संदर्भ निबंध
२९६०
२३६९३
५।१२।८२

# जोशीपुराण

# जोशीपुराण

श्री. ज. जोशी

REFBK-0023683

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशक :
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार
अष्टभुजा रस्ता, पुणे ३०

सर्व हक्क सुरक्षित

मुखपृष्ठ : चित्रकार शि. द. फडणीस

प्रकाशनकाल : १ ऑगस्ट १९८२

मूल्य ३० रुपये

मुद्रक :
चिंतामणी सदाशिव लाटकर
कल्पना मुद्रणालय
शिव-पार्वती
टिळक रोड, पुणे ३०

## पुराण सांगण्यापूर्वी

जुन्या पुण्यातून हिंडत असताना अनेक पुरातन वाडे पाडले जात असल्याचे व त्या ठिकाणी सीमेंट काँक्रिटचे ' ओनरशीप ब्लॉक ' तयार होत असल्याचे दृश्य दिसते. ते पाहिल्यावर माझ्या मनात संमिश्र भावनांचा कल्लोळ उठतो.

ते वाडे पूर्वी केव्हा आणि कुणी बांधले असतील कुणास ठाऊक ! पेशवाईच्या उत्तर काळाने या वाड्यांना जन्म दिला असावा. त्यात तेव्हा संपन्न एकत्र कुटुंबे नांदत असत.

अव्वल इंग्रजीत पुण्यात नोकरदारांची संख्या वाढल्यामुळे या वाड्याच्या दोन दोन तीन तीन खोल्यांमधून बिऱ्हाडे राहायला लागली. एका वाड्यात आठ ते दहा बिऱ्हाडे असत. त्यांची संस्कृती आणि रीतरिवाज सारखे असत. ते ' वाडा जीवन ' वैशिष्ट्यपूर्ण असे. ' बिऱ्हाडाचा वाडा ' ही खास पुणेरी संस्था म्हणावी लागेल. मुंबईत वाडा संस्कृती बहुधा कधीच नव्हती. चाळ आणि वाडा या दोहोंमध्ये फार अंतर आहे.

माझा तारुण्यापर्यंतचा काळ वाड्यातच गेला आहे. वाडा जीवनाबद्दल मला फारसे प्रेम नाही. ते नाहीसे झाल्याचे दुःखही नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९६०
दा. क्र. २.३.६.८३
निबंध चव्हाण
ग्रंथ शाखा (स्थल प्रत)

# १

## सुखदुःखाची सहचरी

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

मी कधी नव्हे ते लिहिण्याचे कागद घेऊन टेबलापुढे बसलो आहे. हातात पेन आहे. चेहरा गंभीर आणि विचारमग्न आहे. इंग्रजी पहिली-दुसरीच्या (हल्लीच्या पाचवी-सहावीच्या) वार्षिक परीक्षेत पेपर लिहायला बसलेल्या आठ-दहा वर्षांच्या मुलासारखा माझा चेहरा दिसत असावा. मी विचारमग्न वगैरे असलो म्हणजे अगदीच हास्यास्पद दिसतो, हे मला माहीत आहे. मी 'लेखक' आहे, पण स्वतः लिहिण्याचा गेली कित्येक वर्षे मला सराव नाही; त्यामुळेच पेनमधून अक्षरे गळायला त्रासच पडत आहे.

तसं म्हटलं तर मी माझं कोणतंच काम स्वतः कधी करीत नाही—केलेलं नाही. आंघोळीच्या वेळी लागणारा गंजिफ्रॉक किंवा टॉवेलदेखील मला स्वतःला दांडीवर वाळत असलेला सापडत नाही. मी त्याबद्दल घरात मोठमोठ्याने पुकारा करतो आणि तिन्ही-चारी खोल्या दणाणून सोडतो. मग माझी पत्नी सौ. कमल हातातले काम बाजूला सारून दांडीवरचे कपडे काढून देते. गेली चाळीस-बेचाळीस वर्षे हाच क्रम चालू आहे. मंडई किंवा वाण्याचे सामान मी कधी आणलेले नाही. गणपतीच्या पूजेची तयारी काय असते, नवरात्रात समई चोवीस तास तेवत ठेवायची असते, वगैरे गोष्टींची काळजी मला नाही. इतका प्रदीर्घ काळ संसार करूनही मला त्या गोष्टींचे ज्ञानही नाही. "तुम्हाला पाव किलोची किंवा अर्ध्या किलोची मापेही ओळखता यायची नाहीत असं मी पैजेवर सांगते.

चाळीस-बेचाळीस वर्षांचा संसार तुम्ही ' केला ' नाहीत, तो ' झाला '... आंधळयाची गुरं देव राखतो तसा हा प्रकार आहे. " असं कमलाचं मला सर्टिफिकेट आहे. संसारातील इतर गोष्टींबद्दलचे एक असो, पण माझ्या लेखनाबद्दलही गेल्या पंचवीस-तीस वर्षांत तसंच म्हणावं लागेल. तिने कागद घेऊन समोर बसायचं. सुवाच्य-सुंदर अक्षरात लिहायचं आणि मी खोलीत फेऱ्या घालीत काहीतरी मजकूर सांगायचा, असा परिपाठ आहे...प्रत्येक गोष्टीत ती प्रमुख भागीदार आहे... मी तसा दुय्यमच आहे. मी लिहायला बसलो आहे खरा, पण तसा मी कित्येक वर्षांत बसलेला नाही याची मला जाणीव आहे. मला स्वतःलाही देखील चमत्कारिक वाटत आहे. थोडं हसूही येत आहे.

टेबलासमोरच्या खिडकीजवळ कॉट आहे. तिथे ती पडली आहे. वरच्या कपाटात औषधाच्या गोळ्या आहेत. दोन-तीन महिन्यांपूर्वी तिला मोठा आजार झाला. तेव्हापासून तिचा चेहरा पांढुरका आणि विवर्ण झाला आहे. डोळे मिटून ती पडली आहे.

मध्येच तिने विचारले, " काय लिहिताय ? "

मी हसलो आणि म्हणालो, " ते तुला सांगण्याजोगं नाही. "

तीही हसली. " तुम्ही आता या वयात प्रेमपत्र लिहिणार नाही...आणि जेव्हा तरुण वय होतं तेव्हा तरी कुठे तशी हिम्मत केलीत म्हणा !...मग आता मला न दाखवण्याजोगं काय आहे ? "

अशा तऱ्हेचं घालूनपाडून बोलण्यात किंवा चाबकाच्या फटकाऱ्याप्रमाणे झणझणीत बोलून जुने वर्म काढण्यात ती निपुण आहे. मला सांगावेच लागले, " मी तुझं स्वभावचित्र लिहितो आहे...' ललित 'साठी."

" आता तेवढंच राहिलं आहे... तुम्हाला आता इतर काही लिहिता येत नाही म्हणून मग संपादक म्हणाले असतील—निदान बायकोबद्दल तरी लिहा..."

मी हसलो आणि पुढ्यातल्या कागदावर लिहायला सुरुवात केली. कष्टाने लिहीत गेलो. आजपर्यंतचे अनेक लेख आणि कथा आम्ही दोघांनी लिहिल्या आहेत...हा लेख मात्र मी एकटाच लिहितो आहे.

आमच्या लग्नाला यंदा बेचाळीस वर्षं पूर्ण झाली. माझं वय तेव्हा चोवीस वर्षांचं होतं. सामान्य नोकरी होती. वडील सरकारी नोकरीत होते. आई

नव्हती. पण म्हातारी आणि जवळ जवळ विकलांग आजी होती. खाली भावंडे चार होती. पुण्यातल्या सदाशिवपेठी ब्राह्मणांचा जसा आर्थिक दृष्टीने आक्रसलेला संसार असतो तसा वडलांचा होता. या महिन्याची तोंडमिळवणी पुढच्या महिन्यापर्यंत होत नसे. महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात तर घरात मुळीच पैसा नसे. पहिल्या तारखेला पगार होई तो दिवस एखाद्या सणासारखा वाटे... आम्ही सगळे त्या दिवशी पाव बिस्किटे खाऊन तो साजरा करीत असू....
" तुमच्या घरात आल्यावर मला हे पहिल्या तारखेचं प्रकरण कळलं. माझ्या माहेरी तसं नव्हतं. नेहमीच घरात पुरेसे पैसे असत... माझं एक स्वप्न आहे. आपल्या घरातही हा पहिल्या तारखेचा उत्सव नसावा...पगाराची वाट पाहावी लागू नये." असं लग्नानंतर थोडा जास्त परिचय झाल्यावर ती म्हणे. मी सेवानिवृत्त होईपर्यंत तिचं ते स्वप्न पूर्ण झालंच नाही.

घरात बाई नसल्यामुळे सर्व प्रकारची अनास्था होती. कुणाच्याच वागण्यात शिस्त अशी नव्हतीच. त्यामुळे आसपासच्या घरात आमचा बोजवारा उडाला होता. आजीनं माझं लग्न चोविसाव्या वर्षीच करायचं ठरवलं. फारशा मुली सांगून आल्या नाहीत. कदाचित असंही असेल की आमच्या कुटुंबाची राहणी आसपासच्या छोट्या जगाला मान्य नसावी. कुणालाही आपली मुलगी शिस्तबद्ध आणि व्यवस्थेशीर घरात पडावी असं वाटतं. पुणं हे चित्पावन ब्राह्मणांचं आगर! सुरेख ऐटबाज मुलींबद्दल प्रसिद्ध...पण मला तसं कुणी सांगून आलं नाही. प्रेमविवाहाचा अर्थात तसा प्रश्नच नव्हता.

प्रेमविवाहाबद्दल ( थोडं विषयांतर करून ) लिहितो...आम्ही कॉलेजात असताना त्याविषयी फार बोलले जाई...आजही जातं. पण माझ्या अनेक परिचितांपैकी एकाचाही प्रेमविवाह झालेला नाही. उपजातीत देखील कोणी लग्न केलं नाही—सगळ्यांनी सांगून आलेल्या मुलींशी, हुंडापाडा घेऊन जुन्या पद्धतीनं लग्नं केली. माझ्या दोन्ही मुलांची आणि भावंडांची लग्ने त्याच चाकोरीतली झाली. मला वाटते, इतर अनेक विषयांत जसा आपण निष्कारण बकवास करतो त्याचपैकी ' प्रेमविवाह ' हा एक विषय आहे. ज्यांची कुणाची प्रेमलग्ने झाली ते अगदी स्वर्गसुखात आहेत असं नाही. ' ठरवलेलं ' लग्नही असफल होते असे नाही...हा योगायोग असतो.

लग्नात माझी पत्नी सोळा वर्षांची होती. सासरे खानदेशमध्ये नोकरीला होते.

मे महिन्याच्या सुटीत त्यांनी पुण्याला बिऱ्हाड केलं होतं. रिकामपणाचा उद्योग म्हणून त्यांनी 'स्थळं' बघण्यास सुरुवात केली होती. तेव्हाही पुणे ब्राह्मणांच्या 'लग्नाची बाजारपेठ' होतं. इथे आलोच आहोत तर जरा हातपाय हलवून बघावेत असा त्यांचा विचार असावा. त्यांना आमचं 'स्थळ' हाती लागलं. तिचे वडील व्यवस्थित आणि टापटिपीचे गृहस्थ होते. सहसा त्यांनी आपली मुलगी आमच्यासारख्याच्या घरी दिली नसती. तेच पुढे माझ्या पत्नीला गमतीने म्हणाले होते, "तुझ्या सासऱ्याचं बोलणं रुबाबदार आणि पुणेरी! बैठकीच्या खोलीत कॉट, टेबल वगैरे दिसलं...शिवाय कलेक्टर ऑफिसातली नोकरी! तेव्हा खूप पैसे खायला मिळालेले असणार असा मी हिशोब केला. पण माझा होरा चुकला."

मुलगी बघायला मी एकटाच गेल्याचे आठवते. काळोख्या खोलीत जाजमावर ती येऊन उकिडवी, खाली मान घालून बसली. मी काय बघितले आणि मला काय कळले हे सांगता येत नाही. कमला म्हणते, "फक्त तुमचे दोन्ही हात तेवढे मला दिसले. ...वर मान करून बघणं शक्यच नव्हतं." एवढं बोलून ती हसते. आणि पुढे सांगते, "त्या वेळी मला दोन जोश्यांनी पसंत केलं होतं. पण ते जोशी बेळगावचे होते... वडील म्हणाले त्यातल्या त्यात पुण्याचा जोशी बरा... बेळगाव आणखीनच लांब होऽ...मला जर बेळगावचा जोशी मिळाला असता तर कदाचित जास्त बरं झालं असतं. पण पत्रिकेत पुण्यातला जोशी होता."

लग्न झाल्यावर आपल्या सोळा वर्षांच्या मुलीला आमच्या घरात ठेवून सासरे आणि सासूबाई खानदेशात निघून गेले. पुढे त्यांचे व मुलीचे वर्षभरात दर्शन झाले नाही. मला वाटते मायेच्या बाबतीत आज जो हळवेपणा आहे तसा तेव्हा नव्हता. निदान तसे प्रदर्शन तरी नव्हते. तेव्हाची मंडळी जास्त कठोर हृदयाची होती.

वैवाहिक जीवनाच्या पहिल्या दहाबारा वर्षांबद्दल लिहिण्याला फारसा अवसर नाही. ती वर्षे अतीव कष्टाची, विवंचनेची आणि एक प्रकारच्या मानहानीची गेली, इतकेच म्हणतो. माझ्या सोळा वर्षांच्या बायकोनं त्या सर्वाला धैर्यानं तोंड दिलं. माझी आजी तेव्हा अर्धांगाने आजारी असून तीनचार वर्षे अंथरुणावर लोळली... बिऱ्हाडाच्या दोनतीन खोल्यांच्या अपुऱ्या जागेच्या एका कोपऱ्यात तिचे सर्व विधी चालत. आम्हा दोघांचे शयनगृहही तेच होते. मला त्याचा राग येई. मी

फार कुरकूर करी. पण कमलाच्या कपाळाला कधी आठी देखील पडली नाही. ती सगळी घाण निस्तरण्याचे काम मनोभावे करी. त्या वेळी ती म्हणाली होती, " ही सगळी नियती आहे... आपल्या कपाळी असं आयुष्य आहे. ते काढल्याशिवाय गत्यंतर नाही... निष्कारण आदळआपट करण्यात अर्थ नाही." हे बोलणाऱ्या मुलीचं वय वीस वर्षांच्या आतलं होतं... तिच्या मनाची खोली मला तेव्हा थोडीशी कळली. मी स्तिमित झाल्याचे आठवते.

आम्ही दोघे विवाहित, वडील पंगू, आजी अर्धांगाने ग्रस्त...भावंडे बेजबाबदार आणि बरीचशी बेशिस्त!... मी स्वतःही त्यांना शोभणारा... असा सगळा लबेदा घेऊन कमी पैशात संसार करायचा ही एक कसरतच होती— तिच्यामुळे ती पार पडली. पूर्वी आमच्या घरात सर्व ठिकाणी उधारी असे. कर्जाचे छोटेमोठे पुंजके असत. कमलाने वडलांचा विरोध असूनही त्या उधाऱ्या थांबवल्या आणि घराला शिस्त लावली. आमच्यावर अनेक वर्षांची बेशिस्तीची पुटे चढली होती. आम्हा सर्वांना नीट मार्गावर आणणं फारच कर्मकठीण होते.

पहिली दहाबारा वर्षे अशा व्यापात गेली. तेवढ्या अवधीत भावंडांची शिक्षणे आणि लग्ने झाली. त्यांची निरनिराळी घरे झाली. कर्ज खूप कमी झाले आणि आम्ही थोडे स्थिरावलो. तोपर्यंत खाणेपिणे, कपडेलत्ते यांतले सौंदर्य कधी कळलेच नव्हते. कमलाला दोनच पातळे असत. मला दोन नेहरूशर्ट आणि पायजमे... लग्नकार्यात, सणासमारंभात, आम्ही उभयता तसेच जात असू. नातेवाइकांत त्यामुळे आमची प्रतिष्ठा शून्याच्याही खाली गेली होती.

इथेच माझ्या संसाराचा एकंदर गोषवारा देणे योग्य ठरेल. आमची नारायण पेठेतली जागा अत्यंत गैरसोयीची होती. आणि बरेच शेजारी कुत्सित स्वभावाचे होते. बाहेर चौकात मोठा नळ होता. तिथून पाणी वाहून न्यावं लागे. हे पाणी भरण्याचे काम बहुतेक वेळा कमलालाच करावे लागे. ती आता म्हणते, " पाण्याचं आणि माझं वाकडंच दिसतंय... नारायण पेठेत पंचवीस-तीस बादल्या उरापोटी न्याव्या लागत... संभाजी पार्कसमोरच्या ब्लॉकमध्येही मालकाशी भांडण असल्यामुळे पाण्याचा खडखडाटच होता... मालक तसे वागले हे बरंच झालं. त्यामुळे आपोआपच व्यायाम घडला. अन्न पचण्यासाठी बॅडमिंटन वगैरे खेळण्याची जरूर भासली नाही."

त्या दिवसांत दारिद्र्याप्रमाणेच माझ्यावर अपत्यवियोगाचं दुःखही कोसळलं.

माझा पहिला मुलगा बरेच दिवस आजारी होता. घरातली कामे करता करता त्याची शुश्रूषाही नीट करता आली नाही, तिला अशी खंत वाटते...दुसऱ्या मुलीच्या वेळी ती माहेरी गेली होती. आठ-दहा दिवसांत ती मुलगीही गेली. शेजारीपाजारी म्हणायला लागले की या बाईची मुलं जगणं कठीण! कमलाच्या वडिलांनी विश्रांतीसाठी तिकडे राहण्याचा आग्रह खूप केला. पण महिन्याभरातच ती एकटी परत आली. मला म्हणाली, "तुम्हाला धीर द्यायला इथे कोणी नाही म्हणून आले...तुम्ही मनाला फार लावून घेऊ नका. सध्या ग्रहमान वाईट आहे म्हणून असं घडतंय. यापुढे कदाचित सगळं ठीकही होईल...जे नशिबात असतं ते भोगावंच लागतं."

मी त्या दिवसांत मनाने अगदी जमीनदोस्त झालो होतो. पण संकटाला सामोरे जाण्याचा चिवटपणा आणि धमक तिच्यात भरपूर होती. नेहमी खोचून बोलणाऱ्या तिने मला धीर दिला. तेव्हापासून तोच पायंडा पडला. धीर देणे, कौतुक करणे, समजूत घालणे, ही सगळी कामे तिच्याकडे आली. ती म्हणते, "लग्न झाल्यापासून माझे कधी कुणी लाड केले नाहीत. कौतुकही नाही... एकेकाचं नशीब तसं असतं."

कमला नशीबवादी आहे. तशीच बरीचशी कर्मठ आणि धार्मिक वृत्तीची आहे. आमच्या घरात देवधर्म, सणवार, कुळाचार सगळे व्यवस्थित व्हावे असा तिचा कटाक्ष असतो. आमच्या घरात अजून एकही अंडं फुटलेलं नाही. पण चातुर्मासात कांदा आणि वांगीही वर्ज्य आहेत. घरातील लग्ने चित्पावन जातीतच व्हावी असा तिचा हट्ट असतो. या बाबतीत कोणताही प्रतिवाद ऐकून घ्यायला ती तयार नसते.

तिच्यामुळे घराची धाटणीही एकोणिसाव्या शतकातल्या ब्राह्मणी कुटुंबाप्रमाणे आहे. डायनिंग टेबल आले तरी प्रसंगविशेषी पाट आणि चांदीच्या ताटांची पंगत असावी आणि बायकांनी वाकून वाढावे अशी तिची हौस आहे.

इतकं सगळं जरी असलं तरी मुलांनी किंवा मी बाहेर मांसाशन करण्यास तिची हरकत नाही. मागे मी कधी कधी मद्यपानाच्या मैफलीला दुसऱ्याकडे जात असे. एकदा ग. वा. बेहेरे म्हणाले, "या पुढची पार्टी तुमच्याकडे"— मी म्हटले, "तसं नको—मुलांवर वाईट परिणाम होईल!"

बेहेरे म्हणाले, "आमच्या मुलांवर वाईट परिणाम नाही का होणार? तुमच्या

घरीच पार्टी व्हायला हवी.'

मी भीत भीत तो विषय कमलाजवळ काढला. ती विरोध करील असं वाटलं होतं. पण आश्चर्य म्हणजे वेहेऱ्यांचं म्हणणं तिला पटलं. घरात मांसाशन करायचं नाही या अटीवर तिनं संमती दिली.

आमच्या बाहेरच्या हॉलमध्ये पाच-सात मंडळींची पार्टी झाली. कमला आतून बघत होती. मधून मधून खायचे पदार्थ आणून देत होती. वेहेरे थट्टेने तिला म्हणाले, "काय हो...ब्राह्मणाचं घर विटाळलं म्हणून रागावलात काय?"-- ती हसली आणि म्हणाली, "अहो रागावून कसं चालेल? अतिथिसत्कार हा आपला धर्म आहे...मला इतकंच म्हणायचं आहे की निदान ब्राह्मणाचं एखादं घर बिनविटाळलेलं राहिलं तर काही बिघडणार नाही!"

बऱ्याच वर्षांनी आम्ही उभयता, आमचा मुलगा आणि वडील एवढेच कुटुंब एकत्र उरले. त्याच दिवसांत आम्ही नारायण पेठ सोडून संभाजी पार्कसमोरच्या ब्लॉकमध्ये राहायला आलो. त्यामुळे आमची राहणी आणि विचारसरणीही बदलली. कमलाचं नवं रूप मला दिसलं. तिच्या बुद्धीची प्रगल्भता आणि कोणत्याही गोष्टीत आनंद व सौंदर्य निर्माण करण्याची क्षमता मला दिसून आली. तेव्हापासून आम्हा उभयतांचे जीवन निरनिराळ्या अंगांनी फुलत गेले.

सांगावं की नाही याचा मी विचार करीत आहे. थोडा संकोचही वाटत आहे. पण सुखदु:खाच्या साथीदाराचं पूर्ण चित्रण करायचं असेल तर शृंगाराबद्दल किंवा शरीरउपभोगाबद्दल लिहायलाच हवं. ते वाचताना कुणाला तारतम्य सुटल्यासारखे वाटले तरीही हरकत नाही.

संसाराची आठदहा वर्षे होऊन गेली होती. आम्हाला एकदोन मुलेही झाली होती. अनास्थेमुळे किंवा अज्ञानामुळे त्यांचा अपमृत्यूही झाला होता. वैवाहिक जीवनातील शारीरिक सुखाची ओळख झालेली होतीच. परंतु त्यामधील मौज किंवा सौंदर्य ब्लॉकमध्ये दोघंच दोघं राहायला लागेपर्यंत कधी कळलीच नव्हती. खरं सांगायचं तर आम्हा उभयतांना त्या काळात निराळे शेजघरही नव्हते. त्या प्रक्रियेत काही संथपणा आणि सौंदर्य असू शकते याची जाणीवही नव्हती.

नव्या ब्लॉकमध्ये स्वतंत्र खोली मिळाली. आणि शृंगार फुलला. आम्ही उभयता नवविवाहितांसारखा आनंद उपभोगू लागलो. खोली कशी सजवावी, कपडे कसे करावेत, 'त्या' वेळी काय बोलावे, कसे बोलावे, त्या क्रियेमध्ये

नुसताच शारीरिक धसमुसळेपणा नाही, इतर स्वादिष्टपणा कसा आणावा हे आम्ही तेव्हाच शिकलो. म्हणजे तिने मला शिकवले किंवा मी तिला शिकवले असे नाही. दोघेही आम्ही शृंगाराच्या बाबतीत अगदी बालवर्गाचे विद्यार्थी बनलो आणि एकमेकांच्या आधाराने पुढे प्रगती करत गेलो. त्यातली मौज अवर्णनीय होती.

आम्ही निरनिराळ्या कल्पना त्या दिवसांत लढवत असू. एकदा ती म्हणाली, “ आपण एकमेकांना प्रेमपत्र लिहू.”

मी हसलो आणि म्हणालो, “ नवराबायको कधी प्रेमपत्र लिहीत नाहीत.”

“ मी आजपर्यंत कुणाला प्रेमपत्र लिहिलेलं नाही. तुम्हीही लिहिलेलं नसणार. आपण तो अनुभव घेऊ.” ती म्हणाली.

मलाही त्या विचारात गंमत वाटली, आणि एक निराळीच थ्रिल अंगात सरसरली. तशा आमच्या त्या दिवसांतल्या अनेक कल्पना आहेत. ( प्रिय वाचक मी त्या निर्लज्जपणे या लेखांत लिहिल्याही होत्या. पण लेख कमलाला वाचून दाखवताना तिने कपाळाला हात लावला आणि म्हटले, ‘ तुमची कमाल आहे. अहो असं सगळं तुम्ही लिहिलंत तर लोक दगडधोंडे मारतील...आपल्याला जावई आणि सून आली आहे...नातवंडं वाचायला लागली आहेत...उद्या जर त्यांनी हे सर्व वाचलं तर?...तिचं म्हणणं मान्य करावंच लागलं. मी तो मजकूर आता काढून टाकतो आणि जरा गंभीर लिहायला लागतो. )

मला स्वतःला महत्त्वाकांक्षा नसण्याचा रोग आहे. तो माझ्या वडलांचा वारसा आहे. ते स्वतः बुद्धिमान होते. त्यांच्या अंगात अनेक गुण होते. पण त्यांची कोणतीही गोष्ट लागी लागली नाही. कुठेही त्यांना जय मिळाला नाही. त्यामुळे त्यांची वृत्ती निराशावादी होती आणि तिलाच त्यांनी विनोदबुद्धीची झालर दिलेली होती. आईही थोडीफार तशीच होती. त्यामुळे आकांक्षाहीन असणे हा माझा स्थायिभाव होता—जन्मभर मी कारकुनी केली तिथेही परीक्षा दिल्या नाहीत. त्यामुळे प्रमोशन वगैरे मिळाले नाही. अगदी सामान्य लोकांच्या हाताखाली मी काम केले, पण त्याची कधी खंत बाळगली नाही. आपले जीवन हे असेच अशी माझी धारणा होती.

कमलाचे उलट होते. जीवन झुळझुळीत असावे. चार लोकांत मानसन्मान असावा अशी रास्त अपेक्षा तिची होती. पहिल्या आठ-दहा वर्षांत ती पुरी होणे

अशक्य आहे हे तिने ओळखले असावे.

तसा तिने माझ्या स्वभावाचा चांगला अभ्यास केला होता. ऑफिसच्या परीक्षांचा अभ्यास करावा असं मी एकदा ठरवलं तेव्हा तिने स्पष्ट म्हटले, “ तुम्हाला ते जमणार नाही. तुमची वृत्ती तशी नाही. तुम्ही जन्मभर कारकूनच राहणार ही अगदी सत्य गोष्ट आहे.”

तिने माझ्या मर्मावर घाव घातला होता, पण तिचं निदान अचूक होतं. मी थोडा बेचैन झालो. तेव्हा तीच म्हणाली, “ तुम्हाला नाहीतरी लिहिण्याचा नाद आहे...तुम्ही त्यातच मन घाला...कदाचित दिशा फाकतील.”

लग्नापूर्वीपासूनच मी गोष्टी वगैरे लिहीत होतो. पण तिला मी त्या व्यापात कधी घेतले नव्हते. ती एक अडाणी आणि अप्रबुद्ध बाई आहे, माझ्या लिखाणात किंवा कोणत्याही बौद्धिक बाबतीत तिला रस असणार नाही, असे मी धरून चाललो होतो. तीही बरीच वर्षे मी लिहिलेले वाचत देखील नसे. पण एकदा कसं कुणास ठाऊक ती म्हणाली, “ तुमचं अक्षर वाईट आहे...शुद्धलेखन तर तुम्हाला येत नाही, त्यापेक्षा मी तुमचं लिहून दिलं तर ? ”

प्रथम तिने माझ्या एकदोन गोष्टी आपल्या सुंदर अक्षरात कॉपी करून दिल्या. तेव्हा मी ‘ झंकार ’ दिवाळी अंकात गोष्ट देत असे. कमलाने कॉपी केलेली गोष्ट मी तिकडे पाठवली. संपादक प्रा. ना. सी. फडके यांनी मुद्दाम पत्र लिहून तिच्या अक्षराची स्तुती केली आणि म्हटले, “ यापुढे तुमचे लेखन जास्त सुधारेल अशी मला खात्री वाटते.”

उत्साहित होऊन मी तिला मजकूर सांगण्यास सुरुवात केली. त्यामुळे आमच्या जीवनात एक निराळीच रोमांचकारी लज्जत आली हे कबूल करायलाच हवं.

मी जवळ जवळ दोन अडीच तपे बरेवाईट लेखन केले, ते अक्षर किंवा अविनाशी आहे असा वेडा भ्रम मला मुळीच नाही. परंतु त्यामुळे आमच्या वैवाहिक जीवनात जो आनंद निर्माण झाला त्याची चव सांगता यायची नाही. गेली पंचवीस वर्षे आम्ही लेखनावरच बोललो. त्याच व्यापात राहिलो. मिलिटरी खात्यातली माझी कारकुनाची नोकरी फार कटकटीची होती. सकाळी नऊला दोन घास पोटात ढकलून मी घराबाहेर पडे व संध्याकाळी सहाला परत येई. सायकलवरून मला दररोज कमीत कमी सात-आठ मैल जावे लागे. माझे

कचेरीतील कामही बेरजा वजाबाक्यांचे, म्हणजेच कंटाळवाणे होते.

संध्याकाळी घरी आल्यानंतर माझे साहित्यिकात रूपांतर होई. थोड्या गप्पा झाल्यानंतर दिवसभरात सुचलेला विषय मी कमलाजवळ बोले. ती त्यावर टीकाटिप्पणी करी. कथा लिहायला योग्य विषय आहे असे ठरले म्हणजे रात्री जेवणानंतर मी मजकूर सांगण्यास सुरुवात करी. दिवसभराच्या श्रमांनी आम्ही दोघे थकलेले असू पण कंटाळा येत नसे...लिहिण्यास आनंद वाटे.

तसे आमचे सारखे लिहिणे चालूच असे. सकाळी आंघोळीचे पाणी तापायला वेळ असला आणि तिची भाजी वगैरे चिरून झालेली असली तर वीस-पंचवीस मिनिटे सवड असे. तेव्हा लगेच माझे कथा सांगणे आणि तिचे लिहिणे सुरू होई. संध्याकाळी आम्ही लिहीत असलो आणि कुणी परिचित गप्पा मारायला आला तरीही आम्ही त्याच्या नकळत कागद बाजूला सारून गप्पांना सरसावत असू. तो माणूस गेला आणि थोडा अवसर मिळाला तर लगेच आमचं लिखाण सुरू होई. बाहेरच्या माणसाला आमच्या या सहजीवनाबद्दल काहीही कल्पना नसे. आम्ही इतर चार संसारी नवराबायकोसारखे आहोत असे त्याला वाटे. कारण सांसारिक कर्तव्यात आमची कधी कुचराई नसे. आमच्या या लेखनाला आम्ही थट्टेने ' होम इंडस्ट्री ' असे संबोधत असू.

लेखनाच्या या नादात कमलाचा सर्व तऱ्हेनं सहभाग होता हे आश्चर्य! मी याबद्दल तिला विचारले तेव्हा ती म्हणाली, "तुम्ही भिक्षुक असतात तर मी सोवळं नेसून तुमच्याबरोबर जेवायला आले असते...दुकानदार असतात तर कौंटरवर बसले असते. मला वाटेल ते काम करायची बुद्धी आहे. मी शिकले नाही इतकेच." खरे तर तिच्या माहेरी लग्नापूर्वी एखादे मासिक किंवा गोष्टीचे पुस्तकही येत नव्हते. ती परंपराच तिथे नव्हती. पण हिंदू स्त्रीच्या आत्मसमर्पण वृत्तीमुळे तिने या अनोख्या विषयातही रस घेतला. लग्नापूर्वी तिला हरिभाऊ आपटे किंवा ना. सी. फडके यांची नावेही माहीत नसावीत. पण वाङ्मयात रस घ्यायचे ठरल्यावर तिने माझ्या बरोबरीने अनेक पुस्तकांचे वाचन केले. शब्दकोषाच्या साह्याने आम्ही संस्कृत आणि हिंदी भाषांमधील उत्तमोत्तम ग्रंथ त्या काळात वाचले. मेघदूत, शाकुंतल, सुभाषित-रत्नहार, ज्ञानेश्वरी, तुलसी रामायण, प्रेमचंद आणि शरच्चंद्र या ग्रंथांचा आनंद दोघांनी मिळून घेतलेला आठवतो.

मी नेहमी आसपासच्या व्यक्तींबद्दल आणि संसाराबद्दल कथा लिही. त्याच्याबद्दल मी नेहमी बोले. आम्हा दोघांनाही त्या त्या परिचित व्यक्तींकडे पाहताना निराळाच दृष्टिकोण लाभला आणि गंमत वाटायला लागली... ' नानूमामा '... ' वृंदावनच्या मामी ' किंवा ' पंढरीनाथ ' ही आमच्या परिसरातील खरी माणसं. त्यांच्या अनेक छटा, त्यांच्यावर लेखन करताना आम्हाला नव्याने दिसून आल्या.

' आनंदी गोपाळ ' लिहीत असताना आम्ही दोघेही भरात होतो. संध्याकाळी ऑफिसमधून घरी आलो की मी स्नान करून उघड्या अंगाने गणपती अथर्वशीर्ष म्हणत बसे. ती मुलांची जेवणे उरकून घेई. मग आम्ही दोघं लिहायला बसत असू. ते लेखन रात्री अकरा-बारापर्यंत चाले. आपल्याला या पुस्तकामुळे काही नाव मिळणार आहे ही कल्पना नव्हती. पण आम्ही अगदी रंगून गेलो होतो. स्त्रियांची स्वभावचित्रे आणि संवाद याबद्दल ती नेहमी जागरूक असे. संवादातला एखादा शब्दही तिला खटके. लेखन संपले की जवळ जवळ मध्यरात्री आम्ही आमच्या एका आवडत्या देवळात जाऊन दर्शन घेत असू, मग जेवण होई. असे झपाटलेले दिवस पुन: येणार नाहीत.

' रघुनाथाची बखर ' जास्त सखोल आहे, आणि तिचा बोलबाला होईल असं कमलाचं मत होतं. पण तसं झालं नाही. कादंबरीच्या पहिल्या शंभरदीडशे पानांत मी अण्णा कर्वे यांच्याबद्दल सांगत गेलो. ती म्हणाली, " तुम्ही अण्णांना बाजूला ठेवा. त्यांच्यामुळे कादंबरी फेल होईल–" शेवटी तिने आता अण्णांबद्दल काहीही लिहिणार नाही असा सत्याग्रह केला. मग माझी गाडी रघुनाथावर आली.

गेली पंचवीस-तीस वर्षं आमचा हाच छंद चालला आहे. माझ्या परिचयाचे जे इतर लेखक आहेत त्यांच्या संसाराची आणि लेखनाची फाळणी झालेली असते. एकाचा दुसऱ्याशी संबंध नसतो. नाव घेऊन सांगता येईल पण तसं मी करत नाही. त्यांच्या बायकांचे मनोविश्व अगदी निराळे असते. रात्री शयनगृहात भेटतात ते नुसते नवरा बायको म्हणून ! पण आमचं तसं नाही. बोलायला विषय नाही किंवा एकमेक बोअर झालो आहोत असं कधी होत नाही.

संसारात मी दुर्दैवाचे टक्केटोणपे खूप खाल्ले. अनेक दु:खं अनुभवली. परंतु हे कबूल करावंच लागेल की, तसं माझं नशीब अगदीच गचाळ नाही. कमलाने घरची आघाडी उत्तम संभाळली. माझ्याकडे अनेक लोक येतात. कुणाचा स्वभाव कसा आहे, माझ्याबद्दल मत काय आहे, कोण किती स्वार्थी आहे,

याबद्दलचे मत ती आतल्या घरात बसून बोलण्यावरून बनवते. बहुधा ते बरोबर असते. बाहेरच्या दिवाणखान्यात येऊन परिचितांशी देखील बोलत बसण्यास तिची अनिच्छा असते. आमच्या घरात वागणुकीची तशी जुनी पद्धत आहे. 'बायकांनी' प्रत्येक विषयात लबालबा बोलू नये असं ती म्हणते. शिवाय स्वत:चं रूप व्यक्तिमत्त्वहीन किंवा सामान्य आहे याची तिला कल्पना आहे. ती म्हणते, "बायको देखणी किंवा चटपटीत असली तर तिनं बाहेर येणं किंवा गप्पा मारीत बसणं इतरांना आवडतं. माझं तसं नाही."

संसाराचं जवळ जवळ अर्धशतक होत आलं. आता काहीबाही व्याधी सुरू झाल्या. उत्साह मावळत चालल्याची जाणीव होते. तीनचार महिन्यांपूर्वी तर कमलाला हार्ट ॲटॅक आला. दोन-तीन दिवस धावपळीत गेले. बरी झाल्यावर मी विचारले, "तुला नक्की काय वाटलं?...भय वाटलं का?"

ती म्हणाली, "मुळीच नाही...उलट, जीवनाच्या या बाजूकडे आपण परतलो आणि पुन्हा बाराखडी काढायला बसलो याचं वाईट वाटलं."...थोडा वेळ जाऊ देऊन तिने पुढे सांगितले, "मरणाचं दु:ख कशाला वाटेल?... मला तर पानावर बसून चारी ठाव पक्वान्नाचं जेवण जेवल्यासारखं आणि नंतर विडा चघळत असल्यासारखं वाटत आहे..."

# २

## सदाशिवपेठी संस्कृती !

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

दोन-चार दिवसांपूर्वी एका ढगाळ दुपारी मी सहज पुण्याच्या रस्त्यांवरून भटकत होतो. भटकण्याचा माझा जन्मजात नाद आहे. जुन्या पुण्याच्या रस्त्यावरून किंवा गल्लीबोळातून निर्हेतुक हिंडण्याची मला हौस आहे. अशी भटकंती चालली असताना माझं मन सैरभर असतं. अनेक भावभावना माझ्या अंतर्मनात सारख्या उचंबळत असतात. नानाविध दृश्यांची आणि आठवणींची गर्दी मनात दाटलेली असते. अशा वेळी माझा मी राहात नाही. मी कोणाशी बोलत नाही. डोळे उघडे असतात पण काहीही पाहात नाही. भुताटकीने झपाटलेल्या माणसासारखा मी नुसताच पावले टाकीत असतो.

कसा कुणास ठाऊक पण मी त्या विवक्षित रस्त्याला लागलो...होय!... तोच तो रस्ता...कोपऱ्यावरची ती तालीम...तिच्या समोरची तीन मजली दगडी इमारत...थोडं पुढे गेलं की डाव्या बाजूचा पेशवेकालीन हौद! अगदी लहानपणी तिथे बायका कपडे धूत असलेल्या किंवा पुरुष डोक्यावर भडाभडा बादल्या ओतून घेत असलेले मी पाहिले आहेत. ते दृश्य माझ्या मनात घर करून आहे. हौदावर आंघोळ करीत असताना आमच्या वाड्यातले विसूभाऊ मोठमोठ्याने विष्णुसहस्रनाम म्हणत ते स्वर अजूनही माझ्या कानांत रेंगाळत आहेत. आंघोळ झाल्यावर 'विश्वं विश्वषट्कारो' म्हणत असताना डाव्या खांद्यावर धुतलेल्या धोतराचा पिळा व उजव्या हातात भरलेली बादली असलेले

विसूभाऊ लहानपणी मी पाहिलेले आहेत...लहानपणी म्हणजे जवळ जवळ पन्नास-साठ वर्षांपूर्वी !...अजून तिथे हौद आहे पण तो ओकाबोका आहे... प्राण गेलेल्या कलेवरासारखा आहे. त्यात आता पाणी नाही. तिथे कुणी आंघोळी करत नाही. विसूभाऊंना कैलासवासी होऊनही आता चाळीस-पंचेचाळीस वर्षे लोटली आहेत. ते त्या हौदावर असणे शक्यच नाही. पण त्या कलत्या दुपारी हौदासमोरून चाललो असताना मला एकदम भास झाला की विसूभाऊ तिथे स्नान करीत आहेत. त्यांनी म्हटलेले मंत्र मला ऐकू येत आहेत.

मी झपाटल्यासारखा पुढे चाललो होतो...एकदम जागा झालो. आसपास पाहिले. समोर कोरडा हौद होता, तिथे कोणीही नव्हते. मी टवकारून पाहिले तो रस्ताही 'तो' नव्हता. हौदाशेजारी पूर्वी मोठा पेशवाई पद्धतीचा वाडा होता. भिंतीवर कसली कसली चित्रे काढलेली होती. वरच्या माडीत असलेल्या हंड्या रस्त्यावरूनही दिसत असत. मी चमकून त्या वास्तूकडे पाहिले. तो वाडा तिथे नव्हताच. हंड्याझुंबरं नव्हती, चित्रं नव्हती. तिथे सिमेंट कॉंक्रिटची तीन मजली इमारत होती. निरनिराळे ओनरशीप ब्लॉक सजलेले होते...मी स्तिमित होऊन त्या तीन मजली इमारतीकडे पाहिले. मला किंचित हसू आले. मन आतल्या आत कुठेतरी हलले. माणसानं पुनर्जन्म घेतला म्हणजे त्याचा आत्मा तोच असतो. फक्त वरचं शरीर बदलतं असं गीतेत सांगितलं आहे. पण इथे तर त्या जुन्या घराचा आत्मा आणि शरीर दोन्हीही पार बदललं होतं. त्याकडे बघावंसं वाटत होतं आणि नव्हतंही...मी पुढे निघालो.

ती आमच्या कुटुंबाच्या वास्तव्याची जुनी गल्ली होती. शंभर वर्षांपूर्वी माझे आजोबा तिथे राहायला आले असं म्हणतात. त्याच वाड्यात त्यांनी एक दोन जागा बदलल्या पण ती वास्तू सोडली नाही. माझ्या वडलांचा सगळा संसार तिथे झाला. माझंही निम्मंशिम्मं आयुष्य तिथेच सरलं. शहराच्या या बाजूला आलं की माझं मन कावरंबावरं होतं. जुन्या खाणाखुणा न्याहाळायला लागतं. मी स्वतः नि माझे वडील तिथे राहात असताना मला दिसायला लागतात. या रस्त्याला आलो म्हणजे माझ्यातली कित्येक वर्षं गळून पडतात.

मी चाललोच होतो. डाव्या हाताला पूर्वी मोठी बखळ होती तिथे आता इमारत उठली होती. बरीचशी घरं आता पडली होती. त्यांच्या जागी नवे ब्लॉक्स उठले होते. नवे आटोपशीर संसार उभे होते. पण काही घरं मात्र

अजूनही कमरेत वाकलेल्या अवस्थेत काळाचं ओझं सावरीत कशीबशी उभी होती. त्यांच्या अंगोपांगावर म्हाताऱ्या विकलांग माणसाची कळा होती. चैतन्याचा कुठे मागमूसही नव्हता. वादळामध्ये पिंपळाचं एखादं जीर्णशीर्ण पान उगीचच फडफडताना दिसावं त्याप्रमाणे त्या घराचं स्वरूप होतं. मी चाललोच होतो.

गल्लीच्या मध्यावर मी येऊन उभा राहिलो. डाव्या बाजूला आडव्या अंगाचा तो जुनाट वाडा मान सावरीत कसाबसा उभा होता. बाहेरच्या बाजूला ओटा होता. ओट्याच्या मधोमध दोन दगडी पायऱ्या होत्या. पायऱ्यांच्या वर भला मोठा काळाकुळकुळीत दरवाजा होता. त्याला एक बारकीशी दिंडी होती. त्या दिंडीतून वाड्याचा काही भाग दिसत होता.

वाड्यासमोर मी नुसताच उभा राहिलो. कोणीतरी ओळखेल असे वाटले. माझ्या लहानपणच्या नावानं एखाद्या परिचितानं साद घालावी अशी इच्छा झाली. पण कुणीही हाका मारली नाही. रस्त्यावरून माणसं जात येत होती. कुणीही माझ्याकरिता थांबले नाही. त्या प्रचंड वाड्याकडे मी नुसताच बघत राहिलो.

दिंडीदरवाजा ओलांडून मी आत गेलो. मन एका अनामिक दुःखाने भरून गेले. बॉंबहल्ल्याने बेचिराख झालेल्या शहराची चित्रे असतात त्याप्रमाणे तो वाडा दिसत होता. मी तो वाडा वीस-पंचवीस वर्षांपूर्वी सोडला तेव्हा तो चांगला नांदता होता. निरनिराळ्या बिऱ्हाडांत संसार फुलत होते. आता तिथे तसं काहीच नव्हतं. जिकडे तिकडे धूळ नि पडझड होती. बहुतेक सगळी बिऱ्हाडं केविलवाणी दिसत होती. त्यांच्या दरवाज्यांना कुलपे लटकत होती. वाड्यावर कित्येक महिन्यांत स्वच्छतेचे संस्कार मुळीच झालेले दिसत नव्हते.

त्या ओक्याबोक्या वाड्यात आमच्या पूर्वीच्या बिऱ्हाडाच्या बंद दारासमोर मी भारल्यासारखा उभा होतो. जुन्या काळातली कित्येक दृश्ये दिसत होती. स्त्री-पुरुषांचे आवाज ऐकू येत होते. मी भानावर आलो. आसपास कोणीही नव्हते. तीस-चाळीस वर्षांपूर्वी मनानं जी दृश्यं आणि जे स्वर अभावितपणे टिपले होते, त्यांची भुतं माझ्याभोवती पिंगा घालत होती.

पायरी उतरून मी पलीकडच्या बिऱ्हाडात गेलो. तिथे मात्र कुलूप नव्हतं. मोडक्या दाराशी एक माणूस नुसताच बसला होता. मी त्याच्याकडे पाहिले. त्याला ओळख पटली नाही. मला पटली. पूर्वी तिथे विसूभाऊंचं बिऱ्हाड होतं.

विसूभाऊ म्हणजे कपाळावर दुबोटी लाल गंध आणि मध्ये पांढरा टिळा. तोंडात नेहमी अथर्वशीर्ष ! एखाद्या खोल काळोख्या विहिरीत डोकावून पाहावे त्याप्रमाणे मी त्या माणसाकडे पाहिले... तो विसूभाऊंचाच कुणीतरी असणार !... कदाचित मुलगा असेल किंवा पुतण्याही असेल. मी डोकावून त्याच्या चेहऱ्यातील विसूभाऊंची साम्यस्थळे निरखीत त्याला विचारले, " इथे पूर्वी विसूभाऊंचं बिऱ्हाड होतं ? "

त्याच्या डोक्यात काही प्रकाश पडला नाही. एखाद्या वेड्याकडे पाहावे तसा तो माझ्याकडे बघत राहिला. त्याने विचारले, " तुम्हाला काय पाहिजे ? "

माझ्या मनात भावना दाटल्या होत्या. " अहो, आमचं पूर्वी इथं बिऱ्हाड होतं. विसूभाऊ अन् आम्ही शेजारी... जवळ जवळ तीस-चाळीस वर्षं त्यांच्या नि आमच्या बिऱ्हाडाची भिंत एक होती..."

मी आणखीही बोलणार होतो. विसूभाऊंच्या किंवा इतर बिऱ्हाडातल्या माणसांच्या हकिगती विचारणार होतो...कोपऱ्यात 'मराठे' राहायचे...कोर्टातले कारकून !...बिचाऱ्याला सहा मुली. त्या सगळ्या मुली मला एकदम दिसायला लागल्या...मधल्या भागात आपटे होते...कसलं तरी दुकान होतं त्यांचं. त्यांची बायको देवदेवस्की करी...नवरात्रात महालक्ष्मीला तिच्या अंगात येई आणि घागर फुंकत फुंकत ती घराबाहेर पडे. बऱ्याच गोष्टी विचाराव्याशा वाटल्या. तो वाडा आता निर्मनुष्य झालेला आहे...बरीचशी पडझड झालेली आहे याची नोंद घ्यायला माझ्या मनाची तयारीच नव्हती. मला तो भरलेला वाडाच दिसत होता. चौकातल्या नळावरून बायका पाणी आणत होत्या...बाहेरच्या पायरीवर बसून दोघंतिघं वयस्कर लोक गप्पा करीत होते. घराघरात स्वयंपाक चालला होता. ताटं मांडल्याचे आवाज ऐकू येत होते...

तो माणूस मात्र थंडच होता. माझं मन...माझ्या भावना, त्याला समजत नव्हत्या. त्याचं मन मला कळत नव्हतं. एकमेकाची भाषा न समजणारे आम्ही समोरासमोर उभे होतो. त्याने किंचित त्रासून विचारले, " तुम्हाला काय पाहिजे ? "

" या वाड्यात आम्ही पूर्वी राहात होतो...इकडून सहज चाललो होतो. जुन्या आठवणी झाल्या, आत आलो...इथे कुणीच कसं दिसत नाही ? प्रत्येक बिऱ्हाडावर कुलपं कशी ? "

समोरच्या माणसाला माझं बोलणं किती भावलं कुणास ठाऊक! पण तो किंचित हसत म्हणाला, "अहो हा वाडा पाडून इथे ब्लॉक्स व्हायचे आहेत. मालकानं खूप पैसे घेतले आणि विकून टाकला. लोकं दुसरीकडे राहायला गेली इथे कुलपं लावून!.... कारण ओनरशिपवर क्लेम पाहिजे...कोर्टात प्रत्येकाचे खटले चालले आहेत."

मला हसू आलं. थोडं चमत्कारिकही वाटलं. मी त्या कुलूपबंद बिऱ्हाडांकडे विषादाने पाहिले. तो माणूस स्वतःच्या बिऱ्हाडाला कुलूप न लावता तिथे का बसला होता हा प्रश्न विचारावा असं वाटलंच नाही. त्या धुळीने भरलेल्या परिसराकडे पाहात मी म्हटले, "इथे आलोच आहे तर एकदा सगळा वाडा हिंडून येतो. जुना परिसर न्याहाळतो...चालेल ना?"

तसं त्याला विचारण्यात काहीच अर्थ नव्हता. त्याला माझ्या म्हणण्यातलं काव्यही कळलं नव्हतं. मी तसाच चौकातून मागच्या दारी गेलो.

मागच्या परसात ओनरशिप ब्लॉकचे काम जोरात सुरू होते. चुना-विटांचे ढीग आणि खडीचे डोंगर ठिकठिकाणी होते. मी तिथे जाऊन उभा राहिलो.

उजव्या हाताकडे थोडे दूर बघितले. पूर्वी तिथे एक पिंपळाचा पार होता. संध्याकाळी वटवाघळांच्या ओरडण्याने सर्व आसमंत भरून जाई. पिंपळाची कोवळी, पोपटी पिवळी पाने अंगणात पडलेली असत. सूर्याची किरणे झाडावर पडली म्हणजे पानांच्या शिरा गमतीदार दिसत.

आता तिथे ओकाबोका पिंपळ उभा होता. त्याला शेवटची घरघर लागली होती. थोड्याच दिवसांत त्याच्यावर कुऱ्हाडीचे घाव पडणार होते. त्याच्या म्हाताऱ्या अंगातून रक्ताच्या चिळकांड्या उडणार होत्या. मृत्यूपूर्वी वयस्कर माणसाच्या चेहऱ्यावर ज्या प्रकारचे कारुण्य दिसते तसे त्याच्या अंगोपांगावर दिसत होते.

तो पिंपळ माझा बालमित्र होता.... माझाच काय माझ्या वडलांचा... माझ्या आजोबांचाही तो मित्रच होता. आमच्या तीन पिढ्यांच्या आयुष्यातील सगळ्या घटनांचा किंवा भावभावनांचा तो साक्षी होता. तो मला वडिलांसारखा होता... समवयस्क मित्रासारखाही होता. मृत्यूसमीप असलेल्या त्या पुराणवृक्षाकडे मी त्या कातर दुपारी बघत उभा राहिलो.

मनात अनेक तरंग दाटले. पाच-दहा मिनिटांनी मी त्या पिंपळवृक्षाच्या

बुंध्याकडे गेलो...पूर्वी त्याच्या भोवती मोठा पार होता. खालच्या बाजूला लाल शेंदूर लावलेला मुंजा होता. त्या पारावर कुणी कुणी प्रदक्षिणा घालताना दिसे. माझी आजी तिथे दासबोध वाचीत बसे.

पार अगदीच मोडकळीला आला होता. त्याचे दगड ठिकठिकाणी निखळले होते. माती काढून नेल्यामुळे कुठे कुठे भगदाडं पडली होती. एखाद्या दंत-विहीन म्हाताऱ्याप्रमाणे तो सुरकुतलेला दिसत होता.

मला किंचित हसू आले. त्या मुंजाचा महिमा आठवला. आमच्या लहानपणी कडकपणाबद्दल त्याच्या अनेक आख्यायिका ऐकल्या होत्या... कधी कधी अमावास्येच्या रात्री पिंपळावरून पठणाचे आवाज ऐकू येत...त्या मुंजाला केशरी साखरभात फार प्रिय असे. तोच नैवेद्य त्याला लागे. प्रत्येक कार्यात देव-देवक ठेवण्याच्या पूर्वीच मुंजाला साखरभात देऊन तृप्त करावा लागे. एकदा कुणाच्या तरी लग्नात मुंजाला विसरल्यामुळे साखरभात मिळालाच नाही. सगळं लग्न नीट पार पडलं. सोळाव्या दिवशी गर्भादान होते. रात्री नवरी हिरवा शालू नेसून हातात चांदीचे तांब्याभांडे घेऊन नवऱ्याच्या खोलीकडे जाण्याचा जिना चढायला लागली...कुणीतरी अदृश्य शक्तीने तिला जोराने ढकलले. तिची दातखीळ बसली. ती गडगडत खाली आली. खूप डॉक्टरी उपाय केले पण ती वाचलीच नाही. मागून लक्षात आले की तो मुंजाचाच कोप होता...

लहानपणी अनेक वेळा त्या हकिगती ऐकल्या होत्या. अंग शहारले होते. रात्री घाबरलो होतो. स्वप्नात ती दातखीळ बसलेली नवरी दिसली होती... आता नुसतंच हसू येत होतं !...त्या ओनरशिप ब्लॉकमध्ये येणाऱ्या नव्या फॅशनेबल जोडप्यांना केशरी साखरभाताची काय माहिती असणार ?

मुंजाला मी नेहमीप्रमाणे नमस्कार केला. तिथून मी समोरच्या विहिरीकडे गेलो. विहिरीच्या पाण्याला वास मारत होता. मोडका रहाट तिथेच केविलवाणा उभा होता...त्या विहिरीच्या कट्ट्यावर पूर्वी तुळशीच्या कुंड्या होत्या. आजी तिथे संध्याकाळी सांजवात करी. निरांजनाची ज्योत आताही माझ्या डोळ्यांपुढे शांतपणे तेवत होती.

लहानपणी त्या विहिरीच्या रहाटावर बायका पाणी ओढताना दिसत. कित्येकांची शरीरं त्या पोजमध्ये मनोहर वाटत. मराठ्यांच्या मुली तिथे कायम

असलेल्या आठवतात. रहाटावर असलेले एका मुलीचे मेंदी लावलेले हात दिसतात.

त्या विहिरीचं वैभव त्या वाड्यात नळ आल्यापासून नाहीसं झालं. नळ आले तो दिवस मला आठवतो. अशी संध्याकाळची वेळ होती. वाड्याच्या चौकात नळ येणार होता. तो बघायला सगळी माणसं सोप्यावर जमली होती. उत्सुकता शिगेला पोचली होती. काही वेळाने म्युनिसिपालिटीच्या कामगारानं नळ सुरू केला. पाणी धो धो वाहायला लागलं. पाणी इतकं विनासायास मिळू शकतं ही नुसती कल्पनादेखील रम्य होती. आम्ही सगळे धावत नळापाशी गेलो. धो धो वाहणाऱ्या पाण्यानं हातपाय धुतले. भगिरथानं पृथ्वीवर गंगा प्रथम आणली त्या दिवशीही आनंदाचा इतका कल्लोळ झाला नसेल !

नळाला देखील विसूभाऊंचा आणि मराठ्यांचा विरोध होताच. ते म्हणाले, ' विहिरीचं पाणी शुद्ध झऱ्याचं...जास्त पाचक...नळाच्या पाण्यात विलायती औषधं घातलेली ! ... आम्ही नाही ते पाणी वापरणार ! '...अर्थात त्यांचा तो विरोध दोन-चार दिवसदेखील टिकला नाही...ती दोन्ही बिऱ्हाडंदेखील नळावर नंबर लावून पाण्यासाठी आमच्याशी भांडायला लागली.

हसत मी मागच्या बाजूकडून पुढच्या चौकात आलो...पुढे दर्शनी भागात मालक राहात. ती जागा आता अगदी काळोखात होती. पण मला तिथली सगळी माणसं इतक्या वर्षांनंतर तीस-चाळीस वर्षांपूर्वीच्या स्वरूपातच दिसायला लागली.

वाड्याचे मालक भास्करभाऊ !...तिकडे लांब कुठेतरी जज्ज होते... शिकलेले होते. पगार मोठा होता. घराणे खानदानी होते...

आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांच्या घरातली माणसं काळीबेंद्री होती. भास्कर-भाऊ तर जास्तच !...अंगानं किरकोळ. नेहमी आजारी...त्यांच्या जज्जपणाचं कौतुकच आम्हाला फार वाटायचं....कारण आमचे वडील कारकून !...कुणाचे शिक्षक...एक दोघं तर भिक्षुकच होते. महिन्याची दोन टोकं मिळवताना नाकी नऊ यायचे...तीस....पाच...दोन...ऐशी ही ग्रेड !...घरात माणसांचा खचाळा.. त्या मानानं भास्करभाऊंचा पगार तेव्हा अडीचशे-तीनशे. शिवाय वाडयाचे मालक !...त्यांचे महत्त्व आम्हाला फार वाटे. राजेमहाराजांना द्यावा तसा मान आम्ही त्यांना देत असू.

भास्करभाऊ नेहमी नोकरीच्या गावी असत. दुसरेपणची बायको! तीही वेडसर...पण अंगाखांद्यांवर गोठपाटल्या घालून वावरायची. पट्टेवाल्याच्या आणि सरकारी बंगल्यांच्या हकिगती तोऱ्यात सांगायची...

भास्करभाऊ मे महिन्याच्या सुटीत यायचे तेव्हा रंगरंगोटी व्हायची. त्यांचं प्रत्यक्ष आगमन होण्यापूर्वी महिना महिना वाडा नुसता गर्जत राही. त्यांच्याबरोबर आचारी नि पट्टेवाला असायचा त्याचं अप्रूप वाटे. मे महिन्यात एकदा ते आंब-रसाची मेजवानी देत. आम्ही त्या आंबरसाची वाट पाहात असायचो. हापूसचा आंबा, ब्रेड आणि श्रूजबेरी बिस्किटे हे प्रथम मी त्यांच्याकडं पाहिलं. मे महिन्यात त्यांच्याकडे एखादं लग्नही निघे तेव्हाचा थाट तर अपूर्व वाटे.

भास्करभाऊ वर्षातून एखादाच महिना घरी येत. बाकी सर्व वर्षभराची देखरेख त्यांची विधवा आत्या रंगूताई करीत. तांबडं अवलण नेसलेल्या, दम्याच्या त्रासामुळे सारख्या जर्जर असलेल्या विकेशा रंगूताईंना विसरणं अशक्य आहे. त्यांचा दरारा फार भयंकर असे. त्या वाटेल त्याला फाडदिशी बोलत. एवढे माझे वडील... कलेक्टर ऑफिसमधले! त्यांचा देखील त्या मुलाहिजा ठेवत नसत.

रंगूताई म्हणजे वाड्याचा इतिहासच!... लोक म्हणत की त्या वाड्यात मालकाच्या घराण्यातली माघारी आलेली विधवा राज्य करते. मालकाचं बिऱ्हाड तिथे कधी नांदत नाही... ती समजूत खरी होती की काय कुणास ठाऊक! ...हल्लीच्या बुद्धिवादी जगात तिला सत्य मानणे हास्यास्पद ठरेल... पण भास्करभाऊंच्या वडिलांची बहीणही बालविधवा होऊन त्या वाड्यात राहिली होती... रंगूताई जवळ जवळ सत्तर वर्षांच्या होऊन गेल्या. त्यांच्याजवळ कोणीच नसे. एकट्याच स्वयंपाक करत. सगळा वाडा खराट्याने साफ करीत. पार झाडून सडा घालत. मुंजाच्या पूजेची तयारी करत. मुंजाची पूजा यथासांग होत आहे की नाही यावर लक्ष ठेवीत.

माझे वडील हलक्या आवाजात म्हणत, " रंगूताई म्हणजे मुंजाची बायकोच आहे. मुंजाचं कधी लग्न झालं नाही. रंगूताईला कधी नवरा भेटला नाही... मुंजानं स्वत:साठी तिला इथे आणली आहे... पूर्वी अशीच एक बाई आणली होती... रंगूताई मेली की ह्यांच्या घराण्यात अशीच कुणीतरी विधवा होईल आणि जन्मभर ती आवडीनं मुंजाची सेवा करील "... त्यांच्या त्या बोलण्यात

काही एक गूढ अर्थ होता. लहानपणी तो कळायचा नाही. पण पुढे कळला. दर पिढीत घराण्यातली एक मुलगी तरुणपणी विधवा व्हायची आणि तिथे येऊन तिनं मुंजाची सेवा करायची !... सगळंच फार भयंकर होतं... मीरेचं कृष्णावरचं प्रेम मी पुढे वाचलं. ते आख्यान वाचताना मला मीरेच्या स्वरूपात रंगूताई दिसत हे मात्र खरं !

आता तो मुंजाही गेला, रंगूताईही गेल्या... पुढच्या पिढीत कुणी रंगूताई निर्माण होणार नाही. तो पारही आता पडला आहे. ओनरशिप ब्लॉक झाल्या-नंतर मुंजाची प्रतिष्ठापना तिथे होणार नाही– तो तिथे शोभणारही नाही.

भास्करभाऊंच्या शेजारीच मराठ्यांचं बिऱ्हाड होतं. एकंदर सहा मुली. काही गोऱ्या नि काही काळ्या. दर वर्षा दोन वर्षांनी एका मुलीचं लग्न... ! पत्रिका...मंगळ...हुंडा, मानपान, देणंघेणं.... मुहूर्त यांचा आखाडा ! मोठीचं लग्न ठरलं की तिच्या खालच्या नंबरला शाळेतून काढायची. तिने धुणी धुवायची, भांडी घासायची... 'गृहकृत्यदक्ष' अशी नवरी मुलगी तयार व्हायची. एक थट्टेखोर गृहस्थ म्हणायचे, " मराठ्यांच्या घरात कायम अढी घातलेली आहे. वरचे आंबे खाऊन होईपर्यंत खालचे तयार ! " घरात लग्न असायचं तशी बाळंतपणंही असायची. एका वेळी कधी कधी दोन दोन ! संध्याकाळी उदाचा वास व लहान मुलाच्या रडण्याचा आवाज !

मराठ्यांचे बिऱ्हाड आठवलं आणि हसू आलं. बॉम्बहल्ल्याची भीती असणारं गाव जसं सारखं टेन्शनमध्ये असतं त्याप्रमाणे त्यांचं घर होतं. आपल्या घरातली एखादी मुलगी कोणाशीतरी बोलेल, कुठेतरी प्रेम जमवील, कुलशीलाला बट्टा लागेल या भयानं वयस्कर मराठे पति-पत्नी कायम पछाडलेले असत. ते कोणाही तरुणाला घरात येऊ देत नसत. मुलगी कुणाशी बोलते आहे किंवा काय याबद्दल नेहमी चिंतातुर असत...एक एक मुलगी म्हणजे डोंगराएवढं ओझं होतं. ते त्यांनी कसं वाहिलं असेल कुणास ठाऊक !

मोठी मुलगी नर्मदा !...अशी गोरी आणि फोपशी...पडेल डोळ्याची. तिचं पंधराव्या वर्षीच लग्न झालं... दुसरी कावेरी ! दिसायला बरी. ती थोडी जास्त शिकलेली. आमच्या वाड्यातल्याच एका मुलाशी जिन्यापाशी बोलताना आढळली. खूप भांडणं झाली. शेवटी मालकांना सांगून त्या मुलाचं बिऱ्हाड त्यांनी काढून लावलं. मग सगळं शांत झालं. कावेरीचं लग्न एका बी. ए. बी. टी. शाळा मास्तरशी

झालं. ती पुढे मला कधी दिसली नाही. पण तिला चार-पाच मुलं झाल्याचं कळलं. तो मुलगा मात्र आदर्श प्रेमिक होता. कायम ब्रह्मचारी राहिला... कादंबऱ्या वाचून त्याचं डोकं फिरलं होतं. 'दिव्य' प्रेमाच्या गोष्टी करायचा... नशीब बिचाऱ्याचं !

मराठ्यांच्या कुटुंबाबद्दल लिहायचं म्हणजे त्यांच्या मुलींविषयीच !...तो एक मोठा प्रबंधच होईल. त्यातल्या शेवटच्या मुली शिकल्या. युद्धकाळात कुणी शिक्षिका झाल्या, कुणी कारकुन्या केल्या. पण ऐट ही की कुणी कधी परपुरुषाशी बोलल्या नाहीत....प्रेमविवाह वगैरे केले नाहीत...घरातली भांडी मोरीत खालच्या मानेने घासावीत त्याप्रमाणे ऑफिसात मान खाली घालून इकडे तिकडे न बघता कारकुनी करीत...धन्य त्यांची ! त्यांची लग्नं केव्हा झाली, पुढची प्रजा कशी नि किती आहे याचा हिशोब मजजवळ नाही.

मराठ्यांच्या पलीकडे ढवळे मास्तर !...असे जरात्कारू...किडकिडीत अंगाचे, बायको खूप स्थूल ! एखाद्या मोठ्या जहाजासारखी !...त्यांना मूलबाळ कधी झालंच नाही. बाई त्या अशक्त नवऱ्याला खूप घाबरत. चळचळा कापत. तो भयंकर शिस्तीचा होता. माझे वडील उदाहरण सांगत...दररोज तो रव्याचा एक लाडू दुपारी खायचा. महिन्याचे तीस लाडू डब्यात भरलेले असायचे. एकदा बाईचा लांबचा भाऊ भेटायला आला. त्यांनी त्याला लाडू खायला दिला. महिन्याच्या शेवटी डब्यात लाडू कमी दिसला तेव्हा गुन्हा उघडकीला आला. मग ढवळे मास्तरांनी वेताच्या छडीनं त्या लठ्ठ बाईला अक्षरशः फोडून काढले. तिच्या रडण्या-ओरडण्याने सगळा वाडा दणाणून गेला.

ढवळे मास्तरांच्या पलीकडे राहायचे रहाळकर !...ते कँपात नोकरीला जायचे, हाच रुबाब. वाड्यातले सूटबूट घालणारे ते एकमेव गृहस्थ !...त्यांना रेसचा नाद होता हे पुढे कळलं. वाड्यातल्या इतरांशी त्यांच्या गप्पा कधी जमत नसत. त्यांच्या डोक्यात नेहमी घोड्याच्या टापा चालत. रेसच्या दिवशी ते झपाटलेले असत. पहिल्या पहिल्यांदा काही वर्षे त्यांना रेसमध्ये पैसे मिळत असावेत. रेस संपली की ते घरी मिठाई आणि फळफळावळ घेऊन येत. त्यांची बायकामुले रुबाबात वागत.

पुढे कशी कुणास ठाऊक पण त्यांची नोकरी सुटली. रेस अंगावर आली. खायची भ्रांत झाली. त्यांच्या मानानं आपण फार शहाणे...सरळ वाट न

सोडणारे...नीट संसार करणारे अशी अहंता मराठे आणि ढवळे मास्तर बाळगत. त्यांच्या बिऱ्हाडाकडे तुच्छतेने बोटे दाखवत.

रहाळकरांना कसा कुणास ठाऊक पण पुढे देवाधर्माचा नाद लागला. ते रात्री बारा वाजता ओंकारेश्वरावर जाऊन आंघोळ करीत. तिथलं चिताभस्म अंगाला लावीत. एखादेवेळी लहर लागली म्हणजे पायीच आळंदीला जात. आपल्याला खुद्द ज्ञानेश्वरमाऊली किंवा दत्तगुरू प्रत्यक्ष भेटतात आणि अध्यात्मावर चर्चा करतात असं ते सांगत. खरं खोटं कुणास ठाऊक !

रहाळकरांची बायको उफाड्याची आणि गोरीपान होती. सगळ्या वाड्यात तेव्हा तीच सुंदर असावी. लग्नाकार्यात नऊवारी लुगडं नेसून आणि नाकात नथ घालून मिरवे तेव्हा छान दिसे. पुढे त्या बाईची अगदीच रया गेली. अंगावर फाटकी लक्तरे आली. स्वयंपाकिणीचं काम करायला लागली. महिना महिना रहाळकर बेपत्ता असत. एखाद्या कातर संध्याकाळी एकदम उगवत आणि बायकोला घेऊन ओंकारेश्वरावर हिंडायला जात. मी एकदा त्यांना ओंकारेश्वराच्या ओवरीत बसलेले पाहिले आहेत.

रहाळकरांच्या पलीकडे परांडे राहात. वाड्यातले सगळ्यात गरीब गृहस्थ ते होते. आम्ही सर्व गरीबच होतो पण त्या मानानेही ते गरीब होते. प्रथम ते आणि त्यांची सोवळी आई दोघंच आले. ते म्युनिसिपालिटीत रोजंदारीवर काम करीत. दोन-तीन वर्षांनी त्यांनी बायको करून आणली. ती विशेष रूपवान नव्हती, पण चटपटीत होती. तिचा गळाही चांगला होता. ती गरीब म्हणून वाड्यातल्या बायका तिला सामावून घेत नसत. ती एकटीच घरात बसे. कधी कधी नाटकातली पद मोठ्याने म्हणे. आमच्या त्या वाड्याला संगीताचा विटाळ तिच्यामुळेच झाला. त्याबद्दल बरेच लोक नापसंती दाखवत.

पुढे तिने निराळीच झेप घेतली. कशी कुणास ठाऊक तिने हौशी नाट्यसंघात काम करायला सुरुवात केली. तिचं नाव जाहिरातीत ‘ नटी ’ म्हणून जेव्हा झळकलं तेव्हा वाड्यातले सर्व लोक बेशुद्धच पडले. आता कशात काही अर्थ उरलेला नाही असं मराठे काकू चौकातल्या नळावर दात कोरत जवळ जवळ दहा-पंधरा वेळा तरी म्हणाल्या.

पुढे तर परांडे वहिनी घरात दिसेनाशाच झाल्या. लोक कुजबुजत की त्यांनी नवऱ्याला सोडलं आहे...त्या दुसऱ्या एका नटाबरोबर तशाच राहात आहेत.

पाच-सात वर्षांनी मला एकदा त्या मुंबईत भेटल्या होत्या. त्यांची प्रकृती वगैरे छान होती. चेहराही उजळला होता. अंगावर कपडे चांगले होते. अनीतिमान स्त्रीची जशी दुर्दशा व्हायला हवी तशी तिची मुळीच नव्हती...खरं म्हणजे त्यांनी मला चुकवायला हवं होतं. पण मीच खाली मान घातली. त्याच मजजवळ येऊन बोलायला लागल्या.

त्यांनी सगळी चौकशी केली...मराठ्यांच्या मुलींची लग्नं झाली का?... ढवळे मास्तरांचे लाडू संपले का नाही...सगळं बोलून झालं. मग मी त्यांना त्यांच्याविषयी विचारलं. त्या म्हणाल्या, " परांडे तसे वाईट नव्हते. त्यांनी मला काही त्रास दिला नाही...पण मी त्या वाड्याला कंटाळले. तिथे राहिले असते तर मी गंजून गेले असते...एव्हाना फक्त मुलांची संख्या आणि दारिद्र्याची व्याप्ती वाढली असती...आणि मी मराठे काकूंसारखी दात कोरत राहिले असते."

मला त्यांचं म्हणणं पटलं. त्या तिथे राहिल्या असत्या तर त्या अवजड वाड्याचाच भाग झाल्या असत्या. बंड करून वाडा सोडणारी पहिली स्त्री म्हणून इतिहासानं त्यांची नोंद घ्यायला हवी. पुढे मी नवमतवाद आणि समाजवाद यांच्याविषयी काही वाचले. पण त्या वाड्याने 'घटस्फोट' हा भयंकर शब्द त्यांच्या संदर्भातच प्रथम ऐकला असावा. पुढे तर मराठे काकूंच्या सगळ्यात धाकट्या मुलीनेही घटस्फोट घेतल्याचे ऐकले...परमेश्वरच तिचे रक्षण करो!

परांड्यांच्या पलीकडे विहिरीजवळ एका अंधाऱ्या खोलीत नर्सबाई आणि त्यांची दोन मुले राहात. त्यांचं आडनाव आठवत नाही. गरिबाला आडनाव असण्याची जरुरीही नसते...सगळे लोक त्यांना नर्सबाईच म्हणत. वाड्यात ते बिऱ्हाड वाळीत टाकलेले होते. त्या बाईचा नवरा तरुणपणीच अपघातात मेला. अशा बायकांना दोनच मार्ग मोकळे असतात...एक स्वयंपाकीण होणे किंवा प्राथमिक शिक्षिका होणे!...हे दोन्ही राजमार्ग न धरता त्या बाई सरळ नर्स झाल्या. सकाळच्या वेळी पांढरं शुभ्र पातळ नेसून त्या ससून हॉस्पिटलमध्ये जात. संध्याकाळी परत येत. दिवसभर लहान मुलं घरातच असत. नर्सची मुलं म्हणून त्यांना कुणी खेळायला घ्यायचं नाही. एकदा वाड्यातल्या बायका-मुलांची ट्रीप चतुःशृंगीला गेली होती. त्यात फक्त नर्सबाईची मुलं नव्हती. मी तेव्हा दहाबारा वर्षांचा होतो. आम्ही संध्याकाळी ट्रीपहून परत आलो तेव्हा ती दोन्ही मुलं आमची वाट पाहात खिडकीत बसली होती. त्या गोष्टीला चाळीस-पन्नास वर्षं

होऊन गेली. पण त्या मुलांच्या दृष्टीतला केविलवाणेपणा अजूनही मी विसरलो नाही.

बराच वेळ चौकात उभा होतो. वाड्यातली बिऱ्हाडं मला दिसत होती. त्यांचे आवाज ऐकू येत होते. भुताने भारलेल्या घराप्रमाणे मला सगळी दृश्यं दिसत होती. मी स्वतःला विसरलो होतो. एकोणीसशे ऐंशी सालही विसरलो. मनात मी एकोणीसशे पंचवीस-तीसमध्ये वावरत होतो.

मला कुणीतरी हलकेच ढोसले. मी खडबडून जागा झालो आणि तिकडे पाहिले. विसूभाऊंचा तो नातेवाईक चमत्कारिक दृष्टीने माझ्याकडे पाहात होता. क्षणभर मला भास झाला की वाड्यानंच त्या म्हाताऱ्या थिजलेल्या डोळ्याच्या माणसाचं रूप घेतलं आहे. तो वाडाच माझ्याकडे गोठलेल्या नजरेने पाहात आहे.—माझे सर्वांग थरारले. मला कसलीतरी अनामिक भीती वाटली.

तो माणूस कोरड्या आवाजात म्हणाला, " नुसतेच का उभे ?... मला तुमचं आश्चर्य वाटतं. पुण्यात इतर ठिकाणं नाहीत का ?... तुम्हाला हेच प्रेक्षणीय स्थळ आढळलं...."

मी आता पूर्ण जागा झालो होतो. दुपार कलली होती. संध्याकाळ सुरू झाली होती. आसपासच्या बंद दरवाज्यांवरची कुलपे माझ्याकडे टक लावून पाहात होती. मी त्यांना म्हटले, " तुम्ही एकटेच इथे का राहता ?... इतरांनी जशी बिऱ्हाडांना कुलपं लावली..."

तो विषण्णपणे हसला. " इतरांना संसार आहेत... मला नाही. त्यांना कुठेतरी जायला ठिकाणं आहेत...मला नाही. शिवाय माझ्या बिऱ्हाडाला कडी-कोयंडाही नाही.... कुलूप न लावता जर मी गेलो तर नव्या जागेवरचा माझा क्लेम जाईल...." तो फिदीफिदी हसला आणि म्हणाला, " अहो, नुसत्या जरी दोन खोल्या विकल्या तरी गुजराथ्याकडून पन्नास-साठ हजार काढता येतील."

मी खिन्नपणाने म्हटले, " अहो, पण या जुन्या वाड्यात तुम्ही एकट्यानं राहायचं..."

" एकटा कशानं ? " तो खो खो हसत म्हणाला, " अहो, मागच्या घरी मुंजा आहे की ?... दोघंही बरोबरच जाणार ! "

मला त्या ठिकाणी उभं राहणं अशक्य झालं. काहीच न बोलता मी बाहेर पडलो. दिंडीदरवाज्यातून रस्त्यावर आलो.

सगळीकडे सामसूम आणि पडझडच होती. मला आठवले की आमच्या लहानपणी कोपऱ्यावर मारुतीचं देऊळ होतं. मध्यावर हौद होता. दुसऱ्या बाजूला छोटीशी तालीम होती. संध्याकाळी घराघरांत दिवे लागत. परवचा म्हटल्याचे किंवा 'दिव्या दिव्या दीपत्कार'चे आवाज कानावर येत. मंद दिव्याच्या प्रकाशात वावरणाऱ्या गृहिणी खिडकीच्या गजाआडून दिसत. घराच्या पायऱ्यांवर वयस्कर लोक गप्पा मारताना दिसत....तसं आता काहीच नव्हतं.

खाली मान घालून मी त्या गल्लीतून झपाट्याने बाहेर आलो.... आता तिथें नवे जग आकार घेत होते, पण मला मात्र जुन्या जगाच्या आठवणींनी कसनुसं होत होतं.

# ३

## सभांचे गाव

ज्या ठिकाणी मी वाढलो, त्या पुणे शहरास ‘ सभांचे गाव ’ म्हणायला हवे. एकही जाहीर सभा नाही, असा दुर्दिन या गावात गेल्या पन्नास-पाऊणशे वर्षांत उगवला नसावा. ऐन प्लेगच्या साथीत दिवसाकाठी शंभर सव्वाशे माणसे मृत्युमुखी पडत पण तेव्हाही गावात सभा झाल्याशिवाय राहात नसे. पानशेतचा एवढा मोठा प्रलय झाला, पण त्यानंतर आठ-पंधरा दिवसांतच आचार्य अत्रे यांची ओंकारेश्वरावर सभा झाली. जाहीर व्याख्यानांचं इतकं वेड असलेलं दुसरं गाव जगात नसेल.

पुणेकर निरनिराळ्या कारणांसाठी पूर्वी प्रसिद्ध होते. पुण्याच्या भामट्याने दिल्लीच्या सोद्यालाही मान खाली घालायला लावली होती असा इतिहासात दाखला आहे. उत्तर पेशवाईत जेवणाचे शास्त्र पुण्यासच प्रगतावस्थेस पोचले...केळीचे पान किती लांब असावे, भाज्या कुठे वाढाव्यात, कोशिंबिरी कशा असाव्यात याची पद्धत पुण्याने घालून दिली.

इंग्रजी अमलात पुण्याने व्याख्यानबाजीबद्दल नावलौकिक मिळविला. खरे तर व्याख्यानाची आणि सभांची कल्पना सर्वस्वी परकीय आहे. शिवाजीच्या काळात किंवा पेशवाईत ‘ सभ्य स्त्रीपुरुषांना ’ उद्देशून व्याख्याने दिली जात नव्हती. परंतु या परकीय कलेला पुण्याने इतके आपलेसे केले की, मुळामुठेच्या तीरावरच या कलेचा जन्म झाला असावा असेच कुणालाही वाटेल. ..जेवणाप्रमाणेच

व्याख्यानांचेही पुण्याने एक तंत्र बनविले आहे. अध्यक्षांची सूचना...अध्यक्षांची ओळख...अध्यक्षीय भाषणाचा पूर्वरंग...मग वक्त्यांची भाषणे...अध्यक्षांचे समारोपाचे भाषण व आभारप्रदर्शन !...अशा व्याख्यानांच्या पायऱ्या ठरलेल्या आहेत. प्रत्येक पायरीवर काय काय बोलायचे, हेही ठरलेले आहे...आजच्या सभेच्या अध्यक्षांची ओळख करून द्यायची म्हणजे ' सूर्याला दिवा लावून शोधण्या-पैकी आहे...' हे वाक्य यायलाच हवे. ...' वास्तविक पाहता अध्यक्ष म्हणून बसण्याची माझी लायकी नाही ' असं अध्यक्षांनी म्हणायचं असतं...आभार-प्रदर्शनाचं काम नेहमी 'गोडच' असायला हवं...' श्री. अमुक तमुक हे घरचेच आहेत, त्यांचे आभार मानण्याची जरूर नाही ' वगैरे वाक्ये उच्चारली गेली नाहीत तर ती सभाच नाही !

अस्सल पुणेकराला जेवण्याप्रमाणेच व्याख्यानाचेही वेड असते. त्याचे एकच उदाहरण सांगतो—माझे एक चुलते खानदेशात शिरपूरला वकिली करीत. शिरपूरला सगळं चांगलं आहे...दूधदुभतं, भाजीपाला मुबलक आहे, पण तिथे व्याख्यानमात्र कधी ऐकायला मिळत नाही, असे रडगाणे ते नेहमी गात. दर मे महिन्यात ते आमच्या घरी मुक्काम टाकीत...वसंत व्याख्यानमालेची व्याख्याने ऐकणे व रात्री जेवणाच्या वेळी त्या सभेच्या हकिगती मोठ्या चवीने माझ्या वडिलांना सांगणे एवढाच त्यांचा महिनाभर उद्योग असे.

आयुष्यात पहिले व्याख्यान मी माझे स्वतःचेच ऐकले. तेव्हा मी पाच-सात वर्षांचा होतो. माझ्या सभाप्रेमी काकांनी माझ्याकडून दोन-तीन व्याख्याने बसवून घेतली होती...पुरुषांच्या केस राखण्यावर आणि मिश्या बोडण्यावर, तसेच स्त्रियांच्या आखूड बाह्यांच्या पोलक्यांवर त्यात टिंगलवजा मजकूर होता हे मला अजूनही स्मरते. मंगळागौरीच्या रात्री मुली झिम्मा, फुगड्या खेळून दमल्या की माझे व्याख्यान हमखास ठेवले जाई. बायकांच्या फॅशनवरचा ठरीव भाग व्याख्यानात आला की त्या तरुण मुली तोंडावर पदर धरून फिदीफिदी हसत. या विषयावर एक पदही काकांनी शिकविले होते. ' हल्ली स्त्रियांचा शृंगार । कित्ती मजेदार ।। ' असे त्याचे पालुपद असल्याचे मला आठवते...व्याख्यानाच्या ओघात ते पद ठसक्यात म्हणून दाखवून मी जास्तच रंगत आणत असे.

पहिली जाहीर सभा मी साधारणपणे तीस बत्तीस सालच्या सुमारास शनि-वारवाड्यापुढे ऐकली. शनिवारवाड्याचे पटांगण मोठ्या सभेसाठी, असे त्याच

दिवसांत परिपाठात आले. खुद्द टिळकांची एकही सभा शनिवारवाड्यापुढे झालेली नसावी. पूर्वी नेमस्तांच्या सभा हिराबागेत होत. आणि जहालांच्या सभा मंडईसमोर होत... कायदेभंगाच्या चळवळीपासून मंडईचे पटांगण मागे पडले. त्यानंतर नव्या पुलाच्या खालचे पटांगण किंवा एस. पी. कॉलेजचे मैदान अशी अनेक सभास्थाने निर्माण झाली. त्यात नेहरू-पटेलांच्या सभाही गाजल्या, पण शनिवारवाडा पटांगणाची शानमात्र इतर ठिकाणांना आली नाही...जाहीर वादळी सभा ही शनिवारवाड्यापुढेच व्हायची !

सोलापूरचे मल्लाप्पा धनशेट्टी आणि इतर चार लोक यांना सरकारने फासावर दिल्यानंतरची सभा ही मी ऐकलेली पहिली सभा !...अनेक वेळा नावे ऐकलेले वक्ते आयुष्यात मी प्रथम त्याच सभेत बघितले.

सभा सुरू होण्यापूर्वी एक मुलगा कोवळ्या आवाजात 'भेटेन नऊ महिन्यांनी' हे पद म्हणायला लागला...एक देशभक्त फासावर जात असताना आईला सांगतो, "आज जरी मी मृत्यू पावलो तरी मी तुझ्याच पोटी जन्म घेईन. आणखी नऊ महिन्यांनी नवजात बालकाच्या स्वरूपात तुला भेटेन !" असे कथानक त्या गीतात आहे. त्यातील काही अर्धवट कडवी अजूनही आठवतात.

"लाडका बाळ एकुलता ।
फाशीची शिक्षा होता
कवटाळुनी त्याला माता ।
अति आक्रोशे रडते केविलवाणी
भेटेन नऊ महिन्यांनी ।"

असे त्यातील एक कडवे मी अजूनही गुणगुणतो. त्या दिवसांत दूरध्वनिक्षेपक नव्हते. त्यामुळे त्या नवयुवकाचे गाणे कोणालाच ऐकू येत नव्हते. इतक्यात अर्धी चड्डी घातलेले पन्नाशी उलटलेले एक गृहस्थ तावातावाने पुढे आले आणि त्यांनी त्या नवयुवकाला बाजूला ढकलले व आपल्या भसाड्या आवाजात मोठमोठ्याने 'भेटेन नऊ महिन्यांनी' म्हणायला सुरुवात केली...'अति आक्रोशे रडते केविलवाणी' हे कडवे त्यांनी इतके किंचाळून म्हटले की सभेतल्या स्त्रिया व लहान अर्भके बहुधा मूर्च्छित पडली असावीत !...ते होते बाळूकाका कानिटकर !

त्याच सभेत मी प्रथम एस. एम. जोशींना बघितले. व्याख्यान देण्याची एस. एम. चीही ती पहिलीच वेळ होती. दोनचार वक्त्यांनंतर एस. एम. उठून उभे राहिले. त्यांची आकृती कृश होती. रंग कोकणस्थी गोरा होता, आणि चेहरा नीटस होता. फडक्यांचा नायक चुकून शनिवारवाड्यापुढे उभा राहिल्यासारखे वाटले. ते तेव्हा कॉलेजात असावेत. ते म्हणाले, "आज सकाळी मी अभ्यास करीत बसलो होतो. इतक्यात सोलापूरच्या चार लोकांना फाशी दिल्याची बातमी समजली... मला वाटलं, हे काय चाललं आहे?... अभ्यासाचा उपयोग काय?... सरकारच्या या कृत्याचा मी निषेध करायला नको काय?"...एस. एम. हे चांगले वक्ते कधीच नव्हते. त्यांच्या वक्तृत्वाला ढंग नाही; श्रोत्यांना खुलविण्याची कला तर त्यांच्यात अजिबात नाही; पण त्यांचे भाषण ऐकताना मला त्यांच्यामधील तळमळ इतक्या वर्षांपूर्वीही प्रतीत झाली होती, हे विशेष! त्याच सभेत मी काकासाहेब गाडगीळ, केशवराव जेधे किंवा शंकरराव देव यांना ऐकले असावे.

त्यानंतर पंचवीस-तीस वर्षे शनिवारवाड्यापुढची व्याख्याने मी ऐकतच आहे. महाराष्ट्रातला असा एकही वक्ता नाही की, ज्याची हजेरी तिथे लागलेली नाही. कितीजणांची म्हणून माहिती सांगायची?... आमच्या पिढीच्या पुढाऱ्यांपैकी बरेचसे मृत्युमुखी पडले आणि राहिलेले मोडीत निघाले. आजच्या तरुण पिढीला यांपैकी बहुतेकांची नावे माहीत नाहीत...गाडगीळ, जेधे, मोरे, शंकरराव देव, रावसाहेब पटवर्धन, तुळशीदास जाधव, नाना पाटील अशी कितीतरी नावे! एक-दोन गमतीच्या वक्त्यांबद्दल सांगावेसे वाटते.

श्री. बाळूकाका कानिटकर हे फार हौशी वक्ते होते. वक्तृत्वाचा गुण त्यांच्यात; अत्यल्प होता. आणि ध्येयनिष्ठा व कळकळ ही थट्टा करण्याइतकी जाज्वल्य होती. पुण्यातल्या खानदानी घराण्यातले व डेक्कन कॉलेजमध्ये ऐषआरामात शिकलेले हे गृहस्थ मुळशी सत्याग्रहाच्या वेळी प्रथम राजकारणात पडले व त्यांनी आपल्या इस्टेटीची आणि कौटुंबिक सौख्याची अक्षरशः होळी केली... खादीची हाफ पँट आणि हाफ शर्ट असा त्यांचा पोशाख असे. कधी फार थंडी असली तर रात्री हिंडताना ते अंगावर एखाद्या शेतकऱ्याप्रमाणे कांबळे घेत. सेनापती बापट छापाची काही काव्यरचनाही ते करीत व त्याची पुस्तके छापवून घरोघरी जाऊन स्वतः दोन दोन आण्याला विकत.

साधारण प्रतीच्या श्रोत्यांत किंवा पुण्याच्या राजकीय हायकमांडमध्ये त्यांना किंमत नव्हती. राजकारणाविषयीचे त्यांचे वाचनही फारसे नसावे. मनाचे श्लोक किंवा दासबोध याशिवाय तिसऱ्या ग्रंथातले दृष्टान्त त्यांच्या व्याख्यानात येत नसत. शनिवारवाडयापुढील प्रचंड सभांमध्ये त्यांना स्थान नव्हते. पण चौका-चौकात व्याख्याने देण्याची त्यांची पद्धत होती. त्यांच्या दोन चिरंजिवांची व त्यांची एक हातगाडी होती. तिच्यावर खादीचा माल ठेवून ते रस्तोरस्ती विकत. गाडी एकदम कोणत्याही चौकात थांबे व एखाद्या घराच्या पायरीवर उभे राहून बाळूकाका व्याख्यान द्यायला लागत. सकाळची नऊ साडेनऊ वाजण्याची वेळ असे. लोक मंडई वगैरे करण्याच्या नादात असत. 'बंधुभगिनींनो' असा किंचाळल्यासारखा आवाज कानावर आला की लोक थबकत. बाळूकाकांचा वाक्प्रवाह एक-दोन तास जोरजोराने चालत असे. लोक असले किंवा नसले तरी त्यांना त्याची फिकीर नसे. कुणी निंदा, कुणी वंदा, आमचा बोलण्याचा धंदा असे त्यांचे ब्रीद असे. रस्त्यावर भाषण चालू असताना वस्तुपाठ देण्याचीही त्यांना लहर येई. एकदा जोगेश्वरीच्या देवळासमोर त्यांचे व्याख्यान चालले होते. एक दूधवाला मावळा कासंडी पायरीवर ठेवून व्याख्यान ऐकत उभा होता. इतक्यात व्याख्यानाच्या ओघात बाळूकाका त्याच्याजवळ गेले व त्याला खवाट्याला धरून पुढे ओढत ओरडले, " हे मावळे ! यांनी स्वराज्याची स्थापना केली ! ! "

मावळ्याला वाटले आपल्या हातून काहीतरी फार मोठा अपराध घडला आहे. तो अजीजी करत म्हणाला, " नाही नाही साहेब मी नाही केली...मला गरिबाला कशापायी धरता..." पण बाळूकाकांनी त्याला सोडले नाही.

सभेत किती वेळ बोलावे याचेही त्यांना तारतम्य नसे. ना. ग. गोरे ह्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांची सभा चालली होती. पाऊण तास झाला...एक तास झाला पण त्यांच्या व्याख्यानाला खळ पडेचना !...राणा प्रताप...शिवाजी...पहिले बाजीराव...पानपतचा रणसंग्राम...सगळं झालं; पण उतार पडेना. गोरे कंटाळून गेले व त्यांनी सहज हातावरच्या घडयाळाकडे पाहिले, पण तेवढेही बाळूकाकांना सहन झाले नाही. पानपतचा रणसंग्राम सोडून ते सरळ गोऱ्यांवरच कोसळले.

" तुम्हाला जर घाई असेल तर सरळ चालू लागा. माझं व्याख्यान अजून एक दीड तास तरी चालणार." बिचारे गोरे ! खाली मान घालून स्वस्थ व्याख्यान ऐकत राहिले.

बाळूकाकांचा शेवट वाईट झाला. राजकीय जीवनातून ते अस्तंगत झाले. एका निवडणुकीत त्यांनी काँग्रेसला विरोध केला, तेव्हा शनीच्या पाराजवळ एका सभेत त्यांच्यावर अक्षरश: अंडयांचा आणि कांदेबटाट्यांचा वर्षाव झालेला मी पाहिला आहे. ते वारले त्याच दिवशी केशवराव जेधेही गेले. केशवरावांची प्रेतयात्रा प्रचंड निघाली; पण बाळूकाकांच्या प्रेतयात्रेत पाचपंचवीस तरी लोक असतील किंवा नाही कुणास ठाऊक !

त्या पिढीच्या वक्त्यांपैकी काकासाहेब गाडगिळांच्या व्याख्यानाइतकेच मला शंकरराव मोरे यांचे व्याख्यानही आवडे. फार पूर्वी मोरे ब्राह्मणेतर चळवळीत अग्रगण्य होते. तेव्हा ते काळी उंच टोपी घालत. पुढे काँग्रेसमध्ये आल्यावर त्यांच्या अंगावर पांढरा नेहरू शर्ट आणि मस्तकावर तिरकी गांधी टोपी आली. मोरे उंचे पुरे होते. मराठा जातीच्या मानाने त्यांचा रंग फार उजळ होता. डोळे घारे होते आणि त्यात मिस्किलपणाची छटा होती. उत्तम वकील असल्यामुळे हजरजबाबीपणा आणि कोटिबाजपणा त्यांच्यात फार होता. याशिवाय सत्यशोधकी चळवळीतून आलेला कडवटपणाही त्यांच्यात होता. ते बोलायला उभे राहिले म्हणजे एकदोन वाक्यांतच सभा ताब्यात घेत. पाजळलेल्या वस्तऱ्याप्रमाणे त्यांची जीभ चाले, आणि उपहासाचा अवलंब करून ते भल्याभल्यांचा चेंदामेंदा करीत.

गांधीखून झाल्यानंतर पुण्यात कल्लोळ उडाला. बाराव्या दिवशीच सकाळी शनिवारवाडयापुढे शंकरराव मोरे, बाळासाहेब खेर वगैरे वक्त्यांची भाषणे झाली. शनिवारवाडयापुढचा तो देखावा मला चांगला आठवतो. खून नुकताच झाला होता. महाराष्ट्रभर जाळपोळ सुरू होती. वातावरण भयंकर गंभीर होते. शनिवारवाडयाचा चेहरा फारच म्लान दिसत होता. नारायणराव पेशव्यांचा खून झाला त्या वेळी तो तसाच झाला असेल. सभेपुरतीच कर्फ्यू उठली होती, आणि हजारो लोक तिथे उपस्थित होते. दंगा होईल अशी अफवा होती. खुद्द कलेक्टर बर्वे जातीने हजर होते.

त्या दिवशीचे मोरे यांचे भाषण अप्रतिम झाले. त्यांच्या भाषेला भलतीच धार चढली होती. सत्यशोधकी कडवटपणाही तीत होता. ब्राह्मणांची घरे जाळली गेली, याचा उल्लेख करून ते म्हणाले, " घरं जळली म्हणून रडत काय बसता ? ती घरं आम्हीच बांधून दिली होती....तुम्ही नीट वागलात तर अजूनही आम्ही

वरं बांधून देऊ."

त्यानंतरच्या निवडणुकीत शेतकरी कामकरी पक्षातर्फे पुण्यात केशवराव जेधे निवडणूक लढवीत होते. कॉंग्रेसचे काकासाहेब गाडगीळ होते. केशवरावांना वक्तृत्व मुळीच नसल्यामुळे त्यांच्यातर्फे मोऱ्यांनी ती निवडणूक लढवली व काकासाहेबांसारख्या वाचिवीराला तोंड दिले. गाडगिळांचा उपहास त्यांनी त्या वेळी अत्यत केला...गाडगीळ थापाडे आहेत हे पटवून देताना ते म्हणाले, "आमच्या शेजारी एक अठरा-वीस वर्षांचा पोरगा आहे. त्याला क्वीन इलिझाबेथ बायको हवी आहे. तो प्रथम माझ्याकडे आला तेव्हा मी त्याला वेड्यात काढले व हाकून दिले. मग तो काकांकडे गेला. त्यांनी त्याच्या पाठीवरून हात फिरवला व सांगितले, 'मी निवडणुकीत गुंतलो आहे. या याद्या घेऊन तू घरोघरी हिंड... निवडणूक संपली की पहिल्या मुहूर्तावर मांडव घालतो आणि त्या इलिझाबेथशी तुझं लग्न ठोकतो!...त्यात विशेषसं काय आहे?"...या बोलण्यावर सपाटून टाळ्या पडल्याचे व उपहासपूर्ण हास्याचे फवारे उडाल्याचे मला आठवते.

सदतीस साली प्रांतात कॉंग्रेसची मंत्रिमंडळे आली; पण त्यापूर्वीच काही वर्षे हिंदुमहासभा आणि कॉंग्रेस अशा दोन फळ्या पडलेल्या होत्या. त्यांच्यामधून विस्तवही जात नव्हता. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर हे दोन प्रवाह पुण्याच्या पश्चिम आणि पूर्व भागात नांदत होते. त्या दोन विरोधी प्रवाहांनी पुढे हिंदुमहासभा आणि कॉंग्रेस ही नावे घेतली असे म्हणता येईल. पूर्वी नेमस्तांच्या सभा हिराबागेत होत.

त्याचप्रमाणे हिंदुमहासभेच्या बैठकी टिळक स्मारक मंदिर किंवा शिवाजी-मंदिर यासारख्या बंदिस्त ठिकाणी व्हायला लागल्या...तात्यासाहेब केळकरांचे एकही व्याख्यान मी शनिवारवाड्यापुढे ऐकलेले आठवत नाही. तसेच केशवराव जेधे किंवा काकासाहेब गाडगीळ यांची व्याख्याने टिळक स्मारक मंदिरात झालेली विशेष आठवत नाहीत. त्या दोन प्रवाहांमधील विरोध सभास्थानांचे बाबतीत देखील दिसून येई.

कॉंग्रेसच्या पोटात तेव्हा ब्राह्मणेतर पक्ष, कम्युनिस्ट आणि सोशॅलिस्ट हे सर्व एकत्र आलेले असत. सोशॅलिस्टांतली वक्तृत्वाची आघाडी ना. ग. गोरे किंवा भाई र. के. खाडिलकर हे लढवीत. कम्युनिस्टांमध्ये तसा कोणी प्रभावी वक्ताच नव्हता. भाई के. एन. फडके हे बोलताना उगीच आकांडतांडव करीत. बाकी मैदानी वक्तृत्व कोणातही नव्हते. पण सभा सुरू व्हावयाच्या पूर्वी कम्युनिस्ट

मंडळी जी गाणी गात ती मात्र अर्थपूर्ण असत.

‘ उठाव झेंडा बंडाचा ।
शेतकरी स्वातंत्र्याचा ।
कामकरी स्वातंत्र्याचा ।
पोरे बेकारांची मरती । ‘ मरोत ’ पैसेवाले म्हणती.
शेकडो गरिब बेकार । एक सरदार । ’
‘ शेतकरी बाया, आम्ही कामकरी बाया ।
पोराबाळा नाही आमच्या पोटभर खाया ॥...
लाठी खाऊ, गोळी खाऊ
अर्पू अपुली काया । शेतकरी बाया ।
आम्ही कामकरी बाया ॥ ’

अशी कितीतरी कडवी मला अजूनही आठवत आहेत.

हिंदुसभेच्या गोटात मला आवडणारा एकही वक्ता नव्हता. केळकरांच्या भाषणात आवेश नसे, आणि ल. ब. ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर यांच्या भाषणात फक्त आवेशच असे. त्यामुळे दोघांचीही भाषणे गिळगिळीत वाटत. अण्णासाहेबांचे वडील बंधू भालाकार भोपटकर यांचे भाषण मात्र वैशिष्ट्यपूर्ण असे...खरेच सांगतो, त्यांच्यासारखा वक्ता अजून झाला नाही. वर्ण पक्का सोलापुरी, बसके नाक, चेहरा कुरूपात जमा, असे त्यांचे वर्णन करता येईल. डोक्याला ते काळी गोल टोपी घालत, आणि गळ्याभोवती करवती काठी रेशमी उपरणे असे. त्यांचा पट्टा एकदा सुरू झाला की त्यात कोण भरडून निघेल हे सांगता येत नसे. कॉंग्रेसच्या अनुयायांना ते गांधाळ, सुताळ किंवा कायदेभंगी असे संबोधत. धाकट्या भावावर ते सपाटून टीका करीत....सदतीस साली ते अण्णासाहेब भोपटकरांच्या विरुद्ध उभे होते. त्यांचे व्याख्यान रामेश्वराचे देवळात ऐकल्याचे स्मरते. त्यांना लोक सारखे टाळ्या देत होते. तेव्हा ते म्हणाले, “ जेवढ्या टाळ्या पडत आहेत तितकी जरी मते पडली तरी मी धन्य समजेन. मला माहीत आहे की टाळ्या वाजवणारे मला मत देणार नाहीत.”....त्या निवडणुकीत त्यांना फक्त दोनशे बावन्न मते पडली होती.

खोचक बोलण्यातही ते प्रवीण होते. एकदा वसंत व्याख्यानमालेत ‘ संतती

नियमन ' या विषयावर परिसंवाद होता. तरुण स्त्री-पुरुष श्रोत्यांची अफाट गर्दी जमली होती. प्रथम कोवळ्या वयाचे काही प्राध्यापक नियमनाच्या बाजूने बोलले. मग भालाकर बोलायला उठले. ते म्हणाले, " या विषयावर बोलायला मीच सगळ्यांत लायक आहे. कारण माझ्या बायकोची कमीत कमी सात-आठ बाळंतपणे झालेली आहेत. आता जे प्राध्यापक बोलले, त्यांना फार तर झुरळा-सारखे एखादे मूल झाले असेल !...त्यांनी या विषयावर काय बोलावे ? "... समारोप करताना शेवटी ते म्हणाले, " चांगले चांगले लोक ' टोप्या ' वगैरे वापरतात...केवढी ही अधोगती !...मला वाटते की त्या टोपीत कित्येक शिवाजी आणि संभाजी अडकून पडले असतील...शहाजीला हा शोध माहीत नव्हता, म्हणून शिवाजी महाराज जन्मले ? "...असल्या कोटिक्रमाचे स्वागत पुण्यातल्या श्रोत्यांनी कसे केले असेल हे सांगायला नकोच.

गेल्या पंचवीस-तीस वर्षांत ऐकलेल्या कितीतरी वक्त्यांच्या आठवणी येतात.. दत्तो वामन पोतदार, आचार्य अत्रे किंवा स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या वाग्विलासा-बद्दल मी काय लिहिणार ? त्यांची वाणी ऐकून मी तृप्त झालो आहे...त्यावरच मी पोसलो आहे.

मी वक्ता नाही. पण उत्तम श्रोता आहे. श्रोत्याची सर्व लक्षणे माझ्यामध्ये आहेत. रामदासांनी कनिष्ठ प्रतीच्या श्रोत्यांविषयी लिहिले आहे.

> विषयी लोक श्रवणा येती ।
> ते बायांकडेच पाहती ।
> चोरटे लोक चोरून नेती । पादरक्षा ।।

ही सर्व पापे श्रोता या नात्याने मी केलेली आहेत हे सांगायला नकोच.

मी अस्सल पुणेकर आहे त्यामुळेच मला सभांचे वेड आहे. सारस्वताला माशांचे कालवण खाल्ले नाही तर करमत नाही असे म्हणतात...सभा ऐकायला मिळाली नाही तर मलाही खंत येते.

अलीकडे पुण्यात फारशा सभा होत नाहीत त्यामुळेच हे ' पुणं ' वाटतच नाही...पुणेकर म्हणून हेच माझे दु:ख आहे.

# ४

## मी ! एक ब्राह्मण

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

मी ! माझी जात ब्राह्मण... माझे नातेवाईकही ब्राह्मण हे सांगायला नकोच. पण मित्र आणि बरेचसे परिचितही ब्राह्मणच आहेत हे मुद्दाम सांगायला हवे. पुण्यासारख्या शहरात माझं सगळं जीवन गेलेलं. इथं खरं तर ब्राह्मण जात अल्पसंख्य आहे. आमच्या शाळेत किंवा गल्लीतही अब्राह्मण बरेच होते आणि आहेत. त्यांची आणि माझी खरं म्हणजे खूप मैत्री व्हायला हवी. आम्ही एकमेकांच्या अगदी स्वयंपाकघरापर्यंत जायला हवं. पण तसं झालेलं नाही. आमच्यात एक न दिसणारा दुरावा आहेच. मी तसा जातीयवादी नाही. सगळ्या धर्मांचे आणि जाति-उपजातींचे लोक बुद्धीने आणि कर्तृत्वाने समान असतात अशी माझी श्रद्धा आहे. मी ज्या शाळेत शिकलो त्या शाळेचीही तीच शिकवण आहे. अब्राह्मणांविषयी दुरावा बाळगायला मला कुणीच सांगितलं शिकवलेलं नाही. उलट जातिबंधनातील वैय्यर्थता मला पटावी–माझ्या मनावर बिंबावी असा माझ्या शाळेने सदैव प्रयत्न केला. तरीही माझ्या मनात ब्राह्मणी जातीयतेचा एक गंड आहेच हे कबूल करायला हवे. आमच्या वर्गात मराठा जातीची जी मुले होती, त्यांच्या मनातही तसाच गंड होता हेही सांगायला हवे. अशा अनैसर्गिक वातावरणात आम्ही वाढलो आणि जोपासलो.

'मी ब्राह्मण आहे' या छोट्या वाक्यामागे अनेक प्रकारचे अभिनिवेष आहेत.

लहानपणी ' मी ब्राह्मण आहे ' हे सांगताना माझी मान ताठ होई, आणि इतर जातीचे लोक माझ्याकडे थोड्या आदरमिश्रित कौतुकाने पाहात. लहानपणी, कितीही वयाचा अ ब्राह्मण असो, त्याला आमच्या घरात किंवा परिवारात ' अरे-तुरेने ' संबोधण्याची पद्धत होती. मी चार वर्षांचा असताना एक मोलकरीण नवे लुगडे नेसून आमच्या घरी आली होती. मला त्याचे इतके आश्चर्य वाटले की, मी ओरडून आईला म्हटले, "अग ती बघ मराठ्याची बाई नवं लुगडं नेसली आहे." माझे बोलणे आईला काही चूक वाटले नाही, पण ती मोलकरीणच म्हणाली, "साहेब, असं बोलणं बरं नाही. आम्ही कधी नवी लुगडी नेसायची नाहीत का?" माझ्या मनावर तो प्रसंग कोरला गेलेला आहे. पुणे म्युनिसिपालिटीचे पुढे अध्यक्ष झालेले गृहस्थ लहनपणी ओझी उचलण्याची कामे करीत. आमच्याही घरी येत असावेत. पुढे श्रीमंत झाल्यावरही माझ्या आजीला भेटायला येत. ते म्हणत, " वहिनी, तुमच्या हातची आमटी आणि भाकरी मला अजून आठवते. ब्राह्मणाच्या घरच्या अन्नाची चव काही निराळीच असते. "

आम्ही मंडईत गेलो तरी तिथल्या गाळेवाल्या स्त्रिया एकमेकीत कुजबुजत 'बामणं आली...चांगली भाजी द्यायला हवी.' ही सगळी आदराची भावना प्रतीत होई. तिला कारण आमचे पैसे किंवा श्रीमंती मुळीच नव्हती. उलट त्या काळात माझ्या वडिलांना फक्त चाळीस रुपये पगार होता. कित्येक गाळेवाल्या आमच्या-पेक्षा किती तरी पटीने जास्त पैसे मिळवत असणार. केवळ ब्राह्मण म्हणून त्या आदर दाखवीत हे विशेष ! ती आदराची भावना अर्थातच फार दिवस टिकली नाही. अठ्ठावीस-एकोणतीस साली सत्यशोधक चळवळीचा बहर होता. सर्व ब्राह्मण समाजाची निंदानालस्ती जाहीर प्रमाणात सुरू होती. त्या दिवसांतली काही स्मरणे देतो. शाळेत अब्राह्मण मुले आम्हाला ' भट्ट्या ' म्हणून उघड उघड हाका मारत. ' भट्ट जेवूनी तट्ट फुगले ' हे गाणं म्हणून खिजवत. शिमग्यातही ब्राह्मण स्त्रियांबद्दल घाणेरडे उखाणे घेत. त्या सर्वांबद्दल शाळेतले मास्तर किंवा गल्लीतले प्रतिष्ठित लोक नापसंती दाखवायलाही भीत...बहुसंख्य मराठा समाजाविषयीचे भय त्या काळातच ब्राह्मणमनात रुजले...एकदा गायकवाड-वाड्यासमोर छत्रपती मेळ्याची आणि दुसऱ्या ब्राह्मण मेळ्यांची मारामारी झाली. ती बातमी फैलावताच आमच्या वाड्याची दारे-खिडक्या लावून घेतल्याचे आठ-वते. अंगणात बायका जमल्या होत्या, आणि आता आणखी कोणता प्रसंग येतो

याविषयी त्या चिंतातुर स्वरात कुजबूज करत होत्या. माझे वडील कलेक्टर ऑफिसमध्ये नोकरीला होते. चौतीस-पस्तीस साली ते एका मित्राजवळ बोलल्याचे आठवते. "अहो, आता सरकारी नोकरीतली मजाच संपली. पूर्वी ऑफिसमध्ये सगळे ब्राह्मण असत. खेळीमेळीनं कामं चालायची. आता शिंदे नि होळकर कारकून म्हणून आले. सरकारी कामं कशी होतात कुणास ठाऊक!" त्यावर त्यांचे मित्र उद्‌गारले, 'आज शिंदे होळकरावर भागतंय...उद्या महार नि मांग येतील नि तुमच्या मांडीला मांडी लावून बसतील." आणखीही स्मरणे देता येतील.

सत्यशोधक चळवळीपासून ब्राह्मणांचा पाडाव होण्यास सुरुवात झाली. सर्व क्षेत्रांतून त्यांची पद्धतशीर पीछेहाट झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रौढ मतदानाचे युग अवतरले. ब्राह्मणाबद्दल जो द्वेष किंवा तिरस्कार जोपासला गेला होता, त्यामुळे राजकारणातून हळूहळू ब्राह्मण बाहेर फेकले गेले. महात्मा गांधींच्या खुनानंतर ब्राह्मणांबद्दल बहुजनसमाजाचा रोष किती पराकोटीचा आहे याचे प्रत्यंतर आले. खेडोपाडी किंवा तालुक्याच्या गावी ब्राह्मण कुटुंबांना मानाने जगणेच अशक्य झाले. पुण्यासारख्या शहरातही तीच अवस्था निर्माण झाली. भर दिवसा ब्राह्मणांची घरे पेटविण्यात पुरुषार्थ किंवा देशभक्ती आहे असेही समजण्यात येऊ लागले.

आपण ब्राह्मण आहोत हे सांगण्यात त्या वेळेपासून मला कमीपणा वाटायला लागल्याचे स्मरते. माझी जात कोणी विचारू नये आणि ती सांगण्याची पाळी येऊ नये असेही वाटू लागले. या बाबतीत एकच आठवण सांगावीशी वाटते... गांधीवधानंतर दुसऱ्या दिवशी पुण्यात जाळपोळ चालली होती. मी ती बघत पायीच हिंडत होतो...लोकांचे घोळके कोपऱ्याकोपऱ्यावर जमले होते. एका कोपऱ्यावरून पुढे गेलो तेव्हा मोठ्याने हाक ऐकू आली.

"जोशी, अहो जोशी..." मनातल्या मनात मी घाबरलो आणि हाक मारणाऱ्याकडे वळूनही न पाहता वेगाने पुढे चालू लागलो. मागून हाका येतच होत्या. शेवटी तो हाका मारणारा माणूस पळत पळत मजजवळ आला आणि म्हणाला, "अरे जोशी, मी तुला किती हाका मारल्या, ऐकू नाही आलं का?"

मी म्हटले, "ऐकू आलं. पण मी 'जोशी' आहे म्हणजे ब्राह्मणच आहे हे तुझ्या हाकांवरून इतरेजनांना कळेल आणि माझ्या जिवाला धोका पोचेल अशी

भीती मला वाटली म्हणून मी पुढे निघून गेलो." यापुढे ब्राह्मणांची आडनावे लावून समाजात हिंडणे दुरापास्त आहे.

गांधीवधानंतर ब्राह्मणद्वेषाला एक प्रकारचे नैतिक अधिष्ठान प्राप्त झाले. कुणीही उठावे आणि ब्राह्मणांना शिव्या द्याव्यात व पुरोगामी म्हणून मिरवावे अशी अवस्था झाली. याबद्दलची दोन स्मरणे अशी. माझ्या एका मित्राचा मुलगा पंचवीस-सव्वीस वर्षांचा ! तो गप्पा मारत असताना मला म्हणाला, " मला राजकारणात भाग घेण्याची हौस आहे. मी वक्तृत्वाची कला वाढवत आहे. खूप सभा गाजवाव्यात आणि मंत्री होऊन समाजाचं कल्याण करावं असं माझं ध्येय आहे." त्याचं ते जगावेगळं ध्येय पाहून मी अवाक् झालो. माझा एक परिचित तिथंच बसला होता. तो त्या मुलाला म्हणाला, " हा शुद्ध वेडेपणा आहे. ब्राह्मणांनी राजकारणात पडू नये असं मला वाटतं. तुम्ही कितीही हुषार आणि त्यागी असलात तरी म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीतदेखील निवडून येणं शक्य नाही. तुमच्या जातीमुळे तुम्हास बहुजनसमाजातला एखादा फाटका अशिक्षित माणूसदेखील पराभूत करील. शेवटी ते मिनिस्टर होतील आणि तुम्ही नुसतेच व्हालंटियर राहाल."

माझा तो परिचित उघड उघड जातीय दृष्टिकोणातून बोलत होता. परंतु त्याचा प्रतिवाद करण्याचेही भान मला राहिले नाही. कारण दुर्दैवाने त्याचे म्हणणे शंभर टक्के सत्य होते. माझ्या एका सोळा-सतरा वर्षांच्या नातेवाईक मुलीला बारावीच्या परीक्षेत पंचाऐंशी टक्के मार्क मिळाले. मी तिचे घरी जाऊन अभिनंदन केले आणि कौतुकाने म्हटले,

"आता डॉक्टर होणार ना ?" ती सोळा वर्षांची मुलगी हताशपणे म्हणाली,

" बघू या काय होतं ते. मार्क चांगले आहेत. पण मी ब्राह्मण आहे. दलित नाही. त्या सगळ्यांना कॉलेजमध्ये जागा दिल्यानंतर राहिलीच तर ती मला मिळणार." माझ्या मेव्हण्याच्या मुलाने अमेरिकेत डॉक्टरेट मिळविलेली आहे. तिथे त्याला शेकडो डॉलर पगार आहे. तो इथे सुटीवर आला असताना मी म्हटले, " आता भारतात केव्हा येणार ?" तो उद्वेगाने म्हणाला, " इथे येऊन करायचं काय ? मी ब्राह्मण आहे. मला नोकरी कोण देणार ? इतर जातींच्या उमेदवारांचा इथे प्रथम विचार होईल. मग माझा. त्यापेक्षा अमेरिका बरी." नोकरीसाठी अर्ज करताना ब्राह्मण उमेदवाराला गुणवत्ता असूनही डावलले

जाण्याची भीती नेहमीच वाटते यात विशेष काही नाही. पण साहित्यक्षेत्रातही जातीचा विचार केला जातो. एका कादंबरीकाराने बक्षिसासाठी पुस्तक का पाठवले नाही याबद्दल कारण देताना तो म्हणाला, " ब्राह्मण लेखकाला बक्षीस मिळणं कठीण आहे. मी जर नवबौद्ध किंवा मुसलमान असतो तर याच कादंबरीला नक्कीच पुरस्कार मिळाला असता. " हल्लीच्या ब्राह्मणांचे मन किती अधू झालेले आहे याची साक्ष वरील उदाहरणे आहेत.

सत्यशोधक चळवळीने शेठजी आणि भटजी यांच्याविरुद्ध शस्त्र उचलले. त्यातले शेटजी तसेच राहिले. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ होऊनही खेडोपाडीदेखील गुजराती आणि मारवाडी व्यापारी तसेच सुरक्षित राहिले. त्या शेठजींनी महाराष्ट्राच्या अभिवृद्धीसाठी थोड्याफार देणग्या देण्यापलीकडे विशेष काही केलेले नाही. त्यांच्याविरुद्ध राग नाही, पण भटजींविरुद्ध मात्र आहे. यातली विसंगती कुणाला कळत नाही. महाराष्ट्रात ब्राह्मण हे कधीच जमीनदार नव्हते आणि त्यांनी कुळांचे रक्तशोषणही केलेले नाही. एक-दोन एकर जमीन खंडाने किंवा अर्धेलीने देऊन खेडोपाडी म्हाताऱ्या बायका आणि शाळामास्तर जगत होते. त्यांच्यावर जमीनदारीचा शिक्का मारून गदारोळ करण्यात आला. पाटण्याला किंवा अलाहाबादला ज्या पद्धतीने पुरोहितवर्ग अज्ञ लोकांना लुबाडतो तसं महाराष्ट्रात फारसं झालं नाही. भिक्षुकीचा व्यवसाय काही कुटुंबे करीत होती. पण त्यांनी लुबाडलं असं म्हणता येणार नाही. तरीही भटजींवर फुल्यांच्या काळापासून आजतागायत दातओठ खाणं चालूच आहे.

याउलट महाराष्ट्रातलं बहुतेक सगळं प्रबोधन ब्राह्मणांनीच त्यागपूर्वक केलेलं आहे. ज्यांना फाशीच्या किंवा जन्मठेपेच्या शिक्षा देशभक्तीकरिता झाल्या अशा मराठी मंडळींची गेल्या शंभर वर्षांतली नावे काढली तर त्यांतली निदान पंचाण्णव टक्के नावे ब्राह्मणांची असतील साहित्यक्षेत्र, सामाजिक कार्य यांमध्ये ब्राह्मणांनी केलेले काम सर्वमान्य व्हावे, हे सांगण्यात इतर समाजाचा अधिक्षेप अर्थातच नाही. ब्राह्मणांना शिक्षणाची परंपरा असल्यामुळे त्यांच्या हातून इतके बौद्धिक कार्य होऊ शकले. परंतु त्यांनी त्याग, शुचिर्भूतपणा, साधेपणा, ज्ञानोपासना वगैरे श्रेष्ठ गुणांचा आदर्श इतर समाजापुढं ठेवला यात काहीच शंका नाही. वाचनालये, शाळा आणि वर्तमानपत्रे यांमध्ये पोट मारून काम करणारी ब्राह्मणासारखी जमात महाराष्ट्रात दुसरी नसावी.

इतकं सगळं असूनही हा समाज द्वेषाचं आणि टीकेचं केंद्र बनला. त्यालाही काही कारणे असू शकतील. पेशवाईपासून महाराष्ट्रात राज्यकर्त्यांची आणि शासनाची भूमिका ब्राह्मणवर्गाकडे आली. इतर समाजाच्या रोषाचं तेही एक कारण असावं.

ते काय असेल ते असो, पण ब्राह्मण समाजातील तरुणांची मने आज निराळ्या मार्गाने जात आहेत हे खरं! दीड-दोनशे वर्षे महाराष्ट्राचं राजकारण आणि समाजकारण या वर्गानं केलं. पस्तीस-छत्तीस सालापर्यंत ब्राह्मण तरुणांना राजकारणाचा फार हव्यास होता असे मला स्मरते.

घरोघरी तेव्हा राजकारणाच्याच चर्चा घडत. कॉंग्रेस चांगली का वाईट... समाजवादाची तत्त्वे कोणती...वगैरे विषयावर वादंग घराघरात चाललेले आठवतात. याचा अर्थ प्रत्येक ब्राह्मण तरुण तेव्हा राजकारणात प्रत्यक्ष भाग घेत होता, असा नव्हे. तो कारकुनाच्या किंवा शिक्षकाच्या नोकऱ्या करी. पण राजकारणावर पोटतिडिकेने बोले. वर्तमानपत्रातले अग्रलेख व बातम्या तेव्हा त्याला प्रिय असत. त्याच्यावरच त्याचे मन पोसले जाई.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर– विशेषत: गांधीखुनानंतर ब्राह्मण तरुणांनी राजकारणाबद्दल हाय खाल्ली. त्यागाबद्दल किंवा तत्त्वनिष्ठेबद्दल त्याचा पाया डळमळायला लागला. दीडशे वर्षांचा राजकारणाचा व्यासंग सुटल्यामुळे काही वर्षे त्याचे मन वैफल्याने ग्रासले गेले. पण आज तो निराळ्या तऱ्हेने स्वत:च्या आयुष्याची बांधणी करीत आहे. स्वत:बद्दल निराळ्या तऱ्हेने विचार करीत आहे.

आजच्या ब्राह्मण तरुणाला देशभक्ती, त्याग, सेवाधर्म, समाजप्रबोधन इत्यादी गोष्टी फजूल वाटतात. त्यांच्यावरचा त्याचा विश्वास संपूर्ण नाहीसा झाला आहे. एखाद्या तत्त्वाकरिता त्याग करायचा आणि दारिद्र्याला कवटाळायचं यात काही अर्थ नाही असे त्याला वाटते. त्या दारिद्र्याचीच हेटाळणी होते, आणि समाजाच्या दृष्टीने त्या त्यागाची किंमत शून्य असते, हे त्याला अनुभवाने पटले आहे. देशासाठी सर्व जन्म फकिरी पत्करणारा माणूस जर निवडणुकीला उभा राहिला तर ब्राह्मण असल्यामुळे त्याचे डिपॉझीटदेखील जप्त होते हे त्याने पाहिले आहे. याबाबतीत एक जुनी आठवण सांगतो– कॉ. विनायकराव भुस्कुटे यांनी एका निवडणुकीत कॉंग्रेसच्या तिकिटाकरिता अर्ज केला होता. परंतु त्यांना तिकीट न देता कॉंग्रेस कमिटीने ते केशवराव जेधे यांना दिले. श्री. शंकरराव मोरे यांनी

तेव्हा जाहीरपणे सांगितले की, " श्री. भुस्कुटे हे ब्राह्मण असल्यामुळे निवडून येण्याची शक्यता कमी आहे. शिवाय त्यांच्याजवळ आर्थिक बळही नाही. म्हणून आम्ही जेधे यांना तिकीट दिले." त्यावर भुस्कुटे यांनी 'सकाळ'मध्ये पत्र लिहून जाहीर सवाल केला होता, " त्यागामध्ये जेध्यांच्या मानाने मी मुळीच कमी नाही. मी जात मानत नाही– पण मी ब्राह्मण जातीत जन्मलो असल्यामुळेच माझ्यावर अन्याय होत आहे." हा प्रसंग पुरेसा बोलका आहे.

आजचा ब्राह्मण तरुण असल्या प्रसंगांमुळे पुरेसा शहाणा झाला आहे. तो राजकारणाचं किंवा त्यागाचं नाव काढत नाही. त्याने विज्ञानाच्या आणि यंत्रविद्येच्या क्षेत्रात स्वत:ची प्रगती करून घेतलेली आहे.

आज महाराष्ट्रातल्या बहुतेक सर्व उद्योगधंद्यांत आणि कारखान्यांत ब्राह्मणवर्ग अग्रेसर आहे. सकाळी तो कामावर जातो आणि संध्याकाळी परत येतो. खूप पैसे मिळवतो. टी. व्ही., फ्रीज, फोन वगैरे सुविधांमुळे त्याने आपले जीवन समृद्ध केले आहे. सुंदर, फॅशनेबल बायको, चांगला पगार, दोनच दोन मुले, सर्व सुविधांनी युक्त असलेला फ्लॅट, वाचायला इंग्रजी गुप्तहेर कथा आणि अश्लील कथा अशी त्याची जीवनाची चौकट आहे. मला एक ब्राह्मण वृद्ध गृहस्थ म्हणाले, " आपला समाज पार्शी किंवा अँग्लो-इंडियन लोकांसारखा झाला आहे. इतर मराठी जीवनाशी आपला काही संबंध उरलेला नाही. आपली पाळंमुळं महाराष्ट्राच्या भूमीत नाहीत...आपण इथे परके आहोत."

परवा मी त्या वृद्ध गृहस्थांचे हे बोलणे माझ्या इंजिनियर मुलाला सांगितले. त्याच्या मनावर काय परिणाम होतो याचे मी मुद्दाम निरीक्षण करीत होतो. त्याला काहीच वाटले नाही. त्याला तो विचार कळलाही नाही. तो म्हणाला– " कसली महाराष्ट्रभूमी आणि कसली पाळंमुळं ? तुम्ही उगाचच कशाबद्दल तरी शोक करीत बसता. मला इतका वेळ नाही. मी क्लबवर निघालो आहे. मला जर उद्या परदेशात मोठी नोकरी मिळाली तर मग मला या देशाची आठवणदेखील होणार नाही."

सामुदायिक धर्मांतराबाबत माझ्या एका मित्राचा मुलगा म्हणाला, " सगळ्या ब्राह्मणांनी मुसलमान धर्म स्वीकारावा. त्यात त्यांचे जास्त कल्याण आहे. ते निवडून येतील, त्यांना सहज नोकऱ्या मिळतील, आणि मराठा पुढारी मतांकरिता त्यांच्यापुढे लोटांगण घालतील."

त्याचं ते बोलणं ऐकून मी फार बेचैन झालो. या महाराष्ट्रात आपली पाळंमुळं नसणं ही केवढी भयंकर गोष्ट आहे... बाळाजी विश्वनाथापासून लो. टिळकांपर्यंत, सावरकरांपासून एस. एम. जोशींपर्यंत सगळा इतिहास आठवला. मन खिन्नतेने भरून आले. या देशात परकं होण्याची कल्पनाही भयंकरच वाटली.

हे एक झालंच. पण दुसराही एक भयंकरपणा यात दडलेला आहे. दीड-दोनशे वर्षं जो समाज राजकारण करीत होता, मुत्सद्देगिरीची शर्थ करीत होता, ज्ञानोपासना करीत होता, समाजाच्या कल्याणासाठी स्वतः झीज सोसत होता तो समाज आज एकदम मूक झालेला आहे. राजकारणाची हाय खाऊन बाजूला गेला आहे.

दीडशे वर्षांची परंपरा आज खंडित झाली आहे. यामुळे आज महाराष्ट्रात काही विलक्षण पोकळी निर्माण झाली आहे का? समाजात पोरकेपणा निर्माण झालेला आहे का? त्या पोकळीमुळेच भ्रष्टाचार आणि नैतिक अवमूल्यन झाले आहे का?

तसं काही नक्की सांगता येणार नाही. कदाचित झालं असेल. कदाचित नसेल. पण ती पोकळी मला तरी फार जाणवते. माझा जीव कासावीस करते.

त्या पोकळीचे उदाहरण आजच्या ब्राह्मणांच्या लाचारीत दिसेल. आपण ब्राह्मणाला शिव्या दिल्या, तरच जगू शकू असे आज ब्राह्मण विचारवंताला वाटते. घाशीराम कोतवाल नाटकाची प्रशस्ती सर्व ब्राह्मण विचारवंतांनी केली त्या वेळी माझ्या एका लेखकमित्राने स्वतः जाऊन मुद्दाम घाईघाईने त्या प्रशस्तिपत्रावर सही केली. तो मला म्हणाला, "पत्रकावर सही नसती तर मी पुरोगामी विचारवंत ठरलो नसतो." एका दलिताची कादंबरी प्रकाशित झाल्याबरोबर एक मराठा लेखक मला म्हणाला, " आता सगळे ब्राह्मण टीकाकार एका सुरात, त्या कादंबरीची स्तुती करायला लागतील. कादंबरी चांगली वाईट हा प्रश्न नाही. ती एका दलिताने लिहिली आहे, एवढेच ते पाहणार. ब्राह्मण टीकाकारांसारखी लाचार जमात नसेल."

मी एक ब्राह्मण आहे! मी संध्या करत नाही, सोवळं नेसत नाही, शिवाशिव पाळत नाही. मांसाशनही करतो. मग मी ब्राह्मण आहे म्हणजे काय? पण आहे एवढं मात्र खरं! लोकांच्या दृष्टीने आहे आणि माझ्याही दृष्टीने आहे.

माझी मुलं, नातवंडं यंत्रविद्येत निपुण आहेत. ती पैसेही खूप मिळवतात. मी जसा दरिद्री होतो तसे ते नाहीत.

पण तरीही महाराष्ट्राच्या भूमीत आमची पाळंमुळं नाहीत! आम्ही अँग्लो-इंडियनांसारखे आहोत.

बापरे! या कल्पनेनेच माझा जीव अर्धमेला होतो. इथे पाळंमुळं नसण्यापेक्षा मरण बरं असं वाटत राहतं.

## ५

# नानूमामा

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

बरेच वय होईपर्यंत साधारणपणे वयाची दहाबारा वर्षे उलटून जाईपर्यंत मी नानूमामाला बघितलेच नव्हते. पण त्याच्याविषयी ऐकले मात्र खूप होते! माझ्या सर्व नातेवाइकांत नानूमामा खूप श्रीमंत होता–महाराष्ट्रातील एका फार मोठ्या नामवंत गृहस्थाचा दत्तकपुत्र होता. त्यामुळे त्याच्याविषयी घरात नेहमीच काही ना काही ऐकायला मिळे आणि गंमत वाटे. गरीब लोकांना नेहमी श्रीमंत व सुस्थितीतील लोकांविषयी बोलायला आवडते हे तर झालेच, पण आईचे बालपण नानूमामाच्या घरातील मोठ्या परिवारात गेले असल्यामुळे, स्वतःच्या दरिद्री संसारातील खस्ता खाताखाता, तिला लांबच्या का होईना, पण श्रीमंत भावाविषयी बोलणे आवडे, हेही सांगता येईल.

आईचा तो भाऊ लागे, पण लांबचा–खूप लांबचा. अगदी खरे सांगायचे तर त्यांच्या नात्याचा संबंध फारसा नसेलही! परंतु त्या श्रीमंत घराण्यात जुन्या काळातील खानदानी पद्धतीप्रमाणे जे गरीब, अनाथ आश्रित जमा झाले होते, त्यांत माझ्या आईचे वडीलही होते, आणि त्यामुळेच तिचा बालपणातील बराचसा काल, त्या वाड्यात गेलेला होता. आश्रितांचे जिणे ती त्या मोठ्या पेशवाई वाड्यात जगली होती आणि भटांनी सार्वभौम राजाची स्तुतिस्तोत्रे गावीत, त्याप्रमाणे ती नेहमी नानूमामांची गात असे, असे म्हटले तर ते विशेष चूक होणार नाही. आईचा नि बाबांचा संसार इतर चार संसारांप्रमाणे अगदी गरीब

होता, हे उघड आहे. नारायण पेठेतील त्या दोन अंधाऱ्या ओलसर खोल्यांत वावरताना वर्षानुवर्षे तिने नानूमामाच्या मोठ्या वाड्याचे नि संपन्न जीवनाचे चित्र मनात जपून ठेवले होते, असे समजण्यासही हरकत नाही.

मला आठवत आहे, लहानपणी कधी आईबरोबर मंडईत गेलो, की टिळक पुतळ्याच्या बाजूने पानाचे गाळे आहेत, तिथे उभे राहिले, की ती एका खूप मोठ्या वाड्याकडे बोट दाखवी आणि सांगे, " तो नानूमामाचा वाडा ! "

हातातील भाजीची झोळी सावरता सावरता मी टाचा उंच करून त्या वाड्याकडे बघितल्याचे मला पक्के स्मरते ! आज इतकी वर्षे झाली, पण त्या मोठ्या अंगाच्या वाड्याचे स्वरूप मनावरून पुसले गेले नाही. स्थूल प्रकृतीचा पण म्लान गंभीर चेहऱ्याचा एखादा माणूस असावा, तसा तो वाडा मला प्रथमदर्शनीच वाटला. काही दुःखद विचार मनात सारखे घोळत असलेल्या रुबाबदार पुरुषासारखे त्या वाड्याचे स्वरूप होते. एखाद्या घराच्या आतल्या खोलीत कुणीतरी मरत पडले असावे – एखाद्या जीवाची अंतकाळची तडफड नि आकान्त चाललेला असावा, व बाहेरच्या बाजूला इतर खोल्यांतून नेहमीचे व्यवहार शांतपणे चाललेले असावेत, म्हणजे जसे ते घर दिसेल, तसेच नानूमामाचे ते प्रचंड घर दिसत होते, असे इतक्या लहानपणीही मला वाटले होते. इतके आयुष्य वाहून गेले, पण सांगायला काही हरकत नाही, की मालवलेल्या, म्लान चेहऱ्याची अशा तऱ्हेची घरे मी फार कमी बघितली असतील.

पण त्या म्लान वास्तूच्या नुसत्या दर्शनानेदेखील आईच्या आठवणींना पालवी फुटे. तिच्या आणि काळसर वर्णाच्या किंचित ओबडधोबड चेहऱ्यात काही निराळीच चमक भासायला लागे ! वडिलांसाठी एक आण्याची पाने व चुना घेताना ती सांगायची, " बाहेरच्या बाजूला तो मोठा हॉल दिसतोय ना, तिथे पूर्वी ' रावसाहेब ' बसायचे ! तिथे कुणाला जायची परवानगी नसे. मी इतक्या वर्षांत तिथे फक्त एकदा गेले होते ! "

' रावसाहेब ' कोण होते हे मला माहीत होते. आमच्या मराठीच्या पुस्तकात मी त्यांचे चरित्र वाचले होते. तांबडसर ऐटबाज पगडी घातलेला, आणि गळ्याभोवती उपरणे लपेटलेला त्यांचा फोटोही त्याच धड्यात मी बघितला होता, व इतक्या मोठ्या लोकोत्तर पुरुषाचे नि माझे अगदी लांबचे का होईना, पण नाते आहे, या विचारांनी अभिमान पावलो होतो. ' रावसाहेब ' कोण होते हे

विचारण्याची मला जरुरी नव्हती.

एवढ्या वेळात पाने घेऊन आम्ही मंडईच्या खालच्या बाजूला पालेभाज्या घ्यायला गेलेलो असायचो. आईचा चेहरा अजूनही फुललेला असायचा, व तिचे तेच पुराण चालायचे ! ती सांगायची,

"—आणि बाजूला मोठी खोली आहे ना, तिथे नानू बसायचा ! तिथेही कुणी जायचे नाही. एखाद्या राजपुत्रासारखा त्याचा थाट असायचा !...जरीची निळी टोपी घालून घरच्या मोठ्या बगीतून पुढेमागे पट्टेवाले घेऊन तो तेव्हा शाळेत जायचा !"

मंडई उरकून आमच्या बिऱ्हाडापाशी आलो, तरी देखील आईचे बोलणे संपायचेच नाही ! त्या मोठ्या खानदानी घरातील अनेक गोष्टी ती ऐकवीतच राहायची ! दत्तकाची भांडणे...कुणी लक्ष्मीकाकू होत्या त्यांचा जहांबाजपणा... सोपाना गड्याचे चोरून गांजा ओढणे...कुणी नारायणराव होते, त्यांनी व्यवहार बघताबघता किती नि कसे पैसे खाल्ले – हे सांगायची ! लहानपणी ह्या मोठ्या श्रीमंती घरात कोणकोणत्या माणसांनी तिला कसेकसे वागविले होते, याचे सुंदर वर्णन करायची !

त्या वर्णनात मी अगदी तल्लीन होऊन जायचा. का होऊन जायचा हे त्या वेळी कळायचे नाही, पण आता इतक्या वर्षांनंतर त्याचे कारण सहज सांगता येईल. नारायण पेठेतील त्या दोन ओलसर खोल्यांतील आंबलेले दरिद्री जीवन जगताजगता मला त्या श्रीमंती वातावरणाच्या गोष्टींची मजा वाटत असावी. जरीची टोपी घालून पुढेमागे पट्टेवाले घेऊन मोठ्या थाटाने बगीतून शाळेत जाणाऱ्या नानूमामांचा मला त्या वेळी हेवा तर वाटेच, पण एक प्रकारची आसक्तियुक्त अशी आत्मीयताही वाटे, हे सांगणे जरूर आहे. आई त्या वेळी आणखी इतर माणसांबद्दल जे बोले, त्याबद्दलही अशीच चमत्कारिक ओढ वाटे. मी स्वतः अजून नानूमामालाच बघितले नव्हते, तर इतर कोणाला बघणार ? तरी महाभारतातील कौरवपांडवांची चित्रे जशी आपल्या मनात तयार झालेली असतात त्याचप्रमाणे आईच्या बोलण्यात नेहमी येणाऱ्या लक्ष्मीकाकूंची आणि नारायण-रावांची चित्रे माझ्या मनावर अगदी स्पष्टतया उमटलेली असत. मी लक्ष्मीकाकूंना बघितले नव्हते-बघणे शक्य नव्हते, परंतु त्यांचे रूप मनाशी केव्हाच निश्चित केले होते. त्या नक्कीच अशा स्थूल अंगाच्या, गौर वर्णाच्या, आणि गोबऱ्या चेहऱ्याच्या

असतील, आणि स्त्रीजातीला – विशेषतः श्रीमंत चित्पावन स्त्रीला शोभेसा ठसका त्यांच्या प्रत्येक बोलण्यात नक्कीच असेल! कुत्सित, आडवेतिडवे बोलून त्या आसपासच्या लोकांची मने नेहमीच रक्तबंबाळ करीत असतील, आणि त्याची त्यांना तिळमात्र क्षितीही वाटत नसेल!...व्यवहार बघताबघता पैसे खाणारे नारायणराव असे डोक्याला टक्कल पडलेले, काळेमिचकट जानवे घातलेले व प्रत्येकाशी अजीजीने आणि लाचारीने बोलणारे असतील...नारायणराव आणि लक्ष्मीकाकू यांच्याप्रमाणेच मी आयुष्यात कधीही न बघितलेल्या अनेकविध व्यक्तींची रेखाचित्रे त्या वेळी माझ्या मनावर तेव्हा चितारलेली होती.

असेच दिवस जात होते, आणि नानूमामाच्या गोष्टी मी ऐकतच होतो. तो डॉक्टर आहे, आता मुंबईला प्रॅक्टिस करीत आहे, व आता त्या प्रचंड घरात दुसरे कोणी राहात नाही, हे मला आईच्या बोलण्यावरून समजलेच होते. 'रावसाहेब' कित्येक वर्षांपूर्वी मयत झाले होते, आणि त्या घराची सारी शान आता संपलेली होती. कणगीतील धान्याचे दाणे हळूहळू संपत जावे, त्याप्रमाणे आश्रितांचा घोळका आता कुठल्या कुठे गेला होता. त्यांपैकी कुणी मेले होते, कुणी वृद्ध होऊन दुसरा आसरा बघितला होता, तर कुणाला नानूमामाने हाकून दिले होते. एवढ्या मोठ्या प्रचंड वाड्यात आता नोकरवर्गाशिवाय दुसरे कोणीही नव्हते, असे मी ऐकत होतो, आणि जुन्या घराविषयीचे माझे ममत्वही संपत चालले होते. अजूनही एखादे वेळी मी मंडईत गेलो, की पाने घेताना त्या वाड्याकडे टक लावून बघण्यास विसरत नसे, परंतु त्या विषयातील बरेचसे स्वारस्य कमी होत चालले होते असे म्हणायला हरकत नाही!

अशीच आणखी काही वर्षे गेली असावी, आणि मग 'तो' दिवस उगवला! इतक्या वर्षांनंतरही मला त्याचे स्मरण अगदी पूर्ण आहे.

अशी सकाळची, – साडेआठ-नऊची वेळ होती! वडील स्नान आटोपून नि कपाळावर आडवे दुबोटी पांढरे गंध लावून बाहेरच्या खोलीत देवाची पूजा करीत बसले होते, आणि आई आतल्या घरात पोळ्या लाटीत होती! आम्ही सारी भावंडे तशीच अस्वच्छ कपड्यांनी आणि झोपेनंतरच्या मलिन चेहऱ्यांनी दाराजवळच्या भिंतीजवळ जी वळकट्यांची रास ठेवली होती, त्यावर गुधडा घालीत होतो. वडील मोठमोठ्यांदा काही स्तोत्रे म्हणत होते, आणि आई आतल्या घरातून कुणावर तरी ओरडत होती! असा हा धुमाकूळ चालू

असतानाच कुणीतरी एक माणूस वडिलांच्या नावाची चौकशी करीत दरवाज्यापाशी आला, नि तिथेच उभा राहिला.

वळकट्यांच्या राशीवर बसून मी त्या माणसाकडे बघितले, आणि मला तो एकदम निराळा वाटला. त्याचे कपडे स्वच्छ होते, पण परीटघडीचे नव्हते. डोक्यावर तपकिरी रंगाची घडीची टोपी होती, आणि ओठांवर किंचित पांढुरक्या मिश्यांचा भलामोठा झुबका होता ! त्याच्या उभे राहण्याच्या पद्धतीवरूनच मला त्याचे निराळेपण जाणवले होते. श्रीमंत माणसाच्या पिढीजात नोकराने वागावे – उभे राहावे तसे त्याचे वागणे होते.

स्तोत्र म्हणणे वडिलांनी एकदम थांबवले, व विचारले, " कोण आहे ? "

अदबीने हात जोडून त्याने सांगितले, " मी आहे ! "

माझ्या वडिलांशी इतके अदबीने वागलेले मी आजपर्यंत कुणालाही बघितले नाही. ऐतिहासिक नाटकांतील एखाद्या काळोजी किंवा हिरोजीप्रमाणे त्याने जमिनीला तीन वेळ हात लावून, " मी आहे सरकार ! " म्हटले असते, तरी मला त्या वेळी वाटले तितके आश्चर्य वाटले नसते.

माझ्या वडिलांनी त्याला ओळखले नाही म्हणून ते नुसतेच बघत बसले. तेव्हा तोच पुढे म्हणाला, " मी नानासाहेबांकडून आलो आहे ! "

तरीही वडिलांच्या डोक्यात प्रकाश पडला नाही, तेव्हा त्याने पुढे सांगितले, " रामेश्वराजवळचे नानासाहेब ! नमूताईंची चौकशी करायला पाठवलं आहे त्यांनी ! "

' नमूताई ' हे माझ्या आईचे माहेरचे नाव आहे. ते ऐकल्यावर वडिलांना एकदम समजले, व ते आश्चर्याने ओरडले, " ओऽ होऽ हो ! म्हणजे नानूमामांकडून तुम्ही आला आहात ? "

तो " हो " म्हणाला व पुढे त्याने सांगितले, " मुंबईची प्रॅक्टिस बंद करून नानासाहेब पुण्याला आले आहेत, आणि त्यांनी मुलांना घेऊन नमूताईला रविवारी दुपारी चहाला बोलावलं आहे."

आई इतके झाल्यावर बाहेर आली, व त्या माणसाच्या दर्शनाने एकदम सुखावली ! मग जुन्या आठवणींना उजाळा मिळाला, आणि थोड्या वेळाने तो माणूस निघून गेला.

त्या माणसाने सांगितलेला निरोप मी ऐकला होता, आणि मला फार आनंद

झाला होता. रविवारी नानूमामाने बोलावले होते, म्हणजे अजून फक्त दोनतीन दिवसांनीच लहानपणापासून बघत असलेल्या त्या किल्लेवजा अजस्र वाड्यात मी प्रवेश करणार होतो, व आमच्या नात्यातील एकुलत्या एक श्रीमंत माणसाला बघणार होतो.

मी आनंदलो होतो. माझ्या खालची भावंडे सुखावली होती, पण का कुणास ठाऊक, वडील मात्र एकदम गंभीर झाले होते. ते काहीच बोलत नव्हते–नुसतेच 'हं हं' करीत होते. त्यांचे ते गांभीर्य त्या साऱ्या दिवसभर टिकले होते, आणि दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ऑफिसमधून आल्यानंतर चहा पिता पिता ते आईला म्हणाले, "—म्हणजे आता पंचाईत आली!"

कशाची पंचाईत आली हे आईला कळले होते, म्हणून ती नुसतीच थंड बसली.

तेव्हा तेच पुढे म्हणाले, "तुम्हाला आता परवा नानूमामाकडे जायचं आहे! पण चांगले – झुळझुळीत कपडे कुणालाच नाहीत."

ही गोष्टही खरी होती, आणि बोलण्याजोगे तीत काहीच नव्हते, तेव्हा आई गप्पच बसली.

वडील पुढे स्वतःशीच पुटपुटावे तशा आवाजात म्हणाले, "कुणालाच काही कपडे नाहीत. विजार आहे, तर सदरा चांगला नाही! आणि पायात तर कुणाच्याच नाही!...छे बुवा! इतक्या श्रीमंत लोकांकडे असं जाणं कसंतरीच दिसेल!"

"माझं काही नाही, पण मुलांचं मात्र बघायला पाहिजे!" आई म्हणाली.

"नाही तर असं करावं, कुणीच जाऊ नये झालं! — सांगावं काहीतरी कारण—" माझ्याकडे दृष्टी टाकीत वडील म्हणाले.

त्यांचे ते बोलणे ऐकून माझ्या मनाला बसलेला हादरा मला आठवत आहे! ...वाटले, की वडील स्वतःचेच बोलणे खरे करतील, आणि ती सोन्याची द्वारका मला कधी दिसणारच नाही.

पण तसे अर्थातच काही झाले नाही दुसऱ्या–तिसऱ्या दिवशी कुठून तरी वडिलांनी पैसे उसने आणले. आम्हाला तयार कपड्यांच्या दुकानात नेऊन, प्रत्येक मुलाला एक निळी चड्डी व खाकी शर्ट घेऊन आले. आईला अर्थातच काही घेतले नाही – घेणे शक्यच झाले नाही. ती तशीच राहिली.

मग रविवारी दुपारी आम्ही सर्व भावंडे ते आमच्या अंगाचे नसलेले आणि

भयंकर दाटणारे, खळीचा वास मारणारे कपडे घालून नानूमामाकडे जावयास निघालो. एखाद्या सेनापतीने अगदी शेवटच्या घटकेला सैन्याची पाहणी करावी, तशी वडिलांनी आम्हा सर्वांची केली, व माझ्याकडे पाहून चेहरा वाकडा करीत म्हणाले, " बाकी सारे ठीक आहे. पण याच्या पायावर खरूज आहे, आणि मलमाचे काळे डाग आहेत. याला मोजे घालायला पाहिजेत. नाही तर ते भारी वाईट दिसेल."

आईलाही ते बोलणे पटले ! इतक्या श्रीमंतांकडे पायावर खरूज घेऊन जाणे बरे नव्हे, हे उघड होते. खरूज असणे हे अर्थातच तितकेसे वाईट नव्हते. अंगावर ती घेऊन वाड्यातल्या-आसपासच्या मुलांबरोबर खेळणेही वाईट नव्हते. पण तिच्यासह नानूमामाकडे जाणे मात्र अब्रह्मण्यम् होते. मग पुन्हा एकच धावाधाव नि आरडाओरड झाला. ते एक महान संकट नव्यानेच जणू उभे राहिले; व त्या यक्षप्रश्नाची सोडवणूक कशी करावी याबद्दल बरीच चर्चा झाली. शेवटी काही विचार करून वडिलांनी कष्टी चेहऱ्याने खिशातले आठ आणे आईजवळ दिले, व सांगितले, "— जाताना तुळशीबागेजवळ आठ आण्यांचे मोजे घ्या, नि ते त्याला घालून मग पुढे जा." त्याप्रमाणे आम्ही खाकी रंगाचे-भोके भोके असलेले मोजे विकत घेतले. ( माझ्या आयुष्यातले ते पहिलेच मोजे. दुसरे मोजे मी नोकरीसाठी ' इंटरव्ह्यू 'ला मुंबईस गेलो, तेव्हा घेतले.) ते तिथंच घातले, व पुढे निघालो.

आम्ही हळूहळू रामेश्वराजवळच्या त्यांच्या मोठ्या वाड्यात आलो, आणि का कुणास ठाऊक, पण आई एकदम गंभीर झाली, आम्ही सर्वच थोड्याफार प्रमाणात कावरीबावरी झालो, आणि धडधडत्या छातीने आत शिरलो.

खरेच सांगतो, इतका मोठा प्रचंड वाडा मी तोपर्यंत बघितला नव्हता, आणि खऱ्या खऱ्या श्रीमंत माणसाच्या घरात तर मी प्रथमच पाऊल टाकीत होतो. आमच्या पुण्याचे वाडे इतके प्रकाशमान, इतके स्वच्छ कधीच नसतात. त्यांच्या-वर नेहमीच एक जुनाटपणाची अवकळा पसरलेली असते, आणि दरिद्री जीवनाची लक्तरे त्यांच्या अंगाखांद्यावरून लोंबत असतात. पण तसे नानूमामाच्या वाड्याचे नव्हते. वाडा चांगला प्रशस्त, दोनमजली होता, आणि खाली असे मोठे फरसबंद अंगण होते. एवढी गोष्ट खरी, की वाड्याच्या मोठ्या अंगाच्या मानाने तिथे गडबड-गोंधळ अजिबात नव्हता; एक प्रकारची अदबशीर

व किंचित भीतिदायक शांतता तिथे असल्यासारखे वाटत होते.

आम्ही आत शिरलो, तेव्हा दुसऱ्या बाजूला अंगणातल्या बाकावर तो त्या दिवशीचा माणूस बसलेला दिसला; त्याने आम्हाला वरच्या हॉलमध्ये नेले, व बसण्यास सांगितले. वरच्या दिवाणखान्यात नानूमामाच्या सासुरवाडीच्या नात्याकडील आणखी काही बायका होत्या, आणि दोनचार नीटनेटके कपडे केलेली, सुकुमार, टवटवीत शरीरयष्टीची मुले होती. त्या बायका दागिन्यांनी व उंची कपड्यांनी मढलेल्या होत्या, आणि त्यांच्या सर्व व्यक्तिमत्त्वावर सुखवस्तुपणाची, किंवा ऐदी श्रीमंतीची चमत्कारिक कळा दिसत होती. त्या सर्व घोळक्यात अगदी उठून दिसण्याइतकी गरिबी फक्त आमचीच होती, आणि त्यामुळे आईवरील आणि आम्हा भावंडांवरील केविलवाणेपणाची छाया जास्त गडद झाली होती.

त्या उंची कपडे घातलेल्या स्त्रियांच्या गराड्यात आई अंग चोरून, मुकाटपणाने बसली, व आम्ही मुले बाजूला बसलो! खरे म्हणजे मुलामुलांनी बोलायला पाहिजे होते—दंगामस्ती करायला पाहिजे होती. पण आम्ही तशीच बसलो. त्या श्रीमंत, सुकुमार मुलांत आणि आमच्यांत काहीच साम्य नव्हते, साम्यस्थळे नव्हती. त्या घोळक्यात बसलो असताना मला वाटते, आयुष्यात अगदी प्रथमच अजाणतेपणाने का होईना, पण मी ‘ क्लास-कॉन्शस ’ झालो होतो, असे म्हणण्यास हरकत नाही.

त्या दिवाणखान्यातून खाली मंडईतील पानवाल्यांची दुकाने दिसत होती, आणि गिऱ्हाइकांचा कलरव ऐकू येत होता. हॉलच्या मध्यावर एका मोठ्या कोचावर ‘ रावसाहेबां ’चे खूप मोठे असे तैलचित्र ठेवलेले होते, आणि त्याला पिवळ्या फुलांचा खूप मोठा असा ताजा हार घातला होता. त्या मोठ्या तैलचित्रासमोर केव्हा तरी लावलेली उदबत्ती जळूनजळून आता शेवटास आली होती, आणि तिच्या वासात, फुलांच्या गंधाचे चमत्कारिक मिश्रण झाले होते. तो अर्थातच रावसाहेबांचा दिवाणखाना होता, हे उघड होते. लहानपणापासून मंडईच्या मागच्या बाजूला पानांच्या दुकानाच्या बाजूने ज्या दिवाणखान्याकडे मी बघत होतो, तोच हा दिवाणखाना होता. रावसाहेबांना मरून जवळजवळ चाळीस वर्षे होऊन गेली होती, परंतु ते जणू जिवंत आहेत, अशा भावनेने ती वास्तू जतन करून ठेवण्यात आली होती.

आम्ही असे बराच वेळ तिथे बसलो होतो. एखाद्या मुलाखतीला न्यावे त्याप्रमाणे आतून नोकर येऊन एकएका बाईला नि तिच्या मुलांना आत नेत होता, आणि थोड्याच वेळात तो बाहेर येत होती. प्रथम ती टवटवीत अंगाची सुकुमार मुले, आणि उंची वस्त्रे नेसलेल्या त्या गौरवर्ण स्त्रिया आत जाऊन आल्या आणि नंतर नोकराबरोबर आम्ही आत गेलो.

आतल्या दिवाणखान्यात मधल्या कोचावर परीटघडीचे तलम रेशमी कपडे घालून नानूमामा बसला होता, आणि शेजारीच हिऱ्यामोत्यांचे दागिने अंगावर असलेली, पूर्ण गौरवर्णाची तारामामी होती. त्या वेळी नानूमामाचे प्रथम पाहिलेले स्वरूप माझ्या अजूनही स्मरणात आहे. त्यांचा चेहरा असा गोरटेला नि गोब्रा होता, आणि डोळ्यांवर ऐटबाज फ्रेमचा सोनेरी चष्मा होता, हे तर झालेच, पण साऱ्या व्यक्तिमत्त्वावर श्रीमंतीचा – सुखवस्तुपणाचा – एक चमत्कारिक तवंग असल्याचे मला त्या वेळीही जाणवल्यावाचून राहिले नाही. एखाद्या वेळी अगदी लहानसहान गोष्टी उगीचच लक्षात येतात, आणि जन्मभर मनात पक्क्या रुजून बसतात. त्याप्रमाणे त्याच्या अगदी जवळ बसल्यानंतर माझ्या हे लक्षात आले होते, की त्याचे तळपाय आणि तळहात अगदी शुभ्र – अगदी मळहीन होते. तळहातांचे एक असो, परंतु तळपाय देखील इतके शुभ्र असणारा, – त्यावर मळाचा काळा ठिपकाही नसणारा मराठी माणूस मी आजतागायत पाहिलेला नाही असे म्हटले तर ते चूक होणार नाही. किंबहुना असेही म्हणता येईल, की त्याच्या एकंदर घडणीतच महाराष्ट्रीयत्वाचा अंशच फार कमी असावा. मी स्वतः महाराष्ट्रीय श्रीमंत व संपन्न माणसे फार करून बघितली नाहीत, परंतु जी काही बघितली आहेत, त्यांच्यामध्ये इतका लिबलिबीत – इतका तुकतुकीत – माणूस माझ्या दृष्टिपथात आलेला नाही. महाराष्ट्रीय श्रीमंत माणूसदेखील बराचसा ओबड-धोबड व राकट असतो – सह्याद्रीचा अंश त्याच्यात थोडातरी असतोच, परंतु नानूमामा त्याला अपवाद होता, असे म्हणणे भाग आहे. म्हणूनच असेल कदाचित, त्याची ती एखाद्या पारशासारखी तुकतुकीत अंगकांती मला त्या वेळी विचित्र वाटली होती.

आम्ही आत गेलो, आणि त्यांच्यापुढे उभे राहिलो. श्रीमंत माणसे गरीब माणसांची चौकशी करताना जो एक कनवाळूपणाचा मृदू-मुलायम आवाज काढतात, तशा आवाजात मग त्यांनी आमची चौकशी केली. ' आता बरं आहे

ना ?', 'मुलं किती ?', 'मुलं ठीक दिसतात !' वगैरे प्रश्नोत्तरे झाली आणि जुन्या आठवणी निघाल्या. नंतर प्रत्येक मुलाला जवळ बोलावून, त्याच्या हनुवटीला किंवा गालाला हात लावून प्रत्येकाचे नाव विचारले, आणि 'हा छान दिसतो !', 'याचे डोळे अगदी हुबेहूब तुझ्यासारखे दिसतात' किंवा असेच काहीतरी बोलून कौतुक करण्यात आले. मी त्याला आवडलो होतो किंवा नाही हे मला सांगता येत नाही. कदाचित आवडलो असेन, कदाचित नसेनही. परंतु मी जवळ गेल्यानंतर त्याने माझे नाक ओढून माझे कौतुक केल्याचे मला नक्की स्मरते. (स्वच्छतेच्या बाबतीत माझे नाक बरे आहे, पण पायावर खरूज असल्यामुळे त्यांनी दगा दिला आहे ! माझ्या इतर भावंडांचे पाय बरे होते, पण नाके अगदीच वाईट होती. त्या वेळी मी पायात मोजे घातले होते ते बरे केले होते, अशी भावना झाल्याचे मला नक्की आठवते.)

आतून आम्ही बाहेर आलो, आणि पुन्हा त्या टवटवीत नीटनेटक्या मुलांत बसलो. नंतर गड्यांनी फराळाची ताटे व आइस्क्रीमच्या बश्या आणून ठेवल्या व नानूमामा आणि तारामामी कोचावर येऊन बसली व आग्रह करू लागली. फराळाचे पदार्थ आणि पिवळेधमक केशरी आइस्क्रीम खरोखरच चांगले होते, आणि मी तशा तऱ्हेचे पदार्थ तोपर्यंत खाल्ले नव्हते. परंतु तेथल्या श्रीमंती दरबारी वातावरणाचा माझ्या मनावर असा काही विचित्र परिणाम झाला की ते मी विशेष खाऊ शकलो नाही.

खाणे झाल्यानंतर प्रत्येक मुलाचे कौतुक झाले. कुणाला काय येते, काय नाही याची चौकशी झाली. मला आठवत आहे की त्या टवटवीत सुकुमार मुलांनी त्या वेळी मोठ्या ठसक्यात, धीटपणाने इंग्रजी गाणी म्हणून दाखविली, आणि मुलांसाठी बसविलेला एक नाचही करून दाखविला. त्या मुलांचे अर्थातच खूप कौतुक झाले, आणि इंग्रजी गाण्यावर नानूमामा खूप हसला. मला कुणी गाणे म्हणायला सांगितलेही नाही, आणि कुणी कौतुकही केले नाही. (गाणे म्हणायला सांगितले असते तर मी त्या वेळी 'झाडीतुनी हे उडुनी प्रभाती–' किंवा 'का रे नाठविसी' म्हणून दाखविले असते, आणि ते फारच वाईट झाले असते असे आज मला वाटत आहे.)

गाणी वगैरे झाल्यानंतर संध्याकाळ झाली आणि एकएक माणसे घरी परतायला लागली. प्रथम ती सुकुमार टवटवीत मुले आणि त्यांच्या आया निघून गेल्या.

आम्ही तसेच बसलो होतो, आणि तो प्रचंड अजस्र वाडा रिकामा होत होता. भरतीचे पाणी ओहटीच्या वेळी मागे सरत असावे, आणि उघड्या पडत चाललेल्या, ओक्याबोक्या वाटणाऱ्या किनाऱ्यावर बसावे तसे आता त्या मोठ्या वाड्यात थोडेफार वाटायला लागले होते. शेवटी हळूहळू कोणी राहिले नाही, आणि मग आम्ही निघालो. त्याच वेळी कसे कोणास ठाऊक – व्हायला नको होती, पण मला जाणीव झाली की त्या एवढ्या प्रचंड वाड्याच्या मानाने माणसे, घरची माणसे फारच थोडी आहेत, व ती वास्तू काही एका अर्थाने म्लान, मलिन आणि कंटाळवाणी दिसत आहे. माणसे जात होती, आणि आवाजाने भरून गेलेले ते घर हळूहळू शांत होत होते. मी जिना उतरून खाली अंगणात आलो, आणि वर बघितले, तर सारे शांत होते – जणू ती वास्तू, तो परिसर झपाटल्यासारखा झाला होता, त्याची शुद्ध जाऊन तो तिथे शिळा होऊन पडला होता. इतक्या लहान वयातही ती शांतता मला जाणवली, आणि मग एकदम वीज चमकावी तसे लक्षात आले, की एवढ्या मोठ्या त्या प्रचंड वाड्यात घरची अशी कुणी मुलेच नाहीत! नानूमामाला, तारामामीला स्वतःची मुळी मुलेच नाहीत! खरे सांगायचे म्हणजे त्या चौकात विटीदांडूचा नाही तर क्रिकेटचा डाव किती रंगायला पाहिजे होता. पण खेळायला तिथे मुलेच नव्हती. हॉलच्या व खोल्यांच्या दरवाज्या-खिडक्यांना लावलेल्या रंगीबेरंगी काचा दंगामस्ती करून फोडून टाकायला तिथे कुणी मुलेच नव्हती! सगळ्या काचा अगदी शाबूत होत्या. त्यांच्यावर एक चीर – एक ओरखडाही गेलेला नव्हता. त्या बालवयातदेखील त्या प्रचंड वाड्यातील, रावसाहेबांच्या दिवाणखान्यातील आणि नानूमामाच्या खोलीतील स्वच्छतेतील न्यून मला एकदम जाणवले नि कसेसेच वाटले.

काय वाटले, का वाटले ते सांगता येणार नाही – खरे म्हणजे असे वाटण्याचे नि विचार करण्याचे माझे ते वयही नव्हते. परंतु ह्या वेळीही माझी त्या ध्वनिशून्य वाड्याविषयी काही चमत्कारिक भावना झाली हे निश्चित आहे. मला त्या वेळी असेही वाटले की शांततेचे, व्यवस्थितपणाचे ओझे सहन न होऊनच नानूमामाने इतर मुलांना पाचारण केले असेल. फावड्याने किंवा कुदळीने चिखल फोडावा किंवा ओल्या मातीचे गट्टे चुरगळावेत, तशी घरातील शांतता फोडली तोडली जात नाही, हे जाणूनच कदाचित त्या अपत्यहीन दंपतीने नात्यातील इतर मुलांना बोलावले असेल.

दुडक्या चालीने आम्ही घरी आलो, व उगाच बसलो. आईचा साराच उत्साह संपला होता. आम्हा सर्वांनाही काही एक चमत्कारिक सुन्नपणा आला होता. वडील त्या दिवशी थंडच होते, पण एक दिवस जाऊ देऊन त्यांनी आईला नानूमामाकडील वृत्तान्त विचारला.

त्या वेळी आईही शांत झाली होती. तिने तो वृत्तान्त अगदी तिखटमीठ लावून सांगितलाच, पण पुढे म्हटले, "त्या पटवर्धनांकडच्या नि बापटांकडच्या बायका नानूजवळ सारख्या स्वतःच्या मुलांची कौतुकं करीत होत्या... म्हणे आमचा प्रभाकर असा आहे नि शरद् तसा आहे!...अरविंदला इंग्रजी गाणं येतं नि त्याला शाळेत नाच शिकवला आहे...छे ग बाई! माणसांना इतकं पुढंपुढं करणं सारखं जमतं तरी कसं कुणास ठाऊक!"

वडील यावर नेहमीच्या पद्धतीप्रमाणे खोखो हसले होते, आणि म्हणाले होते, "मग तूही तुझ्या मुलांचं कौतुक करायचं होतंस–तुला कुणी नाही म्हटलं होतं!" आणि नंतर माझ्याकडे दृष्टी टाकून व स्वतःच डोळे मिचकावून ते पुढे म्हणाले होते, "अग, त्याचा काही नेम नाही! कुणाच्या मनात कोण, कसा आणि कधी भरेल ते सांगता यायचं नाही! कदाचित हा आपला श्रीकृष्णही नानूच्या मनात भरेल, व तो त्यालाच दत्तक घेईल!"

माझ्यादेखतच ही बोलणी चालली होती, आणि अपेक्षेपेक्षा – कल्पनेपेक्षा ती माझ्यावर परिणाम करीत होती. वडील गमतीने बोलत होते, पण ती गंमत कळण्याचे माझे वय नव्हते. मला साऱ्या गोष्टी खऱ्याच वाटत होत्या.

वडिलांचे ते बोलणे ऐकले, आणि एकदम जणू मी दुसरा झालो. क्षणभर मी माझ्या कारकुनी करणाऱ्या, आणि प्रपंचाचा गाडा अतीव कष्टाने ओढणाऱ्या वडिलांकडे व आसपासच्या दरिद्री वातावरणाकडे बघितले, आणि मला भास झाला की, नानूमामाने मला दत्तकच घेतले आहे, आणि नारायण पेठेतील ती ओलसर ओंगळ जागा सोडून मी त्या मोठ्या अजस्र वाड्यात राहात आहे— जरीची टोपी घालून व पुढेमागे पट्टेवाले घेऊन घरच्या बग्गीतून मी मोठ्या डौलाने शाळेत जात आहे!

पुढे बरेच दिवस वडिलांच्या ह्या बोलण्याने उत्पन्न झालेले काल्पनिक चित्र मला सुखवीत राहिले. एका दृष्टीने खरी गोष्ट ही होती, की नानूमामाजवळ अमाप इस्टेट होती, आणि दोन्ही बाजूंकडच्या नात्यातील प्रत्येकजण आपल्या

मुलाचे प्यादे त्याच्यापुढे सरकवीत होता. त्या 'रेस'मध्ये टिकणे मला केवळ अशक्य होते, हे अगदी उघड होते. टवटवीत, सुकुमार अंगकांतीच्या देखण्या मुलांना टाकून माझ्यासारख्या ओबडधोबड चेहऱ्याच्या, पायाला खरूज आलेल्या मुलाला तो दत्तक कशाला घेईल हे वडिलांना नक्कीच माहीत असेल, व म्हणूनच त्यांनी कधी या बाबतीत पुन्हा शब्द काढला नाही. एकदाच काढला, पण तेवढ्याचमुळे माझ्या मनात एक अदृश्य अशी दुनिया उभी केली गेली, हे काही खोटे नाही.

नानूमामा पुण्यात स्थायिक झाल्यावर दरवर्षी उन्हाळ्यात एकदा आइस्क्रीम खायला आणि दिवाळीत फराळाला सर्व मुलांना बोलावी, तेव्हा त्याची गाठ पडे. त्या अजस्र आणि ध्वनिशून्य वाड्यातील रावसाहेबांच्या दिवाणखान्यात आणि नानूमामाच्या गॅलरीच्या कोपऱ्यातील खोलीत पाऊल टाकण्याची संधी मिळे. अर्थात वर्षांमागून वर्षे उलटून गेली, तरी तेथील वातावरण तसेच असे – त्यात तिळमात्र बदल झालेला नसे, हे उघड आहे. दरवर्षी तशीच दरबारी आणि अलिप्त वागणूक असे. तेच पदार्थ, तीच बोलणी आणि मुलांचे कौतुक करण्याची तीच ठरीव पद्धत. कशात काही बदल नसायचा.

हा मधला काळ जवळजवळ आठदहा वर्षांचा असेल. बालपण संपून मी तारुण्यात प्रवेश केला होता; आणि मामा-मामी प्रौढावस्था संपवून वृद्धावस्थेकडे झुकली होती. परंतु त्या परिसरातील वातावरण तसेच होते! रेशमी, झुळझुळीत कपडे घातलेला, गोऱ्यागुबऱ्या चेहऱ्याचा नानूमामा आणि अंगावर सदैव हिऱ्यामोत्यांचे दागिने असलेली तारामामी, दोघेही तशीच होती. इतका काळ वाहून गेला, पण चेहऱ्यावर एखादुसरी सुरकुती पडण्याखेरीज त्या दोघांमध्येही बदल असा कधी झालाच नाही. जुन्या लेण्यांमध्ये हजारो वर्षांपूर्वीची चित्रे जशीच्या तशी जतन करून ठेवलेली असतात, त्यांचे रंग कधी विटत नाहीत, काळ कधी त्यांच्यावर परिणाम करू शकत नाही, तसेच त्या दोघांचे होते असे म्हटले तर चूक होणार नाही.

आज मला आश्चर्य वाटत आहे की इतकी गरिबी असून, परिस्थितीत इतके अंतर असूनदेखील इतक्या दूरच्या नात्याच्या आधारावर आम्हाला त्या वाड्यात कसा प्रवेश मिळत होता? त्या संपन्न जीवनात डोकावण्याची संधी का दिली जात होती? अगदी खूप विचार केला तरी याची कारणे सापडत नाहीत –

सांगता येत नाहीत. कदाचित असेही असेल की जगात प्रत्येक गोष्टीला कारण लागतेच असेही नाही. एखाद्या परिवारात माणसे एकदा चिटकली, की वर्षानुवर्षे तशीच तिथे लळतलोंबत राहतात. ती त्यापासून तुटत नाहीत. काय कारण असेल ते असो, पण आम्ही सर्व भावंडे त्या वास्तूला आणि परिवाराला चिकटून होतो, ही गोष्ट मात्र खरी.

नानूमामाला—तारामामीला आमच्याबद्दल काय वाटत असेल ते सांगता येत नाही. कदाचित श्रीमंत लोकांना गरीब लोकांविषयी वाटतो तसा सूक्ष्म तिरस्कारही असेल ! त्यातून पुन्हा हे सांगायला पाहिजे की खुद्द नानूमामाचे नातेवाईक पुण्यात फार कमी होते, पण तारामामींचे श्रीमंत माहेर नातेवाइकांनी समृद्ध होते. नानूमामा त्यामुळे बरा वागे, पण तारामामींच्या वागण्यात मात्र तो सूक्ष्म तिरस्कार कधी कधी दिसून येई.

इतक्या वर्षांनी आठवण केली तरी सूक्ष्म तिरस्काराची आणि अलिप्तपणाची धार अजूनही जाणवत आहे – त्या जखमेची बोच अजूनही दु:ख देत आहे. तिथे गेलो असताना आम्ही कधी मोठ्याने बोललो, दंगाधोपा केला किंवा त्या ध्वनिशून्य वास्तूला आवाजाने बरबटवले, तर नानूमामा किंचित अस्वस्थ होत. पण तारामामींच्या कपाळाला एकदम आठ्या पडत, आणि उजवी भुवई वर चढे. मग एखादे वेळी त्या गड्याकरवी दंगा न करण्याविषयी समज देत, आणि त्यानेही न भागले तर स्वत: येऊन मृदू पण ताठर आवाजात म्हणत, " अरे, तुम्हांला ओरडा करू नका म्हणून किती सांगायचं ? दंगा करायचा असला तर आपले घरी जा बघू ! " आणि नंतर माझ्या आईकडे बघून पुटपुटत, " मघापासून सारखा आरडाओरडा चालला आहे – पण तुमचं आपलं एक नाही नि दोन नाही. जरा थोडंसं रागवायचं तर खरं ! " यावर आई ओशाळेपणाने हसे, व ओरडा न करण्यास सांगे. या वेळी तारामामींचा आवाज अगदी मृदू मुलायम असे, परंतु डोळ्यांत, चेहऱ्यावर अशी काही विलक्षण तिरस्काराची धार असे की, तिचे वर्णन करणे अशक्य आहे. या प्रसंगासारखाच दुसरा एक प्रसंग आठवतो. कसला तरी समारंभ असल्यामुळे नानूमामाकडे जेवायला गेलो होतो; कुणी तरी बडे पाहुणे आले होते, व दिवाणखान्यात मोठी पंगत मांडली होती. हातात चांदीची भांडी घेऊन तारामामी व इतर श्रीमंत बायका वाढण्यासाठी सज्ज होत्या. मदत करावी म्हणून माझी आईही

वाढण्यासाठी गेली, व तिने एकदा वाढलेही ! परंतु एका खेपेनंतर लगेच तारा-मामीने तिच्या हातातले ताट काढून घेतले, व अगदी रूक्षपणाने सांगितले, "तुम्ही नका वाढू ! आणि उगीच मध्येमध्येही करू नका ! तिकडेच कुठे तरी बसा घटकाभर!" त्या एवढेच बोलल्या आणि जखमी होऊन आई बाजूला बसली. पंगत सुरू होती, हशा-खोखोशा चालला होता, आणि हिऱ्यामोत्यांचे दागिने अंगावर झगमगत असलेल्या बायका वाढीत होत्या. परंतु माझी आई मात्र मालवलेल्या चेहऱ्याने कोपऱ्यात बसली होती. तिच्याकडे तेव्हा कुणाचे लक्ष गेले नाही—तिचा अभाव कुणाला जाणवला नाही. इतक्या लहानपणी-देखील बाहेरच्या पंगतीत जेवायला बसलो असताना तिची रक्तबंबाळ अवस्था मला दिसली होती—जाणवली होती, हे सांगणे भाग आहे.

पण इतके सगळे असले तरी आम्ही तिथे जातच राहिलो. मध्यंतरीच्या काळात खूप लोकांनी आडूनआडून— उघडपणेदेखील स्वतःच्या मुलांबद्दल प्रयत्न केले, पण कुणाला यश मिळाले नाही. हळूहळू दत्तक जाण्याच्या माझ्या मनातील स्वप्नाचा पुरा लोप झाला, आणि नुसतेच तिथे जाणे राहिले. तारा-मामींच्या माहेरच्या मुलांचे प्रयत्न चालले होते, पण मुक्कामावर कुणीच पोचले नाही. वर्ष-दोन वर्ष एखाद्या मुलाचे कौतुक चाले. तो दिसायला चांगला आहे, हुशार आहे, क्रिकेट चांगले खेळतो, वगैरे गोष्टी सारख्या बोलल्या आणि चघळल्या जात. पण थोड्याच काळात तो मुलगा मागे पडे, आणि दुसरा कुणी हुशार मुलगा पुढे येऊन त्याच्या कौतुकाला सुरुवात होई. दर दोन वर्षांनी तरुण मुलीला जनानखान्यात आणणाऱ्या आणि पुढे तिला सांदीकोपऱ्यात फेकून देणाऱ्या एखाद्या नबाबासारखे हे कृत्य होते, पण त्याला कुणाचाच इलाज नव्हता.

अशीच आणखी बरीच वर्षे गेली, पण त्या अवजड, अजस्र वास्तूत काही फरक पडलाच नाही. तिथे काही बदल होईल याची शक्यताही माझ्या मनातून पार पुसून गेली. जगाच्या अंतापर्यंत तो वाडा नि त्या वाड्यात राहणारी ती दोन श्रीमंत खानदानी माणसे तशीच राहणार आहेत, अशीच जणू माझ्या मनाची खात्री झाली होती.

परंतु तसे व्हायचे नव्हते. एकदा तिथे गेलो असताना सहज कानांवर आले की नानूमामा त्या वाड्यात सूतिकागृह काढणार आहे. स्वतःचा कंटाळा

घालविण्यासाठी तो तिथे हॉस्पिटल काढणार आहे. प्रथम प्रथम ती बातमी खरी वाटली नाही, परंतु पुढे पाचसहा महिन्यांत ती वास्तवात आली. हळूहळू मग बाहेरच्या वातावरणात बदल होत गेला. दिवाणखान्यातील उंची गालिचे, लोड नि तक्के अदृश्य झाले आणि तिथे एका ओळीत मांडलेल्या लोखंडी खाटा, आणि त्यांच्या पायथ्याशी बांधलेले चिमुकले पाळणे दिसायला लागले. ज्या वाड्यात जवळजवळ तीस-चाळीस वर्षांत लहान मुलांच्या रडण्याचा आवाज ऐकू आला नाही तिथे दररोज एकदोन मुले जन्माला यायला लागली. मला वाटते, त्या दोघांच्या आयुष्यातील तो सर्वांत सुंदर काळ होता. ती दोघेही दवाखान्यात जोडीने काम करीत होती, आणि मुलांची दृष्ट काढण्यापासून तो काजळ घालण्यापर्यंत सर्व कामे मोठ्या हौसेने करीत होती. पुण्यातील श्रीमंत घरंदाज स्त्रियांचे त्या दिवसांत तो वाडा एक केंद्र बनला होता, असे म्हणण्यास हरकत नाही. केव्हाही नानूमामाकडे गेले, तरी त्याच्यासमोर एखादी अवघडलेल्या अंगाची, गौर वर्णाची, इरकली नऊवारी लुगडे नेसलेली पहिलटकरीण बसलेली असायची, आणि तो तिला मोठ्या गांभीर्याने प्रकृतीची कशी काळजी घ्यावी, काय खावे, नि किती खावे, जिना चढावा किंवा नाही, आणि वाकावयाचे झाल्यास शरीर किती अंशापर्यंत लववावे इत्यादी गोष्टी सांगत असायचा. त्या दिवसांत तारामामीही जास्त सतेज नि जास्त बोलक्या झाल्या होत्या, असे म्हणण्यास हरकत नाही. त्यांच्या हातात नेहमी लाल रंगाचे, सातआठ दिवसांचे मूल असे, आणि तोंडात बाळ आणि बाळंतीण याशिवाय विषय नसे.

हॉस्पिटल निघाल्यापासून पाचसहा वर्षांनी माझे लग्न झाले, आणि पहिले अपत्य होण्याचा संभव दिसायला लागला. लगेच मी बायकोचे नाव दवाखान्यात घातले, आणि आम्हा उभयतांच्या तिथे फेऱ्या सुरू झाल्या. हळूहळू दिवस भरले, आणि बायको प्रसूत झाली.

दोनचार दिवस तसेच तिथे गेले, आणि नंतर एकदा संध्याकाळच्या वेळी मी तिथे असताना नानूमामा मला म्हणाला, " एक गोष्ट मी ठरवली आहे–"

मी विचारले, " ती कोणती ? "

" तुझ्याकडून या केसचे पैसे न घेण्याचं मी ठरवलं आहे ! हे बाळंतपण मी तसंच करीन. तुझी बायको जणू माझ्या घरीच बाळंतपणाला आली आहे, असं समज ! तुझं काय म्हणणं आहे ? "

मी काहीच बोललो नाही. पण मला कसेसेच वाटत होते. इतक्यात हातातील चांदीच्या नक्षीदार भांड्यात जळता ऊद घेऊन तारामामी तिथे आल्या, आणि त्या उदाच्या वासाने मी आणखीनच कावराबावरा झालो.

पण नानूमामाला माझ्या मनाची काहीच कल्पना नव्हती. तो तारामामीला म्हणाला, "बरं का ग, मी सारं याला सांगितलं आहे."

तारामामी काहीच बोलल्या नाहीत. त्यांची आणि माझी दृष्टादृष्ट झाली, तेव्हा सुगंधी उदाचा धूर मध्ये असूनदेखील त्यांची दृष्टी बरीचशी म्लान आणि विमनस्क आहे असे मला वाटले.

घरी येऊन मी वडिलांना हे सांगितले तेव्हा त्यांनाही कसेसेच वाटले, व एखादी गोष्ट अगदी झटकून टाकावी, तसे ते म्हणाले, "तसं नको!"

कारण माहीत होते, तरीही मी विचारले, "का?"

ते काहीच बोलले नाहीत; माझ्या बायकोने विरोध केला तरी तिचेही काही चालले नाही. हळूहळू बारा-पंधरा दिवस झाले, आणि त्या अजस्र वाड्यात नानूमामाने बादशाही वैभवात माझ्या मुलाचे बारसे केले. खूप पेढे वाटले, आणि माझ्या बायकोला उंची लुगडे देऊन तिची रवानगी केली.

झाला तो समारंभ मोठा झाला, पण आम्हाला कोणालाच ते बारसे मानवले नाही. कसली तरी अदृश्य भीती मनावर घोंगावतच राहिली, आणि झालेही तसेच. ते मूल जेमतेम आठदहा महिने राहिले, पण त्याने कधी अंग धरले नाही – ते कधी हसले-खिदळलेच नाही. कधी मोठ्याने रडलेही नाही. एखाद्या कोमेजलेल्या, विनफुललेल्या किंवा कधीही न फुलणाऱ्या कळीसारखा त्या मुलाचा सारा अवतार होता. खूप औषधोपचार झाले, सर्व काही झाले; परंतु ते मूल पुढे कधी सुधारलेच नाही. एखाद्या अदृश्य शक्तीच्या सामर्थ्याखाली चेंगरून-चुरगळून गेल्यासारखे ते सदा केविलवाणेच राहिले. सात आठ महिने ते जेमतेम जगात राहिले, आणि पुढे हळूहळू वठत जाऊन एके दिवशी सकाळी ते पूर्णपणे वठले. त्याचे निर्माल्य झाले.

कुणी काही बोलले नाही, पण मला आणि माझ्या बायकोला ते समजले– अंतर्यामाला जाणवले. बाळंतपण नानूमामाकडे व्हायला नको होते हे माझ्या लक्षात आले. त्या प्रचंड, अजस्र वास्तूला अपत्यविहीनतेचा शाप आहे – तिच्या परिसरात स्वतःचे असे कोणतेच मूल वाढू शकत नाही, हे मला जणू नव्याने

कळले, आणि कसेसेच वाटले. एकदा असेही वाटले की, अगदी लहानपणी मी स्वतः वांच्छिल्याप्रमाणे त्या घरात दत्तक गेलो नाही, हे बरेच झाले! कुणी सांगावे, तसे झाले असते तर त्या अदृश्य शक्तीने माझा केव्हाच चोळामोळा केला असता. मीही कदाचित असाच अल्पवयात सुकून वठून गेलो असतो.

त्यानंतर माझ्या बायकोने नानूमामाच्या घराचे अगदी नाव टाकले. तिच्या मनात त्या वास्तूविषयी एक चमत्कारिक अढी निर्माण झाली. परंतु मी तिथे कधीमधी जातच राहिलो. तिच्या प्रतिकाराला न जुमानताही, का कुणास ठाऊक, पण तिथे जातच राहिलो. तिच्या मनात जशी चमत्कारिक अढी आणि नावड निर्माण झाली होती त्याचप्रमाणे त्या घराविषयी माझ्या मनात जास्तच औत्सुक्य निर्माण झाले आणि मंतरलेल्या जागेकडे खेचले जावे तसा मीही तिकडे ओढला जायला लागलो.

मी तिथे कधीतरी जात होतो; पण तथली शान नि अदब आता झपाट्याने मावळत होती. बुडणारी बोट किनाऱ्यावरून बघावी, तसे त्या ध्वनिशून्य खानदानी घराची ऐट मावळताना मी दर दिवशी बघतच होतो. नंतरच्या दिवसांत मग म्हातारपणामुळे नानूमामाने तो दवाखानाही बंद केला, आणि एकदोन गड्यांच्या साहाय्याने ती दोघेच त्या वाड्यात राहायला लागली.

एखादे वेळी मी तिथे जाई, त्या वेळी मला त्या दोघांची स्थिती स्पष्ट दिसे. बहुतेक गडी काढले होते, आणि साऱ्या खोल्या बंद केल्या होत्या. वृद्धापकाळामुळे नानूमामा खचला होता आणि काठीच्या आधाराशिवाय चालणे-हिंडणे त्याला कठीण होत चालले होते. बहुतेक सारा वेळ तो स्वतःच्या खोलीत पडून असे आणि एकटी तारामामी त्याच्या शुश्रूषेत मग्न असे. त्याच्या मानाने तारामामी मात्र प्रकृतीने अगदी धडधाकट होती, आणि पैशाआडक्याचे सर्व व्यवहार पाहात होती. त्या जुन्या वाड्यातले सारे वैभव आता झाकळल्यासारखे झाले होते. रावसाहेबांचा दिवाणखाना, मोठे स्वयंपाकघर, चांदीची भांडी – सारे तसेच होते. पण त्यातील आत्मा केव्हाच लोपला होता. दत्तकाची बोलणी अगदी बंद होती, आणि तारामामीच्या अगोदर नानूमामा मरणार हे सर्वांनी गृहीत धरले होते. एखाद्या मोठ्या प्रवासाला जाण्यापूर्वी करावी, तशी नानूमामाने सारी व्यवस्था केली होती. नानूमामा लवकर मरणार आणि त्या अजस्र मोठ्या वाड्यात तारामामीला पुढे सारा जन्म एकटीने कंठावा लागणार हे उघड होते. नानू-

मामाच्या मृत्यूनंतर त्या मानी स्त्रीचे आयुष्य कसे जाणार याचीच सर्वांना जणू काळजी होती!

पण ती काळजी करण्याचे कारणच पडले नाही! मृत्यूनेच जणू मोठ्या चमत्कारिकपणाने त्या काळजीतून साऱ्यांनाच मुक्त केले. नानूमामाच्या मृत्यूची वाट पाहणाऱ्या नातेवाइकांना मृत्यूने असा एक गमतीदार नि अकल्पित तडाखा दिला, की सारेच स्तिमित झाले.

त्या घटनेआधी एकदोन दिवसच मी त्या वाड्यात एका उदास संध्याकाळी गेलो होतो. जिना चढून वर गेलो, तर बाहेरच्या दिवाणखान्यात तारामामी मोठ्या कोचावर बसून वर्तमानपत्र वाचीत होत्या. माझी आणि त्यांची दृष्टादृष्ट झाली आणि त्या हसल्या! का कुणास ठाऊक, पण मला त्यांच्या त्या हसण्यात-बघण्यात कमालीची खिन्नता आढळली. कसले तरी दुःख मनात टोचत असावे अशी त्यांची मुद्रा होती. अंगावर नेहमीप्रमाणे हिऱ्यामोत्यांचे दागिने होते पण तेही त्या दिवशी मलूल वाटले.

त्यांची नि माझी दृष्टादृष्ट झाली व मी विचारले, "कशी काय आहे तब्येत?"

खिन्नपणाने त्यांनी सांगितले, "बरी आहे." आणि नंतर काही विचार करून त्या म्हणाल्या, "तू थोडा वेळ इथेच बस! मी आतून बोलावते."

इतके बोलून त्या आत गेल्या. बहुधा त्यांनी नानूमामाचे कपडे बदलून शुभ्र परीटघडीचे कपडे घातले असावेत! अगदी अखेरच्या वेळीही दुसऱ्यासमोर केविलवाणेपणा दिसू नये, याची त्या काळजी घेत असाव्यात.

थोड्याच वेळात आतून बोलावणे आले, आणि मी त्या पहिल्या दिवशीच्या खोलीत गेलो. एका रॉकिंग चेअरवर नानूमामाला त्यांनी बसवला होता, आणि अंगावर फुलाफुलांची शाल होती. खोलीत किंचित अंधार होता, तरीही त्याच्या चेहऱ्यावरची निस्तेजता मला जाणवल्याशिवाय राहिली नाही.

त्याच्या समोरच्या खुर्चीवर मी उगाच बसलो, व काही तरी बोलायचे म्हणून विचारले, "कशी काय आहे तब्येत?"

खिन्न हसून तो म्हणाला, "ही अशी आहे!" आणि त्याने तारामामीकडे बघितले.

त्यानंतर कुणीच काही बोलले नाही. मी उगाच बसलो. तो आता फार

थोड्या दिवसांचा सोबती आहे, हे समजून कसे तरीच वाटले. लहानपणी आईबरोबर अगदी पहिल्याने या वाड्यात आल्याचा प्रसंग माझ्या मनापुढे साकार झाला, आणि मन खिन्नतेने भरून गेले.

बोलण्याजोगे काहीच नव्हते. म्हणून मी उठलो, व त्याचा निरोप घेऊन बाहेर रावसाहेबांच्या दिवाणखान्यात आलो. तारामामीही मागोमाग उठल्या व तिथेच उभ्या राहिल्या. काहीतरी बोलायचे म्हणून मी म्हटले, "तब्येत बरी दिसत नाही ?"

"बरी तर नाहीच, पण स्वभावही फारच चिरचिरा झाला आहे." त्यांनी सांगितले, "खाण्यापिण्याच्या आवडी तर इतक्या आहेत, की गडीमाणसांवर–कुणावर सोपविताही येत नाही. सारंच मला करावं लागतं."

हे बोलत असताना त्यांच्या डोळ्यांशी माझे डोळे भिडले, आणि कधी नव्हे ती त्या एकाकी स्त्रीच्या आयुष्यातील आर्तता मला जाणवली. मी त्यांना इतकी वर्षे बघत होतो, पण त्यांच्या इतक्या जवळ कधी आलोच नव्हतो. श्रीमंतीच्या तोऱ्यात, आणि दागिन्यांच्या व उंची वस्त्रांच्या झगझगाटात वावरणाऱ्या त्या स्त्रीचे मूक दु:ख जणू मला एकदम त्या दिवशीच जाणवले, आणि त्या क्षणभरातच त्यांच्या भकास आयुष्याचे पूर्ण चित्र डोळ्यांपुढे उभे राहिले.

चारपाच मिनिटे तशीच गेली, आणि मी म्हटले, "तुम्हीच आहात, म्हणून तरी त्यांची इतकी तंत्रं सांभाळता !"

त्यावर त्या हसल्या, मलूलपणाने हसल्या, व म्हणाल्या, "होय रे बाबा ! आता तुझ्या तोंडूनच तेवढी स्तुती ऐकायची राहिली होती !" आणि असे बोलता बोलता त्यांनी मग एकदम स्वत:ला सावरले, व त्यांच्या डोळ्यांत ते जुने खानदानी पाणी चमकायला लागले. या क्षुद्र माणसाला आपण फारच जवळ येऊ दिले याची जणू त्यांना मनस्वी खंत वाटली, व त्यांनी मला निरोप दिला.

मी बाहेर पडलो, आणि जिना उतरून त्या प्रशस्त फरसबंद चौकात येऊन उभा राहिलो. एकाही खिडकीचे व दाराचे तावदान कधीही न फुटलेल्या त्या अती शांत वाड्यात एक जीव मृत्यूशी सामना करीत आहे, आणि दुसरा त्याची शुश्रूषा करीत आहे, याची खंत मला वाटली, व मी घराबाहेर आलो. नानूमामावर मृत्यू एकदोन आठवड्यांतच झडप घालणार, ही माझी खात्री होती. परंतु झाले भलतेच. त्यानंतर दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी मी कामावरून घरी आलो,

तेव्हा बायकोने सहज सांगावे तसे सांगितले, "आज एक वाईट बातमी आहे."

ती नानूमामाच्या मृत्यूची बातमी असणार हे उघड होते, म्हणून मी विचारले, "काय बातमी आहे?"

"तुम्हाला कल्पना यायची नाही." ती संथ आवाजात म्हणाली व तिने पुढे सांगितले, "आज सकाळी तुमच्या तारामामी गेल्या!"

ती बातमी खरोखरच धक्का देणारी होती, म्हणून मी म्हटले, "काय म्हणतेस!"

"खरंच सांगत आहे! तारामामी गेल्या. काल रात्री त्या नेहमीप्रमाणे नानूमामांचे सारे करून झोपल्या. त्या सकाळी उठल्याच नाहीत!"

बराच वेळ मी सुन्न होऊन बसलो. काय बोलावे हेच कळेना. थोडा वेळ तसाच गेला आणि मी म्हटले, "आता नानूमामाचं कसं होणार? शरीराच्या अशा या अवस्थेत तो एकटा कसा राहणार?"

त्यानंतर एकदोन दिवस जाऊ देऊन, मी त्याच्या समाचारास गेलो, तेव्हा वाड्याचे वातावरण पालटल्यासारखे दिसले. तारामामीच्या माहेरच्या नातेवाइकांनी तिथे एक अदृश्य असे कडे केले होते, आणि आत जाऊन त्याचे दर्शन घेणे– त्याच्याशी बोलणे– हे खरोखरच कठीण काम होते. त्या दिवशी मी गेलो, तेव्हा बाहेर गड्याने सांगितले, "आज त्यांना फार त्रास झाला आहे! ते कुणालाच भेटू शकत नाहीत– तुम्ही येऊन गेल्याचे मी सांगतो." मी नंतर पुन्हा सातआठ दिवसांनी गेलो, तरीदेखील तीच पोलिशी चौकशी आणि तीच आडकाठी. हळूहळू मग माझ्या लक्षात आले की, त्याच्याभोवती श्रीमंत नातेवाइकांनी चौकी पहारे बसवले आहेत, आणि आता वर्गयुद्धाला खरी सुरुवात झाली आहे. त्या सर्व श्रीमंत मंडळींना असे वाटणे साहजिक होते की हे गरीब नातेवाईक त्याला एकटे भेटले तर घोटाळे करतील! ते येतील, त्याचे मन द्रवेल, आणि त्या अमाप संपत्तीतील काही भाग तरी या लोकांना मिळेल. शेवटी अगदी अखेरीची वेळ आली, तरी आसपासचे वातावरण काही बदलले नाही. पैशाशिवाय, संपत्तीशिवाय दुसरा विषय तिथे त्या दिवसांत नव्हता हेच खरे! जाणाऱ्या जीवाबद्दल तिथे भीती नव्हती – काळजी नव्हती. काळजी होती ती फक्त, ती अमाप संपत्ती कोणाच्या घरात जाईल या गोष्टीची!

मला त्या वातावरणाचा लवकरच उबग आला, व मी तेथे जाणे सोडले!

हळूहळू मी त्याला जवळ जवळ विसरूनही गेलो. कधी मंडईत गेलो आणि पाने घ्यायला लागलो की, त्याचे स्मरण होई, व जावेसे वाटे, पण कधी गेलो नाही !

असे बरेच दिवस गेले, आणि मला वाटते, तो ऑक्टोबर महिना होता. ऊन भयंकर रणरणत होते, आणि कसली तरी सुटी असल्यामुळे मी जेवून सुखाने पडलो होतो. माझ्या डोळ्यांवर किंचितशी झापड आली होती, इतक्यात कुणी तरी दार वाजवले, व मी उठून बसलो.

येणाऱ्या माणसाने एखादी ठरलेली गोष्ट घडावी, तशा सहजतेने सांगितले, " तुमचे नानासाहेब दुपारी गेले ! तुम्हाला बोलावलं आहे."

मी " बरं " म्हणालो आणि कपडे करून बाहेर पडलो. मनात भावना काहीच नव्हत्या. वाईट वाटत नव्हते – काहीच वाटत नव्हते ! दुपारच्या रणरणत्या उन्हात मी तसाच चालत रामेश्वरापाशी येऊन त्या मोठ्या वाड्यात शिरलो ! वाड्यात रडारड काहीच नव्हती – रडणारे असे कुणी शिल्लक नव्हते. साराच अगदी कोरडा नि भावनाशून्य व्यवहार होता. मी वर गेलो, तेव्हा प्रेत रावसाहेबांच्या खोलीत आणून ठेवले होते, आणि मी लहानपणापासून बघितलेली ती टवटवीत अंगयष्टीची सुकुमार माणसे अवतीभोवती गंभीर चेहरे करून वावरत होती.

तिथे मी उगाच इकडे तिकडे घोटाळलो, – पिवळ्या फुलांचा हार घातलेल्या रावसाहेबांच्या फोटोकडे, आणि मंडईतल्या गर्दीकडे बघत उभा राहिलो. शेवटी प्रेत नेण्याची वेळ आली, तेव्हा त्या घोळक्यात मी अलिप्तपणाने उभाच होतो. इतक्यात त्या घराण्यातील एक जुने हितसंबंधी वृद्ध गृहस्थ माझ्याजवळ आले, व म्हणाले, " पुढचे सारे विधी तुम्हालाच करायचे आहेत ! "

एकदम आश्चर्य वाटून मी म्हटले, " अहो, माझा काय संबंध ? "– आणि त्या घोळक्यातील श्रीमंत लोकांकडे दृष्टी टाकून पुढे म्हटले, " ही इतकी सगळी माणसं इथं असताना ? "

" खरं आहे ते ! पण ती सारी त्यांच्या सासुरवाडीची माणसं. ती त्यांना जवळ होती, पण खरी लांबच होती. मगाच आम्ही विचार केला, आणि लक्षात आलं, की त्यांच्या रक्ताचा – अगदी खूप लांबचा का होईना, पण संबंध असलेले आज पुण्यात फक्त तुम्हीच आहात ! "

अनुमती देण्याशिवाय अर्थातच इलाज नव्हता, व मी ' होय ' म्हटले.

थोड्याच वेळात सर्व तयारी झाली, आणि पुष्पहारांनी मंडित झालेले ते प्रेत बाहेर काढले गेले. त्या म्हाताऱ्या गृहस्थांनी माझा हात धरला, मी पुढे झालो आणि हातात शिंकाळे धरून दुपारच्या त्या रणरणत्या उन्हात लक्ष्मी रोडने ती प्रेतयात्रा सुरू केली. माझ्या हातात शिंकाळे होते, आणि मी एका अंत्ययात्रेचा निदान त्या वेळी तरी सूत्रधार होतो. ती वेळ हसण्याची मुळीच नव्हती, पण तरीही मला हसू आले. वाटले, की मी लहानपणी नानूमामाला दत्तक जाणार होतो, त्या अजस्र पेशवाई वाड्याचा मालक होणार होतो; जरीची टोपी घालून आणि पुढेमागे पट्टेवाले घेऊन घरच्या बग्गीतून मोठ्या ऐटीने शाळेत जाणार होतो! बालपणीचे ते स्वप्न काळाच्या प्रवाहात कुठल्या कुठे विरले- वाहून गेले! परंतु आज एखाद्या पुत्राने पित्याचा करावा, तसा त्याचा अंत्यविधी मला करावा लागत आहे! कागदोपत्री नसलो, मालकी हक्काने नसलो, तरी धर्महक्काने मी जणू त्याचा वारसच आहे, आणि त्याला अग्नी देण्याचे काम विधीने माझ्या अंगावर सोपविले आहे. लहानपणचे ते बालिश स्वप्न अशा विचित्र तऱ्हेने साकार होण्याचा योग येत आहे.

आम्ही त्याच्या देहाचे दहन केले, आणि घोळक्याने घरी आलो. परत येताना लोक त्याच्या इस्टेटीबद्दलच बोलत होते! त्याने त्या अमाप इस्टेटीपैकी एक कपर्दिकही कोणाच्या हाती लागू दिली नव्हती. जीवनाच्या शेवटच्या दिवसांतदेखील चांदीची भांडी व उंची गालिचे विकून टाकून त्याचे टक्के करण्याची तत्परता दाखविली होती, याबद्दल ती सर्व संबंधित माणसे जळफळत होती! मला अर्थात काहीच वाटत नव्हते. त्या अपत्यविहीन, पाशरहित माणसाने संपत्तीवरच सारी माया जडविली होती, आणि मुलाचे संगोपन करावे तसे तो त्या अमाप संपत्तीचे रक्षण करीत असतानाच वारला होता. आम्ही त्या अजस्र वाड्यात आलो आणि अंत्यशय्येच्या जागी ठेवलेल्या दिव्याचे दर्शन घेतले, व मी ते घर सोडले. त्यानंतर मी आजतागायत तिकडे गेलो नाही—जाण्याची इच्छाच झाली नाही.

अजूनही एखादे वेळी मी मंडईत गेलो तरी त्या वेळी मी विड्याच्या पानांच्या गाळ्याकडे जात नाही; तिकडून गेलो तर अवजड अंगाची, व म्लानमलिन चेहऱ्याची ती वास्तू दिसेल अशी सारखी भीती मला वाटत असते.

५

## मेळे ! पुण्याचा इतिहास

दारावरची घंटा वाजली, आणि मी दार उघडलं. समोर दोन मुले उभी होती. फुलाफुलांचे बुशशर्ट घातलेली, शीख लोकांप्रमाणे हातात कडे असलेली. त्यांपैकी एकाने तर चक्क दाढी वाढवली होती. दोघांच्याही केसांना पोमेडचा स्पर्शही नव्हता.

मी प्रश्नार्थक नजरेने त्यांच्याकडे पाहिल्यावर एकाने सांगितले, "कॉलनीतल्या गणपतीच्या कार्यक्रमाची पत्रिका द्यायला आलो आहे... आम्ही पलीकडल्या बंगल्यात राहतो."

मी त्यांना आत बोलावले आणि वर्गणी देऊन कार्यक्रमपत्रिका वाचायला लागलो...सुभाष डान्सिंग पार्टी.... 'जानवर और इन्सान' सिनेमा... स्त्रियांच्या भावगीत गायनस्पर्धा... टेबल टेनिसच्या आणि बॅडमिंटनच्या मॅचेस...

मी हसलो आणि त्या दोघांनाही न्याहाळत म्हटले, "कॉलनीतल्या गणपती पुढे मेळाबिळा नसतो वाटतं ?"

त्यांना अर्थबोधच झाला नाही. कपाळाला आठ्या घालत एकाने विचारले, "मेळा ?... मेळा म्हणजे काय बुवा !... कॉलनीत सात-आठ वर्षं गणपती बसतोय, पण मेळ्याचा प्रोग्राम कधी झालेला नाही."

मला जास्तच हसू आले. मेळा म्हणजे काय हे मी त्या दोघांना समजावून सांगणार होतो. पण त्यांची तशी इच्छा दिसली नाही. मी त्या वस्तीत नवीनच

राहायला आलो आहे. मला एक बावळट, भंपक माणूस समजून ते निघून गेले.

माझ्या मनात मात्र निरनिराळ्या आठवणी दाटल्या... घुंगराच्या काठ्या घेतलेली, मराठेशाही फेटे बांधलेली अनेक तरुण मुले दिसायला लागली. जुनी गाणी आठवली. त्या गाण्यांचे ताल मनात घुमत राहिले.

एकदम मला बापूमामांची आठवण झाली... सख्खे नाहीत—दूरचे मामा! सत्तर पाऊणशे वर्षांचे. रुग्णशय्येवर असलेले. घराबाहेर मुळीच न पडणारे. बापूमामा भिक्षुकी करीत. पण गणपती बसण्याअगोदर महिनाभर त्यांची ती 'प्रॅक्टिस' जवळ जवळ बंदच असे. नारायण पेठेत तेव्हा 'सन्मित्र समाज मेळा' निघे. त्यातले बहुतेक सगळे लोक गरगरीत वाटोळ्या अंगाचे असत. त्या मेळ्यात बापूमामा अग्रभागी असत. फेटा आणि सुरवार घालून हातात खुळखुळ्याची काठी घेतलेलं त्यांचं रूप मला अजूनही आठवतं... गणपतीच्या पहिल्या दिवशी बँडच्या दणदणाटात मेळ्याची मिरवणूक निघे. लष्करी शिस्तीत पावलं टाकीत जाताना बापूमामा आम्हाला दिसत, आणि त्यांच्याविषयी फार आदर वाटे.

मनाला चैनच पडेना. 'मेळा म्हणजे काय?' असा प्रश्न विचारणाऱ्या मुलाचा मला संताप आला होता. बापूमामांकडे गेल्याशिवाय मनाचे समाधान होणार नव्हते. मी कपडे केले आणि बाहेर पडलो... पुन्हा हसू आले. बापूमामांचा आवाज भसाडा असला तरी गाण्याची त्यांना फार आवड. रस्त्यातून सायकलवरून जातानादेखील ते मोठमोठ्याने गात. लोक त्यांना थट्टेने 'रोड गंधर्व' म्हणत... 'सारे छंद सोड सोड। कन्हैय्या। सारे छंद सोड।' या चालीचे एक गोड पद त्या वेळी प्रचारात होते. बापूमामा आपल्या भसाड्या आवाजात त्याच चालीवर 'सारे पक्ष सोड सोड। देशा!... एक पक्ष कर गोड॥' असे पद म्हणत असत... लोकांची सहनशक्ती जबर खरी. ते बापूमामांचा तो आवाज खपवून घेत. बापूमामा कवीही होते. 'होई विजयी तू रंभे। शुभांगे॥' या लोकप्रिय चालीवर त्यांनी 'होई विजयी तू टिंगले। शुभांगे॥' असं पद केलं होतं...'गांधी नेहरू बोल मुखसेऽ। गांधी नेहरू बोलऽ!' हे त्यांचे 'राधेकृष्ण बोल मुखसे' या चालीवरचं पद पुण्यात खूप टाळ्या घेत असे.

लक्ष्मी रोडवरून जाताना मनात मेळ्यांच्या पदांची अनेक कडवी घोंगावत

होती. गेल्या तीस-चाळीस वर्षांत ती पदं मनाच्या तळाशी इतकी टवटवीत कशी राहिली होती, कोण जाणे!... गुणगुणत मी धुंद होऊन पावले टाकीत होतो... ' नवा पूल मोठा झाला। शोभा पुण्याला। '... ' हा काळ कठिण आला शिकवी नातु आजोबाला। '...' शिक्षणासाठी–कॉलेजसाठी झाली पुण्यामध्ये दाटी!'... ' बी. ए. झाला बी. ए. झाला। झाला होऽऽ पदवीवाला। ' ...माझा मीच हसत होतो. परिचितांपैकी एखाद्याने मला बघितले असते तर मला वेड लागले आहे असे नक्कीच त्याला वाटले असते.

मला मेळ्यात जायची इच्छा होती. मामांच्या वशिल्याने ती पूर्ण झाली. आम्ही एका बाल मेळ्याच्या चालकांकडे गेलो. ते म्हणाले होते, "मेळ्यात यायचं म्हणजे गळा नसला तरी चालेल. पण प्रकृती दणदणीत हवी. सारं पुणं पालथं घालावं लागतं." मी चांगलाच आडवा-तिडवा होतो. त्यामुळे लगेच ॲडमिशन मिळाली. शिवाजीचा दरबार भरला आहे आणि न्याय मागण्यासाठी निरनिराळे लोक तिथे आले आहेत असा संवाद होता. ...मला खरं तर शिवाजीच व्हायचे होते. जिरेटोप घालायला मिळाला असता आणि दाढीवरून हात फिरवत ' मांसाहेब! ' अशी भावपूर्ण आरोळी ठोकता आली असती. पण एका श्रीमंताच्या मुलाला ते काम मिळालं, आणि माझ्या कपाळी ' मावळा ' आला. शिवाजीराजांपुढे उभे राहून मी पद्यमय ललकारी ठोके! ' न्याय खरा होणार। भरला शिवबाचा दरबार। ' ...सर्व संवादात मला तेच पद आठदहा वेळा तरी म्हणावे लागे... मी खूश होतो.

मामांच्या घरी पोचलो तेव्हा ते आतल्या खोलीत होते. सरकारी कचेरीत क्लार्क असलेले त्यांचे चिरंजीव सूटबूट घालून बाहेर पडत होते. अगदी लहानपणी ऐकलेले पद एकदम आठवले.

' सोडा चाले फॅशनचे।
तुमच्या या रंगढंगाचे॥
गळ्या नेकटाई। ओठा मिशी नाही।
जसे वडिल वारले यांचे॥ '

मी हसलो. ते पद मोठ्याने म्हणावे, आणि त्या ' क्लार्क 'ची जिरवावी असे वाटले. पण तो मोह मी आवरला.

...मामा बाहेर येऊन तक्क्याला टेकून बसले. त्यांची प्रकृती बरी नव्हतीच. शरीर सगळेच झडले होते. मला मात्र जुन्या काळातले, सन्मित्र समाज मेळ्यातले ऐसपैस शरीराचे मामा आठवत होते.

मामांनी कापऱ्या आवाजात विचारले, "बऱ्याच दिवसांनी आलास... गणपतीच्या दिवसांत म्हाताऱ्याची बरी आठवण झाली?... कार्यक्रमाला जायचं सोडून..."

"म्हणून तर तुमच्याकडे आलो. कार्यक्रम ऐकायला! मला जुन्या मेळ्यांची आठवण झाली... 'सन्मित्र समाज'...'भारतमित्र'...'मावळी मेळा'... 'छत्रपती मेळा'..."

मामांचा चेहरा खुलला. ते त्या जुन्या काळात गेले. "अरे बाबा, परवा केळकरांची जन्मशताब्दी झाल्याचं वाचलं तेव्हाच मला आमच्या मेळ्यातल्या पदाची आठवण झाली. केळकर आणि खाडिलकरांवर..."

"दाखवा तरी म्हणून!" असे सांगण्याची जरूरच पडली नाही. ते म्हणायला लागले,

"अजि नव्या नाटकाला।
'मेनका' चला बघण्याला।
गुरु खाडिलकर हे रचती।
गंधर्व जना दाखविती।
कवि कृष्ण महा कसलेले।
परि राजकारणी चकले।"

"अहो पण याच्यात केळकर कुठे आहेत?" मी विचारले.

"ऐक रे बुवा पुढे!

'ठार बुडविला गुरु टिळकांच्या
परंपरेचा बाणा।
ध्यास अंतरी, होईल
कैसी केळकरांची दैना।'"

आम्ही दोघेही खूप हसलो. मामांचा अशक्तपणा कुठल्याकुठे पळाला होता.

" अहो मामा, केळकरांच्या निंदापर एक पद तेव्हा होतं, आठवतं का ? "

" कोणतं बुवा ? " त्यांनी विचारले.

केळकरांची लोकप्रियता पस्तीस-छत्तीस साली अगदी खाली आली होती. त्यांना कोणीही विचारत नव्हते. त्या वेळी केळकर स्वत:शीच म्हणतात अशी कल्पना–

" व्हा अध्यक्ष म्हणुन का कुणी न ये बोलावण्यासी मला ।
कोणी नूतन पुस्तकास परि का प्रस्तावना मागिना
जाती सर्व असे रिते दिवस हे । वाटे वकिली बरी ।
झाली सोडुनि जीस फारचि अरे अभ्यंतरे लोटली । "

" आज दुष्काळ आहे. कठीण परिस्थिती आहे. पण त्याचं वर्णन आम्ही अठ्ठावीस सालीच करून ठेवलं आहे. " मामा हसत म्हणाले.

" प्रभुवर तुजविण नच कुणाही जाण ।
भारतास मार्ग दावी कोण ।
अन्न नाही जन व्याकुळ होउन
कितिक फिरती बघ वसनहीन ।"

मामांच्या अंगात मेळा घुमायला लागला होता. शिवछत्रपती मेळ्यातलं पद म्हणायला त्यांनी सुरुवात केली–

" महाराष्ट्रा ऊठ आता सोड निद्रा ।
खड्ग घेई, शौर्य दावी वीरभद्रा ।
ही पाखंडी पैदास
मातली । खतम करी तीस ।
पोटपुजे । भडभुंजे ।
दूषण जे प्रगतीचा मातीत गाडा ।
तरी चाले राष्ट्रीय गाडा । "

मी मामांना म्हटले, " छत्रपती आणि शिवछत्रपती हे दोन मेळे मला आठवतात... सत्यशोधक समाजाचा छत्रपती मेळा त्यांचे पद असे 'आला

छत्रपती मेळा। भटांनो पळा पळा पळा आता।'...शिवछत्रपतीचे मुख्य नारायणराव झांजले होते. 'संग्राम देवतेला नमन पदकमला' हे त्यांच्या गाण्याचं पालुपद असे."

आम्ही दोघेही रंगून गेलो होतो. खूप पदांच्या उजळण्या झाल्या. तरी आणखी काही पदे आठवावी अशी इच्छा होत होती. मामा उत्साहात आले होते. ते म्हणाले, "अरे, मला पूर्वी पद्यावल्या जमवायचा नाद होता... कोपऱ्यातल्या पेटीत असल्या तर बघ..."

मी पेटी उघडली आणि शोधाशोध केली. पाच-सात पद्यावल्या फाटक्या-तुटक्या अवस्थेत होत्या. त्या धूळ झटकीत मी बाहेर काढल्या. मामा सावरून बसले. म्हणाले, "वाच एखादं पद!"

एकोणीसशे सव्वीस सालची शिवछत्रपती मेळ्याची पद्यावली मी हातात घेतली नि मोठ्याने वाचायला लागलो.

"भले शाबास। शाबास।  
खूप केली हो बहार।  
भजनी पूजनी, देवदर्शनी।  
जात न आता कोणी।  
गार्डन पार्टी लेव्ही लागी।  
जाती हो हौसेनी।  
पत्नीलागी लाथा देई।  
मान देई वेश्येला।  
मुले उपाशी घरात।  
करती अन्नदान इतराला॥"

मामांनी वीर नेताजी मेळ्याची पद्यावली हातात घेतली, आणि म्हणायला लागले.

"ऐक मजा पुण्याची।  
शहर सुधारणा ही खाशी।  
रस्ते रुंद केले। डांबर पसरविले  
खाचखड्डयांनी कमाल केली।

आमचे पुणे शहर।
हॉटेलांनी तर भंडावलं फार।
चिवड्यामध्ये फिरती।
पाली उंदीर घुशी। ''

...मी चाळतच होतो, '' एकूण म्युनिसिपालिटीवर मेळ्यांचा कटाक्ष जास्त दिसतोय ''

'' येते लग्नाची रीघ बघा।
कमेटीच्या मेंबरांची
पगड्यांचा मानपान।
देती पैशाचे दान।
घरोघरी त्या पत्रिका देती।
एक नवरीसाठी बारा नवरे पाठी।
खरे बुद्धिवान।
त्यांना नाही मान।
होत अडचण त्यांना हुंड्याची। ''...

शूर मराठा मेळ्याचे हे पद बघा—

'' डोळ्यांनी पहाव्या। मौजा कमेटीतल्या।
लोकहिताच्या मुख्य गोष्टीला
पैका नाही म्हणती।
मानपत्र आणि पुतळ्यासाठी
खर्चा संमती देती।
भांबुर्ड्याच्या शूर मराठ्याची।
एवढी विनंती ऐका।
बड्या लोकांच्या नादी लागुनी।
मत तुम्ही का देता? ''

आम्ही दोघेही पद्यावल्या चाळण्यात गुंग होतो. मामा तर काही काही पदे मोठ्याने म्हणत होते. माझे त्यांच्याकडे लक्षच नव्हते. पण त्यांनी मुद्दाम हलवून पद ऐकवले. पुण्यात बस सुरू झाली तेव्हा मेळ्यात हे पद होते—

“ आता बस गाडी येणार। रे। मौज खूप होणार।
दोन लाख हे पुणे वाढले। किती याचा विस्तार ।।
चाल चालुनी तुटती तंगडया। जीव होई बेजार।
प्रभातनगरी इकडे। तिकडे असे जुना बाजार।
दगडी पुलावरूनी। लकडी पुलावर। रखडत का जाणार।
किंवा खांद्यावर जाणार। गरिबांना का टांगा।
गाडी पुण्यात परवडणार।
सवारीसाठी। कुठुन पावली
बहुजन हे देणार।
भजी खावया। बिडी प्यावया
थांबे वारंवार।
टांगेवाला अडवी पदोपदी
हुज्जत घाली फार ।।
घेई स्टेशन। जाता येता।
बंदा रुपया छान।
भांबुडर्यात ‘ चला ’ म्हणता।
हा खडकीला जाणार।
विमानातुन हे आले आता
दुनिया बदले फार।
छकडया टांग्यामध्ये पुणेकर।
तरी कसा बसणार।
बस गाडीतिल मऊ गादीवर
आरामात बसणार।
दोन दिडक्यावरी मैलभर
बाजारास जाणार ।। ”

आम्ही दोघेही हसत सुटलो. घरातल्या लोकांना आमच्याकडे बघून काय वाटले असेल कुणास ठाऊक !

बराच वेळ झाला म्हणून मी निघालो. मामांना खूपच बरं वाटलं होतं. ते म्हणाले, “ मेळ्यांची पदं म्हणजे आपल्या पुण्याचा इतिहास आहे. गेल्या पंधरा-

वीस वर्षांत मेळेही नाहीत आणि इतिहासही नाही."

मी सिटीपोस्टापाशी बससाठी उभा राहिलो. खूप मोठा 'क्यू' होता. 'दोन लाख हे, पुणे वाढले! किति याचा विस्तार!' हे एकोणचाळीस सालातले पद गुणगुणत होतो आणि ओसंडून वाहणाऱ्या पुण्यातल्या गर्दीकडे पाहात होतो.

बस आली आणि मी वर चढलो. फाटक्या सीटवर बसलो. कंडक्टरपुढे दहा पैसे केले आणि 'जिमखाना' म्हणून सांगितले.

तो ओरडला, "चाळीस पैसे द्या... कुठल्या युगात वावरत आहात?"

मी त्याला आणखी पैसे दिले आणि मनाशीच गुणगुणायला लागलो.

'बस गाडीतिल 'मऊ' गादीवर।
आरामात बसणार।
दोन दिडक्यांवरी मैलभर।
बाजारास जाणार॥'

६

## मला लिहावंसं वाटतं, कारण—

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

दोन-तीन महिन्यांपूर्वी एका महिला मंडळात मी व्याख्यानासाठी गेलो होतो. व्याख्यान संपल्यानंतर नेहमीप्रमाणे काहीजणांनी मला माझ्या स्वत:बद्दल आणि लेखनाबद्दल जुजबी प्रश्न विचारले. त्याचं मला विशेष काही वाटलं नाही. मी ठरीव उत्तरं दिली; परंतु शेवटी एका मध्यमवयीन स्त्रीनं विचारलं, "तुमच्यामधला लेखक कधी, कसा आणि कुठे जन्माला आला ?–कोणत्या विशिष्ट घटनेमुळे तुम्ही लेखक झालात ?" त्या स्त्रीला मी हसत हसत उत्तर दिलं. थोडा हशाही पिकवला. परंतु त्या उत्तरामुळे माझं स्वत:चं समाधान झालं नव्हतं. तो प्रश्न माझ्या मनात पुढे दोन-तीन दिवस घोटाळत राहिला.

माझ्या कुटुंबात कोणीही लेखक नाही. मग लेखक व्हावं अशी प्रेरणा मलाच का झाली ? लहानपणापासून मी कोणत्याही गोष्टीबद्दल महत्त्वाकांक्षा बाळगली नाही–आपल्याला मोठी नोकरी असावी, बंगला असावा, लोकांत मान-मान्यता असावी वगैरे मध्यम वर्गीयांची स्वप्नं मला कधीही पडली नाहीत. आपण लिहावं असं मात्र लहानपणापासून वाटायला लागलं–आय. सी. एस. व्हावं असं कधीही वाटलं नाही, पण लेखक व्हावं ही इच्छा मनात निर्माण झाली खरी !

मला वाटतं, लेखकाचं मन असमाधानानं किंवा अतृप्तीनं पछाडलेलं असतं. जीवनाविषयीच्या असमाधानाचा वारसा मला माझ्या वडिलांकडून मिळालेला

असावा. त्यांच्या जीवनात अनेक दु:खं आली. ते बाह्यत: आनंदी असत, परंतु त्यांचं अंतर्याम नेहमी धगधगत असावं. ती ठिणगी जन्मत:च माझ्या मनात पडली असावी. माझ्या भावाबहिणींच्या मनात ती अतृप्ती पेरली गेली नाही आणि माझ्या मनालाच तिनं ' झाड ' बनविलं हा योगायोग आहे.

मला कळायला लागल्यापासूनच मी ' लेखक ' आहे. लेखक नेहमी दोन पातळ्यांवर जगत असतो. इतरेजनांप्रमाणे तो जगातले व्यवहार करतोच. परंतु त्याच वेळी तो त्या ' जगण्या'कडे तिऱ्हाइताच्या नजरेनं पाहात असतो. मी बारा वर्षांचा असताना माझी आई वारली. त्या वेळी इतर चार मुलांप्रमाणे मी रडत होतो, परंतु मी त्या मृत्यु-सोहळ्याकडे माझ्यातून बाजूला होऊन अलगपणानं पाहातही होतो. अंधारी रात्र, नातेवाइकांचं रडणं, ' या मुलांचं आता कसं होणार ? ' या भावनेनं प्रौढ स्त्रियांनी आमच्याकडे पाहणं, हे सगळं मी टिपत होतो. त्या दृश्याचा मी पुढे केव्हातरी उपयोगही केला असेल. परंतु त्या दृश्याची छाया माझ्या लहानग्या मनानं तेव्हाच शोषून घेतली होती.

परमन-प्रवेशाची सिद्धी मला लहानपणापासूनच प्राप्त झालेली आहे. प्रत्येक लेखकाला ती असतेच. लहानपणी आमच्या घरी माधुकरी मागण्यासाठी किंवा वारानं जेवण्यासाठी मुलं येत. त्यांच्याच वयाचा मी असून मला त्यांचं मन संपूर्णपणे वाचता येई. त्यांना मात्र माझं मन कळत नसे ही गंमत होती.

मला वाटतं, जीवनाकडे निरनिराळ्या पातळ्यांवरून बघण्याची शक्ती ज्याला असेल तो लेखक होतो. एखाद्या विशिष्ट घटनेमुळे माणूस लेखनप्रवृत्त होतो असं नाही. ते तात्कालिक कारण असलं तरी त्यामागची साखळी फार मोठी असते. म्हणूनच, लेखक हा जन्मावा लागतो. माझ्या मनात असमाधानाची ठिणगी पडली ती योगायोगानं, पण पुढे मात्र लेखक होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेच लागतात. ते प्रयत्न करणं हा लेखक-जीवनातील ' ऐहिक ' भाग झाला.

सुरुवातीच्या दिवसांत मनापुढे लिहिण्यासाठी अनेक विषय येत. परंतु त्यात नेमकेपणा नसे. प्रथितयशांचं अनुकरण करावं, बाजारात जी फॅशन चालू असेल तसं लिहावं असे वाटे. ते फडके-वाङ्मयाचे दिवस होते. माझ्या व अप्पासाहेब फडक्यांच्या मन:पिंडात काहीही साम्य नाही. तरीही मी तशा धर्तीच्या दोन-चार गोष्टी लिहिल्याचं आठवतं. खांडेकरांचा पगडा जास्त होता.

कारण मी गरिबी अनुभवत होतो. माझी कुचंबणा होत होती. ' नवा प्रातः-काळ ' ही खांडेकरांची गोष्ट जणू काही माझ्यावरच लिहिली आहे असं त्या वेळी मला वाटलं. ' गरिबीचं उच्चाटन, ' ' श्रमजीवी वर्गाविषयी सहानुभूती ' आणि याचाच परिपोष म्हणजे मार्क्सप्रणित क्रांती–वगैरे गोष्टींचं त्या वेळी आकर्षण वाटे. परंतु तेही बरंचसं नाटकी आणि दिखाऊ होतं. शेवटी मला स्वतःची ' नस ' सापडली. मी माझ्या पांढरपेशा जीवनातील गोष्टी लिहायला लागलो. मग मात्र माझं मलाच समाधान लाभलं.

माझा स्वभाव गप्पाष्टकांत रमणारा आहे. निरनिराळ्या लोकांकडे जाऊन जीवनचरित्रं ऐकायची आणि कथाविषयांची नोंद करून ठेवायची असं मग सुरू झालं. मी स्वतः पुण्यातील कनिष्ठ मध्यमवर्गात, म्हणजे अगदी सामान्य लोकांत वाढलो आहे. त्या लोकांचे अनेक गंड व स्वप्नं असतात. ती रंगवणं ही माझी लेखनामागची प्रेरणा होती. एकेका कथानकामुळे मी दोन-दोन महिने भारून जात असे व कथा पूर्ण झाल्यानंतर मला अतीव सुख होत असे. प्रेमळ पत्नीकडून मिळालेल्या परिपूर्ण रतिसुखानंतर मनाला जी शांती मिळते तीच उपमा या सुखाला द्यावी लागेल. अलीकडे मात्र मन तेवढं भारून येत नाही आणि लेखनानंतर तेवढं सुखही लाभत नाही. हा कदाचित ' अतिपरिचियाचा ' परिणाम असावा.

मी साधारणपणे बरंच लिहितो. वर्षाकाठी पंचवीस-तीस गोष्टी लिहिल्या जातात. दोन-तीन वर्षांनी एखादी कादंबरी लिहून होते. सुरुवातीच्या काळात वर्षाला दोन-तीन गोष्टी छापून आल्या म्हणजे फार झालं अशी स्थिती होती. तेव्हा मागणीच थोडी होती. अनाहुतपणे मासिकांची दारं ठोठावावी लागत.

विपुल लिहिणाऱ्यांच्या लेखणीचा कस कमी होतो अशी समजूत कित्येकांची असते, ती साफ चुकीची आहे. ' मागणी आहे म्हणून निर्मिती ' हे सूत्र लेखनाच्या बाबतीत बरोबर नाही. आरंभीचा चाचपडण्याचा काळ संपला आणि तेव्हापासून माझं लेखक मन सदैव जागृत राहायला लागलं. मला सारखे विषय सुचत असतात. मी त्यांच्याबद्दल चिंतन करतो ते स्वतःच्या नकळत. त्यामुळे कित्येक कथाबीजं माझ्या मनात पडून असतात, मागणी आल्यावर त्या त्या मासिकाला कोणतं कथाबीज आवडेल याचा मी विचार करतो आणि लिहावयास बसतो. लिहिताना मला काहीही त्रास होत नाही. कारण मनानं पूर्वतयारी अगोदरच

केलेली असते. मासिकाच्या आवडीप्रमाणे कथा पाठविणं यात चूक काहीही नाही. माझ्या व्यक्तित्वाची अनेक अंगं आहेत. त्याप्रमाणे मला कथा सुचतात. त्या लिहिल्या तर काय बिघडलं ? काही लेखकांमध्ये कल्पना-दारिद्रय असतं त्यामुळे त्यांना फार कथाबीजं मिळत नाहीत. तीच माणसं जास्त लिहिणाऱ्यांबद्दल बकवा करतात. ' मागितली म्हणून लिहिली,' अशा स्वरूपाच्या माझ्या कित्येक गोष्टी प्रथम दर्जाच्या ठरल्या आहेत.

काही अडचणींमुळे मन उदासीन असले तर लेखन होत नाही. आपण लेखन सोडून द्यावं अशाही फिट्स मला पूर्वी येत. म्हणून मी वर्षवर्ष लिहीत नसे. माझी बदली अलाहाबादला झाली तेव्हा माझा लेखनाशी संबंध सुटला. दोन-तीन वर्षं काहीही लिहिलं नाही. प्रसिद्धीच्या दृष्टीने हा काळ त्रासदायक जातो. परंतु अशा काळात माझं अंतर्मन कथाबीजं टिपत असतंच. तीन-चार वर्षं मुळीच लेखन न केल्यानंतर मी जेव्हा परत लिहायला लागलो तेव्हा मधल्या काळात अनेक उत्कृष्ट कथाबीजं माझ्याजवळ जमल्याचा साक्षात्कार मला झाला. मी मग भराभर लिहीत गेलो आणि वाचकाकडून मला प्रतिसाद मिळू लागला. लौकिक अर्थानं मी जरी लेखन करीत नसलो तरी माझं लेखकपण सुरूच असतं. एवढंमात्र खरं की फार दिवस लेखन प्रसिद्ध झालं नाही तर मनाला एक चमत्कारिक भूक लागते. चिडचिड निर्माण होऊन जीव गुदमरतो. हे सगळं प्रसिद्धीच्या हौसेमुळे होते का आत्मप्रगटीकरणाच्या अनिवार्य इच्छेमुळे होते हे सांगता यायचं नाही. फार दिवसांत पोहायला उतरलं नाही तर जशी सुरसुरी येते तशीच मला लेखनाची येते.

माझा वाचक कोण आहे हे मला पूर्ण माहीत आहे. त्याला मी बहुतेक वेळी तृप्त करतो. त्याच्या जीवनातले प्रॉब्लेम्स मी हाताळतो. त्यामुळे तो मला दाद देतो. पांढरपेशा वर्गातील संसारी तरुण स्त्रिया माझं लेखन आवडीनं वाचतात. सात-आठ वर्षांनीदेखील जुन्या गोष्टीचा आवर्जून उल्लेख अशा स्त्रिया करतात. वाचकांना माझ्या मनात महत्त्वाचं स्थान आहे. मला वाटतं प्रत्येक ललितलेखक एका विशिष्ट वाचकवर्गाचा प्रतिनिधी असतो. त्याची लोकप्रियता त्याच्या बळावरच उभी असते.

माझं सगळं लिखाण ' चरित्रात्मकच ' आहे. नव्वद टक्के गोष्टी मी स्वत: पाहिलेल्या व्यक्तींवर किंवा अनुभवलेल्या प्रसंगावर आहेत. ' आनंदी गोपाळ '

या चरित्रात्मक कादंबरीमुळे मी पुढे आलो, कारण आनंदीबाई आणि गोपाळराव यांची चरित्रं पूर्वी पुस्तकरूपाने प्रसिद्ध होती. बाबूराव, नानूमामा आणि पंढरीनाथ ही चित्रणंही खऱ्याच व्यक्तींची आहेत. परंतु त्यांची ओळख लोकांना नव्हती इतकंच! चरित्रात्मक कथा-कादंबऱ्या लिहिताना मी त्या व्यक्तींच्या मनाची आंदोलनं माझ्या शक्तिबुद्धीप्रमाणे रंगवतो. त्यामुळे ती व्यक्ती मूळ व्यक्तीपेक्षा भिन्न उतरते. माझ्या काही गोष्टींतील पात्रं ओळखून त्यांचं मी चुकीचं चित्रण केलं आहे असा राग कित्येकांनी व्यक्त केला आहे.

लेखनाच्या प्रवासात दु:खापेक्षा सुखाचे प्रसंग अधिक आले. सामान्य आयुष्याला किनार प्राप्त झाली. माझ्यावरील दु:खाचे प्रसंगही मी माझ्या कथांमध्ये चित्रित केले असल्यामुळे दु:खांची धग संपली. माझं बहुतेक लिखाण मी माझ्या पत्नीला 'डिक्टेट' करतो. मी कुणावर लिहिणार आहे हे तिला माहीत असतं. त्यामुळे कित्येक वेळा ती लेखनाच्या प्रक्रियेशी तद्रूप होते आणि आम्हा उभयतांचा निराळाच संसार सुरू होतो. वास्तव संसारातील सगळी सुख:दुखं लिहून टाकल्यामुळे आम्हाला स्वत:चं असं काही सुखदु:ख चघळण्यास उरत नाही. यामुळे पोकळीही निर्माण होते. सर्वसामान्य जोडप्यांजवळ स्वत:चीच सुखदु:खे असतात, आणि उतारवयात त्यांच्याबद्दल बोलण्यात– विचार करण्यात त्यांचा वेळ जातो. आमचं तसं होत नाही.

परंतु लेखनामुळे इतर खूप आनंदाचे क्षण अनुभवायला मिळतात. 'आनंदी गोपाळ' वाचून एक ऐशी-ब्याऐंशी वर्षांचे जख्ख म्हातारे गृहस्थ रात्री माझा पत्ता शोधत आले. ते म्हणाले, "मी मुद्दाम नाशिकहून तुम्हास भेटण्यास आलो आहे. गोपाळराव जोशी आमच्या घरी नाशकास मेले. तेव्हा मी दहा वर्षांचा होतो. मी त्यांना हाताला धरून बाहेर नेत असे. अमेरिकेला जाऊन आल्याकारणानं त्यांच्या दहनाच्या वेळी मंत्राग्नी न देता भडाग्नी दिला. त्यांची काही पुस्तकं अजूनही मजजवळ आहेत. ती मी तुम्हास पाठवून देईन." खानदेशातलं एक प्रसिद्ध डॉक्टर जोडपं माझ्याकडे ओळख नसताना आलं. त्या बाईंनी मला एखाद्या सासुरवाशिणीप्रमाणे नमस्कार केला व 'आनंदी गोपाळ' लिहिल्याबद्दल अहेर दिला– माझ्या एका गोष्टीत हार्टडिसिज असलेल्या एका माणसाच्या मृत्यूपूर्वीच्या रात्रीचं वर्णन मी केलं आहे. जीवनाबद्दल त्याच्या मनात आलेले विचार तो स्वत:च्या पत्नीला सांगतो अशी कथा आहे. वर्ष दीड वर्षानंतर एका स्त्रीचं

मला पत्र आलं. त्यात लिहिलं होतं, “ तुम्ही त्या माणसाच्या तोंडी जी वाक्यं घातलीत तशीच वाक्यं आणि विचार मृत्यूपूर्वी माझ्या यजमानांनी मजजवळ बोलून दाखवले. तुमची गोष्ट मी मागून वाचली. दुसऱ्याचं मन जाणण्याची तुमची शक्ती अपूर्व आहे.” असे आणखीही काही प्रसंग सांगता येतील. त्यांची लांबण लावण्यात अर्थ नाही. परंतु एकच गंमत सांगतो.

मी स्वत: तीस वर्षं कारकुनी केली. नेहमी सामान्य लोकांत वावरलो. माझ्या लेखनाबद्दल कधीही वल्गना केल्या नाहीत. त्यामुळे माझ्या ऑफिसमधले लोकही मला त्यांच्यातलाच समजत राहिले.

मी सेवानिवृत्त होऊन आता दोन वर्षं झाली. माझ्याबरोबर तीस वर्षं काम करून निवृत्त झालेले कुलकर्णी मला परवा लक्ष्मी रोडवर भेटले. ते मला म्हणाले, “ काय रे तू लेखक वगैरे आहेस काय ? ”– मी म्हणालो, “ हो. ” त्यावर आश्चर्यनिदर्शक तोंडाचा चंबू करत ते म्हणाले, “ तू ‘ आनंदी गोपाळ ’ लिहिलीस ? आयला ! कमाल झाली. मी ती कादंबरी वाचली आहे. परवा तू आमच्या रस्त्यावरून जात असताना माझ्या मुलीनं तुझ्याकडे बोट दाखवून तू ‘ आनंदी गोपाळ ’चा लेखक आहेस असं सांगितलं– मी खरोखर थक्क झालो.” ऑफिसमध्ये कुलकर्णी माझी नेहमी थट्टा करीत. मला चिडवीत. त्या गोष्टीचा ओशाळेपणा त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता... लेखकालाच ही गंमत अनुभवता येईल.

लेखक म्हणून माझं स्वत:बद्दल काय मत आहे असा प्रश्न मी स्वत:लाच विचारतो. आरशात आपलं रूप पाहावं त्याप्रमाणे माझ्या पुस्तकांकडे मी कित्येक वेळा पाहात बसतो.

मराठी वाङ्मयाच्या दृष्टीनं लेखक म्हणून मला पहिल्या दर्जाच्या लेखकांमध्ये स्थान मिळायला हवं. मी पस्तीस वर्षं लेखन करीत आहे. अजूनही माझ्या वाचकांना माझा कंटाळा आलेला नाही. पस्तीस वर्षांत वाचकांच्या तीन पिढ्या झाल्या; तरीही मी टिकाव धरून आहे.

टीकाकारांनी मात्र मला प्रथम दर्जा दिला नाही, याची मला खंत वाटते. पहिल्या दर्जाचे इतर लेखक माझ्यापेक्षा बुद्धिमान आहेत असं वाटत नाही. परंतु ते लिहिण्यामध्ये जसे निरनिराळे प्रयोग करतात तसे मी मुद्दाम करत नाही. कारण मला माझ्या वाचकांशी प्रतारणा करायची नाही. हे जरी खरं असलं तरी

लेखकांची आज जी चलती नाणी आहेत, त्यांत माझा समावेश होत नाही. आजची वाङ्मयसमीक्षा ज्या वर्गाच्या स्वाधीन आहे त्या वर्गाला माझं वरपांगी, सुबोध आणि साधं दिसणारं लिखाण विशेष आकर्षक वाटत नाही. मी इंग्रजी वाङ्मय अलीकडे सात-आठ वर्षंच निष्ठेनं वाचत आहे. अमेरिकन कादंबऱ्या अत्यंत ' सेक्सी ' आणि अनैसर्गिक असतात असं मला वाटतं. त्या कादंबऱ्यांचा माझ्यावर परिणाम होत नाही. माझं लिखाण अस्सल मराठी आहे. कोणत्याही परकीय लेखकाची त्यात उसनवारी नाही. यामुळेही माझी उपेक्षा झाली असावी.

इतकी वर्षं लेखन करून काय मिळविलं हा प्रश्नच आहे. काही मिळवण्याच्या हेतूने माणूस लिहायला लागतो असं नाही. लेखनामध्ये पूर्वीतरी पैसा मुळीच मिळत नव्हता. आज थोडाफार दिसतो, परंतु तो नगण्यच ! लेखनामुळे प्रथम दर्जाची कीर्ती मिळाली तर तिचा थोडाफार उपयोग होतो. पण असे भाग्यवान थोडे. दुसऱ्या दर्जाच्या कीर्तीचा तसा काहीही उपयोग नसतो. उलट त्रासच असतो.

मी लेखक झालो नसतो तर माझं आयुष्य अळणी झालं असतं. पण कदाचित त्या अळणीपणाची मला कल्पना आली नसती व मी इतर चारजणांसारखा आत्मसंतुष्ट राहिलो असतो. तसं झालं नाही हेच सुदैव. लेखनात यश मिळणं हे बरंचसं दैवाधीन असतं, ते न मिळालं तर माणसानं खळखळ करू नये.

जीवनात राहून जीवन लांबून न्याहाळण्याची मौज फक्त लेखकालाच अनुभवता येते. ' करून अकर्ता ' राहण्याची शिकवण गीतेमध्ये आहे ती स्थिती लेखनाच्या छंदामुळे मी अनुभवतो.

## ७

# ' शरदेर स्मृती '

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

रात्री झोप लागली नव्हती. वरचा बर्थ मिळाला होता. अलाहाबादपासून डब्यातली गर्दीही बरीचशी कमी झाली होती. झोप यायला हरकत नव्हती; पण आलीच नाही. चालत्या गाडीत वाचन करणे मला जमत नाही. त्यामुळे मोठ्या प्रवासात बेचैनी वाढते. मन हेलावते.

बर्थवरून खाली आलो. चांगले फटफटले होते. दिवस दिवाळीच्या आसपासचे होते. उत्तर प्रदेशात अजून थंडी सुरू झाली नव्हती; पण हवेत गारवा होता. गाडीतून जाताना क्षितिजापर्यंत हिरवे हिरवे दिसत होते. मोठी मजा वाटत होती.

धनबादला छानपैकी चहा घेतला, सिगारेट शिलगावली, आणि बाहेर बघत बसलो. अलाहाबादेच्या पलीकडे मी प्रथमच चाललो होतो. उत्तर प्रदेशातली कित्येक गावे परिचयाची होती, पण गाडीने उत्तर प्रदेश केव्हाच सोडला होता. ती आता बंगालच्या वेशीतून आत शिरत होती.

आत शिरताना इतिहासाची पाने मनात फडफडली. डोळ्यांपुढे काय दिसत होते हे मनालाच कळत नव्हते. निरनिराळी भूतकाळातली माणसे सारखी समोर येत होती. एका आकृतीत दुसरीचे रंग होते. तिसरीचे प्रतिबिंब होते. सगळी सरमिसळ झाली होती. आकृतीचे निराळेपण संपले होते. गाडी चाललीच होती. बराच वेळ चालली होती. हिरवी शेते बघून डोळे कंटाळले होते.

बर्थवर स्वस्थ पडून राहावे असे वाटत होते.

इतक्यात गाडीच्या पलीकडे अर्ध्या फर्लांगावर छोटेसे अर्धवर्तुळाकृती तळे दिसले. त्यात फुललेली सुंदर कमळे! निळया जांभळया रंगाची. मध्यभागचे कमळ तर पूर्ण फुलले होते. त्याचा डौल काही अपूर्व होता. मन समाधानाने भरले.

तळे मागे टाकून गाडी पुढे गेली. पण मनापुढचे ते पूर्ण फुललेले डौलदार कमळ हालेचना. असे कमळ मी पूर्वी बघितले नव्हते. लहानपणी 'क-कमळातला' शिकलो होतो. मोठेपणी माझ्या मुलांना शिकवले होते. पण तेव्हा 'क'च्या वेलांट्या आणि वर्तुळेच महत्त्वाची होती. मुळाक्षरांच्या तक्त्यात कमळ होते, पण ते होते इतकेच! गणेशचतुर्थीला श्रींच्या पूजेला कमळे लागतात. भिक्षुकाने दिलेल्या मळकट कागदावरच्या यादीत कमळांचा उल्लेख असे. म्हणून त्यांची उस्तवारी करणे भाग पडे. पुण्यात माळयाच्या दुकानात पूजेसाठी म्हणून पावलीला दोन या भावाने जी कमळे विकतात त्यांपैकी हे कमळ नव्हते. काहीतरी निराळेच होते.

मी डोळे मिटून घेतले आणि सौंदर्य मनात साठवले. पुन्हा डोळे उघडले नि बाहेर पाहिले. आश्चर्य होते! गाडी वेगाने पुढे जात होती, पण देखावा तोच होता...तळयात कमळे होती. तळयाच्या पाळीवर दहा-पंधरा वर्षांची मुले पाण्यात गळ टाकून मासे धरत होती. गाडी चाललीच होती. दुसऱ्या तळयाच्या मागे थोडया अंतरावर दुमजली बैठे घर दिसले. घर सुस्तावले होते. तळे शांत झोपलेले होते. कमळे थोडीफार डुलत होती—लहान मुलांनी झोपे-तल्या झोपेत थोडीफार हालचाल करावी तशी! कुठल्या तरी जुन्या कहाणीत जादुगाराने सुंदर राजकन्येचे अचेतन वस्तूत रूपांतर केलेले असते, ते तळे-ते घर तसेच असेल का?

उजव्या-डाव्या बाजूला थोड्याथोड्या अंतरावर अशी अनेक तळी नि अनेक घरे दिसली. सारी झोपलेली! कुठेकुठे मुले मासे पकडत होती. घराच्या खिडकीतून एखादी प्रौढा पळत्या गाडीकडे बघत उभी होती. ओळखीची माणसे थोडीच असतात; अनोळखी माणसांचा समुद्र चारी बाजूंनी फेसाळत असतो, त्यात ओळखीच्या माणसांचे छोटे बेट असते. प्रथम ती प्रौढा बेटावर नव्हती. पण पुढच्याच क्षणाला त्या अथांग समुद्रातून ती प्रौढा बेटावर आली. माधवीच ती!

जिथे उभी आहे तेच तिचे शयनागार. तिथेच सुरेंद्र गेला होता आणि तिने त्याला धमकावले होते. बेटावर आता गर्दी होत चालली. तळ्याच्या पाळीवर बारा-तेरा वर्षांचा मुलगा आणि आठदहा वर्षांची चिमखडी मुलगी उभी आहे. मुलाच्या हातात वेताची छडी आहे. कसलेतरी भांडण चालले आहे ! बापरे ! त्या मुलाने केवढ्या जोराने हातातल्या छडीचा सपकारा त्या मुलीच्या अंगावर ओढला ! तिचे अंग काळेनिळे झाले आहे. तो मुलगा देवदास. तो तसाच आहे खोडकर ! हातातल्या छडीने केवढ्या जोराने त्याने पार्वतीला मारले. पण पार्वतीची गंमत आहे. इतका मार खाते, पण देवदासशिवाय तिला करमतच नाही. गाडी वेगात आहे. दुसरे एक तळे दिसत आहे. काठावर पंधरा-सोळा वर्षांची दोन मुले उभी आहेत. मासे पकडत आहेत. कोण बरे आहेत ती ? हां ! ओळखले, तो तर श्रीकांत आहे. दुसरा नक्कीच इंद्रनाथ असणार ! श्रीकांत आणि इंद्रनाथ! त्यांच्याशिवाय अशा उनाडक्या कोण करेल ?

मी किंचित हसलो. डोक्यात विचार भिरभिरत होते. थांबवायचा प्रयत्न केला पण थांबेनात. बरद्वान स्टेशन आले. फलाटावर फार गर्दी होती. माणसे खिडकीतून डब्यात चढत होती. बंगाली पद्धतीचा शर्ट घातलेला स्वप्नाळू डोळ्यांचा तरुण खिडकीतून आत आला. मी लगेच त्याला ओळखले. तो अपूर्वबाबूच होता. मान उंचावून मी फलाटावर पाहिले. एक स्त्री हात वर करून निरोप देत होती. ती भारती असणार. मला गंमत वाटली. डब्याच्या दुसऱ्या टोकाला, खास वंगदेशीय डोळे लाभलेल्या दोन स्त्रिया बसल्या आहेत. त्यांतली एक नक्कीच हिरण्मयी आहे. दुसरी बहुधा किरणमयी असावी.

मनाला असे हेलकावे बसत असताना हौरा आले. मी टॅक्सी करून शामच्या घरी गेलो. मनाला कसलीतरी ओढ लागली होती.

रजा थोडी होती. दोन-तीन दिवसांत कलकत्ता बघायचे होते. शामने छान कार्यक्रम आखला होता. दुसऱ्या दिवशीच्या आरामगाडीची तिकिटे काढून ठेवली होती. त्या बसमधून कलकत्त्यातील सर्व मुख्य मुख्य ठिकाणे एका दिवसात बघायची होती.

शामने बसची मार्गपत्रिका मुद्दाम आणून ठेवली होती. कोणकोणत्या स्थळाला बस भेट देणार आहे, हे त्या पत्रिकेत लिहिले होते. मी पत्रिका वाचली. स्थळांच्या गर्दीत मला पाहिजे ते ठिकाण नव्हते. पत्रिकेची घडी करून मी शामला म्हटले,

" ही सारी ठिकाणं बघायलाच पाहिजेत. पण मला मुख्य एक ठिकाण बघायचं आहे. ते या यादीत नाही."

वहिनी मोठ्या हुशार आहेत. कलकत्त्यात त्यांनी दहा-बारा वर्षे काढली आहेत. पाहुण्याराउळ्यांना कलकत्ता हिंडून दाखवण्याची त्यांना हौस आहे. त्या म्हणाल्या,

" सुभाषबाबूंचं घर ना ? आरामगाडी तिथं जात नाही. मी तुम्हाला परवा घेऊन जाईन."

मी अस्वस्थ झालो. चाचरत म्हटले, " सुभाषबाबूंचं घर बघू – बघायलाच हवं. पण मला शरदबाबूंचं घर पाहायचं आहे."

त्या हसल्या. कुलाबा महिलामंडळातल्या बायकांनी सासवड-बारामतीच्या गावंढळ माणसाकडे बघून हसावे तशा हसल्या.

" शरदबाबू ? अहो म्हणजे ते सुभाषबाबूंचे मोठे भाऊ. त्यांचं तेच घर."

त्यांचे वाक्य तोडत मी म्हटले, " शरद बोस नव्हेत !... मला शरच्चंद्र चटोपाध्यायांचं घर बघायचं आहे."

त्या दोघांचे चेहरे संथ निर्विकार राहिले. समजावून सांगत मी म्हटले, " माहीत आहे ना ? शरच्चंद्र चतर्जी. कादंबरीकार. ज्यांनी ' पथेरदावी ' लिहिली."

शाम मोठा इंजिनियर आहे. वाङ्मयाशी त्याचा संबंध नाही. वहिनी थोडेफार वाचतात. देवदास चित्रपट त्यांनी बघितला होता. शरदबाबूंच्या काही कादंबऱ्यांचे अनुवाद त्यांनी वाचले होते. पण शरदबाबूंबद्दल औत्सुक्य नव्हते. त्या दोघांनाही शरदबाबूंचे घर माहीत नव्हते. ते घर पाहण्याचा हट्ट धरणारा पाहुणा अजून त्यांच्याकडे आला नव्हता. भाविक लोकांना कलकत्त्यात कालिमंदिर किंवा बेलूर मठ बघायचा असतो. राजकारणात रस घेणाऱ्यांच्या दृष्टीने सुभाषबाबूंचे घर हे पवित्र तीर्थ असते. हौशी लोकांना चौरंगीवरून हिंडायचे असते. ती सगळी त्या दोघांना पाठ होती. शरदबाबूंचे घर मात्र माहीत नव्हते.

मी निर्धार केला होता. ज्या वास्तूत शरदबाबू राहिले होते, तिथे जाणे मला भाग होते. शेवटी तोड निघाली. दुसऱ्या दिवशी आरामबसने मी कलकत्ता बघायचे. तोपर्यंत शामने किंवा वहिनींनी महाराष्ट्रनिवासात कुणाला तरी विचारून शरदबाबूंच्या घराचा पत्ता मिळवून ठेवायचा. काम सोपे होते. निवासात जमणारे कित्येक मराठी लोक कलकत्त्यात एक दोन तपे राहिलेले होते. त्यांना

शरदबाबूंचे घर नक्कीच माहीत असणार! मला समाधान वाटले. कल्पनेनेच मन सुखावले.

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता आरामबस सुटली. तीत प्रांतोप्रांतीचे लोक होते. गाईड म्हणून वीस-बावीस वर्षांची, ओठ रंगवलेली, स्मार्ट दिसणारी, फुलाफुलांचा झगा घातलेली अँग्लोइंडियन मुलगी होती. बस सुरू झाल्यावर लाऊडस्पीकरवरून ती बोलायला लागली. सफाईदार अचयावत इंग्रजी उच्चारात सांगायला लागली, " हे हायकोर्ट आहे. तुम्ही आता शहराच्या अमुक भागातून चाललेले आहात. हे बिर्ला प्लॅनिटेरियम आहे. हा बेलूर मठ आहे."

लोक स्थळे बघण्याच्या नादात होते. मी मात्र अस्वस्थ होतो. आत कुठे तरी दुखत होते. दुपारी चारच्या सुमाराला रवींद्रनाथांच्या घरापाशी आम्ही आलो. तीन मजली मोठी इमारत आहे. दालने प्रशस्त आहेत. कमालीची स्वच्छता आहे. मुंबईची एक मोठी चाळ सहज मावेल एवढा रवींद्रनाथांच्या वाड्याचा परीघ आहे.

खोल्यांतून टागोरांचे निरनिराळे फोटो लावले आहेत. अगदी लहानपणचा. वडिलांच्या मांडीवर बसलेला. नोबेल प्राईझ मिळाले तेव्हाचा. रशियात गेले तेव्हाचा. इंग्लंडातला, अमेरिकेतला. निरनिराळ्या देशांतले फोटो! दुसऱ्या मजल्यावर मोठा हॉल आहे. तिथे रवींद्रनाथांचे देहावसान झाले! त्याच्या मध्यभागी सारखा धूप जळत असतो. धूपाच्या वासाने वातावरणात गांभीर्य भरले आहे. आत जाताना पादत्राणे काढावी लागतात. मी आत जाऊन उभा राहिलो. थोड्या वेळाने रवींद्रनाथांना वंदन करून खाली आलो. अजून इतर लोक यायचेच होते. रवींद्रनाथांनी काढलेली पेंटिंग्ज बघण्यात ते गुंतले होते. अँग्लोइंडियन गाईड बसमध्ये मागच्या बाजूला सिगारेट ओढत बसली होती. मी जवळ गेलो. थोडासा हसलो. तिचा चेहरा निर्विकारच राहिला—हास्याला तिने प्रतिसाद दिला नाही.

मी पुन्हा हसलो...माझ्या पुणेरी इंग्रजीत तिला म्हटले,

" माहिती पाहिजे आहे."

तिनं नक्षीदार भुवया उंचावल्या.

" मला शरदबाबूंचं घर बघण्याची इच्छा आहे."

सफाईदार इंग्रजीत तिने सुभाषबाबूंच्या घराचा पत्ता दिला.

मी चिडलो. " मला शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांचा पत्ता पाहिजे....यु नो

शरदबाबू ?...द ग्रेट नॉव्हेलिस्ट ?"

त्या मुलीला अर्थबोध झाला नाही. तिने लालचुटुक ओठांचा चंबू केला. भुवया विस्फारल्या. थोडेसे औत्सुक्य, थोडीशी छुपी टिंगल पण बराचसा उपचार अशा भावनेने माझ्याकडे पाहिले आणि फॅशनेबल 'पॉलिश्ड' बाया अज्ञान लपवण्यासाठी तोंडातून 'ओऽऽ' अशा प्रकारचा जो आवाज काढतात, तो तिने काढला.

मी तिच्याकडे नुसता बघतच राहिलो. तेही तिला असह्य झाले. ती म्हणाली, "सॉरी! आय डोंट नो! यु मे आस्क समबडी."

बस सुरू झाली. लाऊडस्पीकरवरून पुन्हा प्रेक्षणीय स्थळांचे 'केशवाय नमः नारायणाय नमः' सुरू झाले. मला चैन पडत नव्हते. कोणत्याच स्थळात गंमत वाटत नव्हती. शरदबाबूंचे घर बघायलाच हवे होते.

रात्री शामने निराश केले. त्याने निवासातल्या बऱ्याच लोकांना विचारले होते. वहिनींनीही प्रयत्न केला होता. पण शरदबाबूंचे घर कुणालाच माहीत नव्हते.

शामला त्याबद्दल विशेष काही वाटले नाही. रात्र बरीच झाली होती. दिवस-भर काम करून तो थकला होता. त्याने एक जांभई दिली. म्हणाला, "हे काय नवीन त्रांगडं काढलं आहेस? झोप आता. उद्या बघू आणि नाही घर सापडलं तरी हरकत नाही. तो काही हौराब्रीज नव्हे की बघितलाच पाहिजे!"

वहिनींना विनोदाची लहर आली. त्या म्हणाल्या, "पुण्याला गेल्यावर एखादा लेखक नाहीतर प्रोफेसर विचारील फार तर की शरच्चंद्रांचं घर बघितलंत का? त्याला दडपून थाप मारा, की बघितलं, छान आहे. अहो नेहमीची वर्णनं करा-यची. त्यांचं फौंटनपेन आहे. अर्धवट लिहिलेले कागदसुद्धा जपून ठेवले आहेत."

वहिनी हसल्या. शामही हसला; आणि ती दोघे झोपायला गेली. मी दिवा मालवला. अंथरुणावर पडलो, पण झोप आलीच नाही—ती येणे शक्यच नव्हते. मनापुढे सारखी माणसे नाचत होती. श्रीकांत, डॉक्टर बाबू, अपूर्व, भारती, बडी दीदी! कित्येक प्रसंग मी जगत होतो. बंगालच्या जमीनदाराच्या घरात, अगदी अंतर्गृहात—स्त्रीराज्यात—जे घडले ते मी पाहात होतो. डोळ्यांपुढे नाटक चालले होते. त्या नाटकात मीही एक पात्र होतो. झोप येणे शक्यच नव्हते!

सकाळी उठलो, खाना घेतला. शाम कामावर निघून गेला. मला स्वस्थ पडून राहायला हरकत नव्हती. पण मन फार बावचळले होते. शरदबाबूंचे घर

शोधून काढणे जरूर होते. कपडे केले आणि बाहेर पडलो. शामप्रसाद मुकर्जी रस्त्यावरून उगाच भटकलो. थेट कालीघाटापर्यंत जाऊन आलो. एका-दोघा बंगाल्यांना विचारले, पण त्यांना माहीत नव्हते. 'शरद' या नावापुढे 'बोस' ही अक्षरेच फक्त सर्वांना ज्ञात होती. चटर्जी कुणाच्या गावीही नव्हते!

मी हट्टाला पेटलो. घर शोधून काढायलाच हवे होते. हिंडता हिंडता कोपऱ्यात जुन्या पुस्तकाचे दुकान दिसले. आत गिऱ्हाईक कुणी नव्हतेच. बाहेर खुर्ची टाकून एक किडकिडीत अंगाचा मध्यमवयीन बंगाली गृहस्थ पेपर वाचत बसला होता. तो बहुधा त्या दुकानाचा मालक असावा.

का वाटले, सांगता येत नाही. पण मनाला विश्वास आला की इथे माहिती मिळेल. मी दुकानात गेलो. बंगाल्याने डोळ्यापुढचा पेपर बाजूला केला. तो हसला—सामान्यपणे बंगाली माणसे कधी हसत नाहीत. त्याच्या हसण्यामुळे धीर आला. एका क्षणात मी त्या माणसाचे निरीक्षण केले. दुकान नीट चालत नव्हते हे उघड होते. दारिद्र्य त्याच्या फाटक्या शर्टातून दिसत होते. चेहरा ओढघस्त होता. दुःखी माणसाची स्थिरता त्याच्या डोळ्यांत होती.

अंतरीची खूण पटून मी पुन्हा हसलो. हिंदीत म्हटले,

"माफ करा...एक माहिती पाहिजे आहे."

तो म्हणाला, "बोला."

"मला शरदबाबूंच्या घराचा पत्ता पाहिजे आहे.—कालपासून मी शोधायचा प्रयत्न करतोय."

"मी देतो—मला माहीत आहे."

"माफ करा. शरदबाबूंचा पत्ता पाहिजे. शरदबाबू...द ग्रेट नॉव्हेलिस्ट—शरद बोस नव्हे!"

त्याचे डोळे लकाकले. हसत तो म्हणाला, "होय...होय! कहानीकार शरदबाबू—बोस नव्हे."

मी त्याला माझा झालेला गोंधळ सांगितला. तो पुन्हा हसला. खिशातून पेन काढून त्याने पत्ता लिहून दिला. "१६ अश्विनी दत्त रोड, कलकत्ता." कसे जायचे ते सांगितले; पण त्याची गरज नव्हती. मला पाताळातूनही ते घर शोधून काढणे शक्य होते.

दुपारी शाम नोकरीवरून लौकर परत आला. मला कलकत्यात हिंडवावे, सरबराई करावी, खाऊपिऊ घालावे, अशी त्याची इच्छा होती. कुठे जायचे, काय पाहायचे, कोठल्या हॉटेलात खाना घ्यायचा, ह्याचे बेत तो आणि वहिनी करीत होत्या. मी ते सर्व बेत मोडून काढले. खाण्यापिण्याला माझी हरकत नव्हती. पण प्रथम शरदबाबूंच्या घरी जाऊन येणे जरूर होते. ते माझे धर्मकृत्य होते. मी हट्ट धरला. त्यांना निघणे भाग पाडले.

अश्विनी दत्त रोड प्रसिद्ध नाही. मोठ्या रस्त्यांच्या आजूबाजूला समांतर असे शांत रस्ते असतात, त्यांतला तो एक रस्ता आहे. वहिनींनादेखील तो रस्ता मोठ्या मुष्किलीने सापडला. आडवळणे घेऊन गल्ल्या पार करून शेवटी रस्त्याच्या पाटीपर्यंत आलो. मला समाधान वाटले. रस्ता सापडला होता. घर सापडणे अवघड नव्हते.

अश्विनी दत्त रोडवर शांत मध्यमवर्गीय बंगले आहेत. पुण्याला जिमखान्यावरून किंवा पुरंदरे कॉलनीतून हिंडताना वाटते, तसे वाटले. रस्त्यावर वर्दळ मुळीच नव्हती. बंगल्यांच्या अगदी आतल्या भागात असलेल्या माणसांची सूक्ष्म जाग येत होती. पण कसलीच गडबड नव्हती.

एका दोघांना विचारले पण पत्ता लागला नाही. घर नि घर तपासत चाललो. शाम अणि वहिनी कंटाळली होती. माझा उत्साह त्यांना वेडेपणाचा वाटत होता... मी पुढे चाललोच होतो. शेवटी एका सुशिक्षित बंगाली स्त्रीने पत्ता दिला. तिच्या घरापासून दोन-तीन घरे टाकली की शरदबाबूंची वास्तू होती. आम्ही पुढे चाललोच होतो. शरदबाबूंचे घर जवळ येत चालले होते. पण रस्त्यावरच्या कोणालाच त्याची क्षिती नव्हती. त्यांच्या दृष्टीने इतर दगडा-विटांच्या बंगल्याप्रमाणेच तोही एक बंगला होता.

गल्लीच्या शेवटी शेवटी बंगला दिसला. वर बंगालीत ‘ शरदेर स्मृति ’ अशी अक्षरे होती. मी बंगल्याच्या फाटकात दोनतीन मिनिटे नुसताच उभा राहिलो. दोन मजली घर होते. पुढे अंगण होते. घरात अगदी शांतता होती. माझे हृदय मात्र सारखे धडधडत होते. त्याला कसली हुरहूर लागली होती कोण जाणे! प्रियकराची भेट होण्यापूर्वी प्रेयसीचे मन हेलावते—तसे वाटत होते का? छे! तसे मुळीच नाही. प्रियकर...प्रेयसी...उत्कंठा...मिलन! शब्द गुळगुळीत वाटतात. भावना अगदी सरधोपट आहेत. ओळखीच्या रस्त्याप्रमाणे. हा अस्वस्थ-

पणा तसा नाही. कसा आहे? सांगता येणार नाही. मृत्यू निश्चित झाला, शरीराची या जगात राहण्याविषयीची तडफड संपली की मरणाऱ्या माणसाला हुरहूर वाटत असेल का? मला माहीत नाही. पण त्या वेळी काही निराळे वाटत असेल नक्की. समोरचे ते दुमजली घर बघून मला तसे वाटले. मन एकदम शांत झाले. पण तरीही आत कुठेतरी कळेल न कळेल अशा बेताने अस्वस्थता ठुसठुसत राहिली. शांतपणा आणि अस्वस्थता. आग आणि पाणी. प्रकाश आणि अंधार! चमत्कारिक मिश्रण आहे. मनात ते एखादे वेळीच होते तसे. तेव्हा झाले.

वर दुसऱ्या मजल्यावर गॅलरीत केसात सिंदूर असलेली, शुभ्र वस्त्रे परिधान केलेली एक प्रौढा उभी होती. वहिनींनी बंगालीत तिला विचारण्याचा प्रयत्न केला. पण पुरुष बरोबर असल्यामुळे तिचा घरंदाजपणा आड आला. तिने घुंगट घेतला आणि ती झपाट्याने आत गेली.

फाटक उघडून आम्ही आत गेलो. कसलाच आवाज नव्हता. बाहेर कुत्रा बांधला होता. तो मात्र भुंकत राहिला. मग वरून एक गडी आला. त्याला बहुधा त्या प्रौढेनेच पाठविले असावे.

गड्याने बंगालीत विचारले, "कोण पाहिजे?"

त्याला कसे सांगायचे?...त्याला काय समजणार?

शामने बंगालीत सांगितले, "आम्हाला हे घर पाहायचे आहे. लांबून आम्ही आलो आहोत. मालकिणीला जरा बाहेर बोलाव."

मालकीण आलीच नाही. दोन-चार मिनिटांत गडीच परत आला. त्याने सांगितले,

"बाई बाहेर येत नाहीत. घर पाहायला मिळणार नाही."

गडी थंड होता. वरती मालकीण थंड होती. उत्सुकता मलाच होती.

शामने पुन्हा जोरात सांगितले, "कुणीतरी घरातल्या पुरुषाला बाहेर बोलाव...तुला कळणार नाही."

कुत्रा भुंकत होता. गडी अळंटळं करीत होता. वरची मालकीण कुणावर तरी ओरडत होती.

चार-पाच मिनिटांनंतर चोवीस-पंचवीस वर्षांचा एक तरतरीत मुलगा आला. त्याच्या डोळ्यांवर उपनेत्र होते. उंची मध्यम होती. केसांची झुलपे कपाळावर

आली होती. डोळ्यांमध्ये अबोध छटा होत्या. बरे वाटले. तो आदर्श सुशिक्षित बंगाली होता.

शामने विचारले, " हे शरदबाबूंचे घर काय ? "

जरुरी नव्हती तरीही मी मुद्दाम सांगितले, " शरदबाबू—द ग्रेट नॉव्हेलिस्ट ! "

त्याने ' होय ' म्हणून सांगितले, पण तो नुसताच उभा राहिला. आमच्या येण्याचे कारण त्याच्या लक्षात आले नाही. शामने इंग्रजीत सांगितले, " हा माझा मित्र. ही इज अ ग्रेट मराठी रायटर. "

अस्वस्थ होऊन मी आसपास पाहिले. आम्हा तिघांशिवाय दुसरा मराठी माणूस तिथे नव्हता. हसू आले. आता काहीही थापा मारायला हरकत नव्हती.

शामचे चाललेच होते. " ही इज अ ग्रेट मराठी रायटर. ही वॉन्टस टु पे रिस्पेक्टस टु शरद बाबूज हाऊस."

बंगाल्याने माझ्याकडे आपादमस्तक निरखून पाहिले. रायटरला शोभेसा माझा चेहरा आहे. बंगाल्यालाही तसेच वाटले असावे. त्याने मुंडी हलवली. ' ग्रेट ' वगैरे काही शक्य नाही. पण मी रायटर असायला त्याची हरकत नव्हती. मग तो माझ्याबद्दल गौरवपर बोलला, ' ग्रेट रायटर ' आल्यामुळे आपणाला फार आनंद झाला आहे असे त्याने सांगितले.

त्याने मग गड्याला किल्ल्या आणण्यासाठी फर्मावले. उजव्या हाताला तळमजल्यावरच एक कुलुपबंद खोली होती. तिकडे जात तो म्हणाला, " इथं बघण्याजोगं काही नाही...आय ॲम अफ्रेड यू वील वी डिसअपॉइंटेड. "

मी मात्र भारावलो होतो. स्वप्नात चालल्यासारखा त्याच्यामागोमाग चालत होतो.

कुलुपाला किल्ली लावत तो म्हणाला, " इन विस रूम, माय अंकल युज्ड टु सिट. "

कानात शब्द शिरत होते. पण अर्थ कळत नव्हता.

दार उघडले. आणि धुळीचा खकाणा उडाला. खूप: दिवस बंद असलेल्या खोलीतून येतो तसा कुबट वास आला. आम्ही आत शिरलो. तो सांगत होता, " या खोलीत आता कोणीच नसते...दिवसचे दिवस ती बंद असते."

मन एकदम कोरडे झाले. चमत्कारिक वाटले. जुन्या घरात माळ्यावर

निरुपयोगी वस्तू कशातरी रचून ठेवलेल्या असतात, तशी ती खोली होती. खिडकीपाशी मोठी लाकडी हात असलेली आरामखुर्ची होती. तालुक्याच्या गावात फौजदारी वकिलांच्या ऑफिसमध्ये असती तशी ! तिचा एक पाय मोडला होता. मधली वेताची चौकट ठिकठिकाणी उसवली होती. त्या खुर्चीत बसून शरदबाबू विचार करत असतील. कथानक जुळवत असतील. दुसऱ्या बाजूला वेताचा जुनाट कोच होता. शेजारी उंच खुर्ची होती. कपाटावर बक्षीस मिळालेली पदके आणि चांदीचे चषक होते. पुस्तक, ग्रंथ, हस्तलिखिते, लिहिण्याचे सामान, डोळ्याला लावायचा चष्मा—काहीच नव्हते !

भकास विधवेप्रमाणे ती खोली होती. त्यांनी निर्मिलेल्या दुर्दैवी, दरिद्री, चारित्र्यहीन नायिकांमध्येही एक प्रकारचे सौंदर्य होते. तकाकी होती. मलिनपणा कळकटपणा त्यांच्या एकाही पात्रात नव्हता. ते राहात असलेल्या खोलीच्या वाट्याला मात्र तो आला होता.

भिंतीवर जुने फोटो लावले होते. न पुसलेले. धुळीमुळे अंधूक दिसणारे. ऑफिसातल्या कारकुनांनी हौसेने ग्रुप फोटो काढून घ्यावे, आणि पेन्शनीनंतर ते धूळ खात पडावे तसे ! डाक्का विश्वविद्यालयाने डॉक्टरेट दिली तेव्हाचा फोटो, ब्रह्मदेशातले फोटो, आणखी काही फोटो, स्मशानयात्रेचा फोटो. एका फोटोत नुसतीच वयस्कर बाई होती. पुतण्याने सांगितले, " ही शरदबाबूंची बायको."

मला लगेच तिचे नाव आठवले. हिरण्मयी. तिचा इतिहास आठवला. खूप बोलावेसे वाटले. पण पुतण्या उत्सुक दिसला नाही.

चारपाच मिनिटांत खोली बघून झाली. स्टुलावर उगाच बसलो. मी आज धन्य झालो होतो. पण मनाची उदासीनता वाढलीच होती. खूप बोलावेसे वाटत होते, पण पुतण्याला किंवा शामला आणि वहिनींना त्यात रस नव्हता. हातात कुलूपकिल्ली घेऊन, आमची ब्याद बाहेर केव्हा जाते, याची पुतण्या वाट बघत होता.

मी उठून उभा राहिलो. घसा दाटून आला. चाळिशी उलटलेला मी प्रौढ माणूस होतो म्हणून केवळ ढसाढसा रडलो नाही. घोगऱ्या आवाजात म्हणालो,

" ही खोली फार वाईट आहे. टागोरांचं, सुभाषबाबूंचं घर ठेवलं आहे, त्यापेक्षा जास्त इतमामात हे घर ठेवायला हवं होतं. "

आमच्या जाण्याची पुतण्याला घाई झाली होती. दरवाज्याकडे जात तो

म्हणाला, " टागोर, सुभाष ही सारी रईस माणसं! आम्ही फार सामान्य आहोत."

मला पटले नाही. सामान्य असली म्हणून काय झाले? खोली नीट ठेवायला हरकत नव्हती. तिच्या मध्यभागी शरदबाबूंचा मोठा एन्लार्ज केलेला फोटो होता, त्यावर जुना पाचसहा महिन्यांपूर्वीचा हार लटकत होता. सामान्य माणसाला दररोज त्या फोटोला फुले वाहणे, एखादी उदबत्ती लावणे, खोली रोज झाडून स्वच्छ करणे नक्कीच शक्य होते. पण ते होत नव्हते.

आता पुतण्या दरवाज्याबाहेर जाऊन उभा राहिला. जास्त थांबणे शोभले नसते म्हणून मी शरदबाबूंच्या खुर्चीजवळ गेलो. ज्ञानेश्वरांच्या समाधीला हात लावावा त्या भावनेने मोडक्या खुर्चीला हात लावला. माझे असेच आहे. पवित्र वस्तूला स्पर्श करायची मला इच्छा होते. मागे कॉलेजमध्ये असताना गांधींचे पुण्यात व्याख्यान होते. मी स्वयंसेवक होतो. गांधीजी झपाट्याने व्यासपीठाकडे चालले असताना मी असाच गर्दीतून पुढे गेलो. वेड्यासारखा त्यांच्या अंगावरच्या पंचाला हात लावला होता. त्या स्पर्शाची आठवण शरदबाबूंच्या खुर्चीला हात लावल्यावर झाली.

खोलीबाहेर आलो. पुतण्याने धाडकन दार लावून घेतले. पुन्हा धूळ उडाली. रवींद्रनाथांनी शरदबाबूंच्या मृत्यूनंतर श्रद्धांजली वाहताना म्हटले आहे,

" प्रेमाच्या आसनावर ज्याचे स्थान अमर आहे, त्याला मृत्यूचे भय कसले?"

" मातृभूमीच्या धुळीमध्ये ज्याचे अवसान झाले, त्याला देशाच्या हृदयात मानाचे स्थान प्राप्त होते."

बंद खोलीतल्या धुळीकडे पाहून मला मातृभूमीच्या धुळीची आठवण झाली.

आम्ही खाली अंगणात आलो. शामने आणि वहिनींनी सुटकेचा निःश्वास टाकला. माझी निराशा झाली आहे, हे पुतण्याने ओळखले. तो म्हणाला,

" या घरात त्यांचं जवळ जवळ काहीच नाही. इथून जवळच, चारपाच लोकलची स्टेशनं सोडली की आमचं खेडं लागतं. तिथं मोठं तळं आहे. त्याच्या मागे दुमजली घर आहे. त्या घरात काकांच्या स्मृती जतन करून ठेवल्या आहेत. त्यांना बघितलेले आमचे दुसरे नातेवाईक तिथे आहेत — तुम्ही तिथे जा. मी चिठ्ठी देतो."

क्षणभर मन हलले. छोटेसे तळे...त्यात उमललेली कमळे. मासे मारणारे

इंद्रनाथ आणि श्रीकांत, मारामारी करणारे देवदास आणि पार्वती. खिडकीतून डोकावणारी शांत भावमधुर डोळ्यांची वडी दीदी—क्षणभर मोह झाला. जावे तिकडे.

पण खेड्यात जाऊन मातृभूमीची धूळ बघण्याची इच्छा उरली नव्हती. तिथे तरी काय, असेच असणार याची खात्री होती.

त्या रात्री कुठे गेलो नाही. माझा सगळा उत्साह वाळून गेला. दुसऱ्या दिवशी पुण्याकडे परत निघालो.

## ८

# अल्बम !

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

आमच्या नव्या बंगल्यात वरच्या खोलीत माळ्यावर आमच्या जुन्या घरातलं सगळं अडगळीचं सामान रचून ठेवलेलं आहे. तिथे आमच्या कुटुंबातलं इतर कुणी जात नाही. मुलाला नि सुनेला ते जुनं घरही माहीत नाही. तो दरिद्री संसार आठवण्याचं कारण नाही. माझ्या बायकोनं तो दोन खोल्यांतला जुन्या वाड्यातला संसार अनुभवला आहे. पण तिलाही ती जुनी अडगळ चिवडायला नको वाटतं. त्या अडगळीच्या गाठोड्यात जुन्या दारिद्र्याची आणि दु:खाची लक्तरं गोळा करून ठेवली आहेत असा भास तिला होतो... माझं मात्र तसं नाही. एखादे वेळी करमत नसलं किंवा विमनस्क वाटत असलं तर मी त्या जुन्यापान्या चिंध्यांचं गाठोडं सोडतो आणि उगाच बघत राहतो. मला तिथे भूतकाळाच्या अंधारात गडप झालेली अनेक माणसे दिसतात.

तिथे एक जुन्या फोटोंचं मोठं बाड आहे. अलीकडचा शब्द वापरायचा झाला तर 'अल्बम' म्हणावं. त्यापैकी एक फोटो माझ्या आजोबांचा नि मोठ्या आईचा आहे. माझ्या आजोबांना मी बघितलेले नाही. माझ्या जन्माच्या अगोदर पंचवीस-तीस वर्षांपूर्वी ते मरण पावले. त्या अर्थी तो फोटोही तेव्हाच केव्हा तरी काढलेला असावा. तो फोटो आता पिवळा झाला आहे, आणि त्यातील आजोबांचे नि थोरल्या आईचे चित्रही आता अस्पष्ट दिसत आहे. जुन्या बाडात गुंडाळून ठेवलेल्या त्या फोटोकडे बघत बसणे ही माझ्या मनाची एक सवय आहे.

त्या फोटोत आजोबांच्या मागेच थोरली आई उभी आहे. तिच्या नाकात नथ आणि कानात बुगड्या आहेत. टोपपदरी लुगड्याचा लफ्फेबाज पदर तिने स्वत:च्या डोक्यावरून घेतला आहे. आजोबांच्या मागे ती मोठ्या अदबीने आणि आटोपशीरपणे उभी आहे. त्या फोटोतील थोरली आई खरोखरच एखाद्या घरंदाज खानदानी सुंदर स्त्रीसारखी दिसते आहे.

मोठ्या आईचे तसे स्वरूप मात्र मी प्रत्यक्ष कधी बघितलेले नाही. माझ्या बालपणापासून ती म्हातारीच आहे. पांढरेशुभ्र पातळ, डोक्यावरचा चिंचोक्या-एवढा केसांचा अंबाडा आणि दोन्ही हातांतील तांब्याच्या बांगड्या अशा स्वरू-पात मी तिला पाहिले आहे. ती कधी सुरेख असेल, सौभाग्यवती असेल, आणि नाकात पाणीदार मोत्यांची नथ आणि कानात कर्णभूषणे घालीत असेल, याची कल्पनाच मी करू शकत नाही. पांढऱ्या पातळात वेढलेले तिचे एकच एक व्यक्तिमत्त्व मला माहीत आहे; परंतु ते स्वरूप अलीकडचे आहे हे माझ्या लक्षात येत नाही.

आजोबांना मी बघितलेले नाही; पण थोरल्या आईने बोलण्याच्या ओघात त्यांच्याबद्दल अनेक आठवणी सांगितल्या आहेत. परंपरेने चालत आलेल्या स्मृतीमुळेच पन्नास-साठ वर्षांपूर्वीचा जुना काळ आमच्या घरात श्वास नि नि:श्वास टाकीत आहे. फोटोतील आजोबांकडे, नि मोठ्या आईकडे बघितले, की तो काल स्मृतिरूपाने माझ्या मनात साकार उभा राहात आहे.

आजोबा त्या काळात पुण्यासच कमिशनरच्या कचेरीत कारकून होते. ते मॅट्रिक होते, पण एकदोन वर्षे डेक्कन कॉलेजात राहूनसुद्धा बी. ए. झाले नव्हते. त्यांचे इंग्रजी नि संस्कृत चांगले होते, पण गणित कच्चे होते म्हणे ! ते बी. ए. झाले नाहीत म्हणून त्यांना स्वत:ला किती दु:ख होत होते कुणास ठाऊक, पण थोरल्या आईला मात्र मनस्वी दु:ख होई. आजोबांच्या मृत्यूनंतर चाळीस वर्षांनीसुद्धा कधी जुन्या गोष्टी निघाल्या तर त्यांच्या बी. ए. नापास होण्याबद्दल तिचा गळा भरून येई, हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे.

ते बी. ए. नव्हते, पण तेव्हाच्या बहुतेक पदवीधरांप्रमाणे त्यांना लेखनवाचनाची मोठी हौस होती. सरकारी नोकरी असल्यामुळे अर्थातच टिळकांच्या राजकीय चळवळीशी जुळते असे लेखन करणे त्यांना शक्य नव्हते — इष्ट तर त्याहूनही नव्हते ! म्हणूनच मला वाटते ते त्या वेळच्या समाजसुधारकांच्या फडात शिरले

असावेत ! लेखनशक्ती असल्यामुळे त्या वेळी ते आगरकरांच्या ‘ सुधारका ’त इंग्रजी लेख लिहीत, आणि काही मानमान्यताही मिळवीत ! छापून आलेल्या मजकुराला त्या वेळी समाजात भलतीच किंमत होती, त्यामुळे लेखक म्हणून मिरविण्यास आजोबांना त्या काळात विशेषसे कष्ट पडले नसावेत.

‘ सुधारका ’त लेख लिहिणाऱ्या, संध्याकाळी संध्या न करणाऱ्या आणि कधीमधी ओवळ्याने जेवणाऱ्या आजोबांबद्दल थोरली आई कित्येक आठवणी मोठ्या मजेदार पद्धतीने सांगे आणि स्वतःच हसे !

पुण्यात राहणाऱ्या आजोबांनी तेव्हा पारशी फॅशनचा, बंद गळ्याचा कोट शिवला होता व तो घालून ते ऐटीने हिंडत होते. ही बातमी कुणी तरी हितशत्रूने सोलापूरला त्यांचे वडील होते, त्यांना कळविली, आणि मोठा भडका उडविला होता. सोलापुराहून तेव्हा तातडीने पत्र आले होते; त्यातील मजकूर ती कित्येक वेळा सांगे. ‘ इंग्रजी शिक्षणाने तुम्हास माज आला आहे, आणि प्रत्यक्ष स्वर्गाच्या तुळया डोक्यास लागल्याचा भास तुम्हाला होत आहे. ’ हे किंवा अशाच तऱ्हेचे वाक्य सांगून ती स्वतःच हसे, नि मग एकदम गंभीर होई.

दुसरीही एक अशीच आठवण आहे. ती अनेकांनी, अनेक प्रसंगी सांगितली आहे; पण अजून तिच्यातील गंमत कमी होत नाही. शिळ्या पुरणपोळीसारखी अजूनही ती चविष्टच वाटते.

त्या वेळी आजोबांच्या बहुतेक मित्रांचा अड्डा आनंदाश्रमात हरिभाऊंकडे असायचा, आणि एखाद्या रविवारी दुपारी पाव-बटर खाण्याचा कार्यक्रम व्हायचा. पाव नि बटर हे दोन्ही पदार्थ त्या वेळी कमालीचे निषिद्ध असल्यामुळे, हल्लीच्या भूमिगत चळवळीसारखी त्या कामात गुप्तता ठेवावी लागे. पावाला हरिभाऊंनी ‘ स्वामी ’ असे पारिभाषिक नाव दिले होते, आणि ‘ बटर ’ म्हणजे शिष्यमंडळी होती; दुपारी माझे आजोबा ठरल्याप्रमाणे प्रोफेसर पानशांना बोलवायला गेले, आणि पानशांचे वृद्ध चुलते, तिथे असल्यामुळे त्यांनी मोठ्यादा सांगितले, आनंदाश्रमात स्वामी आणि त्यांचा शिष्यपरिवार आला आहे. त्यांच्या दर्शनासाठी तुम्हास बोलाविले आहे.

स्वामी नि शिष्य म्हणजे कोण हे पानशांनी ताडले, पण त्यांच्या चुलत्यांनी ते ओळखले नाही. त्यांना ते खरेच वाटले, आणि आनंदाश्रमात स्वामीदर्शनाला नेण्याचा त्यांनी हट्ट धरला. त्यांची समजूत काढता काढता आजोबांना इतका

त्रास पडला की काही विचारू नका.

ही आठवण सांगून थोरली आई कित्येक वेळा हसली आहे. वडील नि मीही हसलो आहोत. प्रोफेसर पानशांना घेऊन पन्नास-साठ वर्षांपूर्वी आजोबा आनंदाश्रमात गेले असतील, त्याही वेळी त्या तरुण मंडळांत असाच हशा पिकला असेल !

अशा तऱ्हेने वृद्धांना फसविण्यात तरुण पिढीला नेहमीच आनंद वाटत असतो. प्रत्येक नवीन पिढी अशाच काही सुधारकी आचाराकरिता जुन्या पिढीला फसवीत असते. त्यात विशेष काही नाही. पण मौज वाटते ती ही की, या आठवणीने थोरल्या आईच्या वयातील एकदम बरीचशी वर्षे कमी होत, आणि वयाच्या साठ-पासष्टाव्या वर्षीदेखील ती ऐन पंचविशीतील तरुणी भासायला लागे, व तिच्या हास्याला तरुण स्त्रीच्या हास्याप्रमाणे झिलई आणि नाद प्राप्त होई ! कदाचित पन्नास-साठ वर्षांपूर्वी आनंदाश्रमात पाव-बटर खाल्ल्यानंतर संध्याकाळी आजोबा घरी परतले असतील, आणि ती गंमत सांगून मोटमोठ्यांदा हसले आणि थोरली आईही किंचित विनयाने तोंडाला पदर लावून, बाह्यतः नवऱ्याच्या पावबिस्कुट-भक्षणाबद्दल नाराजी दाखवून अशीच हसली असेल. ह्या तरुण जोडप्याच्या हास्याचा आवाज कदाचित काळपुरुषाने जपूनही ठेवला असेल ! त्या लपवून ठेवलेल्या हास्याचे पडसाद माझ्या म्हाताऱ्या जराजर्जर थोरल्या आईच्या हास्यात इतक्या वर्षांनीही उठत असतील !

माझे आजोबा जगले वाचले असते तर नोकरीमध्ये खूप चढले असते; पण तसे व्हायचे नव्हते. शहाण्णव सालचा प्लेग आला, आणि पहिलीच ‘ केस ’ माझ्या आजोबांची झाली, आणि चारपाच दिवसांतच मागे एक अपंग मुलगा, लग्नाला वाढलेली मुलगी आणि तरुण विधवा, ठेवून ते देवाच्या घरी चालते झाले.

त्या प्लेगच्या आठवणी थोरल्या आईच्या बोलण्यात निघत आणि वातावरण गंभीर करून सोडीत. प्लेगविषयी त्या भयंकर गोष्टी सांगताना तिचा गळा नेहमी दाटून येई, आणि हे ऐकणाऱ्याच्या मनाचाही थरकाप होई. पन्नास-पंचावन्न वर्षांपूर्वीचा तो प्रसंग मी तिच्या तोंडून अनेक वेळा ऐकला आहे, आणि अजूनही माझ्यापुढे तो एखाद्या भुतासारखा उभा आहे.

त्या वेळी आमचे बिऱ्हाड नारायण पेठेतील अर्काटकरांच्या वाड्यात होते नि

तो दसऱ्याचा दिवस होता. दुपारी चार वाजता आजोबा आनंदाश्रमातून पान-सुपारी घेऊन आले, आणि थोडा वेळ ओटीवरच्या तक्क्याला टेकून नुसतेच डोळे मिटून पडून राहिले.

मोठी आई तेव्हा साजशृंगार करून दसऱ्याच्या हळदीकुंकवासाठी बाहेर जाण्याच्या तयारीत होती.

तिच्याकडे बघून कापऱ्या आवाजात, पडल्या पडल्या ते म्हणाले, ' मला बरं वाटत नाही ! '

' का ? काय होतं आहे ? ' मोठ्या आईने विचारले.

जांघेकडे बोट दाखवून ते म्हणाले, ' केव्हापासून तरी इथे सारखे ठुसठुसत आहे ! सपाटून ताप भरेल असं वाटत आहे ! '

यावर मोठ्या आईने बाहेर जाण्याचा बेत रहित केला, व जवळ जाऊन ती म्हणाली, ' मी अंथरूण घालून देते ! थोडं पडावं, म्हणजे बरं वाटेल ! '

पण तिचे बोलणे जणू त्यांना कळतच नव्हते. ते तापाच्या नादात असल्या-मुळे कण्हत म्हणाले, ' जांघेत गाठ आल्यासारखी वाटते ! '

' गाठ आल्यासारखी वाटते ! ' हे तीनच शब्द. पण मोठ्या आईने ते ऐकले नि ती खालीच बसली. सारे जग तिच्यापुढे वेडीवाकडी तोंडे करून एकदम गरागरा फिरायला लागले.

लगेच जिकडे तिकडे अर्काटकरांच्या वाड्यात प्लेगची केस झाल्याची बातमी पसरली, आणि अर्धे पुणे रिकामे झाले.

नंतर मुले मोदी गणपतीच्या देवळात एक नातेवाईक होते, त्यांच्याकडे हलविली, आणि थोरली आई आजोबांजवळ राहिली ! त्यानंतर दोनच दिवसांनी अत्यंत हालअपेष्टा होऊन आजोबांचे देहावसान झाले.

मरणानंतरच्या हाहाकाराची नुसती आठवण देखील पुढे कित्येक वर्षे थोरल्या आईला बेचैन करीत होती. ते दिवस तसेच चमत्कारिक होते ! प्लेगची साथ जोरात सुरू होती, आणि गोऱ्या सोजिरांच्या जुलूमजबरदस्तीने तर ताळतंत्रच सोडलेला होता. माझे आजोबा इतके लोकप्रिय, पण प्रेत वाहून न्यायला माणसेही मिळेनात ! जो तो स्वतःच्या जिवाच्या फिकिरीत नि धास्तावलेला ! त्या वेळी दुसऱ्याच्या भानगडीत कोण पडणार ?

पण अशा वेळीच हरिभाऊंचे मित्रप्रेम नि धैर्य उपयोगाला पडले. त्यांनी चार

तेलंगी ब्राह्मण पाच पाच रुपये देऊन तयार केले, आणि प्रेत रातोरात हालवून त्याचे दहन करून टाकले.

नुसते प्रेत हलवूनही उपयोग नव्हता! घरातल्या विधवेलाही हलविणे जरूर होते. कारण दुसऱ्याच दिवशी गोऱ्या सोजिरांची धाड येणार हे निश्चित होते. मग हरिभाऊंनी थोरल्या आईला पतिनिधनानंतरच्या काही तासांतच तेथून हलविले, आणि आनंदाश्रमातील एका बाजूच्या खोलीत लपवून ठेवून दिले. त्या खोलीतच बंदिवासात तिला पुढे जवळजवळ आठपंधरा दिवस राहावे लागले.

इकडे अर्काटकरांच्या वाड्यात सोजिरांनी धुमाकूळ घालायचा तो घातलाच! घरातल्या देवांना, आणि लोणच्या-मुरंब्यांच्या बरण्यांनासुद्धा त्यांनी फिनेलने सचैल आंघोळी घातल्या, आणि राहिलीसाहिलेली वस्त्रे व चिरगुटे कापसाच्या ढिगाऱ्यात जाळून टाकली. त्यांनी थोरल्या आईचाही खूप शोध केला, पण तिचा शोध लागू शकला नाही. हरिभाऊंनी त्या घरात एक कुणबी माणूस मुद्दामच ठेवून दिला होता.

सोजिरांनी त्याला दरडावून विचारले, ‘ बाई कुठे आहे ? ’

कुणब्याने शिकविल्याप्रमाणे उत्तर दिले, ‘ रावसाहेबांना प्लेग झाला, आणि ते मरायच्या अगोदरच बाई मुलासकट घाबरून पळून गेली. ’

सोजिरांनी त्या माणसाला खूप छळले, पण त्याने आपले म्हणणे सोडले नाही. शेवटी कंटाळून त्या कुणब्यालाच त्यांनी पकडून नेले, आणि क्वारंटाइन-मध्ये आठ-दहा दिवस ठेवून दिले.

थोडी सामसूम झाल्यावर मग थोरली आई आनंदाश्रमातून बाहेर आली, आणि नवा मांड मांडायला लागली. बाहेर पडल्यानंतर तिचे पूर्वीचे स्वरूप पार पालटले. टोपपदरी इरकली लुगडे, नाकातील नथ, आणि कर्णभूषणे एकदम नाहीशी झाली, आणि पांढरेशुभ्र पातळ नि चोळी, असा पेहराव आला. पन्नास-पंचावन वर्षांपूर्वीचे ते दिवस! त्या वेळी पुण्यास सनातनी कर्मठपणाचा किती कडक अंमल असेल, याची कल्पनाच न केलेली बरी! अशा वातावरणात एका विधवेला दोन मुले घेऊन दिवस काढायचे होते! खरे सांगायचे म्हणजे त्या काळच्या विधवांप्रमाणे तिच्या अंगावर तांबडी वस्त्रे केव्हाच यायला पाहिजे होती. माझ्या नात्यातील दुसऱ्या एकदोन विधवा स्त्रिया केव्हाच तांबड्या

झाल्या होत्या, आणि त्यांच्या मागोमाग थोरल्या आईने जाणेही जरूर होते. पण काय असेल ते असो, तसे काही झालेच नाही. ती सकेशाच राहिली. हरिभाऊंसारख्या समाजसुधारकांचा पाठिंबा असल्यामुळे तिला तसा त्रासही झाला नाही.

या नव्या अवस्थेत अर्काटकरांच्या वाड्यातले बिऱ्हाड सुटले, आणि त्याच गल्लीतील अगदी समोरच्या वाड्यातील दोन खोल्यांत नवे बिऱ्हाड मांडले गेले. त्याच वाड्यात अजून आमचे बिऱ्हाड आहे. हा वाडा असा चांगला ऐसपैस, पेशवाई पद्धतीचा आहे. पुढचे दर्शनी दार हत्ती आत जाईल इतके उंच आहे; नि त्याच्या मधोमध एक दिंडीदरवाजा आहे. चारी बाजूला प्रशस्त सोपे, मधले चौकोनी अंगण, आणि मागच्या दारचे जुनेपुराणे पिंपळाचे झाड असे याचे स्वरूप आहे. त्या वाड्यात अशीच इतर मध्यम वर्गीय कारकुनी पेशाची बिऱ्हाडे होती, त्यांपैकी एकात मग थोरली आई दोन मुलांना घेऊन राहिली. वाड्याचे मालक तिकडे वऱ्हाडात मोठे अधिकारी होते, आणि त्यांना पगारही मोठा होता. मोठी आई नेहमी सांगे की, आम्ही वाड्यात यायचे ठरल्यानंतर, त्या भल्या गृहस्थाने वाड्याची व्यवस्था बघणाऱ्या आपल्या विधवा आईला पत्र लिहून कळविले होते, की परिस्थिती जाणून आमच्याकडून काही भाडे घेऊ नये. पण मोठ्या आईचा खानदानीपणा अजूनही गेला नव्हता. भाडे न घेण्याचा प्रस्ताव तिला मान्य झाला नाही, व शेवटी इतर बिऱ्हाडकरूंप्रमाणे मासिक आठ आणे भाडे घेण्यास तिने मालकांना भाग पाडले. याच खानदानीपणाची दुसरी एक आठवण ती नेहमी सांगे. पुण्यास वडिलांना नूतन मराठीत घातले, तेव्हा कोणी तरी सुचविले की, शाळेतील फी देण्यापेक्षा वडिलांनी नादारीसाठी अर्ज करावा. हरिभाऊंच्या ओळखीने त्यांना नादारी मिळविणे सहज शक्य होईल ! हे सुचविणाऱ्या माणसाची अर्थातच काही चूक नव्हती, पण नादारीची सूचना मोठ्या आईच्या मनाला मात्र कापत गेली. ती सांगे, की तिने ती रात्र रडून घालविली, आणि शेवटी मुलाला नादार न करण्याचा निश्चय केला. माझी खात्री आहे की, आजोबांच्या प्रत्यक्ष मृत्यूपेक्षाही वडिलांच्या नादारीचे दु:ख तिला अधिक झाले असते !

नंतरचे तिचे दिवस एक प्रकारच्या संथपणात गेले. पैसा फारसा गाठीला नव्हताच ! आजोबांनी मरताना दोन हजारांचा विमा ठेवला होता, काही

दागिने होते, आणि विधवेला मिळणारे मासिक दहा रुपयांचे पेन्शन होते. त्या पैशात तीन माणसांचा प्रपंच कसाबसा चालू शकत होता.

मागे मी सांगितलेच आहे की, मोठ्या आईला लग्नाला आलेली मुलगी होती. त्या वेळी तिचे अकरावे वर्ष सरून गेले होते, पण लग्नाचे कुठे जमत नव्हते. तिच्या लग्नाबद्दलच्या विचारांनी मोठ्या आईचा जीव कसा कानकोंडा होत असे, याचे ती कधीकधी सुंदर वर्णन करीत असे. मुलगी मोठी दिसू नये, शारीरिक दृष्टीने वयात येऊ नये म्हणून तिने तिचे मीठ तोडले होते, आणि वरसंशोधनाची जारीने खटपट चालविली होती. शेवटी खूपशा प्रयत्नाने नागपूरकडचे एक स्थळ मिळाले, आणि मुलगी उजविली गेली. त्या स्थळाबद्दल मोठ्या आईला अनेक कारणांमुळे नाराजी होती. आधी मुलगा नागपूरकडचा होता, म्हणजे लांबचाच होता ! त्या वेळी मुलगी कोल्हापूरला किंवा सांगली-मिरजेला द्यायला पुण्यातली माणसे डरत नसत; पण नागपूर, उमरावती ही मात्र परदेशासारखी वाटत ! तिकडे मुलगी देणे हे आपद्धर्म पालन करण्यासारखे होते. शिवाय नवरामुलगा कारखान्यात काम करून शिकून इंजिनिअर झाला होता ! तो पैसा खूप मिळवीत असे, पण त्याचे संस्कार सारे कामगारवर्गाचे होते. ते कधीकधी खूप मोठी दाढी राखीत, आणि डोक्यावर मुसलमान पद्धतीची टोपी घालून रस्त्याने सिगरेट पीत हिंडत ! इतक्या जुन्या काळातही ते घरी पायजमा किंवा मद्रासी पद्धतीचे धोतर नेशीत, आणि देवधर्माची व सोवळ्याओवळ्याची मनस्वी टिंगल करीत ! जगात देव नाही, असे ते अट्टाहासाने प्रतिपादन करीत, आणि घरात कोणतेही आणि कसलेही धर्मकृत्य होऊ देत नसत ! आज इतकी वर्षे झाली, पण त्या गृहस्थांच्या विक्षिप्तपणाच्या आणि नास्तिक धर्मलंडपणाच्या गोष्टी आमच्या घरात निघाल्या की, गप्पांना नि आठवणींना महापूर येतो. खरेच सांगतो, या गृहस्थाइतका खराखरा प्रामाणिक नास्तिक मी आजतागायत बघितला नाही. सुखकाळात देवाची टिंगल नि थट्टा करणारे खूप असतात, पण तीच माणसे दु:खाचे काळे ढग जमले की नवस बोलायला, आणि शनीला तेल घालायला लागतात ! परंतु या गृहस्थांनी प्रत्यक्ष मृत्यू समोर दिसत असतानादेखील कधी देवाची आठवण केली नाही, हे विशेष होय ! चाळीस-पंचेचाळीस वर्षांपूर्वीचे त्यांचे वागणे पुण्याच्या विशिष्ट संस्कृतीत वाढलेल्या लोकांना किती विचित्र वाटत असेल याची कल्पनाच केलेली बरी !

पण लग्नाबद्दल थोडीफार नाराजी असली तरी लग्न लागले होते, आणि मोठ्या आईच्या कपाळीची चिंता दूर झाली होती. माझे वडीलही एका पायाने अधू असले तरी शाळेत जाऊन मॅट्रिक झाले होते, आणि त्यांना नोकरी लागून त्यांचे लग्नही झाले होते. त्या मायलेकरांचा संसार कसाबसा चाललाच होता, पण वेळेचे काय करायचे हा प्रश्न होता. वेळ कारणी लावण्याची जरुरी होती.

मी असे पाहिले आहे की, जुन्या काळच्या विधवा स्त्रियांचा वेळ दोन-तीन प्रकारांनी जाई. ज्यांच्या घरी माणसे फार त्यांचे सारे आयुष्य चुलखंडातच गाडले जाई! घरातील बाळंतपणांच्या आणि लग्नकार्याच्या खस्ता खाण्यात त्या दुर्दैवी स्त्रिया केव्हाच संपून जात. आमच्या घरात त्या वेळी माणसांचे जंजाळ नव्हते, त्यामुळे या तऱ्हेच्या त्रासातून थोरली आई सुटली होती. दुसऱ्या प्रकारच्या विधवा देव-देवतार्चन आणि व्रते करून व शरीर कष्टवून पुण्य मिळविणाऱ्या मानीव सुखात वेळ घालवीत! परंतु थोरल्या आईला असल्या धर्मकृत्यात रस वाटत नसे. उपवास धरायचे, पण आजोबांच्या मृत्यूनंतर दररोज मुळी ती एकभुक्तच असे; त्यामुळे निराळे काही करण्याचा प्रश्नच नव्हता. परंतु या एकभुक्त राहण्याचे कारण पारमार्थिक नसून दुसरेच होते! आपल्या मराठी भाषेत काही काही विशिष्ट शब्द आहेत; एखाद्या स्त्रीला वैधव्य प्राप्त झाले, आणि पुढे काही दिवसांनी जर तिचे शरीर सुटले, ती लठ्ठ झाली तर जुन्या काळी तिला 'रांडमांस' आले असे म्हणत! थोरली आई नेहमी सांगायची, आजोबांच्या मृत्यूनंतर लठ्ठ होण्याची म्हणजेच रांडमांस येण्याची तिला मनस्वी भीती वाटे. तसे होऊ नये म्हणून ती एकभुक्त तर राहिलीच; पण दररोज पायली-पायलीचे दळण दळण्यासही तिने सुरुवात केली. या तिच्या तपश्चर्येचे फल तिला मिळाले हे मात्र खरे!

आयुष्य घालविण्याचा जास्त सुसंस्कृत मार्ग म्हणजे वाचन करण्याचा किंवा सामाजिक कार्यात स्वतःला गुंतवून घेण्याचा. सुदैवाने हे दोन्ही मार्ग तिला मोकळे होते, आणि त्यांचा उपयोगही तिने यथाशक्ति करून घेतला. हरिभाऊंचे आमच्या कुटुंबाशी साहचर्य हेच मुळी वाचन-मननाच्या दृष्टीने सौभाग्य होते, आणि हरिभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाची प्रभा आमच्या कुटुंबावर न पडणे हे अस्वाभाविक नव्हे, तर जवळजवळ अशक्य होते. हरिभाऊ तेव्हा लेखनाच्या ऐन भरात होते, आणि 'करमणूक' पत्रातून त्यांच्या अनेकविध लोकप्रिय कादंबऱ्यांची प्रकरणे सारखी सुरू असत. थोरल्या आईचे व माझ्या वडिलांचे आनंदाश्रमात नेहमी

जाणेयेणे असे आणि हरिभाऊंच्या परिसरातील सारी मंडळी त्यांना उत्तम तऱ्हेने परिचित होती. निरनिराळ्या कादंबऱ्यांतील पात्रांविषयीचे प्रेम हे आमच्या घराण्यात परंपरेने चालत आले आहे, असे म्हटल्यास चूक होणार नाही. शंकरमामंजी, यमू, प्रोफेसर डॅडी, सोन्याबापू, श्रीधरपंत ही आमच्या दृष्टीने अशरीरिणी पात्रे राहिली नसून आसपास वावरणारी खरीखरी माणसे आहेत, असे म्हणण्यात बिलकूल अतिशयोक्ती होणार नाही. त्या कित्येक पात्रांचा तोंडवळा पुण्यातील खऱ्या व्यक्तींच्यावरून घेतला होता असे म्हणतात ! त्या व्यक्ती कोण हे थोरल्या आईने कित्येक वेळा आम्हास सांगितले होते. शंकरमामंजी म्हणजे कोण ? त्या वेळी सेवासदनात हुजूरपागेत शिकायला जाणाऱ्या स्त्रियांची टिंगल कशी चाले, बुधवारातील गंध्याच्या दुकानात गप्पाष्टकांचे अड्डे कसे पडत, इत्यादी गोष्टी ती सांगायला लागली, की तिच्या रसवंतीला धार येई, व वेळकाळाचे भान नाहीसे होऊन जाई.

वाचनाप्रमाणेच समाजसेवेचेही तिला वेड होते; आणि सेवासदनामधील रमाबाईबद्दल आणि हिंगण्याच्या अण्णा, पार्वतीबाई व बायाबद्दल ती नेहमी सांगे. त्यांच्याबरोबर अनेक कामे केल्याचेही ती उल्लेख करी. तिच्या या कार्याबद्दल मात्र मला नेहमी एक प्रकारची घृणाच वाटे, नि ती बोलायला लागली की, मी गंभीर होऊन जाई ! इतर कोणाचे काय मत असेल ते असो; पण मला मात्र असे वाटते, की गोरगरिबांनी आणि बायाबापड्यांनी समाजसेवेच्या फंदात पडून स्वतःचे आयुष्य दुःखी करून घेऊ नये ! अशा लोकांचे नाव कोठे होत नाही, त्यांना कोणी विचारीत नाही, आणि त्या करीत असलेले काम अगदी जुजबी पद्धतीचे आणि कमी महत्त्वाचे असल्यामुळे, समाजाची सेवाही त्यात विशेष होत नाही. थोरली आई सेवासदनतर्फे मंडईत जाऊन आठवड्यातून एकदा ससून हॉस्पिटलमधील रोग्यांना फळफळावळ देई, आणि हिंगण्याच्या महिलाश्रमात पाणी भरण्यापासून तो लहान मुलींच्या डोक्यातील उवा काढण्यापर्यंत काम करी; परंतु त्या कामाचे मोल काय होते हा प्रश्नच आहे. राजकीय पक्षात काय किंवा सामाजिक कार्यात काय, असल्या तऱ्हेची गरीब, भोळी आणि नादी लागलेली माणसे, निष्कारण खलास होतात, असे मला वाटते. थोरल्या आईच्याबद्दलही असेच झाले. तिला कोणीही विचारले नाही, परंतु सेवा करण्याच्या तिच्या या व्यसनाचा, शेजाऱ्यापाजाऱ्यांनी व नातेवाइकांनी मिस्किलपणाने खूप फायदा

घेतला, आणि मनातून तिला कधीही किंमत दिली नाही.

साधूपणाच्या या व्यसनामुळे तिचे किती अकल्याण झाले, हे तिचे तिलाच माहीत! पुण्याच्या मध्यवस्तीत आमचे बिऱ्हाड होते, तेव्हा लग्नसराईत लांब-लांबचे नातेवाईक आमच्याकडे महिना महिना मुलींना घेऊन राहात, आणि वरसंशोधन करीत! त्या नातेवाइकांची मुले मॅट्रिक झाली, की ऐपत असून कॉलेजच्या वसतिगृहात न राहता आमच्याकडे राहात, आणि त्यांचे जेवणाखाणा-पासून आजारीपणापर्यंत सर्व सोपस्कार मोठ्या आईलाच करावे लागत. गमतीची गोष्ट ही की, सारी खेकटी काहीही फायदा किंवा मोबदला न घेता, ती अंगावर घेई, व निस्तारता निस्तारता बेजार होऊन जाई. वारकरी ठेवण्याची मोठ्या आईची काय, किंवा वडिलांची काय मुळीच ऐपत नव्हती. परंतु कोणी तरी गरीब विद्यार्थी कोठून तरी येई आणि वार मिळवून जाई! असे आठवड्याचे चार चार, पाच पाच वार कित्येक वेळा दिले जात, आणि त्यांचे करता करता मोठ्या आईचे कंबरडे मोडून जाई. मला असे आठवते आहे, की मोठमोठे मातबर वकील नि डॉक्टर लोक स्वतःकडे काही ना काही सबबी सांगून कधीही वार देत नसत! परंतु आईच्या परोपकाराची स्तुती करून कित्येक वार तिच्या गळ्यात टाकीत असत! त्या वारकऱ्यांमुळे, पै-पाहुण्यांमुळे वडिलांच्या कारकुनी अर्थ-प्राप्तीवर भलताच ताण पडे, आणि संसाराचे गाडे नेहमी कर्जात नि उधारीत जाई; परंतु त्याचे मोठ्या आईला काही वाटत नसे.

याच कारणामुळे पुढेपुढे माझ्या आईचे व मोठ्या आईचे पटेनासे झाले, व घरात कटकटी सुरू झाल्या. माझी आई अगदी गरिबाची मुलगी होती, आणि व्यक्तिमत्त्वाच्या दृष्टीने अगदीच आकारहीन होती; परंतु तिलाही पुढेपुढे या चांगुलपणाचा संताप यायला लागला, आणि सासवासुनांची भांडणे झडायला लागली. त्या खडाजंगीमुळे घरात दररोज रडारड होई, आणि वडिलांचा जीव बेजार होई. एके दिवशी वडील कचेरीतून आले तेव्हा त्या दोघींची खूप घनचक्कर चालली होती. आई मोठ्यांदा बोलत होती, आणि मोठी आई रडत होती.

आई म्हणत होती, 'इतकी माणसं तुम्ही जमविता, नि नाहक खर्च करिता! आता उधाऱ्या तुंबल्या त्या कोण फेडील?'

मोठी आई तावातावाने म्हणाली, 'मी माणसे जमविते! तू...तूच का हे बोलत आहेस? तुला लाज वाटायला पाहिजे!'

'माझी लाज काढू नका! मागच्या बाळंतपणात आळीवाचे चांगले पातेले भरून लाडू केले होते! पण त्यातील बाळंतिणीच्या पोटात निम्मे तरी गेले का? जी बाई घरात, नुमती बसायला येईल, त्या प्रत्येकीला तुम्ही आपले लाडू देऊन टाकलेत! अशाने उधाऱ्या नाही होणार तर काय होईल?'

त्यावर मोठ्या आईने ताडताड मुस्कटात मारून घेतल्या, नि म्हटले, 'मीच मूर्ख आहे! पापी आहे! खरं गऽ खरं! तूच मला शिकवायला हवी होतीस!' असे म्हणून तिने दांडीवरचे लुगडे घेतले, व ती तरातरा निघून गेली.

वडील ऑफिसातून दमून आले होते, आणि ते त्या दोघींच्या भांडणाकडे दिङ्मूढ होऊन बघत होते. वाड्यातल्या इतर बिऱ्हाडातल्या बायका देखील खिडक्यांतून उभ्या राहून तो सारा 'सीन' बघत होत्या, आणि मनातल्या मनात फिदीफिदी हसत होत्या.

मोठी आई गेली, आणि माझ्या आईच्या तोंडचा पट्टा एकदम खाली आला. ती एकदम स्तब्ध झाली, आणि मुमूसुमू रडायला लागली.

माझे वडील शांत प्रकृतीचे आहेत! कोणत्याही कठीण प्रसंगी धीर न सोडण्याची, तोल न जाऊ देण्याची त्यांची साधना आहे. ते मग शांतपणे तिथेच बसले, आणि कोट काढीत आईला म्हणाले, 'संध्याकाळची वेळ आहे, असं रडू नकोस.'

त्यांच्या बोलण्याने का कुणास ठाऊक, पण ह्या कातरवेळी एकदम शांतता पसरली.

नंतर दहापंधरा मिनिटे तशीच जाऊ देऊन ते पुढे म्हणाले, 'तुमची भांडणे बघितली की मला भीती वाटते. भांडणे व्हायला लागली, की खुशाल समजावे, घरातील कुणी तरी लवकरच मरणार आहे.'

त्यानंतर दोनतीन दिवस थोरल्या आईचा खूप शोध केला, पण ती सापडली नाही. नंतर एके दिवशी तिचे औदुंबरहून पत्र आले! उरलेले सारे आयुष्य तिथेच सेवेकरी होऊन राहण्याचे तिचे ठरले होते.

हे पत्र मिळताच वडिलांनी त्यांच्या एका मित्राला व मला औदुंबरला पाठविले व आम्ही थोरल्या आईला घेऊन आलो. औदुंबरला मी एकच दिवस होतो, पण तिथल्या दृश्याची भयाणता माझ्या मनावर कोरली गेली आहे. दुपारची वेळ होती, आणि ऊन भलतेच तापले होते. आम्ही गेलो तेव्हा थोरल्या आईने

माधुकरी मागून आणून ती त्या धर्मशाळेत बसून भाताची ढेकळे मोडीत होती, आणि आसपास कळकट माधुकऱ्यांची पोरे व गलिच्छ लूत भरलेली कुत्री होती. आम्हाला बघताच तिने एकदम गळा काढला, त्याचा आवाज इतक्या वर्षांनंतर अजूनही मी विसरलो नाही.

ती परत आली, आणि घरातली भांडणे जणू एकदम संपली. मोठ्या आईने पैशाअडक्याचे व्यवहार बघणे सोडून दिले, व ती कथाकीर्तनांच्या नादी लागली! पण तिला विरक्तीचे हे सुख घेऊ देण्याचे काळाच्या मनात नव्हतेच. तिला अगदी पक्की अद्दल घडविण्याचा त्याचा विचार असावा! कारण थोडेच दिवस असे शांततेत गेले नाहीत तोच, माझ्या आईला ताप यायला, नि अशक्तपणा वाटायला लागला. हळूहळू मग तिचे सारे शरीरच पिवळे पडत गेले. अनेक औषधे आणि डॉक्टर झाले, पण रोगाचा पारा खाली येईचना! आई खचतच चालली.

आईच्या मृत्यूचा तो प्रसंग मला अजूनही आठवतो. ती मध्यरात्रीची वेळ होती, आणि बाहेर श्रावणातील पावसाने तुफान मांडले होते. आम्ही सारी मुले खाली सोप्यावर निजलो होतो, इतक्यात थोरल्या आईने मला हलवून उठवले, आणि हलक्या आवाजात म्हटलं, ‘ वर चला.’

त्या तिच्या आवाजातील गांभीर्य इतके होते, की काहीही न बोलता आम्ही वर गेलो, तर आतल्या खोलीत माझी आई शेवटचे आचके देत होती.

आम्ही तिथे गेल्यावर नुसतीच उभी राहिलो तो थोरली आई म्हणाली, ‘ तुमच्या आईला नमस्कार करा! ती देवाच्याकडे चालली आहे.’

मग आम्ही यांत्रिकपणाने नमस्कार केला, आणि खाली येऊन सोप्यावरच्या रकट्यावर नुसतीच बसून राहिलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी समाचाराला आलेली माणसे, परत घरी निघाली; त्यांत माझी मावशीही होती. ती घरी जाताना म्हणाली, ‘ जाते हो! तुमच्यावर मोठा प्रसंग पडला आहे, पण इलाज नाही.’

त्या वेळी मोठी आई आमच्या शेजारीच सोप्यावर बसली होती. ती म्हणाली, ‘ तुम्ही जाल हो! इथून घरी गेलात की तुम्ही सुटलात! पण मी मात्र आता अडकले. मला आता पुन्हा पहिल्यापासून संसाराला सुरुवात करावी लागणार.’ आणि असे बोलून ती ढसाढसा रडायला लागली.

आणि तिचे म्हणणे खरेच ठरले. सारा संसार वयाच्या साठाव्या वर्षी तिच्या अंगावर पडला, आणि ती एखाद्या नव्या नवरीप्रमाणे भाकऱ्या बडवायला लागली, व केरवारे करून मुलांना शाळेत पाठवायला लागली. धुणे धुवायला नि भांडी घासायला मोलकरीण लवकर आली नाही, तर काळजीने चूर व्हायला लागली.

त्या वेळी आम्ही भावंडांनी तिला किती त्रास दिला याची गणतीच नाही. सकाळ झाल्यापासून अंथरुणे गुंडाळण्याची पाळी कुणाची, नि नळावरून बादल्या भरून कुणी आणायच्या याबद्दल आमच्या मारामाऱ्या नि वादंग चालत, आणि मग थोरली आईच कंटाळून तरातरा नळावर जाई आणि थरथरत्या हाताने व लटपटत्या पायाने पाणी भरून टाकी. दुपारी जेवणे झाली, की मधल्या वेळचे खाण्याचे वाटे काढून ठेवून ती दुपारी आडवी होई, किंवा पुराणाला जाई. पण इकडे आमच्यापैकी जो पहिला शाळेतून येई, तो स्वतःच्या वाट्या· बरोबरच इतरांच्या वाटयातले सारे तूप नि बटाट्याची भाजी मटकावून टाकी, आणि मग घरात कुरुक्षेत्र निर्माण होई. मी तर त्या वेळी कमालच करायचा. शाळेतून मी आलो, आणि घरात कोणी नसले, की मी सरळ दुभत्याचे कपाट उघडून चांगल्या शेर दीड शेर दुधावरील साय न बोलता फस्त करून टाकी, आणि खेळायला निघून जाई. संध्याकाळी थोरली आई पुराणाहून परत आली की साय गेल्याचे तिला कळे व ती कपाळाला हात लावून स्वस्थ बसे! अशा मुलांना तिने कसे वाढविले कुणास ठाऊक!

अशीच आठदहा वर्षे कशी तरी रेटली; आणि मग गाडे अगदीच थकले. काही वर्षे मग स्वयंपाकीण व मोलकरीण ठेवून तिने कारभार चालविला! पण त्या कारभारातील भोंगळपणा उघड उघड दिसे. एक तर तिला शरीराच्या दृष्टीने काही होत नसे, आणि दुसरे असे की जगात दुसरे कोणी तिला वाईट दिसतच नसे. तिच्या दृष्टीने सगळी माणसे साधू होती, आणि अजूनही धर्मराजाच्या वेळचा काळ चालू होता. स्वयंपाकीणबाई चोरून गुळाचे व हिंगाचे खडे नेऊ शकेल, किंवा दिलेल्या दळणातून काही भाग मोलकरीण स्वतःच्या घरी नेऊ शकेल, यावर तिचा विश्वासच बसायचा नाही. त्यामुळे नोकरमाणसे वागवून घेणे तिला जमलेच नाही. शिवाय चांगुलपणाचे नि साधुपणाचे तिचे वेड होतेच! अजूनही वारकरी, पाहुणेमंडळी आणि 'संकटग्रस्त'

माणसे यांची वर्दळ सुरूच असे. या साऱ्या गोष्टींमुळे कुटुंबाच्या अर्थशक्तीवर ताण पडत होता आणि उधारी वाढत होती; पण त्याबद्दल कोणालाच काही वाटत नसे.

अशाच अवस्थेत मी बी. ए. झालो. मराठी विषय घेऊन तिसऱ्या वर्गापुरते जेमतेम मार्क मिळवून मी ती निरर्थक उपाधी प्राप्त करून घेतली. तो दिवस मला आठवतो आणि हसू लोटते. बी. ए. चा निकाल मी पाहिला, आणि लगेच तो माझ्याकडून विसरला गेला. निकाल पाहून मी कुठे तरी गप्पा छाटायला गेलो, आणि बऱ्याच रात्री परत आलो.

पण तोपर्यंत माझ्या अपूर्व यशाची बातमी थोरल्या आईला कुणी तरी दिली होती, आणि तिला मनस्वी आनंद झाला होता. माझे आजोबा बी. ए. नव्हते म्हणून ती दुःख करीत असे. आज चाळीस वर्षांनी मी तिचे ते दुःख जगू संपविले होते. मी आल्यानंतर तिने देवापाशी निरंजन लावून, माझ्या भाळी कुंकुमतिलक लावला होता! त्या सगळ्या कौतुकांची मला एका बाजूने शरम वाटत होती, आणि दुसरीकडून हसू येत होते. मी ज्या काळात बी. ए. झालो त्या काळात पदवीची किंमत शून्याचेही खाली गेली होती. पण थोरल्या आईचे मन अजूनही पन्नास वर्षांपूर्वीच्या जुन्या काळात वावरत होते. त्या काळात म्हणे बी. ए. माणसाची मिरवणूक निघे, आणि त्याला पाहायला सारे गाव लोटे! माझ्या थर्ड क्लास बी. ए. ची किंमत तिच्या दृष्टीने तरी त्या काळातली होती. हे आठवले की कसेसेच वाटते.

हळूहळू मग अशीच वर्षे गेली, आणि पुराणाहून येताना एका संध्याकाळी थोरली आई रस्त्यातच पडली आणि तिचे माकडहाड मोडले. तिला आम्ही उचलून घरी आणले, आणि स्वयंपाकघरातील बाजेवर ठेवून दिले. त्यानंतर ती कधी चाललीच नाही. सारखी अंथरुणातच पडून असे. शरीराचे सारे विधी अंथरुणातच होत. सारा जन्म इतक्या स्वच्छतेत नि शुचितेत काढलेली ती बाई दिवसभर मग विकलांग अवस्थेत गुवामुतात लोळायला लागली. शेवटी तर तिचे मनस्वी हाल झाले. माझी बायको माहेरी गेलेली, आणि घरात दुसरे कोणीही माणूस नाही. संध्याकाळी मी कचेरीतून आलो, की तिचे सारे अंग देहविधीने लडबडलेले–घाणेरडे असे. मी मग शांतपणे कपडे काढी, आणि एखाद्या लहान मुलाला धुऊन काढावे, तसे त्या सत्तर वर्षांच्या म्हातारीला

धुऊन काढी. पण ती स्वच्छता किती टिकणार ? पुन्हा सारे विधी सुरू होतच.

वैधव्यात, दारिद्र्यात तिने कोणाजवळ कधीही लाचारी दाखविली नव्हती, तशी ती ताठ होती. पण शेवटच्या त्या आजारात ती अगदी एकमेला आली. अंग लडबडले असले, की कुणाच्या तरी नावाने ओरडून काकुळती करावी लागे. प्रत्येक सफाईकरिता ती तिच्या दहा रुपये पेन्शनची देणगी जाहीर करी. तिला भूकही त्या दिवसांत मनस्वी लागे. नवऱ्यानंतर अंगावर रांडमांस येईल, या भीतीने जवळ जवळ तीस-पस्तीस वर्षे अगदी एकभुक्त राहिलेली ती बाई मग तिन्ही-त्रिकाळ खायला लागली. भजी, शेव, भेळ इत्यादी पदार्थांचे वासही दुरून ओळखून ते ते मागायला लागली, आणि ते दिले नाही तर अद्वातद्वा शिव्या द्यायला लागली.

सांगायला काही हरकत नाही, की त्या दिवसांत माझ्या मनात भयंकर विचार धुमाकूळ घालीत. नरदेह इतका घाणेरडा, इतका गलिच्छ असेल, शरीराला इतके नाना तऱ्हेचे विलक्षण दर्प येत असतील हे मला त्या दिवसांत प्रथम कळले. वृद्धावस्था इतकी भयंकर असते हे मला त्या दिवसांत प्रथम कळले. आणि वाटले, की जीवनात कोणताही शाप परमेश्वराने द्यावा, पण वृद्धावस्था देऊ नये. स्वयंपाकघरातील बाजेवर गुवामुतात लोळणाऱ्या, भजी नि शेव खाणाऱ्या, आणि वाटेल ते बोलणाऱ्या त्या जीवाकडे बघितले, की वाटे हिला लवकर मृत्यू आला तर किती बरे होईल ? मृत्यू भीषण नि दुःसह खरा, पण हिची सध्याची अवस्था यापेक्षाही भीषण नव्हे का ?

परंतु मृत्यू असा खट नि मिस्किल आहे, की जिथे पाहिजे तिथे तो कधीही येत नाही, आणि नको आहे तिथे हटकून जातो. थोरल्या आईच्या मृत्यूकरिता आम्ही सारे ताटकळत बसलो होतो – एखाद्या गाडीची स्टेशनवर उभे राहून वाट पाहावी, तशी त्याची सारखी प्रतीक्षा करीत होतो–पण तो येतच नव्हता ! त्याची गाडी भलतीच लेट झाली होती.

पण अखेर तो आलाच. उशिरा आला, पण त्याला यावेच लागले, आणि प्राण हरण करताना देखील त्याने शैथिल्याची कमाल केली. तिचे अवयव गार पडले होते, आणि रक्त साकळत होते, पण छातीचा भाता, दीडदोन दिवस हालतच होता. शेवटी तोही थांबला व साराच खेळ संपला. तिचे दहन करून आलो तेव्हा चुटपूट लागली, पण एका दृष्टीने बरेच वाटले. एखाद्या

पाहुण्याला गाडीवर पोचवून घरी यावे व त्याच्याविषयी गप्पा माराव्या तसे झाले. नंतर दोनतीन दिवस आम्ही सारे तिच्याविषयीच गप्पा मारीत होतो नि जुना पन्नास वर्षांचा काल आठवीत होतो. शहाण्णव सालचा प्लेग नि हरिभाऊ, थोरल्या आईचे चांगुलपणाचे वेड आणि माझ्या आईशी झालेली भांडणे, वृद्धावस्थेतल्या यमयातना इत्यादी विषयांवर सारखे बोलतच होतो. थोरल्या आईच्या मृत्यूमुळे आमच्या कुटुंबातील फार मोठ्या काळावर पडदा पडला होता. तिच्याबरोबर त्या जुन्या काळाचे दहन झाले होते.

पण त्या जुन्या काळातील अनेकविध स्मृतींची पाखरे माझ्या मनात अजूनही फडफडतातच ! स्मृतींची गंमत काही निराळीच आहे. त्या क्षणात सजीव होतात आणि क्षणात निर्जीव होतात. रंगीबेरंगी फुलपाखरांप्रमाणे किंवा चमकणाऱ्या तारकांप्रमाणे आमच्या त्या जुन्या बिऱ्हाडात थोरल्या आईच्या स्मृती चमकत आहेत. त्यांतल्या किती म्हणून धरून ठेवू! कितींना जीवन देऊ ?

आमचा तो जुना वाडा आता जमीनदोस्त झाला आहे. तिथे सीमेंट काँक्रिटचे ओनरशिप ब्लॉक्स उठले आहेत. मोठ्या आईच्या किंवा आजोबांच्या स्मृतीला तेथे जागा नाही.

ही अडगळ काढून टाकावी असा ' बूट ' अनेक वेळा घरात निघतो. मी त्याला विरोध करतो.

अडगळ काढून टाकली तर अल्बमही जाईल. मग जुन्या आठवणींनी राह्यचं तरी कुठे ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६६०
क्र. २३६८३
निबंध वाङ्मय
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## ९

# माझे पहिले पुस्तक !

लेखक व्हायचं माझं स्वप्न अगदी लहानपणापासूनचं आहे. आमच्या घराच्या मागच्या बाजूला केसरी कार्यालय होते. त्यामुळे बऱ्याच वेळा सकाळी श्री. तात्यासाहेब केळकर आमच्या रस्त्याने कार्यालयाकडे जाताना दिसत. ऐटबाज लाल पगडी, जांभळटसर रंगाचा लांब कोट, पायातले पुणेरी जोडे, आणि दोन्ही खांद्यांवरून खाली रुळणारे उपरणे असा त्यांचा पोशाख असे...ते रस्त्याने जात तेव्हा आळीतले कित्येक लोक खिडकीतून त्यांच्याकडे नुसते बघत राहात. अशाच एका प्रसंगी मी त्यांना पाहिले व केसरीचा संपादक होण्याचे स्वप्न मनात रुजले. केसरीवर, लोकमान्य टिळकांच्या चित्राखाली आणि " नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते वने ।" या श्लोकाच्या बाजूला संपादक 'श्री. ज. जोशी ' ही अक्षरे छापलेली मी स्वप्नात कितीतरी वेळा बघितली आहेत.

सिनेनट किंवा क्रिकेट प्लेअर होण्याची स्वप्ने पडण्याच्या वयात संपादक होण्याच्या कल्पनेने मी झपाटलो होतो. हे आश्चर्य आहे....पुढे वय वाढल्यावर स्वप्ने बदलली. स. प. कॉलेजमध्ये मराठीचा प्राध्यापक व्हायचे आणि प्रेमविवाह करायचा अशा दोन आकांक्षा निर्माण झाल्या. मनातली संपादकीय खुर्ची सुटली पण लेखक होण्याची इच्छा कधीही सुटली नाही. किर्लोस्करच्या पहिल्या पानावर रंगीबेरंगी अक्षरात आपली कथा छापली जावी असे कॉलेजात असताना

फार वाटायचे. त्या दिवसांत प्रा. फडके यांचा पोलो कॉलरचा शर्ट घातलेला आणि टेबलासमोर लिहिण्याच्या आविर्भावात असलेला फोटो किर्लोस्करमध्ये नेहमी यायचा...माझे त्या वेळी एक अक्षरही छापून आले नव्हते. तरीही त्या पोझमध्ये मी छवी काढून घेतली होती, हे आठवते. पुढे बऱ्याच वर्षांनी अरविंद गोखले यांचा तसा फोटो किर्लोस्करमध्ये आलेला मी पाहिला. गोखले यांना मी नूतन मराठीत हाफ चड्डीत बघितले होते. त्या माणसानं किर्लोस्करमध्ये फोटो आणवावा आणि आपल्याला 'प्रसाद' किंवा अंविके यांच्या 'महा-राष्ट्र' मध्येही आणणे जमू नये याची मला खंत वाटली होती...लेखक म्हणून माझ्या नावाला आजही फारशी ग्लेज नाही. नवसाहित्यातले ते पहिले महान प्रतिष्ठेचे (खरे म्हणजे नशिबाचे!) चार लोक तर सोडूनच द्या पण मला पाचवीच काय, दहावी किंवा बारावी खुर्ची देखील कुणी तिथे देत नाही. पण तरीही माझी लेखनातली 'चव' लहानपणाइतकीच प्रज्वलित आहे. अजूनही ती मुळीच मंदावलेली नाही

माझ्या या आवडीला पोषक अशीच घरातली परिस्थिती होती. आमच्या घराशेजारी मराठी ग्रंथालय होते. तिथे माझे वडील सेक्रेटरी होते. मी तिथे सकाळसंध्याकाळ जाई. गजाननराव भालेराव या नावाचे एक कारकून होते. (ग्रंथपाल हा शब्द तेव्हा नव्हता.) मला ते वाटेल ते आणि वाटेल तितकी पुस्तके घरी वाचायला देत. मी काय वाचत आहे इकडे कुणाचे लक्षही नसे. अगदी लहानपणी 'उषःकाल', 'पण लक्षात कोण घेतो' या कादंबऱ्यांबरोबरच 'बहकलेली तरुणी', 'मास्तरीण काकू' या कादंबऱ्या व समाजस्वास्थ्य मासिक याचेही मी चविष्टपणाने वाचन केल्याचे आठवते... असे सर्वांगीण, विविध रसयुक्त वाङ्मय अगदी लहान वयात वाचून माझा तोटा झाला. परीक्षेत मी अनेकदा नापास झालो. अनेक गोष्टींची समज येऊ नये त्या वयात आली तरीही या सर्व वाचनाचा, माझी शैली सुधारण्यासाठी उपयोग झाला असेल असे वाटते.

कॉलेजमधून बाहेर पडल्यावर मी लिहायला लागलो. नशीब चांगले होते. कारण पहिलीच गोष्ट 'किर्लोस्कर'मध्ये प्रसिद्ध झाली. त्या दिवसांत 'किर्लोस्कर'ची प्रतिष्ठा किती होती, ते सांगून कळायचे नाही. गोष्ट छापून आली आणि एका रात्रीत माझ्याभोवती तेजोवलय निर्माण झाले, इतके सांगितले तरी पुरे! पुढे

सात-आठ वर्षे मी लिहीतच राहिलो. वर्षाकाटी दोन-तीन कथा छापून येत. कथेला सहा ते दहा रुपये मोबदला मिळे; पण या कथेची नशा सहा सहा महिने माझ्यावर राही.

पुण्याच्या नगर वाचन मंदिरात तेव्हा आम्हा काही लेखकांचे वर्तुळ असे. त्यात र. गं. विद्वांस, ज. वा. भिडे, ह. वि. वाडेकर, (कै.) गो. भि. रानडे, श्री. गो. ल. आपटे, मनमोहन नातू वगैरे मंडळी असत. काशीनाथ भालेराव नावाचे एक दुधाचा धंदा करणारे गृहस्थ होते, त्यांच्या डोक्यात कथासंग्रह काढण्याची कल्पना कुणी भरवून दिली कोणास ठाऊक! पण सात-आठ लेखकांकडून पैसे घेऊन एक संग्रह काढावा असे ठरवून ते आमच्याकडे आले. आम्हां प्रत्ये-काने वीस वीस रुपये द्यावे आणि आमच्यापैकी प्रत्येकाची एक एक गोष्ट घेऊन संग्रह छापावा असे ठरवले. पुस्तक काढण्याच्या कल्पनेने आम्ही इतके भारून गेलो होतो, की आम्हास जेवण देखील सुचत नव्हते.

काशीनाथ भालेराव नारायण पेठेतील एका अंधाऱ्या घरात राहात. बाहेरच गोठा होता तिथे आठ-दहा म्हशी बांधलेल्या असत. वाड्यात इलेक्ट्रिक लाईट नव्हता. एकच एक प्रभाकर कंदील भालेरावांच्या दोन्ही खोल्यांत मिळून असे. त्या घरात पुस्तकाबद्दल तावातावाने केलेल्या चर्चा मला अजून आठवतात. पुस्तक काढायचे नक्की झाले आणि नाव 'नवे मुशाफीर' हे ठरले..."छपाई सुरू होण्यापूर्वी मी प्रत्येकाकडून वीस रुपये मोजून घेईन" अशी भालेरावांची घोषणा होती. इतर सर्वांनी कुठून कुठून रकमेची भरपाई केली. मला तेही जमले नाही. वडिलांनी दोन महिन्यांचा वायदा केला पण तो भालेरावांनी मानला नाही. अखेर 'नवे मुशाफीर' निघाले.... एकच मुशाफीर मागे राहिला. तो म्हणजे मी!... पुस्तकरूपाने जगापुढे येण्याचा योग पुढेही बरीच वर्षे आला नाही. मध्यंतरीच्या काळात इतर बऱ्याच लोकांची पुस्तके निघाली. मी मात्र मागे राहिलो.

श्री. वि. वि. बोकील हे एकच मोठे लेखक त्या वेळी माझ्या ओळखीचे होते. त्यांना मी माझी व्यथा सांगितली. प्रथम त्यांनी मला वेड्यातच काढले. पण मी फार अजीजी केली. तेव्हा ते म्हणाले, "अहो, प्रकाशक तरी एकदम नव्या लेखकाचं पुस्तक कसं काढील? त्याला पोट आहे, बायका-मुलं आहेत! ...यातून एक तोड आहे. तुम्ही प्रकाशकाला दोन अडीचशे रुपये द्यायला

तयार असाल तर जमवता येईल."

त्यावर मी त्यांना 'नवे मुशाफीर'चा किस्सा सांगितला. ते खूप हसले व म्हणाले, "परिस्थिती गंभीर आहे. काम होणं कठीण आहे. पण असं करू... दयार्णव कोपर्डेकर नावाचे प्रकाशक आहेत. मी आता त्यांच्याकडे निघालो आहे, तुम्हीही चला. खडा टाकून बघायला हरकत नाही."

आम्ही दोघे सदाशिव पेठेत कोपर्डेकरांच्या बिऱ्हाडी गेलो...आयुष्यात प्रथमच मी प्रकाशकाला बघत होतो. मला अननुभूत का काय म्हणतात तसला आनंद होत होता.

जिना चढताना माझी छाती धडधडत होती, पण कोपर्डेकरांकडे बघून माझी भीती संपली. हल्लीचे बहुतेक प्रकाशक गुलछबू जमीनदाराप्रमाणे किंवा कोल्हापूर छत्रपतींसारखे दिसतात. त्या वेळचे प्रकाशक सामान्य संसारी माणसाप्रमाणे त्रासलेले आणि कावलेले दिसत...कोपर्डेकरही मला तसेच दिसले.

श्री. बोकिलांनी माझी 'केस' कोपर्डेकरांना भीत भीत सांगितली. त्यांनी माझ्याकडे पाहिलेही नाही. एकदम नकार दिला...ललित वाङ्मयाबद्दल त्या अनुषंगाने ते खूप वाईटसाईट बोलले. (काय बोलले हे लिहिण्याची जरूर नाही—जिज्ञासूंनी रा. ज. देशमुख यांचे या विषयावरील लेख व भाषणे वाचावी.) त्यानंतर ते कागदटंचाई या विषयावर बोलले. बोकिलांना ते म्हणत होते, "काळ्या बाजारात कागद घेणं मुळीच परवडत नाही... कंट्रोल रेटनं कागद कसा मिळवावा हेच समजत नाही..."

माझ्या डोक्यात एकदम एक कल्पना लुकलुकली. मी विचारले, "तुम्हाला कंट्रोल भावाने किती कागद लागेल?"

माझा प्रश्न ऐकून त्या अंधाऱ्या खोलीतच त्यांचे डोळे लकाकलेले मला दिसले...त्यांनी विचारले, "तुमची कुठे ओळख आहे का?"

मी सांगितले, "कागद मिळवायचा मी प्रयत्न करीन."

कोपर्डेकरांना इतका आनंद झाला की त्यांनी त्या भरात माझे पुस्तक काढण्याचे कबूल केले...त्यांनी माझी एकही गोष्ट वाचली नव्हती. माझ्या पुस्तकाला दहा ते पंधरा रिमे कागद लागेल असे ते म्हणाले;...तितका मी कंट्रोल रेटने पुरवला तर त्यांनी माझे पुस्तक काढायचे असे ठरले.

माझे एक लेखकमित्र श्री. ज. वा. भिडे हे तेव्हा बडोद्याची नोकरी सोडून

पुण्यास मुंढवा पेपर मिलमध्ये शॉर्टहँड टायपिस्टच्या नोकरीवर होते... दुसऱ्या दिवशी सायकल मारीत मी भर उन्हात मुंढव्याला गेलो, आणि भिड्यांना गाठले. खूपशी आजीजी आणि मनधरणी केली. भिडे हे तसे कुणाच्या भरी पडणारे गृहस्थ नाहीत. पण पुस्तक निघण्याचा अमृतसिद्धी योग माझ्या आयुष्यात येत आहे हे पाहून त्यांचे मन द्रवले. त्यांनी खूप वशिले लावले आणि आम्हाला पंधरा रिमे कागद कंट्रोल भावाने मिळवून दिला.

कोपर्डेकरांनी मग मात्र आपला शब्द आनंदाने पाळला. गोष्टींच्या निवडी-साठी आम्ही आठदहा मित्रांनी पाचसात दिवस डोकेफोड केली. तेवढाच अवधी मध्ये गेला. कोपर्डेकर कोणतीही गोष्ट घ्यायला तयार होते. माझ्या एकूण एक सर्व गोष्टी नामांकित आहेत, असे त्यांचे मत असावे. त्याच कथांत, 'पांढर-पेशांचे जग' या नावाची एक कथा होती. फडक्यांच्या एका गोष्टीवरून ती घेतली होती. पण त्यात पुण्यातील मध्यमवर्गीयांचे यथातथ्य चित्रण होते. त्या कथेचेच नाव मी पुस्तकाला ठेवले... महिन्याभरातच माझ्या हातात शकुनाच्या पहिल्या पाच प्रती आल्या. प्रुफ करेक्शनच्या घोळात कोपर्डेकरांनी मला घातले नाही. पुस्तक एकशेसोळा पानांचे झाले... पुस्तकाचे रूप बघून मी थोडाफार निराश झालो. मुखपृष्ठावर तीनरंगी बाईचे चित्र असावे, अशी माझी इच्छा होती. पण पुस्तकाचा पुठ्ठा अगदी साधा होता. निळसर कागदावर काळ्या रंगात 'पांढरपेशांचे जग' हे नाव फक्त छापले होते. बाई वगैरे कुणीही नव्हते. मी त्याबद्दल कोपर्डेकरांना विचारले. ते म्हणाले, "पुस्तक चांगले आहे. नव्या धर्तीचं आहे. वर चित्र न घालता पुस्तक काढावं अशी 'आयडिया' माझ्या मनात बरेच दिवस होती. मी तीच इथे मुद्दाम वापरली आहे"... थोडा वेळ मला बरे वाटले. पण मग माझ्या लक्षात आले की कोपर्डेकरांनी ती महान 'आयडिया' स्वतःच्या इतर पुस्तकांचे बाबतीत कधीही वापरली नव्हती. अगदी सानेगुरुजींच्या पुस्तकांवर देखील तुपट, सात्त्विक चेहऱ्याच्या बायकांचे मुखपृष्ठ असण्याची तेव्हा पद्धत होती. परंतु माझे पुस्तक तितके नशीबवान नव्हते.

पुस्तक प्रकाशनानंतर कसे वाटले, हे विस्ताराने सांगत नाही. लग्न झाल्यावर पहिले काही महिने जसे वाटते तसे तेव्हा वाटले, असे सांगितले तरी पुरे!... माझ्या वडिलांनी तर माझे इतके कौतुक केले की तितके मी आय. सी. एस.

पास झालो असतो तरीही केले नसते. आम्ही तिघेही भाऊ " श्री. ज. " च आहोत. आमच्याकडे कुणीही आले तरी ते मोठ्याने विचारीत, " कोणते जोशी पाहिजे आहेत ? लेखक जोशी का दुसरे ? " आमचं गोत खूप मोठं आहे. माझ्या वडिलांनी पुस्तकाच्या कॉप्या आतेभाऊ, मामेबहिणी, ऑफिसातले रावसाहेब वगैरे मंडळींना सत्यनारायणाच्या प्रसादाप्रमाणे वाटून टाकल्या. पुस्तकाची एक प्रत मी मराठी ग्रंथालयातील श्री. भोलेराव कारकून यांना दिली, त्या वेळी ते भावनाविवश झाले आणि मला म्हणाले, " माझी खात्रीच होती, तुम्ही लेखक होणार म्हणून ! "

पुस्तकावर अभिप्राय मात्र छान आले. कम्युनिस्टांच्या 'लोकयुग' साप्ताहिकात दि. के. बेडेकरांनी मोठा विस्तृत अभिप्राय लिहिला. 'लोकयुग'मध्ये मराठी पुस्तकावर तसा अभिप्राय बहुधा पहिलाच असावा. माटेमास्तरांनी लागोपाठ तीन दिवस 'दैनिक प्रभात'मध्ये लेख लिहिले. 'अभिरुची 'मध्येही उत्तम अभिप्राय आला. सौ. मालतीबाई बेडेकरांची पुढे ओळख झाली तेव्हा त्या मोकळेपणाने म्हणाल्या, " तुमचं पुस्तक फार चांगलं आहे.— तुम्ही इतकं चांगलं लिहीत असाल असं तुमच्या चेहऱ्यावरून वाटत नाही."

पुस्तकांवर अभिप्राय कसे येतात, याचे त्या वेळी प्रथमच मला सम्यक् दर्शन झाले.

श्री. वि. वि. बोकील यांना मी एक प्रत दिली, व चांगला अभिप्राय देण्याची गळ घातली. ते म्हणाले, " मी पुस्तक वाचणार नाही. पण तुझा इतका हट्टच असेल, तर तूच अभिप्राय लिही, मी त्यावर सही करीन."

मला ती कल्पना कशीशीच वाटली, पण मी दुसऱ्या दिवशी पुस्तकावर अभिप्राय लिहून बोकिलांकडे गेलो. त्या अभिप्रायात मी माझी स्वतःची दाबून स्तुती केली होती. " जोशी यांचे लिखाण वाचून शिवरामपंत परांजपे यांची आठवण होते," असे एक वाक्य मी लिहिले होते. ते वाचून बोकील खूप हसले, व म्हणाले, " तुला पाहिजे असेल, तर मी सही करतो. पण तुला एक सांगतो, हे अभिप्राय कुणीही वाचत नाही. "...त्या प्रसंगाने, माझी लेखनातील कोवळीक संपली.

या कौतुकात मी तुडुंब बुडून गेलो असताना पाच-सात महिन्यांनी कोपर्डेकरांनी मला बोलावणे पाठविले. मी गेल्यावर ते म्हणाले, " तुमचा हिशेब पुरा करू "... पुस्तकाबद्दल ते काही पैसे देणार आहेत हे मी ओळखले, " मला कशाला...मला

कशाला ? " असे मी म्हणणार, इतक्यात कोटाचे खिसे चाचपडत असताना ते थांबले व म्हणाले, " आहेत !...पैसे नव्हतेच पण तुमच्यापुरते निघाले."... मी विस्फारित नजरेने त्यांच्या खिशातून निघणाऱ्या संपत्तीकडे बघत राहिलो. कोपर्डे-करांनी पंचवीस रुपयांच्या नोटा मोजल्या व म्हणाले, " घ्या !... माझं एक तत्त्व आहे...लेखकाचं पुस्तक फुकट घ्यायचं नाही."

मी चांगलाच हादरलो. पण कोपर्डेकर पुढे म्हणाले, " तुम्ही माझं फार मोठं काम केलंत."

मी विचारले, " ते कसं ? "

" अहो, तुमच्या मी पाचशेच प्रती काढल्या... त्याला फक्त तीन रिमे कागद लागला....सानेगुरुजींची 'क्रान्ति' कादंबरी मी छापत आहे. तिला कागद कमी पडत होता,... तुमच्या पुस्तकाकरिता घेतलेली कागदाची रिमे मला तिकडे उपयोगात आणता आली."

कोपर्डेकरांनी पुस्तक का काढले, याचे खरे कारण मला कळले. आणि माझी नशा साफ उतरली. अर्थात माझ्यासारख्या नव्या लेखकाचं पुस्तक काढण्यात त्यांच्या मनाचा मोठेपणाही होताच !

पुस्तक मी माझ्या आईवडलांना अर्पण केले होते. " ती. आई, व ती. बाबूराव यांस— कारण त्यांच्याशिवाय दुसरे कोण कौतुक करणार ? " अशी अर्पणपत्रिका होती.

माझा धाकटा भाऊ त्या वेळी मॅट्रिकच्या वर्गात होता. त्याने माझ्याजवळच्या एका कॉपीत थट्टेने लिहिले होते, " कोणीही नाही. "

पहिल्या पुस्तकाचे खूप कौतुक झाले आणि भावाचे लिहिणे खोटे ठरले... माझ्या पुढच्या कित्येक पुस्तकांच्या बाबतीत मात्र ते भविष्य खरे ठरले.

## १०

# एका लग्नाची हकीकत

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

धाकट्या वहिणीचे लग्न ठरवून पुरंदरे कॉलनीतून घरी आलो तेव्हा रात्रीचे अकरा-साडेअकरा वाजून गेले होते आणि निजानीज होऊन सारे रस्ते शांत झाले होते. वाड्यात आलो तेव्हा आसपासची बिऱ्हाडे झोपेच्या आधीन झाली होती; परंतु आमच्या बिऱ्हाडातील सर्व खोल्यांत बिजलीचे दिवे भगभगत होते. वाड्यातील काळोखामुळे त्या दिव्यांचा प्रकाश फारच मोठा वाटत होता आणि सारी माणसे जागी असल्यामुळे वरच्या आणि खालच्या जागेतही अस्पष्टशी कुजबूज ऐकू येत होती. आजूबाजूच्या शांततेमुळे आमच्या घरातील बोलणेही गोंगाटासारखे वाटत होते.

जिन्यात माझी पावले वाजली आणि घरातील माणसे सारी चुपचाप बसली लग्न ठरले किंवा नाही याबद्दल उत्सुकतेने त्या सर्वांची मने बैचेन झाली होती.

जिना चढून वर गेलो, बाहेरच्या खोलीत कपडे काढले आणि तिथेच उभ्या असलेल्या वहिणीकडे किंवा बायकोकडे मुळीच न बघता मी आतल्या खोलीत गेलो. आतल्या माडीत समोरच्या कॉटवर नेहमीप्रमाणे वडील झोपले होते. म्हातारपणामुळे ते नेहमी तेथेच झोपलेले असत. बसण्याची, झोपण्याची तीच त्यांची जागा होती. मी आलेला बघताच ते कॉटवर उठून बसले व उघड्या अंगावरील जानवे खाली वर करीत त्यांनी माझ्याकडे पाहिले. आमची दृष्टादृष्ट झाली व मी हसलो. अंतराची खूण पटून तेही हसले. त्यांनी त्यांच्या नेहमीच्याच मोठ्या

आवाजात विचारले, " काय झालं ? " बाहेरच्या खोलीत माझे बोलणे ऐकू जावे या इराद्याने मी ओरडून सांगितले, " लग्न ठरलं ! बैठक संपवून नि मुहूर्त ठरवूनच मी आलो आहे. "

यावर वडिलांच्या व बायकोच्या चेहऱ्यावर एकदम हास्य फुलले. घरातील वातावरण काल संध्याकाळपासून साकळल्यासारखे झाले होते. त्यात एकदम मोकळेपणा आला. बायको आदबीनेच का होईना, पण आतल्या खोलीत येऊन पुढच्या हकीकती ऐकायला उभी राहिली. वहीण नि आणखी एकदोघेजण बाहेरच्या खोलीत, दिसेल न दिसेल अशा अवस्थेत उभी होती, यात आश्चर्य नव्हते. ' लग्न ठरले ' हे मी किंचित मोठ्याने बोलल्याकारणाने आसपासच्या बिऱ्हाडांतील किंचितशी हालचाल झाल्याचे व खिडक्या उघडून रात्रीच्या अंधारात आमच्या घराकडे कान देऊन शेजारच्या बिऱ्हाडातल्या बायका उभ्या असल्याचे मला सहज दिसले.

वडील तोपर्यंत उठून बसले होते. टेबलावरचा पानाचा डबा उघडून त्यांनी पान खाल्ले होते व तंबाखूची चिमूट त्यांनी अलगद तोंडात सोडली होती. ते हसून म्हणाले, " लग्न ठरलं म्हणतोस ? "

मी सांगितले, " होय ! मुहूर्तही ठरला ! एक फेब्रुवारीचा. सकाळी नऊच्या सुमारास मुहूर्त आहे."

बायकोने तोपर्यंत भिंतीवरचे मोठे कॅलेंडर हातात घेतले होते. कॅलेंडरवर ढळढळीत तांबड्या अक्षरात ' १९४८ ' हा सन दिसत होता आणि त्या दिवशी जानेवारीची पंचवीस तारीख होती.

तिने पान उलटले व स्वतःशी पुटपुटत ती म्हणाली, " फेब्रुवारी एकोणीसशे अठ्ठेचाळीस ! म्हणजे रविवार आहे ! "

मी म्हटले, " होय. म्हणूनच तो मुहूर्त धरला आहे. दुसरे एक-दोन आडवारांचे मुहूर्त होते. पण ते नापसंत करून मुद्दामच रविवार धरला. रविवार म्हणजे सुट्टीचा प्रश्न नाही ! लोकांना निवांत जेवाय-खायला नि पानसुपारीला यायला सापडेल ! "

वडिलांचा विडा एव्हाना चांगला जमला होता आणि चेहऱ्यावर हास्य ओसंडत होते. कॉटखाली ओणवे होऊन मग त्यांनी तिथले पितळी तस्त घेतले व पिंक टाकीत ते म्हणाले, " रविवार आहे, हेच छान आहे. म्हणजे दुपारच्या

वेळी एकदम पंक्ती होऊन जातील आणि पानसुपारीची संध्याकाळची कटकट राहणार नाही." ते आता चांगलेच हसत होते व रंगात आले होते. "नाही तरी त्या संध्याकाळच्या पानसुपाऱ्या मला आवडतच नाहीत. सकाळी लग्न लागून गेल्यामुळे संध्याकाळचा समारंभ शिळ्या कढीला ऊत आणण्याप्रमाणे वाटतो. त्यात पुन्हा लोक पानसुपारीला ऑफिसातून घरी परतताना येतात; त्यामुळे त्यांच्या डोक्यावर साहेबी टोप्या असतात आणि हातात खायचे डबे असतात. चेहरेही लेकाच्यांचे दमलेभागलेले आणि घामेजलेले दिसतात! लग्नमंडपात असले चेहरे नि पोशाख कसेसेच दिसतात."

ते बोलत होते आणि आम्ही हसत होतो. मग त्यांनी आणखी काही गोष्टी विचारल्या. घायचे-घ्यायचे काय ठरले? मानपान कोणाकोणाचे करायचे! हुंडापांडा किती? पोशाखाचे व करणीचे पैसे हुंड्यात जमा धरायचे की वेगळे? जेवायला त्यांची माणसे किती येणार? आपली किती जाणार?...इत्यादी अनेकविध गोष्टी वडिलांनी व बायकोने विचारून घेतल्या, आणि कधी पसंती तर कधी नापसंती दाखविली. वडिलांना अर्थात त्या एकंदर कार्यात विशेष रस नव्हता. अलीकडे काही वर्षे त्यांनी वानप्रस्थाश्रम स्वीकारला होता; आणि साऱ्याच व्यवहारातून अंग काढून घेतले होते. त्यांचे स्वतःचे मत ते कुठेच लादीत नव्हते. आणि 'अमुक असावे नि तमुक करावे' असा आग्रह त्यांनी गेल्या एकदोन वर्षांत सोडून दिला होता. परंतु बायकोचे तसे नव्हते. सारे कार्य पार पाडण्याची जिम्मेदारी तिच्यावरच होती आणि त्या विषयात तिला भरपूर हौसही होती! म्हणूनच ती अगदी छोट्या छोट्या तपशिलाच्या गोष्टी विचारीत होती, त्याबद्दल शंका काढीत होती, व स्वतःचे मत सांगण्यासही कमी करीत नव्हती.

त्या तपशिलाचा मला लगेच कंटाळा आला व मी म्हटले, "ठरलं असं काहीच नाही! लग्न मात्र ठरलं."

"म्हणजे काय? नुसते लग्नच ठरवून आलात? याद्या वगैरे केल्या नाहीत? घायचं-घ्यायचं लिहून ठेवलं नाहीत? आश्चर्यच आहे."

मी हसलो व सांगितले, "खरंच सांगतो! याद्याबिद्या काहीच केल्या नाहीत. लग्न ठरवायला आम्ही दहा वाजता बसलो, पण एक तासात बैठक आटोपली देखील! अगदीच साधी माणसे आहेत! हुंडापांडा काहीच नाही! फक्त म्हणाले आमचा एकुलता एक मुलगा आहे तेव्हा लग्न थाटात आणि हौसेने झाले पाहिजे."

आश्चर्याने बायकोने विचारले, " इतकंच ? हुंडापांडा ठरला नाही ? – मग कमालच आहे."

" खरंच काही ठरलं नाही. फक्त लग्न हौसेने करायचं ठरलं आहे. बाकी काही नाही, म्हणून तर इतक्या लवकर आलो."

" ते दिसतंच आहे ! " वडील हसून म्हणाले, " ही लग्नाची बैठक झाली की चेष्टा झाली ? सारी एक तास म्हणे बैठक ! आमच्या वेळेला लग्न ठरवायला रात्री बसले म्हणजे याद्या होऊन शेवटच्या सह्या व्हायला पहाट व्हायची ! खुद्द माझ्याच लग्नाची बैठक संपली तेव्हा पहाटेचे तीन वाजले होते, आणि जो तो बैठक फार लवकर संपल्याची तक्रार करीत होता." इतकेच बोलून ते स्वतःच खो खो हसले. त्यांचे मूळचेच अगदी बारीक व काळे डोळे काही विशिष्ट आठवणी होऊन क्षणमात्र चमकले. ते पुढे सांगू लागले, " त्या वेळी बैठक मूळ मुद्दयालाच यायला दोनतीन तास लागत ! 'तुमची भूक किती आहे ?' 'तुम्ही पाणी किती तोडू शकाल ?' ही पारिभाषिक वाक्ये त्या बैठकीत अनेकदा निघत. हुंड्याचा आकडा ठरविताना मुलाकडची मंडळी पाच हजारापासून सुरुवात करीत आणि वधूपक्ष 'मुलगी आणि नारळ घेऊन आम्हाला पदरात घ्या' म्हणून वाटाघाटीचा नारळ फोडीत. पाच हजार रुपये व एक नारळ या दोन गोष्टींमध्ये दोन्ही बाजूकडून खेचाखेच सुरू होई, त्याला पाणी तोडणे अशी संज्ञा असे ! ही पाणी तोडण्याची क्रिया चार चार तास चाले. आणि वधूकडील मंडळी दोनदोनदा तिनतीनदा देखील 'हे आम्हाला जमणं शक्य नाही, लग्न मोडलं असं समजा !' म्हणून उठून घराबाहेर येत; मग मध्यस्थ पाठविण्यात येई आणि वाटाघाटी पुन्हा होत. शेवटी लग्न ठरायला पहाटेचे चारपाच वाजत..."

वडील सांगत होते आणि त्यांच्या बोलण्यात रसवंती असल्यामुळे आम्ही सारे हसत होतो. त्या अनुरोधाने मग आळीतील कित्येक लोकांच्या लग्नाचे जुने इतिहास उजळून निघाले. त्या माणसांची मुले देखील आता लग्नाला आली होती. परंतु पस्तीस-चाळीस वर्षांपूर्वी झालेल्या त्यांच्या लग्नाच्या बैठकी अजून वडिलांना कालपरवाच्या बैठकीप्रमाणे वाटत होत्या. त्याच अनुरोधाने ते सांगत होते, " अरे ज्याला अगदी कुणी नाही – ज्याचं लग्न व्हायची भ्रांत, त्याच्या लग्नाच्या बैठकीही आम्ही तीन तीन तास गाजविल्या आहेत. आपल्या पाठीमागे तो शंकर कुलकर्णी राहात होता ! लेकाचा म्युनिसिपालिटीत उंदराचे पिंजरे

ठेवण्याच्या कामावर होता आणि त्याचं लग्न होणंही अशक्य होतं ! पण कशीबशी त्यानं पंढरपूरकडची एक मुलगी ठरवली होती. आता त्या लग्नात काय ठरवायचं होतं ? शंकरला मुलगी मिळत होती हेच खूप होतं. पण आम्ही तेव्हाही आमच्या आमच्यातच दोन पक्ष केले आणि बैठक चांगली बारा वाजेपर्यंत रंगवली होती. " असे सांगून ते पान थुंकण्यासाठी थांबले.

त्यांचे बोलणे आणखीही खूप लांबले असते, पण ते माझ्या बायकोच्या दृष्टीने इष्ट नव्हते. एक तर ज्यांच्या लग्नाच्या हकीकती इतक्या घोळून वडील सांगत होते, त्या व्यक्तींपैकी तिच्या परिचयाचे कुणीच नव्हते आणि दुसरे म्हणजे पूर्वी केव्हा तरी वीस-पंचवीस वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या लग्नाऐवजी उद्या-परवा होणाऱ्या व तिच्या अंगावरच सर्व तऱ्हेची जबाबदारी असलेल्या लग्नातच ती रस घेऊ शकत होती. लग्न आता फक्त सहासात दिवसांवरच आले होते आणि सारी मांडामांड व व्यवस्था तिलाच बघायची होती.

वडिलांचे बोलणे संपविण्याच्या उद्देशाने तिने मला म्हटले, " पण तुम्ही काहीच ठरवून आला नाहीत ? "

" ठरवायचंय काय ? लग्न थाटात नि हौसेने करायचं एवढंच ठरलं आहे ! त्यांचा एकुलता एक मुलगा आहे तेव्हा त्यांची सर्व तऱ्हेची हौस केलीच पाहिजे. "

" अहो, पण हौस म्हणजे काय ? तिला काही शेंडा-बुडखा ? हौस करायची, हौस करायची म्हणजे का पायघड्या घालायच्या, का रासनहाणी करायची ? "

" उगाच फाटे फोडू नकोस ! " मी म्हटले, " पायघड्या अन् रासनहाणी ह्या दिवसांत कोण करायला बसलं आहे ! जरा थाटात लग्न करायचं इतकंच."

" पण थाटात म्हणजे काय ! हे ठरवायला नको का ? "

" अग थाट म्हणजे थाट ! बँड लावायचा, मांडव मोठा घालायचा—वरातीच्या वेळी मोटार खूप शृंगारायची... आणि जेवणावळी अगदी पेशवाई पद्धतीच्या करायच्या—हा थाट ! – दुसरं काय ? " मी म्हटले आणि आळोखेपिळोखे देत जांभई दिली ! सकाळपासून मी दमलो होतो. झोपेची मला आवश्यकता होती. गेली दोन-तीन वर्षे मी वरसंशोधनाच्या खटपटी करून जोडेफोड केली होती आणि मनस्ताप सोसले होते. पण आता ते सारेच संपून माझ्या मनाला खूपच हलके वाटत होते. मला आता निवांत झोपेची आवश्यकता होती. काही तरी

बोलून बायको आणखी विषय चालू ठेवण्याच्या तयारीत दिसली म्हणून मग मी पुन्हा एक जांभई दिली व पाणी पिण्यासाठी उठलो आणि तो विषय तितक्यावरच राहिला.

दुसऱ्या दिवसापासून मग आमच्या घरात लग्नघाई सुरू झाली. लग्नाचा मुहूर्त एक फेब्रुवारीचा होता आणि जानेवारीची पंचवीस तारीख संपली होती. माझ्या हातून होणारे ते पहिलेच कार्य असल्यामुळे पाचसहा दिवसांत सगळा मेळ जमविणे फार घाईचे आणि घोटाळ्याचे होते. पण त्याला उपाय नव्हता. तयारीला दिवस थोडे राहिले म्हणून मुहूर्त पुढे ढकलणे दुरापास्त व न शोभणारे होते, आणि शिवाय ते मुलीचे लग्न होते. अनुरूप वरांच्या याद्या, गोत्रावळी व घरांचे पत्ते यांच्या चक्रव्यूहातून फिरून शेवटी महाप्रयासाने मी हा मुलगा मिळवला होता व स्वतःच्या जिम्मेदारीवर लग्न ठरवले होते. आता माघार घेणें कठीण होते.

दुसऱ्या दिवसापासून मी रजा घेतली व कार्याच्या प्राथमिक तयारीला सुरुवात केली. ती सारी तयारी करणे अगदी सोपे व बिनकष्टाचे होते आणि मला नवीन असे काहीच करायचे नव्हते. माझ्या वडिलांचा चाळीसपन्नास वर्षांचा संसार पुण्यासच त्याच जागेत झाला होता आणि सर्व कार्ये तिथेच झाली होती. त्यामुळे काय करायचे नि कसे करायचे हे अगदी निश्चित होते. सगळ्या पाऊलवाटा चालूनचालून गुळगुळीत झाल्या होत्या. डोळे मिटून नाकासमोर जाणे एवढेच काम मला होते, व तेवढे मी पार पाडले तरी खूपच होते.

दुसऱ्या दिवशी मी जुनी – मंगलकार्यप्रसंगी बोलावणी करण्याची घरातील यादी काढली व नातेवाइकांना पत्रे लिहिली. कोल्हापूरच्या आतेभावाला, नगरच्या मावशींना, मुंबईस बहिणीकडे – साऱ्यांना आग्रहाची व आवर्जून पत्रे लिहिली. पहिले पत्र आतेभावाला लिहिले व ते वडिलांना मुद्दामच वाचून दाखविले व त्यांना म्हटले, " खाली तुमची सही करतो ! "

यावर त्यांनी नकारार्थी मान हलविली आणि कित्येक वेळा ते हसत तसे ' सिनिकली ' हसून म्हणाले, " माझी सही नको ! तुझीच कर. "

मी कारण विचारणार तर त्यांनीच पुढे सांगितले, " मी आता झाल्या गेल्यातच जमा आहे. आज नाही तर उद्या ओंकारेश्वरावर जायचं आहे हे निश्चित आहे. उगाच मला सहीच्या घोळात कशाला पाडतोस ? "

" वाऽ ! असं कसं होईल ? मुलगी तुमची आणि पत्रावर तुमची सही नको हे शोभायचं नाही. शिवाय तुम्ही ओंकारेश्वराच्या गोष्टी इतक्यातच बोलता हे बरे नाही. तुम्हाला काहीही झालेलं नाही...जेवणखाण उत्तम आहे, झोप चांगली आहे, मग विनाकारण ओंकारेश्वर कशाला ? "

पण त्यांना ते पटले नाही. त्यांचा स्वभाव आनंदी आणि थट्टेखोर होता. पण त्याला उदासपणाची आणि निराशेची, तिऱ्हाइताला सहसा कधीही न दिसणारी झालर होती. चांगले हसतबोलत असताना ते एकदम उदास, मलूल होत व त्यांच्या डोळयात अपयशी आयुष्याची जखम वाहताना स्पष्ट दिसे. घरात मंगलकार्य असले, सणवार असला, की ते बेचैन होत. अवतीभोवतीची मंडळी हसत असली, चांगले चांगले खात असली की त्यांना जीवनातील नश्वरतेची बहुधा आठवण होई आणि ते गप्प बसत. याच्या उलट जेव्हा घरात दु:ख असे, मृत्यू झालेला असे तेव्हा त्यांच्या स्वभावात एकदम मोकळेपणा येई आणि त्या प्रसंगी अप्रासंगिक वाटणारी थट्टामस्करी ते स्वत: करीत. कोणत्याही सणावारी ओंकारेश्वराची आठवण करण्याचा त्यांचा परिपाठ होता. तेव्हा त्या दिवशीचे बोलणे मला चमत्कारिक वाटले नाही.

मी त्यांना खूप सांगून बघितले, पण स्वत:चा हेका त्यांनी सोडला नाही. माझ्याच सहीने सर्वांना पत्रे पाठविणे त्यांनी भाग पाडले आणि वर आणखीही एक वाक्य घालायला लावले की, ' वडिलांच्या देखत होणारे हे शेवटचेच कार्य आहे, तरी अगत्य यावे ! ' मी नाइलाजाने तशी पत्रे लिहिली. आणि चिडून विचारले, " निदान लग्नपत्रिकेवर तरी तुमची सही घालू देणार ना ? " त्यांनी " होय " म्हणून म्हटले व पुढे सांगितले, " छापील पत्रिकेवर लोकांत वाईट दिसेल म्हणून माझी सही येईल इतकेच ! पण या लग्नात बाकी मी काहीच करणार नाही. सारी जमवाजमव तुलाच करावी लागेल. देव-देवक तूच ठेवायचंय. कन्यादानही तूच करायचंस ! मी नुसता प्रेक्षक म्हणून वावरणार ! "

मी ' बरं ' म्हटले. तेव्हा त्यांनीच सल्ला दिला, " हे लग्न आहे ! तुला पाहिजे असेल व सल्लामसलतीची गरज असेल तर सातारला पत्र लिही व तुझ्या श्वशुरांना बोलावून घे. तुला त्यांचा उपयोग होईल."

मी तसे पत्र लिहिले व कामाला लागलो. आमच्या वाड्याच्या मागच्या बाजूलाच बाबू वाजंत्री व शंकरराव आचारी होते. त्यांना निरोप पाठविताच ते आले

व कार्याची सुपारी घेऊन गेले. त्यांच्या बाबतीत देण्याघेण्याचे ठरवायचे काहीच नव्हते. बाबूच्या वडिलांनी माझ्या वडिलांचे पन्नास वर्षांपूर्वी लग्न वाजविले होते आणि पुढची सारी कार्ये बाबूने वाजविली होती. त्याच्याशी काय ठरवणार ? शंकरराव आचाऱ्याचेही तसेच होते. पंचवीस वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या माझ्या मुंजीत आईने वडिलांना न विचारता अक्षदीच्या प्रत्येक घरी जेवणाचेही आमंत्रण कसे दिले व दोनशे पानांच्या अंदाजाऐवजी ऐन वेळी चारशे पान होऊन गोंधळ कसा उडाला, याचे वर्णन तो अजूनही करीत होता. पैशाविषयी त्यांच्याशी बोलणे किंवा मोतीचुराच्या दराविषयी घासाघीस घालणे हे माझ्या आवाक्याबाहेर होते. वाजंत्री आणि आचारी ठरले. अंगणात ऐटबाज मांडव घालण्याची ऑर्डर देऊन आलो. वरातीसाठी मोटर व बँड ठरवला आणि मुलाचा पोशाख शिवायला टाकला. आमच्यापलीकडे लक्ष्मी रोडवर फुलवाल्याचे दुकान आहे. त्याला निरोप पाठविला आणि गोटे, गजरे व फुलांच्या पोशाखाची व्यवस्था केली. गुलाबी कागदात बांधलेल्या पेढ्यांची ऑर्डर दिली व लग्नाची सारी यंत्रणा नीट चालली आहे याची खात्री वाटून मी समाधान पावलो.

दुसऱ्या दिवसापासून पाहुण्यांनी घर गजबजून गेले. साताऱ्याहून सासरे आले आणि त्यांनी बाजाराबद्दल सल्लामसलत देण्यास सुरुवात केली. कोल्हापूरहून व मुंबईहूनही नातेवाईक आले आणि घराला लगिनकळा चढली. मुलाच्या बाजूने लग्नाच्या काही अटी नव्हत्या. एकुलता एक मुलगा असल्याने कार्य थाटात करून द्यायचे एवढीच साधीसुधी अट त्यांची होती. आणि हौसेला तर आमच्या बाजूने काहीच कमी नव्हते. लग्न जुन्या पद्धतीने चार दिवस गाजायचे होते.

माणसे इतकी जमली की मुलांच्या कलकलाटाने व बायकांच्या हसण्याबोलण्यामुळे डोके उठण्याची वेळ आली. चौकात मांडव पडला आणि अंगणावर झालरीचे छत आल्यामुळे कार्यप्रसंगी नेहमी पडतो तसा गमतीदार अंधार घरात पडला. सासऱ्यांनी मुद्दाम मंडईत जाऊन गजाननाचे चित्र आणले व ते दरवाज्यावर लावून त्यावर पिवळ्या वर्खाचे मध्यभागी नारळ असलेले सुंदर तोरण बांधले. लग्नचिठ्या छापून आल्या आणि त्या परगावी रवाना झाल्या. लग्नास पाच दिवस राहिले तेव्हा चित्रशाळेजवळ राहणारे गुरुजी गडबडीने आले व म्हणाले, "आज संध्याकाळी देवाला अक्षत देऊन येऊ."

"इतक्या लवकर ? लग्नाला अजून तर पाच दिवस बाकी आहेत."

" अहो अक्षत पाचच्या मांडवी दिलेली बरी ! म्हणजे मग पुढं घाई होत नाही. आज कसब्याचा गणपती, जोगेश्वरी आणि शकुनाला पाच घरं घेऊ. मग उद्यापासून तुम्हाला सवडीनं हिंडता येईल."

मी होकार दिला व ते निघून गेले. संध्याकाळी पाच-साडेपाचला ते परत आले. आम्ही उभयता कसबा गणपतीस जोगेश्वरीस अक्षत देऊन आलो व कार्याला खराखुरा आरंभ झाला.

पुढचे दोनतीन दिवस धावपळीत उजाडले आणि मावळले. घरात तळणे पडली होती आणि मोठ्या चुलीवरल्या कढईतून बुंदीच्या कळ्या काढल्या जात होत्या. काम जोरात चालले होते. कारण आता लग्न दोनच दिवसांवर आले होते. त्या दिवशी जानेवारीची तीस तारीख होती आणि एक फेब्रुवारी लग्नाचा मुहूर्त होता.

तीस जानेवारीला संध्याकाळी चार-साडेचार वाजता चहा उरकून मी नुसताच मांडवात उभा होतो. मला करायला पाहिजे असे काहीच काम नव्हते. अक्षतीची बरीचशी घरे घेऊन झाली होती आणि आळीतल्या राहिलेल्या घरी अक्षत देण्याचे काम गेल्या वर्षी विवाहबद्ध झालेला धाकटा भाऊ उरकीत होता. वाण्याकडचे नि इतर सामान येऊन पडले होते आणि करण्याजोगे मला काहीच काम नव्हते. सोप्यावरून अंगणात आणि अंगणातून रस्त्यावर मी नुसताच फेऱ्या घालीत होतो. त्या दिवशी शुक्रवार होता आणि रविवारचे लग्न होते. मला व्याहीभोजनासाठी दुसऱ्याच दिवशी—शनिवारी बहिणीच्या सासरी जायचे होते, पण तोपर्यंतचा वेळ सुनाच होता. रिकामपणामुळे मनाला बेचैनी आली होती, आणि मी सोप्यावरून बाहेरच्या दरवाज्यापर्यंत फेऱ्या घालत होतो व रस्त्यावर थांबून रहदारीकडे थोडा वेळ पाहून परतत होतो. त्या संध्याकाळी नारायण पेठेतील त्या आडरस्त्यावरील रहदारीत काही विशेष जोर नव्हता. सारा मद्दलपणा होता.

माझ्या फेऱ्या चालूच होत्या. फेरीच्या एका टोकाला रस्ता होता तो निर्जीवपणे वाहात होता. त्यावर गर्दी नव्हती किंवा गडबड गोंधळही नव्हता.

एकेक माणूस—एकेक वाहन त्या रस्त्यावर इकडून तिकडे सावकाश, रेंगाळत जात होते, आणि दरवाज्यात उभे राहून त्यांच्याकडे बघण्यात मुळीच मौज नव्हती. फेरीच्या दुसऱ्या टोकाला माजघर होते व बाहेरच्या सोप्यावर वडील

उघड्या अंगाने निर्विकार बसले होते आणि आतल्या घरात नव्या कपड्यांच्या व दागिन्यांच्या ढिगाऱ्यांच्या आवतीभोवती बसून बायका त्याच त्याच गोष्टी बोलत होत्या, आणि तेच तेच जुनेपाने विनोद करून हसत होत्या. मी फेऱ्या मारीतच होतो आणि मला कशातच जीव वाटत नव्हता. संध्याकाळची ती कातरवेळ संपून एकदाची रात्र होईल आणि खूपसा काळोख पडेल तर बरे होईल असे वाटत होते.

पाचसात फेऱ्या झाल्या असतील, आणि माजघराची बाजू संपवून मी रस्त्याकडे चाललो होतो, इतक्यात रस्त्यावर एकदम कसला तरी फार मोठा गलका ऐकू आला. मी दरवाज्यात आलो व रस्त्याकडे पाहिले. मघाचा चैतन्यहीन निर्जीव रस्ता आता एकदम प्रचंड वेगाच्या आवर्तात झोकांड्या खाताना दिसला. त्यावरून माणसे व वाहने जोरजोरात पळत होती. लोक एकमेकांना काही सांगत होते आणि आसपासच्या घरांच्या खिडक्या-दरवाज्यांतून माणसांनी गर्दी केली होती. मी बाहेर रस्त्यावर इकडेतिकडे बघू लागलो. आता रस्त्याला जास्तच वेग आला होता. माणसे जोरजोराने पळत होती. काय झाले याची मी चौकशी करीत होतो, पण बोलण्याच्या मनःस्थितीत कोणीच नव्हते ! जो तो घाईने—भाऊगर्दीत पळून घर गाठण्याच्या विचारात होता.

त्या गोंधळात मी उभा होतो, इतक्यात अक्षतीसाठी गेलेला धाकटा भाऊ व त्याची बायको जवळजवळ धावत-पळतच घराकडे येताना दिसली. भावाने रेशमी नेहरू शर्ट व पिवळी टोपी घातली होती. त्याच्या बायकोच्या अंगावर उंची लुगडे असून अंगावर नथीसह सर्व दागिने होते. त्या दोघांच्याही हातात अक्षतीच्या चांदीच्या वाट्या होत्या. दुसऱ्या हातातील पिशवीत गुलाबी रंगाच्या निमंत्रणपत्रिकाही होत्या. परंतु त्यांच्या त्या वेशाला त्यांचं जोरात चालणे अगदी विशोभित दिसत होते. त्या दोघांचे चेहरे उतरून गेले होते; आणि लौकर घरी पोचण्याची त्यांची घाई स्पष्ट दिसत होती. धापा टाकीत ती दोघे माझ्यापर्यंत पोचल्यावर मी विचारले, “ काय झालं ? ”

घाबरलेल्या—गोंधळलेल्या आवाजात तो म्हणाला, “ भयंकर बातमी आहे. ”

“ कोणती ? ” मी विचारले.

“ महात्मा गांधींचा आज संध्याकाळी गोळ्या घालून खून झाला.” त्याने एका दमात सांगितले. “ आत्ता लक्ष्मी रोडवर कळलं. जिकडे तिकडे धावाधाव

व पळापळ चालली आहे. आम्ही अक्षत न देताच परतलो."

"काय म्हणतोस ? गांधींचा खून ?" मी ओरडलो. पण उत्तर द्यायला तो किंवा त्याची बायको कोणीच नव्हते. ती दोघे केव्हाच घरात गेली होती, आणि 'गांधींचा खून झाला' ही बातमी एव्हाना सहस्र मुखांनी जिकडेतिकडे झाली होती. रस्त्याने पळणारे लोक, गच्चीत, गॅलऱ्यांत, खिडक्यांत उभे राहिलेले स्त्री-पुरुष तीच बातमी एकमेकांना हलक्या आवाजात सांगत होते, व त्या अभद्र बातमीचे निनाद वातावरणात घुमत होते.

मी घरात गेलो तेव्हा आसपासच्या बिऱ्हाडातले लोक खुनाबद्दलच बोलत होते. आमच्या घरातील लग्नाचा विषय केव्हाच मागे पडला होता, कारण सारी वऱ्हाडी मंडळी खुनामुळे भांबावून गेली होती. त्याच एका बातमीमुळे घरावरची लग्नाची कळा संपून गेली होती, व घर ओकेबोके वाटत होते.

इतका वेळ सोप्यावर विरक्तपणाने बसलेले वडील आता नीट उठून बसले होते आणि त्यांच्या चेहऱ्यावर चैतन्य दिसत होते. मला पाहून ते ओरडले, "गांधींचा खून झाला, हे खरं का ?" मी होय म्हणून सांगितले व घरात निघालो. तिथे उभे राहिलेले गृहस्थ खवचटपणाने उद्गारले, "गांधींचा खून झाला, व ते 'पैगंबरवासी' झाले–बातमी अगदी खरी आहे." त्यांच्या त्या बोलण्या-मुळे तशा स्थितीतही सर्वजण हसले व मी घरात शिरलो. तेथे अजूनहीं नव्य कपड्यांच्या व दागिन्यांच्याभोवती बायकांचा गराडा होताच, परंतु त्यांच्या गप्पा आता संपलेल्या होत्या. नवी लुगडी आता नवीन आणि तकतकीत दिसत नव्हती आणि झिरझिरीत तांबड्या कागदात असलेले दागिनेही पारोसे दिसत होते.

आता संध्याकाळ संपली होती व घरातील दिवे मिचमिचत होते. वृत्तपत्रांचे खास अंक निघाले होते. त्यांच्या मध्यावर महात्माजींचे मोठे छायाचित्र असून काळ्याकभिन्न अक्षरांनी 'महात्मा गांधी मृत्यू पावले– गांधी अमर आहेत' अशी किंवा अशा अर्थाची वाक्ये छापली होती. बहिणीच्या लग्नाचा विषय मी केव्हाच विसरून गेलो होतो. आणि आळीतील लोकांच्या घोळक्यांत, रस्त्यावर उभा राहून गांधींच्या खुनाची तावातावाने चर्चा करीत होतो.

मी मोठ्याने काही तरी बोलत असतानाच माझ्या शर्टची बाही सासऱ्यांनी हलक्या हाताने ओढली व डोळ्यांनीच एकीकडे येण्याविषयी मला खुणावले. किंचित नाराजीने मी बाजूला होऊन म्हटले, "काय म्हणता ?"

"तुम्ही जरा बाजूला या बरं !" त्यांनी जरबेने म्हटले. मग मी गप्पाष्टकांचे टोळके सोडून जरा लांब त्यांच्याबरोबर गेलो व विचारले, "का बोलावलंत ?"

"बोलावलं अशासाठी, की तुम्ही नुसते बोलत का उभे राहिला आहात ?"

"मग काय करू ?– एवढा गांधींचा खून झाला आहे–"

"म्हणूनच म्हणतो की ही वेळ नुसती गप्पा मारण्याची नाही. आपल्याला तातडीनं मंडईत गेलं पाहिजे."

"मंडईत ?" एखाद्या वेडसर माणसाला विचारावे तसे मी विचारले.

"अहो, मंडईतच जायला हवं. खून झाल्याची बातमी आता कुठे आली आहे. अजून फार तर तास दोन तासच दुकानं उघडी राहतील. कुणास ठाऊक, मग किती दिवस हरताळ पडेल तो ? त्यापेक्षा भाजीपाला – निदान बटाटे तरी आणून ठेवावे."

गांधींच्या खुनाच्या पार्श्वभूमीवर बटाटे आणण्याची त्यांची कल्पना चमत्कारिक वाटून मी म्हटले, "पण आत्ता – या वेळी मंडईत जायचं ?"

"होय, आत्ताच जायचं !" अंगात कोट घालीत त्यांनी सांगितले. "अहो, अगदी प्रत्यक्ष घरात कुणी मेलं तरी पोचवून आल्यावर पिठलंभात करतात. इथे आपण माणसे जेवायला बोलावली आहेत. घरातही पाचपंचवीस माणसे जमली आहेत त्यांच्या पोटाला तर काही घातलं पाहिजे ? नाही तर वेढ्यात सापडलेल्या सैन्यासारखी गत व्हायची."

त्यांचा कोट घालून झाला होता आणि खुंटीवरची टोपी त्यांनी डोक्यावर न घालता कधी नव्हे ती हातात घेतली होती व ते बोडक्यानेच निघाले होते. मला उठावेच लागले. मी कपडे केले आणि गड्याला घेऊन त्यांच्याबरोबर बाहेर पडत म्हटले, "चला ! म्हणताच आहात तर जाऊन येऊ."

आम्ही स्वयंपाकघरातून सोप्यावर आलो व तेथून अंगणात घातलेल्या मांडवाकडे मी बघितले. मांडवाचीच नव्हे, तर लग्नघराचीही शान पार गेली होती. मुले मुलीच दंगा न करता कुठे कुठे उगाच उभी होती, आणि शेजारच्या बिऱ्हाडातले लोक सोप्यावर जमून खुनाविषयीच बोलत होते. एक मोठी प्रचंड घटना घडली होती. तिच्या ओझ्याखाली आमच्या घरातले गरीब बिचारे लग्न पार चेंगरून चोळमटून गेले होते.

आम्ही रस्त्यावर आलो आणि चालायला लागलो. रस्त्यावर दिवे होते, पण

आम्ही जणू अंधारातून चालत होतो. कारण सगळीकडे भीतिदायक शांतता पसरली होती. आमच्या घराच्या कोपऱ्यावर तालीम आहे. तिला आम्ही लोखंड्यांची तालीम म्हणतो. तिथे नेहमी बाहेर लाल मातीचा शिडकाव झालेला असतो व संध्याकाळच्या वेळी दंड थोपटण्याचे आणि घुमण्याचे आवाज कानांवर येतात. पण त्या दिवशी तालमीला कुलूपच होते. रस्त्यावरून जाताना मी सहज तालमीच्या खिडकीतून आत नजर टाकली. तालीम बंद असली तरी भिंतीत खोदलेल्या मारुतीच्या मूर्तीपुढे पणती तेवत ठेवण्याची वहिवाट होती. पण आज तिथे पणती नव्हती. कधी नव्हे ती हनुमंताची मूर्ती आज अंधारात बुडून गेली होती. तालमीला वळसा घालून आम्ही उजव्या हाताच्या छोट्या रस्त्याला लागलो. त्या रस्त्याच्या एका बाजूला हुजूरपागेची मागची बाजू आहे, आणि एखाद्या किल्ल्याची असावी तशी उंचच उंच भिंत आहे. मुलींची शाळा असल्यामुळे भर दिवसाही या बाजूने आवाज कमी येतो. मग आता तर संध्याकाळ टळून गेली होती, आणि आवाजाचा बिलकुल संबंध नव्हता. रस्त्याच्या बाजूला घरे होती, पण तीही गपचीप होती. कुठेच काही ऐकू येत नव्हते. प्लेगच्या साथीत सारे पळून जावेत व रस्ते निर्मनुष्य व्हावेत तसे वाटत होते. उजव्या बाजूला दोनतीन घरे टाकली की मध्यावर दत्ताचे देऊळ आहे, त्याला लहानपणापासून आम्ही ' दाढीवाला दत्त ' म्हणतो. कारण त्याचा मालक एक दाढीवाला गृहस्थ आहे. त्या देवळात संध्याकाळच्या वेळी कधी पुराण, नाही तर कीर्तन चाललेले असते, आणि भाविक स्त्री-पुरुष भारत-भागवत ऐकण्यात दंग असतात. परंतु त्या दिवशी देवळात कुणीच नव्हते. सभामंडपही रिकामाच होता. रस्त्याने जाताना नेहमीच्या सवयीप्रमाणे मी बाहेरूनच दाढीवाल्या दत्ताला नमस्कार केला आणि सासऱ्यांबरोबर पुढे निघालो. गडी मागोमाग होताच. समोर लक्ष्मी रोड डाव्या-उजव्या बाजूने वाहात होता आणि थोड्याच वेळात आम्ही सेवासदन चौकातून मंडईत जाण्यासाठी डाव्या बाजूला वळलो

संध्याकाळ होती आणि तो लक्ष्मी रोड होता म्हणून तिथे थोडीफार गर्दी होती, इतकेच. पण ती गर्दीही नेहमीसारखी नव्हती. नेहमी त्या वेळी त्या चौकात तरुण स्त्री-पुरुषांची एकच झुंबड उडालेली असते. कोपऱ्यावर फोनोच्या रेकॉर्डचे दुकान आहे. तिथून फिल्मी संगीत नेहमी ऐकू येत असते, बसेस धावत असतात, आणि लोकांच्या चेहऱ्यावर सुखासीनता दिसते. पण त्या दिवशी तसे

काहीच नव्हते. काही दुकाने बंद होती, बरीच दुकाने उघडी होती, परंतु व्यवहार मुळीच चालू नसल्याने ती बंदच असल्यासारखी वाटत होती. फूटपाथवर आणि रस्त्याच्या कडेला लोकांचे घोळके उभे होते, आणि ते तावातावाने गांधींच्या खुनाविषयी बोलत होते.

लक्ष्मी रस्ता सोडून आम्ही मंडईकडे निघालो. तुळशीबाग ओलांडली आणि मंडई दिसायला लागली. नेहमी तुळशीबागेपासूनच मंडईचा विशिष्ट गलका कानांवर येतो आणि भाजीच्या झोळ्या भरून मंडई उरकलेले लोक रस्त्यावर भेटतात. कोपऱ्यावर पाने किंवा लिंबे विकणाऱ्या बायका बसलेल्या असतात, आणि त्यांच्याभोवती गिऱ्हाइकांचा चांगलाच घोळका असतो. जरा पुढे वाणसौद्याची व पितळी भांड्यांची दुकाने लागतात आणि संध्याकाळी तर तेथे जोरात देवघेव चालू असते. साऱ्या मंडईचाच एक विचित्र आवाज—विचित्र कोलाहल वातावरणात घुमत असतो. पण त्या दिवशी आश्चर्य घडले होते. समुद्राचा नेहमी लांबून ऐकू येतो तसा मंडईचा नेहमी येणारा आवाज तेव्हा मुळीच ऐकू येत नव्हता !

टिळकांच्या पुतळ्यामागच्या मोठ्या घड्याळात मी सहज बघितले. पावणेसात झाले होते आणि मंडईची मुख्य इमारत किंचित अंधारली होती. मुख्य इमारतीत न जाता नेहमीप्रमाणे तिला वळसा घालून मागच्या बाजूला भाज्यांचे ढीग बसतात तिकडे गेलो. तेथेही गिऱ्हाईक तुरळक होते, आणि ते घाईने खरेदी करीत होते. बिजलीचे दिवे का कोण जाणे, पण बाहेरच्या बाजूला प्रकाशत नव्हते, आणि व्यापाऱ्यांनी रॉकेल तेलाच्या छोट्या छोट्या दिवट्या मालाजवळ ठेवल्या होत्या. नेहमीप्रमाणे, ‘सस्ती लावली, घ्या साहेब– गवार चार आणे शेर...चांगलं बघून खाऽ...वाणेऽर—’ इत्यादी गगनभेदी घोषणा मुळीच नव्हत्या. लोक मोठमोठ्याने बोलत नव्हते, पण त्यांची अस्पष्ट कुजबूजही भीतिदायक वाटत होती.

पालेभाज्यांचे गाळे ओलांडून बटाट्यांच्या गाळ्यांकडे वळलो, इतक्यात बाहेरून काही तरी बातमी आली असावी. त्यामुळे वातावरण अगदी गढूळ झाल्यासारखे वाटले. दुकानदार एकमेकांशी चर्चा करीत होते, त्यांच्या भुवया वक्र होऊन कपाळाला आठ्या पडत होत्या आणि गिऱ्हाइकांशी धड बोलण्याच्याही स्थितीत ते नव्हते. वातावरण जास्त गडद होत चालले आणि अगदी लहानपणापासून मी त्या ठिकाणी येत असूनही भयाची एक लाट येऊन सर्वांगावरून

घोंगावत पुढे गेली.

मी सासऱ्यांकडे बघितले. तेही घाबरल्यासारखे दिसत होते व गाळ्यांमधून झपाट्याने चालले होते. मंडईचे व्यवहार आता अगदीच साकळले होते. दुकानांच्या फळ्या धडाधड बंद होत होत्या. बाहेरच्या बाजूला बटाट्यांचे आणि फळभाज्यांचे मोठमोठे ढीग पडले होते. त्यावर दुकानदार गोणपाटे पसरीत होते. खूपसा रक्तस्राव व्हावा आणि शरीराला बधिरावस्था यावी तसे मंडईचे झाले होते.

आम्ही दोघे चाललोच होतो. ' बटाटे कसे देणार ? ', ' भाव काय आहे ?' वगैरे प्रश्न सासरे करीतच होते. मंडईतले ते नेहमीचेच प्रश्न, त्या दिवशी मात्र अप्रासंगिक वाटत होते. आम्ही विचारीत होतो, पण कुणीच उत्तर देत नव्हते.

एके ठिकाणी बटाट्यांचा उघडा ढीग दिसला. सासऱ्यांनी दुकानदाराला दबलेल्या आवाजात विचारले, " बटाटे देणार का ? " प्रथम आमचे म्हणणे त्याच्या लक्षातच आले नाही. तो घाईघाईने गल्ल्याची पेटी कुलूपबंद करण्यात आणि नोकराला हुकूम देण्यात गर्क होता. आम्ही अगतिक होतो म्हणून सासऱ्यांनी तो प्रश्न मोठ्याने विचारला. प्रश्न त्याला नक्कीच कळला व चार पायांच्या आणि पाच हातांच्या विचित्र माणसाकडे बघावे तसे त्याने आमच्याकडे टक लावून बघितले. त्या धांदलीत बटाटे मागण्याचा गुन्हा आम्हीच केला आहे, याची त्याला खात्री पटली व त्याने आठ्या घालून क्रुद्ध नजरेने – एखाद्या गलिच्छ जिवाणूकडे बघावे तसे आमच्याकडे बघितले आणि हातातला खुर्दा खळकन् पेटीत सोडीत तो म्हणाला, " जा जा ! पुढं जा – बटाटे घेताहेत लेकाचे... च्यायचे हलकट लोक ! – इतकं झालं तरी या भडव्यांची अजून जेवणं सुटत नाहीत."

तोंडासमोर उघड उघड केलेला अपमान आम्ही पचवला. अजून आम्ही काहीच खरेदी केली नव्हती आणि आताही बटाटे मिळण्याची शक्यता मुळीच नव्हती. भरल्या मंडईतील काळोखातून आम्ही चाललो असताना माझा मलाच वैताग आला. मी सासऱ्यांना म्हटले, " आपण परत जाऊ."

काहीच न बोलता ते पुढेच चालले होते. हलक्या आवाजात मी म्हटले, " आज काहीच मिळणं शक्य नाही." तरीही ते पुढेच निघाले तेव्हा मी त्यांना विचारले, " तुम्हाला काय वाटतं ? "

एकवार थांबून त्यांनी त्या अंधारातच माझ्याकडे टक लावून बघितले व ते म्हणाले, " परत जाऊन कसं चालणार ? घरात इतकी माणसं जमली आहेत, उद्या त्यांच्या जेवणाचं काय ? " असे म्हणून ते पुढे निघाले व मी आणि गडी फरपटत लोंबकळत त्यांच्या मागोमाग चाललो. इतका वेळ मी घरातील पाहुण्यांना व परवाच साजऱ्या होणाऱ्या वहिणीच्या लग्नाला पूर्णपणे विसरलो होतो. पण त्यांच्या त्या बोलण्याने एकदम ती आठवण आली व कसेसे वाटले. एवढी मोठी घटना घडलेली होती, पण आमचे सामान्यांतले सामान्य लग्नही मनाचा कोपरा अडकवून बसलेच होते, आणि संधी मिळेल तेव्हा स्वतःचे अस्तित्व दाखवीतच होते.

मधल्याच गाळ्यात आमचा नेहमीचा दुकानदार दिसला. त्याच्या पुढ्यात बटाट्यांची रास होती, पण वरून गोणपाट होते आणि प्रेत दहनभूमीवर घेऊन गेल्यावर घरात लावतात तसा बारीक मिणमिणता दिवा तेथे लुकलुकत होता. तो दुकानदार माझ्या चांगल्या परिचयाचा होता आणि कित्येक वर्षांपासून मी त्याच्याकडूनच माल घेत होतो. त्याच्या तालीमबाज, गोटीबंद शरीरावर नेहमी मलमलीचा पांढराशुभ्र नेहरू शर्ट असे आणि डोक्यावर वेलबुट्टीची रंगीत टोपी असे. मलमलीच्या सदऱ्यातून त्याच्या गळ्यातील वारकरी पंथाची माळ नेहमी स्पष्ट दिसे व तोंडावर समाधानाचे व सुखी जीवनाचे हास्य असे. पूर्वी मी नि बायको नेहमी जोडीने मंडईत जात असू त्या वेळी तो आमचे हसून स्वागत करी आणि 'किसाला बटाटे आताच न्या, पुढं महाग होतील !' असा 'बाई'ना सल्ला देई. कधी मी एकटाच मंडईत गेलो तर तराजूत माल जोखताना हसून विचारी, "आज एकटेच ! बाई नाही आल्या ? " माझी बायको एकटीच मंडईत दिसली तर, 'रावसाहेब' परगावी गेले आहेत किंवा काय, याची चौकशी केल्याखेरीज राहात नसे. माझे नाव त्याला माहीत नव्हते, त्याचेही मला नव्हते. पण आमच्या दोघांत एक प्रकारचे अतूट नाते निर्माण झाले होते.

त्या दिवशी त्याचा पोशाख नेहमीप्रमाणेच होता, पण चेहऱ्यावर तुष्टीचे किंवा संतोषाचे हास्य मुळीच नव्हते. आम्ही त्याच्याजवळ गेलो आणि काहीच झालेले नाही, वातावरण नेहमीचेच आहे असे दाखविण्यासाठी मी हसण्याचा प्रयत्न केला. पण हसू फुटलेच नाही. तो गंभीरच राहिला. आणि आम्ही एकमेकांकडे नुसतेच पाहात राहिलो.

एखादे मिनिट तसेच गेले असेल. मी त्याला अजीजीने विचारले, " बटाटे—? "

तो काहीच बोलला नाही. नुसतेच विलक्षण रीतीने त्याने माझ्याकडे बघितले, व विचारले, " आत्ता? या वेळी? "

मी सांगणार होतो की माझ्याकडे कार्य आहे. परवाच्याच दिवशी लग्न आहे आणि घरी जेवणावळ आहे. पण त्या वातावरणात कार्याचा उच्चार करायला तोंड धजेच ना. आपण काही तरी फार मोठा अपराध करीत आहोत असे एकदम वाटले. मी काहीच बोललो नाही, तेव्हा सासरेच म्हणाले,—" फार जरूर आहे. "

त्याने विचार केला व म्हटले, " बरं, द्या, किती हवेत? "

आम्ही सांगितले, " कमीत कमी दोन मण तरी लागतील. "

त्याने राशीवरचे गोणपाट दूर केले आणि बटाटे तोलू लागला. आपण काय तोलीत आहोत याची त्याला शुद्ध नव्हती आणि त्याने काय भावाने बटाटे दिले हे आम्हाला माहीत नव्हते. त्याचे माप सुरूच होते. पाच-सात मापे होऊन गड्याच्या पोत्यात पडल्यानंतर बाहेर कुठे तरी एकदम प्रचंड गलका झाला. म्हणून मी भीतीने तिकडे बघितले. लोक सैरावैरा पळत होते आणि दुकानदार तराजू थांबवून तिकडे बघत होता. इतक्यात मुंडेछाट पैरणी घातलेले दोन राकट तरुण धावत आत आले आणि दुकानदाराच्या कानाशी काही तरी कुजबुजले. त्यानंतर एकदम त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य दिसले व तो हलक्या आवाजात पुटपुटला, " आरं तिच्या—असं म्हणता? " कानात सांगणारा मनुष्य आमच्याकडे बघत मोठ्याने म्हणाला, " मग खोटं का काय? आताच कळलं. " त्यावर दुकानदाराचा चेहरा एकदम रागीट झाला. मग तो म्हणाला, " च्यामायला आता अगदी हद्द झाली या लोकांची! कुठल्या बापाचे आहेत साले कुणास ठाऊक! " त्याने तराजू एकदम थांबवला व किंचित रागाने व उद्वेगाने तो बोलला, " आता इक्तंच बास! जास्त मिळनार न्हाईत. " आम्ही त्यातूनही काही बोलणार तोच त्याने सांगितले, " तुमी आपलं घर गाठा बिगी बिगी! उगाच उभं न्हाऊ नका! "

बाहेर पळापळ वाढलीच होती आणि अंगात वीज संचारल्यासारखे त्याने दुकान आवरण्यास सुरुवातही केली होती. तिथे उभे राहणे खरोखरच धोक्याचे

होते. लढाईत पराभव व्हावा आणि शत्रुसैन्याने लुटालूट करण्यास सुरुवात करावी तसे भासत होते. बटाट्याचे ते पोते गड्याच्या डोक्यावर दिले व दुकानदाराला विचारले, “ पैसे किती द्यायचे हो ? ” त्याच्यासमोरची रॉकेलची दिवटी विझायला येऊन शेवटचे आचके देत होती. तो घाईघाईने मालाची व्यवस्था लावीत होता. पुन्हा ओरडून मी विचारले, “ पैसे किती द्यायचे हो ? ” तो सुतळीने पोते आवळीत होता व ओरडून सांगत होता, “ तुम्ही पळा बिगी बिगी. इथं ऱ्हाऊ नका. जावा. ”

मला पळणे भागच होते. पण पैसेही द्यायला हवे होते. मी खिशातून हाताला येतील तेवढ्या नोटा काढल्या व त्याच्यापुढे नोटा टाकीत म्हणालो, “ हे ठेवतो बरं. ” आणि त्याच्याकडे लक्षही न देता गड्याला मध्ये घालून मी व सासरे झपाट्याने बाहेर पडलो. समोरच्या रस्त्याने दगडू हलवायाच्या दत्ताच्या बाजूने लक्ष्मी रोडकडे निघालो. नेहमी दत्ताजवळ फुलवाल्याच्या दुकानात टपोऱ्या फुलांचे हार कडीपाटापासून खाली लोंबत असत व कलाबतूने विणलेल्या वेण्या विजलीच्या प्रकाशात सारख्या चमचमत असत. फुलाच्या दुकानासमोर पेढ्यांचे प्रसिद्ध दुकान आहे व मागच्या बाजूला सुगंधी मालाची दुकाने आहेत. माझ्या अगदी लहानपणापासून त्या रस्त्याने मी जात-येत आहे, व तेथले धावपळीचे, गर्दीचे आणि रसिकतेचे दृश्य माझ्या मनावर कायम कोरलेले आहे. माळ्याच्या दुकानातील पुष्पमालांनी, दत्ताच्या देवळात सारख्या जळत असलेल्या उदाने व धुपाने, आणि गंध्यांच्या दुकानाच्या आवतीभोवती नेहमीच घोटाळणाऱ्या देशी व विलायती अत्तरांच्या सुगंधाने त्या चौकातील वातावरण गंधमय झालेले असते. त्याच सुगंधात काका हलवायाच्या पेढ्यांची चव व मंडईकडून येणाऱ्या लोकांच्या पिशव्यांतील हिरव्यागार भाजीचा ताजेपणा मिसळला जाई. त्यामुळे तेथील वातावरण नेहमीच ऊबदार व रसपूर्ण वाटे. पण त्या दिवशी तसे काहीच नव्हते. दत्तमंदिर उघडे होते, पण त्यात भाविकांची व बघे लोकांची नेहमीची गर्दी नव्हती. काका हलवायाची व सुगंधी मालाची दुकाने तर बंदच होती आणि फुलांच्या दुकानांच्या फळ्या बंद असून फुलवाले खुंटीला टांगून ठेवलेले हार नि बाजूस लावून सजवून ठेवलेल्या जाईजुईच्या वेण्या धसाधस ओरबाडून काढत होते आणि कशा तरी टोपल्यांतून भरीत होते.

खरे तर आम्हाला या भागात थोडीफार खरेदी करायला हवी होती. वाण्याचे

सामान येऊन पडले होते. पण सुका मेवा बाहुलीच्या हौदाजवळच्या दुकानातून घ्यायचा होता. जिलबीसाठी केशर नि समारंभासाठी अत्तर-गुलाब तेथून न्यायला हवे होते. आसपासच्या गंभीर वातावरणात मला सुक्या मेव्याची व अत्तर-गुलाबाची आठवण व्हावी हे नवल होते. परंतु तशी ती झाली, हे खोटे नाही.

मनात आले, पण आता थांबण्याची सोय नव्हती. रात्र पडली होती, आणि जिकडेतिकडे धावपळ सुरू होती. बटाट्याचे ओझे संभाळणाऱ्या गड्याबरोबर मी नि सासरे कसेबसे लक्ष्मी रोडला लागलो. तिथेच नगरवाचन मंदिरापाशी कुणी तरी भेटले व त्याने विचारले,

"तुम्हाला कळलं का?"

मी म्हटले, "काय–काय कळायचं?"

"गांधींचा खून कोणी केला ते?" त्याने विचारले व माझा चेहरा तसाच पाहून तो म्हणाला, "आत्ताच बातमी आली आहे. खून नथूराम गोडशाने केला म्हणे!"

"नथूराम गोडशाने?" मी आ वासून विचारले.

"होय ना! आपल्या पुण्याच्या नथूराम गोडशाने." चटाचटा पाय उचलीत घाईने बेलबागेकडे वळत त्याने सांगितले, "घरी लवकर गेलं पाहिजे. वातावरण भयंकर 'टेन्स' आहे."

आम्हालाही लवकर घरी पोचण्याची निकड होतीच. वाहन मिळणे तशा त्या अंधारात व धावपळीत शक्यच नव्हते. गड्याला घाई करून आम्ही दोघेही पळत सुसाट निघालो व कशीबशी नारायण पेठ गाठली.

रात्रीचे आठ वाजून गेले होते, आणि वाड्यातील बिऱ्हाडांत माणसे उभी होती. नथूराम गोडशाने गांधीजींचा खून केला, ही बातमी आता सर्वतोमुखी झाली होती; आणि सोप्यावर जमून लोकांच्या त्याच चर्चा चालल्या होत्या. आमच्या घरात तर दोन दिवसांनीच लग्न होते, पण घरात लग्नासाठी जमलेली पाहुणेमंडळी खुनाविषयीच बोलत होती. जिचे लग्न होते ती माझी बहीण या वेळी खरे तर मैत्रिणींच्या गराड्यात असायला हवी होती, आणि साऱ्यांनी चिडवून तिला नकोसे करायला पाहिजे होते, पण त्या दिवशी वधू कुठे सांदीकोपऱ्याला पडली होती, आणि तिच्याविषयी बोलायचे कुणालाच जमत नव्हते.

आम्ही घाम पुसून पोते भिंतीला टेकून ठेवले व उगाच बसलो. स्वयंपाक-घरात चुलीत मोठा जाळ पेटला होता आणि मोठ्या पातेल्यात भात रटरटत होता. पत्रावळीवर पलीकडे बुंदीचे लाडू व चिवडा ओशट, मेंचट होऊन पडला होता. घरात कुणी तरी स्त्री पत्रावळी मांडीत होती, आणि मांडवात विखुरलेल्या मुलांना रागावून जेवायला बोलावत होती. परंतु एकही मूल अजून जेवायला येत नव्हते.

त्या कोलाहलाकडे बघत मी तसाच बसलो होतो. इतक्यात मुले ओरडत आली, " कुणी तरी आलं आहे. " मी बाहेर आलो आणि मला फार आश्चर्य वाटले. बाहेर खुद्द नवरामुलगा, त्याचे म्हातारे वडील व एकदोन प्रौढ माणसे उभी होती. ती माणसे भेदरलेली बावरलेली दिसत होती, आणि त्यांच्या अंगावर अगदी साधे, मळखाऊ, घरीच धुतलेले कपडे होते. कुणाच्याच तोंडावर मुळी देखील लगिनकळा दिसत नव्हती. लग्नघरची ती माणसे अंत्यविधीच्या मिरवणुकीत शोभावी तशी दिसत होती.

त्यांना मी ' या-बसा ' केले. नवऱ्यामुलाने खरे तर लग्नाअगोदर वधूगृही जायचे नसते. पण नाइलाज म्हणून तोही आला होता. कोणीच बसले नाहीत. मीही उभाच होतो व माझ्या मागे आमची वऱ्हाडी मंडळी व बायका उभ्या होत्या. मी विचारले, " का आला होता ? "

नवरदेव म्हणाला, " उद्याचं ठरवायला आलो होतो. "

" उद्याचं काय ठरवायचं ? "

" ठरवायचं इतकंच ! " मुलाचे वडील म्हणाले, " परिस्थिती सारखी पालटत आहे. गावात मारामाऱ्या सुरू आहेत. उद्या काय होईल कुणाला ठाऊक?"

" अहो, काही होत नाही. तुम्ही स्वस्थ राहा." एकजण उसन्या उत्साहाने म्हणाला.

" पण मला वाटतं, आपण लग्नाच्या मिरवणुका वगैरे रद्द कराव्या. नुसतंच लग्न लावून घ्यावं. " मुलाने सुचविले.

" माझी हरकत नाही. " मी हसून म्हटले, " पण मग लग्न तुम्हाला पाहिजे तसं थाटात व्हायचं नाही. "

" थाट कसला कपाळाचा घेऊन बसलात हो ? लग्न लागलं तरी खूप झालं." मुलाचे वडील हताशपणे म्हणाले. " आता या बाबाला मरायला अगदी

हीच वेळ सापडली !—आपलं नशीब, दुसरं काय ? "

त्यांची मिरवणुका न काढण्याची सूचना मी मान्य केली व माझ्या वडिलांकडे पाहिले. त्यांनी हसून संमती दिली व विचारले, "मग उद्या तुमच्याकडचं व्याहीभोजनही 'कॅन्सलच' असेल ?"

"ते काय म्हणून ?" मुलाच्या वडिलांनी विचारले.

वडील पुन्हा हसले—'सिनिकली' हसले व म्हणाले, "एवढा राष्ट्रपित्याचा खून झाला आहे आणि तुम्ही जेवणं झोडणार ?" ते थट्टेने बोलत होते की खरे बोलत होते हे कळणे खरोखरच मुश्कील होते. मी काहीच बोललो नाही. पण व्याहीच निक्षून म्हणाले, "नाही हो ! उद्या तुम्ही जेवायला याच. घरातल्या घरात जेवायला हरकत नाही."

त्यांना पोचवण्यासाठी घराबाहेर पडून थेट मारुतीच्या देवळापर्यंत मी गेलो. मुलाचे वडील म्हातारे होते. चालताना त्यांचे पाय थरथरत होते. त्यांना पुरंदरे कॉलनीत घेऊन जायला वाहन मिळाले असते तर हवे होते. पण त्या काळरात्री ते शक्यच नव्हते. कोपऱ्यावर मारुतीच्या देवळामागे, बोळकांडीच्या तोंडाशी तालीमबाज तरुणांचे एक टोळके उभे होते. ते आळीतले नेहमीचेच लोक होते; पण त्यांच्या नजरा फिरल्या होत्या. कपाळावर आठ्या होत्या व महारोग्याकडे बघावे तसे ते आम्हा सर्वांकडे बघत होते. मी कोपऱ्यावरून त्यांना निरोप दिला आणि बराच वेळ थरथरत्या पायांनी मार्ग कापणाऱ्या वरपित्याकडे बघत उभा राहिलो. शेवटी ते अस्पष्ट दिसायला लागले तेव्हा घरी परतलो आणि सोप्यावर जाजम घातले होते त्यावर झोपून गेलो.

सकाळी उठून कसाबसा चहा घेतला व रस्त्यावर येऊन पेपर विकत घेतले. साऱ्यांमध्ये खुनाच्याच बातम्या होत्या ! खून कसा झाला ?...कुणी केला ?... गांधीजी मृत्युसमयी 'हे राम' हे शब्द कसे म्हणाले ?...आणि शेवटी गोळ्या लागून धरणीवर कसे कोसळले !...हेच सारी वर्तमानपत्रे ओरडून सांगत होती. हातात काठी घेतलेले, हसऱ्या चेहऱ्याचे गांधीजी साऱ्याच वृत्तपत्रांच्या अग्र-भागी होते आणि त्यांचा वृत्तात सर्वत्र दिला होता. पहिल्या पानावरच्या या बातम्या वाचून आतल्या पानावरील बातम्यांकडे लक्ष गेले तेव्हा भीती वाटल्या-शिवाय राहिली नाही. कुठे कुठे राजकीय पक्षांमध्ये चकमकी झाल्याच्या बातम्या होत्या, कुठे घरे पेटवून दिल्याच्या, मारहाण झाल्याच्या वार्ता होत्या,

तर कुठे लोकांनी भावनेच्या आहारी न जाता नेहमीचे व्यवहार शांतपणाने करावे, असे पुढाऱ्यांचे आवाहन होते.

मंडपात बसून त्या बातम्या वाचल्या व थरकाप उडाला. आजचा दिवस कसा पार पडणार याविषयी मनात चिंता उत्पन्न झाल्याशिवाय राहिली नाही. प्रत्येकजणच भयभीत होता. परंतु दुसरा भिऊ नये म्हणून उगाचच खोटे अवसान आणीत होता.

तशाच अवस्थेत आंघोळी झाल्या, आणि देवदेवक बसविण्यासाठी गुरुजी आले. नेहमी ते मोठ्याने बोलत येत, घाई करीत व 'वहिनीं'ना अजून तयारी न झाल्याबद्दल दोष देत. पण त्या दिवशी गुरुजी अगदी स्तब्धपणे आले व काहीच न बोलता मांडवात पाट मांडून देवकाची तयारी करायला लागले. त्यांची तयारी झाली आणि मी नेहमीच्या जांभळ्या रंगाचा पितांबर नेसून बायकोसह पाटावर बसलो. त्यांनी 'केशवाय नमः नारायणाय नमः' सांगायला सुरुवात केली. नेहमीच्या कार्यांत देवकाच्या वेळी सनई व चौघडा झडत असतो. सुस्नात झालेल्या उंची कपड्यांनी नटलेल्या स्त्रिया आसपास घोटाळत असतात. अहेरांची गर्दी असते आणि थट्टामस्करीला व हसण्याखिदळण्याला ऊत आलेला असतो. पण त्या दिवशी साराच व्यवहार सुतकी होता. गुरुजींच्या मंत्रोच्चारातील नेहमीचा जोर किंवा लय मुळीच नव्हती. म्हणायला हवेतच म्हणून ते मंत्र म्हणत होते, इतकेच!

देवक बसवले आणि बातम्या यायला लागल्या. गावातले इतर नातेवाईक आले आणि काहीबाही सांगायला लागले. कोणी सांगे, पूर्वभागात जंगी मारामारी झाली व रस्त्यावर चार माणसे भोसकली गेली. कोणी सांगे, सारी सदाशिव पेठ पेटवून देण्याचा आज लोकांचा विचार आहे. ते सारे ऐकल्यावर मनःस्वास्थ्य बिघडून जाई. आजचा व उद्याचा दिवस कसा पार पडणार हीच चिंता मनात ठुसठुसत राही.

साडेअकरा-बारा वाजले. मी व बायको रेशमी कपडे घालून व्याही-भोजनासाठी पुरंदरे कॉलनीकडे टांग्यातून निघालो. त्या दिवशीच्या पुण्याच्या रस्त्याचे स्वरूप खरोखरच विलक्षण होते. बालपणापासून मी पुणे बघितले होते. अनेक प्रसंग घडलेले तेथे पाहिले होते. परंतु मला पुणे तसे कधीच दिसले नव्हते. माणसे त्या दिवशी उघडी-बोडकी उदासपणाने हिंडत होती, आणि त्यांच्या

चेहऱ्यावर पोरकेपणा आला होता. हलक्या आवाजात ती एकमेकांशी कुचकुचत होती, व त्यांच्या बोलण्याचा संमिश्र आवाज भयप्रद वाटत होता.

टांगा चालतच होता. रेशमी कोरे कपडे घालून लग्नाचे जेवायला आम्ही चाललो होतो. माझ्या अंगावरील रेशमी नेहरू शर्टकडे आणि बायकोच्या अंगावरील शहापुरी लुगड्याकडे व दागिन्यांकडे बघताना उदासच वाटत होते. नवीन कपडे व सुवर्णालंकार विसंगत वाटावेत, अंगाला टोचावेत असाच तो दिवस होता.

नागनाथाच्या पारावरून पुढे निघून टांगा भिकारदास मारुतीकडे निघाला, आणि त्या अरुंद व नेहमी शांत असलेल्या रस्त्यावरील गर्दी एकदम वाढली, लोक कंपू-कंपूने उभे होते आणि मोठमोठ्याने ओरडत होते. खून करण्यापूर्वी माणूस दिसावा तसा तो जनसमूह दिसत होता.

टांगा पुढे चालला होता आणि आम्ही आसपास बघत होतो. गर्दी जास्तच वाढली होती व लोक उघड उघड प्रक्षोभक बोलत होते. भिकारदास मारुतीपाशी एका हिंदुत्वनिष्ठ वृत्तपत्राचा छापखाना होता, त्याच्याभोवती लोक जमले होते आणि लुटालुटीला व मोडतोडीला प्रारंभ झाला होता. छापखान्यात मालक वा संपादक कोणीच नव्हते ! नोकरवर्गही नव्हता. फक्त चिडलेले, बेभान झालेले लोक त्या इमारतीभोवती उभे राहून अद्वातद्वा ओरडत होते. किंचित कुठे जाळपोळीला सुरुवात झाली होती, व नवे कपडे आणि अलंकार घालून आम्ही टांग्यातून पुढे चाललोच होतो.

टांगा छापखान्याच्या समोरून जात असताना मी खालच्या मानेने तिकडे बघितले. ती नेहमीची ओळखीची इमारत विद्रूप झालेली दिसत होती. इमारतीचा एक भाग पेटल्यामुळे मंदसा धूर येत होता. तावदाने फुटून काचा जिकडे-तिकडे झाल्या होत्या, व कंपोझिंगचे खिळे आणि यंत्राचे सुटे भाग रस्त्यावर विखुरले होते. बलात्कार करून मूर्च्छित स्त्रीला रस्त्यावर फेकून द्यावे तशी ती छापखान्याची इमारत दिसत होती. आणि आम्ही पुढे चाललोच होतो. आमच्या अंगावरील नवे कपडे आणि बायकोच्या नाकातील नथ व गळ्यातील मोहनमाळ सूर्यप्रकाशात चमकत होती. त्या साऱ्या वातावरणात आमचे जोडपे विचित्र दिसत होते.

ती गर्दी एकदाची संपली आणि पुरंदरे कॉलनीतील बंगल्यात आम्ही दाखल

झालो. लोक आमची वाटच पाहात होते, आणि जेवणाची सारी सिद्धता होती. आत गेलो व काही वेळ उगाच बसलो. पुरंदरे कॉलनीच्या बाजूला सर्व शांत होते. गावात चाललेल्या गदारोळाची तिथे छायाही नव्हती. तिथे खरोखरच बरे वाटत होते.

हातपाय धुतले व सोवळे नेसून मधल्या घरात आलो. जेवणाचा थाट अस्सल पुणेरी होता. नक्षीदार फुलाफुलांचे पाट होते. सव्वा हात केळीची पाने होती आणि पानाभोवती तऱ्हेतऱ्हेच्या रांगोळ्या घातल्या होत्या. लग्नप्रसंगी थट्टामस्करी चालते तशा गोष्टी व मंद हसणे सुरू होते.

जेवणे सुरू झाली. मसालेभात संपवून आम्ही जिलबीपर्यंत आलो. " स्वस्थ होऊ द्या !–उशीर फार झाला आहे ! " वगैरे सांगणे झाले. काही वेळ जेवणे गमतीत चालली. आणि क्षणभर असेही वाटले की खुनामुळे उत्पन्न झालेले ढग वितळले आहेत व स्वच्छ ऊन पडले आहे. जेवत असताना मुलाची आई दरवाज्यात येऊन उभी राहिली व माझ्याकडे बघून म्हणाली, " स्वस्थ होऊ द्या हो. कालपासून ही मेली कटकट उपटली आहे. निवांतपणा जरा देखील नाही. "

मी हसलो नि त्यांच्याकडे पाहिले. मला बरे वाटले. लग्न त्या बाईंना थाटात करायचे होते. मिरवणुकीचा दणका उडवून द्यायचा होता. मिरवणुका आता शक्य नव्हत्या. पण इतर थाटामाटात काही उणीव पडण्याचे कारण नव्हते. त्यांची हौस होणार होती यातच मला समाधान होते.

जेवणे निम्मी झाली आणि वातावरण खूपच उमलले. सकाळपासून अवघडल्या-सारखे वाटत होते ते मोकळे वाटायला लागले. इतक्यात लांबून कुठून तरी बंदुकीचे ठो ठो असे आवाज आले, आणि भरल्या पानांवरून आम्ही परस्परांकडे बघितले. काही बोललो नाही, पण जेवणे रेंगाळत राहिली.

दोनचार क्षण तसेच गेले आणि पुन्हा तेच आवाज व खूपसा गोंगाट ऐकू आला. रस्त्यावरून अनेक लोक धावत दौडत गेले. आता जेवणे शक्यच नव्हते. भात न घेताच आम्ही सारे उठलो, व सोवळे नेसलेलेच बाहेर येऊन उभे राहिलो. त्या बंगल्याच्या डाव्या बाजूला दूरवर भिकारदास मारुतीचा रस्ता होता, आणि उजव्या बाजूला स्वारगेटला जाणारा रस्ता होता. भिकारदास मारुतीकडून धुराचे लोट येत होते, व लोक जीव घेऊन सैरावैरा पळत होते. रस्त्याने पळणाऱ्या

एकाला मी विचारले, " काय झालं ? "

न थांबता पळतच त्याने सांगितले, " छापखान्याला आग लागली... पोलिसांनी गोळीबार केला– दोन माणसे मेली. एवढ्यात पळणाऱ्या माणसांपैकी कोणाचे तरी आमच्या सोवळ्याकडे लक्ष गेले. तो दातओठ खात म्हणाला, " च्यायला ! ही भटं अजून जेवत्यातच की ! " आणि मग हेल काढून ओरडला, " कढी आंबट...बाळंभट...! " आम्हाला एकदम भय वाटले, व आत जाऊन सोवळी सोडून दुसरे कपडे घातले, व उघड्या अंगाने पुन्हा बाहेर येऊन उभा राहिलो.

मागून दुसरे लोक पळत होते. टिळक रस्त्यावरून मोठमोठे ट्रक चालले होते. त्यांत केसांच्या झिंज्या झालेली विद्रूप माणसे उभी होती व ती मुठी आवळून प्रक्षोभक घोषणा देत होती. त्या बंगल्याच्या समोरच्या एरवीच्या शांत रस्त्यावरून अनेक लोक पळत होते व बातम्या पुरवीत होते. गोळीबारात पाच माणसे मेल्याचे कोणी बोलत होते, कोणी दहा म्हणत होते, तर कोणी सारे पुणे जळून खाक झाल्याची बातमी ऐकवीत होते.

हळूहळू दुपारचे अडीच-तीन झाले व गलका वाढला. कुठेतरी लागलेल्या आगीमुळे काळ्या धुराचे लोट आकाशात दिसायला लागले. दुसऱ्या दिवशी आमच्याकडे लग्न होते. संध्याकाळी सीमांत-पूजन व्हायचे होते. पण ते सारेच विसरले गेले.

इतक्यात गावातील घराकडून सासरे आणि गोविंदराव धावतपळत धापा टाकीत आले. सासऱ्यांचे सारे शरीर थरथरत होते. ते म्हणाले, " काही तरी ठरवायला पाहिजे. "

" काय ठरवायचं " मी विचारले.

" गावात जाळपोळ आणि दंगल सुरू आहे. लग्न कसं करायचं हेच ठरवायला पाहिजे. " ते म्हणाले व हलक्या, भीतिग्रस्त आवाजात पुटपुटले, " हे लग्न होणं मुश्कील आहे. "

त्यांचे शापवाणीसारखे बोलणे माझ्या मनात जोराने घुसले व आतल्या आत रक्तस्राव व्हावा तसे वाटले. ते म्हणत होते, " लग्न होणं मुश्कील आहे– लग्न होणं कठीण आहे."

दोनतीन वर्षे खटाटोप करून मी लग्न जमविले होते आणि ऐन मुहूर्तावरच

हा घोटाळा उडाला होता. मी इकडेतिकडे पाहिले, तर आसपास बसलेल्या साऱ्यांच्याच चेहऱ्यावर व दृष्टीत तेच वाक्य लिहिले होते आणि साऱ्यांचेच चेहरे सांगत होते की लग्न मुश्कील आहे.

लग्न मुश्कील आहे म्हणणे सोपे होते, पण त्याचे परिणाम फार भयंकर होते. चिठ्या काढून बसलो होतो. नातेवाइकांना, आप्त-इष्टांना अक्षत दिली होती. मुहूर्त ठरला होता आणि लग्न न होते तर ते पुन्हा त्या ठिकाणी होण्याची शक्यता नव्हती. कदाचित मुलाकडच्या माणसांना ठरलेल्या मुहूर्तावर लग्न न होणे अशुभ वाटले असते आणि पुढे त्याच मुलीशी लग्न करण्यास त्यांनी नकारही दिला असता. छे ! तसे होणे अगदीच वाईट होते. आसपास फजिती झाली असती. मुलीच्या आयुष्यावरही भयंकर परिणाम झाला असता. काहीही करून हे लग्न व्हायलाच पाहिजे होते ! गांधींचा खून झाला असला तरी- गावात दंगल असली, गोळीबार असले- माणसे मरत असली आणि घरे पेटत असली तरीही-होय तरीही हे लग्न व्हायलाच पाहिजे होते.

आमचा विचारविनिमय चाललाच होता. गावातली दंगल वाढत चालली होती, आणि त्याच रात्री कर्फ्यू पुकारली जाणार असे बोलले जात होते. आमचा विचार चालला होता. शेवटी गोविंदरावांनी तोड काढली. ते म्हणाले, " मुलाला व इतर माणसांना मोटारीत घालून आत्ताच नारायण पेठेतल्या घरी न्यावं. तो वाडा मोठा आहे आणि आतल्या बाजूस खूप जागा आहे. कार्य तिथं होणं शक्य आहे."

कल्पना चांगली होती व नवऱ्यामुलाने तिला मानेनेच रुकार दिला. त्याच्या वडिलांनीही संमती दिली. मी मग दरवाज्यात उभ्या असलेल्या मुलाच्या आईकडे बघितले. त्यांना लग्न थाटात करायचे होते व मुलगा बँड आणि चौघडा लावून वाजतगाजत मिरवायचा होता. त्या तशा परिस्थितीतही मला त्यांच्याकडे बघताना गंमत वाटली आणि मी विचारले, " तुम्हाला काय वाटतं ? "

बाई थंडपणे, विरक्तपणाने उभ्याच होत्या. लहान मुलाची समजूत घालावी तसे सारे लोक घरी चलण्याविषयीचे महत्त्व पटवून देत होते. त्यांना पटत नव्हते. अनेक वर्षे मनाशी रंगवलेले त्यांचे मुलाच्या लग्नाविषयीचे स्वप्न सारेच भंगले होते; पण त्यांना पटवून घेणे भाग पडले.

त्यांनी मान्यता दिल्यावर मंडळी तिकडे कशी न्यायची याचा विचार सुरू

झाला. जी सडी मंडळी होती व पोरेसोरे होती त्यांना चालत पण सावधपणे नारायण पेठेत जायला सांगितले आणि आम्ही वाहन मिळविण्यासाठी बाहेर येऊन उभे राहिलो. त्या धुमश्चक्रीत कोणतेही वाहन दिसतच नव्हते. एक टांगा एस. पी. कॉलेजपाशी होता, पण कितीही पैसे दिले तरी तो गावात येण्यास तयार नव्हता. शेवटी कुणी तरी जाऊन एका खासगी मोटर ड्रायव्हरची विनवणी केली. मालकाच्या अपरोक्ष पंधरा रुपये देण्याच्या बोलीवर त्याने नारायण पेठेपर्यंत एक ट्रिप करायचे कबूल केले व लोकांनी त्याला बाबा-पुता करून बंगल्यासमोर आणून उभे केले.

मोटर ड्रायव्हर सारखी घाई करीत होता, आणि नवरदेव व त्याचे वडील काय सामान बरोबर घ्यावे याचा विचार करीत आत बसले होते. पाचदहा मिनिटे बाहेरून मोटरचा हार्न वाजविल्यानंतरही नवरदेव बाहेर येईनात. तेव्हा मी आत गेलो व चिडक्या स्वरात विचारले, " काय झालं हो ? "

ते नवे कपडे ट्रंकांतून भरीत होते. माझ्याकडे न बघताच ते म्हणाले, " कपड्यांच्या एवढ्या ट्रंका भरतो नि निघालोच. "

मी काही बोलणार इतक्यात मोटरचा हॉर्न मोठ्याने वाजला; व सासरे बाहेरून तरातरा आत येऊन ओरडले, " चला लवकर. "

कुणीच काही बोलले नाही तेव्हा ते पुन्हा ओरडले, " अहोऽ आता तसेच चला !...नुसत्या अंगावरच्या कपड्यांनिशी चला ! साडेपाच वाजले. सातला कर्फ्यू सुरू आहे. "

इतक्यात बाहेरून मोटरीचा हॉर्न वाजला व रस्त्यावरून कुणाची तरी धावपळ झालेली ऐकली. मी एकदम आत गेलो व नवऱ्यामुलाचा हात धरून त्याला बाहेर नेत म्हटले, " तुम्ही तसेच चला बघू. "

" अहो पण–मला कोट तरी घालू द्या. "

" कोट नको नि टोपी नको ! तसेच चला ! तिथे बघू. "—मी म्हटले, व सुरकुत्या पडलेल्या पायजम्यावर व छातीवर भोके असलेल्या गंजीफ्रॉकवरच त्याला बाहेर काढले, आणि मोटरीत बसविले. त्याच्या वडिलांना दुसऱ्या लोकांनी नेसत्या वस्त्रानिशीच बाहेर आणले. गाडीत फक्त चार जागा होत्या. नवरदेव व वरपिता अंगावरच्या पारोश्या कपड्यांनी मोटरीत बसले. मीही बसावयाला हवे होते व वृद्धावस्थेमुळे सासऱ्यांनाही बसणे भाग होते. आम्ही चौघे बसल्यानंतर

मोटर गच्च भरली व मी नवऱ्यामुलाकडे बघून म्हटले, "आणि तुमच्या मातोश्री ?"

आई खालीच अनवाणी उभ्या होत्या. त्यांचे तोंड उतरले होते. स्वतःच्या मुलाच्या लग्नाची ही अशी मिरवणूक बघताना त्यांच्या डोळ्यांतून पाणी येत होते. मी विचारले, "तुम्ही कशा येणार ?"

प्रश्न विचारला होता, पण त्याला उत्तर नव्हते. मोटरीत चारच जागा होत्या आणि त्या भरलेल्या होत्या. माझी बायको तिथेच उभी होती. ती पुढे झाली व म्हणाली, "त्या नि मी मागून येतो चालत. तुम्ही जा." इतके बोलून तिने सारे दागिने अंगावरून काढून एका रुमालात बांधले. तो रुमाल तिने माझ्याजवळ दिला व म्हटले, "जपून न्या."

मोटर लगेच सुरू झाली आणि मी बाजूच्या काचेतून अनवाणी उभ्या असलेल्या वरमाईकडे बघितले व बायकोला ओरडून म्हटले, "तुम्ही नीट या. गल्ल्यांतून किंवा आडरस्त्यांतून येऊ नका." तिने मानेने होकार दिला. तोपर्यंत मोटर गल्लीच्या टोकाशी जाऊन झपाट्याने वळलीदेखील होती.

गर्दीतून नि गोंधळातून घरी पोचेपर्यंत सहा वाजले होते. आम्ही नवरदेवाला व त्याच्या वडिलांना घेऊन आत गेलो; व शेजारच्या बिऱ्हाडातील एका खोलीत उपऱ्यासारखे त्यांना नेऊन बसविले. त्या खोलीत खुर्च्या-टेबले तर नव्हतीच, पण बसायला जाजम किंवा घोंगडीही नव्हती; केरही काढलेला नव्हता. पण त्यांना तसेच जमिनीवर बसवून मी बाहेर आलो.

एव्हाना पुरंदरे कॉलनीतून पायी निघालेली मंडळी मजल दरमजल करीत कशीबशी नारायण पेठेत येऊन पोचली होती. मुलाची आई आली आणि तिलाही त्या बारक्या अव्यवस्थित खोलीत बसावे लागले. नवरदेव आणि त्याचे आईबाप त्या अनोळख्या अपरिचित जागी रेल्वेफलाटावर किंवा धर्मशाळेत बसावे तसे अंग चोरून केविलवाणेपणाने बसले होते.

मुलाला घरी आणले आणि साऱ्यांना हायसे झाले. वातावरणाचा मनावरील ताण एकदम कमी झाला. लोक हसून-खेळून मोठ्याने बोलायला लागले. आता मुलगा होता आणि मुलगीही होती. मग लग्नाला दुसरी कोणतीच अडचण नव्हती. त्यानंतर पातेलेभर चहा झाला, आणि तो पिऊन जास्तच तरतरी आली. किटलीत चहा घेऊन मी नवऱ्यामुलाच्या खोलीत गेलो. दिवा लावला आणि त्यांना चहा

दिला. ते तिघेही मुटूमुटू चहा पीत होते व मुळीच बोलत नव्हते. त्यांच्याकडे बघून मला कसेसेच वाटले. मी मुलाच्या बापाला म्हटले, " तुम्ही संकोच करू नका. अहो, प्रसंग काय सर्वांवरच येत असतात."

इतक्यात बायको तिथे आली, आणि मुलाच्या आईला घेऊन कोपऱ्यात बोलत बसली. काठी टेकीत वडील आले व नवऱ्यामुलाची थट्टा करीत म्हणाले, " काय जावई ! कसं काय आहे ? " कुणी हसले नाही, पण वडीलच खो खो हसून पुढे म्हणाले, " अहो, हे लग्न तरी गमतीचंच आहे ! छे बुवा ! इतकी लग्नं बघितली पण नवऱ्यामुलाला पळवून आणलेलं हे पहिलंच लग्न ! " आता वातावरणाचा ताण आणखीनच कमी झाला होता. त्यामुळे सगळेच लोक मौजेने हसले. मुलाचे वडीलही हसले व म्हणाले, " इतके दिवस विवाहाचे आठ प्रकार आहेत असं ऐकत होतो. पण संस्कृत शास्त्रकारांनाही न सुचलेला असा हा नववा प्रकार आहे."

आम्ही सारे हसत होतो. थट्टा-मस्करी चाललीच होती. कर्फ्यू सुरू व्हायला अजून तासभर तरी अवकाश होता. संचारबंदी जारी होण्यापूर्वी पोलिसांच्या काळ्या मोटरी रस्तोरस्ती हिंडायला लागल्या होत्या. ठिकठिकाणी हत्यारी पोलिस नेमण्याचे काम चालू होते. खिडक्यांत उभे राहून आम्ही पोलिसांच्या तुकड्यांकडे व संधिप्रकाशात चमकणाऱ्या त्यांच्या बंदुकींकडे आणि बायोनेटांकडे बघत उभे होतो.

पाचदहा मिनिटे तशीच गेली. आम्ही स्वस्थ होतो. इतक्यात सोप्यावरून नगरच्या आत्याबाई खोकत खोकत आत आल्या व मला बघितल्यावर मोठ्याने म्हणाल्या, " अरे ! भटजी कसे आले नाहीत ? "

भटजी नाहीत हे कुणाच्याच लक्षात नव्हते. नवरानवरी जाग्यावर होती यातच सारी खूश होती. भटजींची अनुपस्थिती कुणालाच जाणवली नव्हती. आम्ही काहीच बोलत नाही हे बघितल्यावर त्याच बोलल्या, " भटजी नाहीत, मग कसं व्हायचं ? कुणाला तरी त्यांना बोलवायला पाठवा ! "

त्यांचे म्हणणे खरे होते. मी भावाकडे बघितले. तेव्हा तातडीने उठत तो म्हणाला, " मी जातो सायकलवर. त्यांना घेऊन येतो." भटजी चित्रशाळेच्या चौकात राहात होते. त्यांच्याकडून जाऊन यायला फार तर पंधरा मिनिटे लागली असती. मी घड्याळात बघितले तेव्हा सहा दहा झाले होते. आणि कर्फ्यू सुरू

व्हायला अजून पन्नास मिनिटे अवकाश होता.

भावाची वाट बघत आम्ही दहापंधरा मिनिटे बसलो. तो सायकलीवरून धापा टाकीतच आला व ओरडून म्हणाला, " भटजी येत नाहीत."

मी दरवाज्यात आलो व विचारले, " का ? "

" त्यांच्या तिकडे दंगल सुरू आहे. ते कसे येणार ?– अशा अडचणीच्या वेळी पुरुषांनी घराबाहेर राहणं बरं नाही असं ते म्हणाले."

मी सुन्न झालो. आसपासचे लोक तसेच भकास चेहऱ्याने उभे होते. मी प्रश्न केला, " आता काय करायचं ? "

कुणी तरी पुटपुटले, " नाही तर लग्न ' पोस्तपोन् ' करा. भटजीच नाहीत तर लग्न कसं होणार ? "

ती कल्पना मला मंजूर नव्हती. लग्न मुहूर्तावर – ठरलेल्या मुहूर्तावर झाले पाहिजे असा माझा आग्रह होता. मी ओरडलो, " ते शक्य नाही."

दुसऱ्या कोणीतरी म्हटले, " नाही तर लग्न ' टाळीवर ' लावावं. नवरा-नवरीचे हात हातात द्यावे, साखर वाटावी आणि टाळ्या वाजवाव्या. म्हणजे झालं लग्न. त्यात भटजी कशाला ? "

वडील मोठ्याने हसले आणि म्हणाले, " टाळीवर लावण्याच्या लग्नाची कल्पना चांगली आहे. मागे सत्यशोधक चळवळीच्या वेळी साताऱ्याकडे भटजीशिवाय अशीच लग्नं होत."

भटजीशिवाय–शास्त्रोक्त व विधिपूर्वक मंत्रपठणाशिवाय लग्नाची कल्पना मला चमत्कारिक वाटली. प्रत्येक कार्याच्या वेळी ते विशिष्ट स्वर, तो मंत्रध्वनी कानांवरून गेल्याशिवाय मला बरेच वाटत नाही. मी नुसताच बसलो होतो. कुणीच काही बोलत नव्हते. घड्याळाचा काटा मात्र जोराने साताच्या आकड्याकडे धावत होता. इतक्यात आत्याबाईच ओरडून म्हणाल्या, " अरे, नुसते आकड्याकडे बघत काय बसलात ? भटजींकडे जाऊन त्यांना घेऊन या. इतक्या दिवसाचे भटजी नि आयत्या वेळी येत नाहीत म्हणजे काय ? "

मला ते पटले व प्रयत्न करून बघण्याचे ठरवले. घड्याळात सहा वीस झाले होते. अजून चाळीस मिनिटे अवकाश होता. भावाची सायकल मी बाहेर काढली आणि दामटीत चित्रशाळेपाशी भटजींच्या घरात येऊन उभा राहिलो. त्यांनीच माझी मुंज लावली होती व मला विधिपूर्वक मंत्रदीक्षा दिली होती. माझ्या लग्नात

तेच होते आणि माझ्या बायकोला 'हाताला हात लावण्यास' त्यांनीच सांगितले होते. 'नातिचरामि नातिचरामि नातिचरामि' हा मंत्र त्यांनीच त्रिवार जपून घेतला होता. अनेक सत्यनारायण, एकादष्ण्या व लघुरुद्र त्यांच्याच हातून झाले होते. त्यांचे घर मला मुळीच परके नव्हते.

सायकल भिंतीला टेकवून मी आत गेलो. वृद्ध, साठी उलटलेले गुरुजी उघड्या अंगाने तिथेच उभे होते. मी कशासाठी आलो आहे हे त्यांना माहीत होते. परंतु तरीही निर्विकार चेहरा करून त्यांनी विचारले, "का आला होता ?"

"तुम्हाला बोलवायला ! उद्याचं लग्न आहे, माहीत आहे ना ?"

क्षणभर ते तसेच उभे राहिले व म्हणाले, "येणं शक्य व्हायचं नाही. गावात जाळपोळ आहे, केव्हा काय होईल त्याचा नेम नाही." इतके बोलून ते थांबले, व हलक्या आवाजात पुटपुटले, "त्यातून आमचं भिक्षुकाचं घर ! आम्हाला जपायला पाहिजे."

त्यांचे म्हणणे खरे होते. पण ते येण्याची निकडही तितकीच होती. अजीजीच्या स्वरात मी बोललो, "तुम्ही यायलाच पाहिजे. तुम्हीच नाही म्हणजे लग्न कसं होणार ? पुढेही कदाचित ते होणार नाही. एका मुलीच्या आयुष्याचा हा प्रश्न आहे."

काही वेळ त्यांनी विचार केला. मुलीचे लग्न व्हावे असे त्यांनाही वाटत होते. तेही बाप होते आणि संसार करून पिकले होते. शिवाय जिचे लग्न होते, ती माझी बहीण त्यांनी अगदी लहानपणापासून बघितली होती. लाळ गळताना, रांगताना, दुडूदुडू चालताना त्यांनी तिला पाहिले होते. तिची सारी वाढ अवलोकिली होती. कुणास ठाऊक ! त्या प्रसंगाने त्या वृद्धाच्या डोळ्यांपुढून माझ्या बहिणीची बालपणापासूनची अनेक रूपे तरळून गेली असतील.

मी अजीजीने म्हणतच होतो, "चला तुम्ही. अहो, लग्न मोडून कसं चालेल ? ती मुलगी जन्मोजन्म तुम्हाला दुवा देईल." त्यांचा चेहरा एकदम प्रकाशला. ते म्हणाले, "खरं आहे ! तुमचं म्हणणं खरं आहे. लग्न मोडलं तर वाईटच होईल." असे म्हणून ते थांबले व थोडा विचार करून त्यांनी सांगितले, "मी स्वत: येत नाही, पण दोन मुलगे देतो. तुम्हाला दोन बाजूचे दोन पाहिजेत ना ?" आणि ते ओरडले, "अरे लक्ष्मण–महादेवा, यांच्याबरोबर जा बरं." थोड्याच वेळात दर्भ-समिधा, घटकापात्र व पळी-भांडे घेतलेले उघड्या अंगाचे आणि

बोडक्या डोक्याचे लक्ष्मण आणि महादेव आले व आम्ही घराबाहेर पडलो. मी घड्याळात पाहिले, सातला दहाच मिनिटे कमी होती–दहाच मिनिटे कमी होती. दहा मिनिटांनंतर कर्फ्यू जारी होऊन शहराच्या नाड्या आवळल्या जाणार होत्या –दहाच मिनिटे बाकी होती.

ते दोघे बरोबर असल्यामुळे मला सायकल हातात धरून पळणे भाग होते. मी सायकलबरोबर चालत पुढे निघालो आणि त्या दोन भटजींना म्हटले, "पळा! लवकर पळा! दहा मिनिटांत घर गाठायचंय." हातात दर्भ घेतलेले उघडेबोडके भटजी पुढे पळत होते, आणि मी अंग आणि सायकल सावरीत त्यांच्या मागोमाग धापा टाकीत चाललो होतो. भानुविलास थिएटर सुटले, उजव्या बाजूला वळून आम्ही पत्र्या मारुतीपाशी आलो. पण अजून घर लांबच वाटत होते, व कर्फ्यूला तर पाचच मिनिटे होती.

रस्ते निर्मनुष्य होत होते. ठिकठिकाणी पोलिस शिपाई आणि हत्यारी सैनिक सज्ज होते आणि त्यांच्या बुटांचा खाडखाड आवाज येत होता. पोलिसांच्या काळ्या गाड्या फिरत होत्या. त्यावर मोठमोठे कर्णे लावलेले होते, आणि पुढच्या बाजूस बसलेला राकट चेहऱ्याचा पोलिस हातात कर्णा घेऊन ओरडून सांगत होता, "कर्फ्यू जारी झाली आहे–कर्फ्यू जारी आहे. लोकांनी घरात जावे. रस्त्यावरून हिंडू नये." पोलिसांची लाऊड स्पीकर असलेली मोटर पुढे जातच होती. पण कर्फ्यू जारी झाली आहे हे भीतिदायक व जरबेच्या स्वरात उच्चारलेले शब्द वातावरणात रेंगाळतच होते. घरांची दारे व खिडक्या पटापट लावली जात होती. बायका-मुले, वादळाच्या वेळी पक्ष्यांनी डोळे मिटून वृक्षाच्या ढोलीत बसावे तशी घराघरांतून चुपचाप बसली होती. त्या रस्त्यांतून आम्ही तिघेही लग्न लावण्यासाठी चाललो होतो.

कसेबसे धावतपळत वाड्यात शिरलो व दार लावून घेतले. बाहेर पोलिसांचा पहारा होता आणि मिलिटरीच्या लोकांच्या बुटांचे आवाज ऐकू येत होते. पोलिसाची कर्णे लावलेली काळीभोर मोटर 'कर्फ्यू जारी झाली आहे, कर्फ्यू जारी झाली आहे,' असे लांब कुठे तरी मोठमोठ्याने बजावीतच होती. पण आम्हाला त्याची आता क्षिती नव्हती. आम्ही एकदाचे घरी पोचलो होतो. आमच्याजवळ नवरा होता, नवरी होती आणि दोन्ही बाजूंचे भटजी होते. आता लग्न होणार हे निश्चित होते.

त्यानंतर घरातले वातावरण एकदम संथ झाले. रात्रीची जेवणे झाली व दुसरा काहीच उद्योग नसल्यामुळे आणि भटजी हाताशी असल्यामुळे शांतपणे आमच्याच बैठकीच्या खोलीत सीमान्त-पूजन करून घेतले. त्या वेळी नवऱ्यामुलाने घातलेला रेशमी शर्ट माझ्या धाकट्या भावाचा होता आणि त्याला नेसण्यासाठी परीटघडीचे धोतर माझ्या ट्रंकेतले होते.

रात्र तशीच गेली. सकाळी समोरच्या वाण्याकडून मागच्या बाजूने पहाऱ्यावर असलेल्या पोलिसाची विनवणी करून दुधाचे डबे आणले व आडरानात कुठे तरी चहा प्यावा तसे आम्ही चहा प्यालो. हळूहळू मुहूर्ताची वेळ जवळ आली. भटजींनी सारे विधी फारच सावकाशीने केले. कारण त्या दिवशी कुठेच लगीनघाई नव्हती. इतर लग्नाच्या वेळी सारखा चौघडा झडत असतो. मांडवात इष्टमित्रांची वर्दळ असते. हशा-खोखोशा आणि घाईगडबड यांनी वातावरण दुमदुमलेले असते. ताज्या फुलांच्या वेण्यांचा चमचमाट असतो. पानसुपारीची तयारी सुरू असते. पण आजचे हे लग्न लोकविलक्षण होते. मांडव शृंगारलेला होता, पण त्याला ' मांडवा 'ची कळामात्र नव्हती. मांडवात माणसेच नव्हती. बायका इकडे तिकडे करीत नव्हत्या. फुलेच आली नव्हती. त्यामुळे त्यांच्या वासाचा प्रश्नच नव्हता. कार्यच होते म्हणून घरच्या बायकांनी नवीन लुगडी नेसली होती. पण त्यांतही नवीनपणा वाटत नव्हता. माजघरातल्या पोत्यात हळदकुंकवाच्यावेळी बायकांना देण्याचे नारळ ध्यानस्थ ऋषिमुनींसारखे स्वस्थ पडले होते. लग्नघटका भरत आली होती पण कुठेच चैतन्य नव्हते.

नवऱ्यामुलाने माझे परीटघडीचे धोतर व सदरा घातला होता. फुलांच्या मुंडावळ्या नव्हत्या. त्यामुळे त्या बांधण्याचा प्रश्नच नव्हता. कुठली तरी एक जुनी मण्यांची मुंडावळ होती तीच त्याच्या कपाळावर बांधली होती. परंतु मुलगा नवरामुलगा असा वाटतच नव्हता. आत माजघरात गौरीहर होता आणि तो पुजायला मुलगी बसली होती. तिच्या अंगावर आमच्याच घरचे दागिने होते, पण फुलांची मुंडावळ तिलाही नव्हती. तीही कशीतरीच दिसत होती.

मी बाहेर सोप्यावर उभा होतो आणि आत बायका बोलत होत्या. इतक्यात बायको बाहेर आली व म्हणाली, " अहो, सगळंच मुसळ केरात."

मी म्हटले, " का ? काय झालं ? "

" मुलीचे दागिने सोनाराकडून आले नाहीत हे तर झालंच, पण मुख्य

म्हणजे मंगळसूत्राच्या वाट्याच नाहीत."

"काय म्हणालीस?"

"अहो, मंगळसूत्राच्या वाट्या!—त्या नकोत का?"

माझे स्वतःचे लग्न होऊन तोपर्यंत पाचसात वर्षे झाली होती आणि मीही एका मुलीच्या गळ्यात मंगळसूत्र बांधले होते, पण मंगळसूत्राला वाट्या असतात हे त्या दिवशी मला प्रथमच कळत होते.

मी चिडून म्हटले, "काळ्या पोतीचा सरच नुसता बांधा! नसते वांधे काढू नका."

"अहो, वाट्या नकोत का? त्याशिवाय चालायचंच नाही?"

मी चिडलो होतो. पण हसून म्हटले, "नाही तर असं कर, तू दे जरा तुझ्या गळ्यातल्या वाट्या!"

तिने कोपरापासून हात जोडले आणि म्हटले, "थट्टेची वेळ ही नव्हे. वाट्या मिळायलाच पाहिजेत."

काही वेळ मंगळसूत्राच्या वाट्यांबद्दलच धावाधाव चालली होती. घरात अनेक वाटया होत्या, पण मंगळसूत्राच्या वाटया असणे शक्यच नव्हते. मग खूपच आरडाओरडा झाला.

थोड्या वेळाने तोड निघाली. आमच्या पलीकडच्या वाड्यात एक क्षयरोगी विवाहित स्त्री होती. मृत्यूपूर्वी सौभाग्यदान करावे म्हणून तिने साऱ्या वस्तू तयार ठेवल्या होत्या. मग कुणी तरी मागचे दार उघडून पलीकडे गेले आणि त्या बाईला भेटले. गोष्ट खरीच होती. क्षयाच्या तिसऱ्या अवस्थेत असणाऱ्या त्या स्त्रीजवळ जोडवी-विरोद्यापासून मणिमंगळसूत्र आणि हिरव्या बांगड्यांपर्यंत साऱ्या वस्तू होत्या आणि आमची अडचण जाणून तिने मंगळसूत्राच्या वाटया ताबडतोब दिल्या. साऱ्यांचाच जीव मग भांड्यात पडला.

घटका भरत गेली; मुलाला आणून पाटावर उभे केले. मुलीला आणायला मामा पुण्यात असूनही येऊ शकला नव्हता. दुसऱ्या कोणी तरी ते काम केले व मुलगी आंतरपाटासमोर आणून उभी केली. मंडपात कोणीच नव्हते, आणि अंतरपाटाच्या सभोवती बायकांचा गराडाही नव्हता. सिनेमात पळवून आणलेल्या नायिकेचे जबरदस्तीने लग्न लावत असल्याचा सीन असावा तसे दिसत होते. मी तिथेच उभा होतो. इतक्यात मागच्या भिंतीवरून उडी टाकून बाबू वाजंत्री

आला. त्याने डोक्याला तांबडा पटका बांधला होता. कपाळावर नेहमीप्रमाणे उभे-पांढरे चंदन होते व त्यात बुक्क्याचा ठिपका होता. सर्वांगावरून त्याने पांढरे उपरणे घेतले होते. त्याला बघून मी विचारले, "का हो? इकडे कसे?"

त्याने उपरण्यातून लपवून आणलेली पिपाणी काढून म्हटले, "नुसतं लग्न कसं लावायचं? – थोडी फुंकतो."

"शाबास! तुम्ही फुंका आणि मी वाजवत बसतो." मी हसून म्हटले, "इथं लग्न चाललं आहे हे कुणाला माहीत नाही. तुमची पी-पी ऐकली की लोक म्हणतील, गांधी मेले म्हणून यांनी वाजंत्री वाजवली!"

तो हसला व म्हणाला, "नाई हो – उगं आपलं जरा कुटं वाजवतो. बाहेर कसा जाईल आवाज?"

"वाजवा, पण हळू, अगदी हलके. नाही तर घाल घर आमचं पेटवून म्हणजे झालं."

तो मांडवात येऊन उभा राहिला. इतक्यात भटजींनी 'लक्ष्मीकौस्तुभ-पारिजातकसुराऽ ...' ची टीप लावली, आणि एकदम सूर उंचावला, तेव्हा वडील ओरडले, "हळू हो. खालच्या सुरात चालू द्या – बाहेर आवाज जाईल."

'धन्वंतरीऽऽ चंद्रमा' पासून आवाज अगदी खाली आला व 'गंगा सिंधु सरस्वती च यमुना' या वेळी तर इतका खाली आला की त्या बिचाऱ्या महा-नद्यांना आपल्याला कुणी बोलावीत आहे– हाके घालीत आहे याची जाणीव तरी झाली असेल किंवा नाही, कुणास ठाऊक! त्या दिवशी मंगलाष्टके लवकर संपली आणि आणखी दोनचार मिनिटे शिल्लकच उरली, तेव्हा मग वाड्यातल्या कुणी तरी मुलीने 'या कुन्देन्दुतुषारहारधवला—' हे सरस्वतीचे स्तवन फार मंजुळ व गोड आवाजात म्हटले. मग घटका बुडाली. भटजींनी अंतरपाट दूर केला. परसातील झाडांवरून तोडून आणलेल्या जाईजुईच्या छोट्या माळा वधूवरांनी एकमेकांच्या गळ्यांत घातल्या. भटजींनी 'तदेव लग्नं' केले, आणि अर्थाप्रमाणेच परकीय असलेल्या 'कन्ये'चा मी नारायणस्वरूपी वराच्या हातात हात दिला. बाबू वाजंत्र्याने हलक्या आवाजात पिपाणी वाजवली व ते लग्न एकदाचे लागले.

तो दिवस आणि पुढचाही दिवस कर्फ्यू जारी होती. गच्चीवर उभे राहिले

की शहराच्या दुसऱ्या भागात लांब कुठे तरी घरे पेटलेली दिसत होती आणि धुराच्या काळ्याकभिन्न लोटांनी आकाश झाकळून गेले होते. सारख्या भीतिप्रद अफवा येत होत्या. बंदुकांचे आवाज निघत होते, आणि आमच्या घरात मंगल कार्य घडले होते. लग्न लावणारे भटजी व खुद्द वधू-वर यांचे मनदेखील लग्नात नव्हते. तेथे इतरांची काय कथा ?

त्या तीन दिवसांत इतके काही घडले, इतके काही वाटले की तेवढे वर्षानुवर्षांत घडत नाही, भासत नाही. लग्नाच्या मेजवानीसाठी जो शिधा तयार होता, तो घरातल्याच दोन्ही बाजूंच्या ठाणबंद लोकांनी तिन्ही त्रिकाळ बसून खाल्ला. सबंध महिन्यास लागावे इतके चहाचे पुडे त्या तीन दिवसांत फस्त झाले आणि दुधाच्या अभावी डब्याच्या दुधावर तल्लफ भागवावी लागली. चवीने जेवायचे असते, चटण्या-कोशिंबिरींनी व लोणच्या-रायत्यांनी पान सजवायचे असते हे त्या तीन दिवसांत सारेच विसरून गेले होते. पहिल्या दिवशी घाई करून आम्ही बटाटे आणून ठेवले त्यांनी मात्र शेवटपर्यंत इमान राखले. त्यांच्या अभावी मात्र खरोखरच वेढ्यात अडकलेल्या सैन्यासारखी अवस्था सर्वांचीच झाली असती.

अखेर एकदाचे काळरात्रीप्रमाणे वाटणारे ते बहात्तर तास संपले व दुपारी कर्फ्यू उठली. संचारबंदी संपली यात विशेष काही नव्हते ! नेहमीचेच नागरी जीवन सुरू झाले होते, इतकेच. पण नेहमीच्या त्याच त्याच जीवनाची एकदम फार अपूर्वाई वाटली. बहात्तर तास माणसे घरात डांबली गेली होती, आणि गांधींच्या खुनाशिवाय त्यांना दुसरा विषय नव्हता. स्वतःचे घर हेच किती कंटाळवाणे असू शकते, घरातल्या आवडत्या मंडळींशी सारखे बोलण्याचा किती त्रास वाटू लागतो हे तेव्हाच कळून आले. कर्फ्यू उठली तेव्हा एखादी मिरवणूक पाहण्यास जावे त्याप्रमाणे उठलेली कर्फ्यू बघण्यास गच्च्या, गॅलऱ्या व खिडक्या यांतून माणसे झुंडीने उभी राहिली. प्रथम पाचदहा मिनिटे आपण रस्त्यावर हिंडू शकतो ही कल्पनाच लोकांच्या मनात आली नाही. ते रस्त्याकडे बघत नुसतेच दरवाज्यात उभे राहिले. परंतु एकदोन क्षणांतच रस्त्यावर जाण्यास आता प्रत्यवाय नाही हे कळले व लहान मुलांनी समुद्राच्या पाण्यात पाय बुडविण्यासाठी धावावे त्याप्रमाणे माणसे रस्त्यावर धावली. गेल्या बहात्तर तासांत निर्मनुष्य असलेला, ओकाबोका दिसणारा, पोलिसांनी संरक्षिलेला व सैनिकांनी तुडविलेला तो रस्ता नेहमीच्या प्रापंचिक माणसांनी एकदम भरून गेला व दुथडी

चाहायला लागला.

वाहणाऱ्या नदीकडे कौतुकाने बघावे तसा अर्धा-पाऊण तास मी त्या रस्त्याकडे पाहात बसलो व आत आलो. जावयांनी एव्हाना कपडे बदलले होते व ते जरा निराळे व संकोचाने वागायला लागले होते. त्यांनी खरे तर प्रथमपासून तसेच वागायला हवे होते. परंतु मधल्या कर्फ्यूमुळे सारेच ताण ढिले पडले होते. त्यांचा संकोच व आई-वडिलांच्या मनातील वरपक्षाची भावना ही नेहमीचे वातावरण सुरू झाल्याची निदर्शक होती.

दोनतीन दिवस आमचे पुण्यातले सर्व नातेवाईक, आप्त-इष्ट, व स्नेही-सोबती स्वत:च्या घरातच चुळबुळत बसले होते. आमच्याकडच्या लग्नाविषयी त्यांना काळजी होती. कर्फ्यू उठली व परिचितांचे घोळके घरी आले. प्रत्येकजण भीतभीतच येई. बाहेरून कानोसा घेई, व आमच्या दरवाज्यापुढे येऊन नुसताच उभा राही. त्याला बघितल्यावर मी मोठ्याने हसे व ओरडून सांगे, " अखेर लग्न झालं ! " येणारा तो माणूस समाचाराला आल्यासारखा गंभीर चेहरा करून आलेला असे. इतक्या रणधुमाळीत लग्न झालेले नसणार ही त्यांची खात्री असे व प्राप्त कर्तव्य म्हणून माझ्याकडे येऊन ' जगरहाटी 'कडे लक्ष देऊन मी दु:ख विसरावे–असे सांगायला तो आलेला असे. पण माझे मोठ्याने हसणे व लग्न झाल्याचे सांगणे ऐकून त्याचा चेहरा एकदम बदले. तो एकदम ओरडून आश्चर्याने विचारी, " लग्न लागलं ?...ते कसं ? " आणि मग त्याला बटाटे आणायला गेल्यापासूनची सारी हकीकत सांगावी लागे. पुण्यात आमचे गोत बरेच आहे. त्यामुळे त्या दिवशी ती हकीकत सांगताना माझे तोंड अक्षरश: दुखून आले.

संध्याकाळी जावई व त्याचे वडील माझ्यासमोर येऊन बसले व म्हणाले, " आता आम्ही जातो. "

त्यांनी जायलाच हवे होते. गेले चार दिवस ते इथेच डांबून पडले होते. त्यांना जाणे जरूर होते, तरीही मी हसून म्हणालो, " जाता इतक्यात ? "

" वा ! इतक्यात कसं ? " मुलाचे वडील म्हणाले. " तिकडे घरी पुरंदरे कॉलनीत गेल्या बहात्तर तासांत काय रामायण घडलं आहे कुणास ठाऊक ! आता जायलाच हवं. "

त्यानंतर मी व वडिलांनी डोक्याला टोप्या घातल्या. मुलाचे व त्याच्या आई-

बापाचे कपडे करून झाले. मुलगी हिरवी साडी नेसली आणि त्याच वेळी सोनाराकडून आलेल्या वरपक्षाकडील दागिन्यांनी तिला सजविले. नंतर मुलीने देवाला नमस्कार केला. साऱ्यांच्या पाया पडली आणि आमचे डोळे अशा प्रसंगी नेहमीच येतात तसे अश्रूंनी भरून आले.

बाहेर रस्त्यावर टांगे आणून उभे केले. प्रत्यक्ष निघण्याची वेळ आली. मी मुलाच्या वडिलांचा हात धरला व मुलीला संभाळून घ्या म्हणून सांगितले. त्यांनी " त्याची तुम्हाला काळजी नको, ती आता आमचीच झाली आहे– " असे म्हटले व नवरा-नवरी एका टांग्यात आणि त्यांचे आईवडील दुसऱ्या टांग्यात असे बसून ते मार्गस्थ झाले. ती अपूर्वाईची नवरा-नवरी बघण्यासाठी वाड्यातलेच नव्हेत, तर आळीतीलही स्त्रीपुरुष खिडक्या-दरवाज्यांतून उभे होते व त्यांना पोचवायला म्हणून दरवाज्याच्या पायरीवर उभ्या असलेल्या नातेवाइकांची संख्या निदान वीस-पंचवीस तरी होती.

अखेर टांगे दिसेनासे झाले, आणि आम्ही घरात परत आल्यावर, वरात पोचवून घरी परत आल्यानंतर भयाण वाटावे, तसे मला झाले. सारीच माणसे मरगळल्यासारखी स्वस्थ बसली.

# ११

## पंढरीनाथ

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

पंढरीनाथ आमच्या घरी पहिल्यांदा केव्हा आला, हे मला अगदी चांगलं आठवतं. मी तेव्हा दहाबारा वर्षांचा होतो. शाळेला कसली तरी मोठी सुट्टी होती. बाबा नेहमीप्रमाणे फिरतीवर गेले होते. दादा मॅट्रिकच्या वर्गात होता. तो माडीवर अभ्यास करीत होता. खाली स्वयंपाकघरात स्त्रीराज्य जमले होते...आई होती, काकू होती, वाड्यातल्या दोघीतिघी होत्या, आळी-तल्याही एकदोघांना मुद्दाम बोलावले होते. पापड चालले होते. मी तिथेच घोटाळत होतो...आई पोळपाटावर लाट्या पाडत होती. माझे दोनतीन वेळा खाणे झाले होते...अजूनही हावरेपणाने मी पापडाच्या गोळ्याकडे बघतच होतो.

कामात असल्यामुळे आई माझ्यावर खूप रागावली होती. तिने खरे तर पाठीत धपकाच मारला असता; पण, पण तिचे दोन्ही हात तेलाने माखले होते, त्यामुळे नुसत्या ओरडण्यावरच काम भागले.

आई जोराने म्हणाली, " तू नीघ बरं इथून ! सारखा घरात घरात असतोस बायल्यासारखा– काही वाटत नाही तुला ? "

पापडाच्या लाट्यांचं आकर्षण खरं म्हणजे फार होतं. परंतु आईचा चेहरा बघितल्यावर आता तिथं थांबणं हिताचं नव्हतं. त्या बायांच्या गराड्यातून मग मी धूम पळालो आणि दरवाज्यात येऊन उभा राहिलो. वेळ दुपारची होती. अभ्यासबिभ्यास काहीच नव्हता. इकडे तिकडे बघत बसण्याशिवाय मला

उद्योग नव्हता.

इतक्यात घरासमोर टांगा थांबला...मला आश्चर्य वाटले. आज बाबा यायचा वार नव्हता. त्यांची कुणी वाटही बघत नव्हतं. पण ते अचानक आले होते.

त्यांच्या आगमनाची वर्दी देण्यासाठी मी आत पळत गेलो. स्त्री-राज्यात एकच दंगल उडाली. बायका ऐसपैस होत्या, त्या नीट आवरून बसल्या. हसणी-खिद-ळणी एकदम कमी झाली. सगळे चिडीचिप झाले. त्यांना तसंच सोडून मी पुन्हा बाहेर आलो. गड्यानं बाबांची वळकटी आणि बॅग सोप्यावर आणून ठेवली होती. उजव्या हातातली काठी गरगर फिरवीत नि धोतराचा सोगा डाव्या हातात धरत बाबा आत आले... हे दृश्य नेहमीचेच होते. पण बाबांच्या मागोमाग अंग चोरून घाबरलेल्या चेहऱ्याची एक व्यक्ती आत येताना दिसली. मी तिच्याकडे निरखून पाहिलं. आमच्या दादाच्या वयाचा तो मुलगा होता. डोक्यावर वीतभर लांबीची शेंडी होती. हनुवटीवर उजव्या बाजूला काळा मस वाढला होता. अंगानं चांगला गुटगुटीत होता. डुलत डुलत चालल्यासारखा तो वाटत होता.

मला मजा वाटली. मी पुन्हा धावत स्वयंपाकघरात गेलो. त्या वेळेपर्यंत आई स्वयंपाकघरातून बाहेर माजघरात येऊन पोचली होती. बाबांची आणि तिची गाठ तिथेच पडली. कोणतीही गोष्ट बोलताना मोठ्याने हसत बोल-ण्याची बाबांची सवय होती.

ते म्हणाले, "अग, तू नेहमी ओरडत होतीस ना ?"

"मी ? आणि ते कशाबद्दल बाई ?"

"काम फार पडतं ... दुसरं कुणीतरी माणूस मदतीला पाहिजे अशी भुणभूण सारखी चालली होती ना तुझी ... हा मुलगा आणला आहे बघ."

पंढरीनाथ पुढे आला. आईने त्याच्याकडे बघितले. बाबा मग पुन्हा मोठ्याने हसले. "फार उपयोगी मुलगा आहे बघ ... तुम्हाला बायकांतही कामाला चांगला आहे ... अन् पुरुषांतही आहे."

त्यांच्या म्हणण्याचा अर्थ मला कळला नाही. बाबा मोठमोठ्याने का हसताहेत हे माझ्या लक्षात आलं नाही. आईच्याही प्रथम लक्षात आलं नसावं. पण बाबांनी डोळे मिचकावून तिला काहीतरी सांगितलं. मग तिच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला असावा. ती हसून उद्गारली, "असं होय !... मग छानच

आहे. सगळीकडेच उपयोग होईल."

तिला पुन्हा फार हसू आले. तोंडाला पदर लावीत ती म्हणाली, "चांगलं केलंत. फार चांगला माणूस शोधून काढलात... पण नाव काय त्याचं?"

बाबा हसत हसत त्या मुलाला म्हणाले, "सांग रे बाबा काय नाव आहे तुझं?"

त्या मुलानं माना वेळावल्या, आणि मुरका मारल्यासारखे केले. मी तेव्हा अगदी लहान होतो. पण तरीही मला त्याचे ते हावभाव चमत्कारिक वाटले. नक्की काय वाटले हे सांगता येत नाही.

आईला मात्र त्या हावभावांनीच खुश केले. ती हसत म्हणाली, "अरे नाव सांग ना. लाजतोस काय?"

बघायला आलेल्या मुलानं नाव सांगावं तशा आवाजात तो म्हणाला, "माझं नाव पंढरीनाथ."

बाबा आणखीनच मोठ्याने हसले. म्हणाले, "नाव पंढरीनाथ आहे. तू त्याला नुसतं 'नाथ' म्हटलंस तरी हरकत नाही."

आईही खूप हसली. मग बाबा अनुनासिक आवाजात हेल काढीत बायकी स्वरात म्हणाले, "बरं का नाथ, आता आत जा अन् पापड करायला लागा."

पंढरीनाथचा आमच्या मोठ्या घरातील पहिला प्रवेश हा असा झाला.

त्यानंतर त्याचं आमच्या घरातलं स्थान हळूहळू पक्कं झालं. आईचे सांधे नेहमी धरत. तिला जड कामं मुळीच व्हायची नाहीत. पण नाथ कामाला खंबीर होता. मागच्या दारच्या विहिरीचं पाणी पन्नास पन्नास घागरी तो सहज काढी. घरातल्या सगळ्यांच्या आंघोळींचं काम तर त्याच्याकडेच असे. मागच्या अंगणात मोठा चुला पेटवलेला असे. पहाटेपासून त्यावर मोठं तपेलं तापत पडलेलं असे. एकेकाला पाणी काढून देणं, टॉवेल, अंडरवेअर, गंजिफ्रॉक आणून देणं, साबण, शिकेकाई ठेवणं सगळी कामं तोच करी. कधी कधी बाबांच्या पाठीला आंघोळीच्या वेळेला साबण लावून द्यायचे काम त्याच्याकडे असे...यात विशेष काही नव्हते. पण बायकांच्या आंघोळीच्या वेळीही नाथालाच काम पडे. आईच्या न्हाण्याची मिजास तर फारच असे. सुगंधी शिकेकाई करणे, कानात तेल घालणे, मोरीत गरम पाण्याच्या बादल्या नेऊन ठेवणे वगैरे कामे नाथच करी. लहानपणीदेखील ते मला चमत्कारिक वाटायचं. बाबा मामलेदार होते. गडी वागवण्याची

आमच्या घरात सर्वांनाच सवय होती. पण असा उभयपक्षांत चालणारा गडी तोपर्यंत मी बघितलेला नव्हता. रामा गडी असत. ते बायकांत पुढे पुढे करीत. पण आई त्यांना फटकारून काढी. बायकांत फारसा वावर करण्याची त्यांना बंदी असे; पण नाथाचे सगळेच वेगळे होते.

असेच बरेच दिवस गेले. दादाच्या एवढाच नाथा, आमच्या घरात पूर्णपणे मुरत गेला. दादा पुण्यास कॉलेजमध्ये होता. पण नाथाच्या शिक्षणाबद्दल प्रश्नच नव्हता. पाणी भरणं, उष्टी काढणं, केरपोतेरं करणं, संध्याकाळची दिवाबत्ती करणं या सगळ्या गोष्टी त्याच्याकडेच असत. आमच्या घरी कामाला ऑफिसातले आणखी एकदोन पट्टेवाले येत. आसपासच्या घरांत गडीमाणसे असत. पण ती नाथाला स्वतःत सामावून घेत नसत. ती माणसे निराळी अन् नाथा निराळा असं होई. उलट वेळ रिकामा असला, घरात बाबा वगैरे नसले की, मग आमच्या मागच्या अंगणात घोड्यांच्या तबेल्याजवळच्या खोलीत ती सर्व माणसे जमत आणि नाथाला बोलावत. त्याची खूप थट्टामस्करी करीत. तो बाईसारखा लाजे. त्याकडे बघून ती राकट माणसे पोट धरधरून हसत. एकदा असाच मी मागच्या दारी गेलो होतो तेव्हा मला एक गंमत दिसली. नाथा मध्ये उभा होता. त्याच्या शेजारी आमचा गणपत मोतद्दार उभा राहून त्याच्या गालाला हात लावत होता आणि त्याची छाती चाचपत होता. नाथा खाली मान घालून ‘ आत्ता नको आत्ता नको ’ करत होता. गणपत घोड्यासारखा खिंकाळत होता आणि मग मागं मागं सरणाऱ्या नाथाच्या अंगझटी जात होता.

मला काय वाटलं ते सांगता येत नाही. नाथा कुणीतरी निराळा आहे हे मात्र माझ्या मनात नीट ठसले. पुरुष आणि स्त्रिया दोन्हीही त्याच्याशी फार मोकळेपणानं वागत आणि खूप हसत. आमच्या घरात तर स्त्रीराज्यच होते. मोठ्या दोन बहिणी होत्या... आई होतीच... काकू होती, आसपासच्या बायकांची वर्दळही सारखी असे. पुरुष माणसे घरात असली की मानही वर न करून पाहणाऱ्या आमच्या इथल्या बायका नाथाशी मात्र फार खेळीमेळीने वागत. आमची काकू तर फार थट्टेखोर असे. खाली मान घालून आणि नजर तिरपी करून हलक्या आवाजात ती म्हणे, “ नाथऽऽ! पाणी आणायचं ना गडे ! ” ती असं म्हणाली की माझ्या बहिणींना व आईला हसू आवरेनासे होई.

मी वाढत होतो. नाथाची माझी चांगली गट्टी होती. लोक त्याच्याशी असं का वागतात हे मला कळायला लागलं होतं. दादा सुट्टीत घरी येई. मग त्याचे मित्र जमत आणि नाथाची फारच टिंगल करत. काही काही गोष्टी मला अजूनही आठवतात.

बाबांच्या एका श्रीमंत सरदार मित्राकडे मोठं लग्न होतं. त्यांना एक गडी पाहिजे होता. म्हणून बाबांनी नाथाला दोनतीन महिने तिकडे पाठवला होता. तो परत आल्यावर दादाच्या मित्रांनी त्याला तऱ्हेतऱ्हेने छेडले होते...तिथे काय काम करत होतास म्हणून विचारले होते.

नाथा म्हणाला, " अहो, तिथं फार काम...माझा तर अगदी पिट्टा पडला. सगळ्या बायांना आंघोळी घालायचं काम माझ्याकडे होतं. "

दादा तेव्हा कॉलेजच्या शेवटच्या वर्गात होता. त्याच्या मित्रांना, बायकांना आंघोळी घालणारं नाथाचं चित्र गमतीदार वाटलं. ते खोदून खोदून त्याला जास्त माहितीही विचारायला लागले.

नाथा रंगात येऊन सांगत होता, " प्रत्येक बाईला मोरीत पाणी नेऊन द्यायचं, तिचा परकर ब्लाऊज द्यायचा, शिकेकाई, साबण ठेवायचा हे तर होतंच, पण, बायकांच्या पाठीला साबण घासायचं कामही होतं हो...वहिनीबाईची पाठ काय मऊ आहे...अगदी पुरणाची पोळीच जशी. कितीही घासली तरी त्यांचं समाधन व्हायचं नाही. त्या ओरडायच्या आणखी घास. "

दादा खो खो हसत म्हणाला, " पाठच घासत होतास ना? का आणखी काही? "

दादाच्या मित्रानं विचारलं, " असलं काम म्हणजे तुला मोठा त्रासच वाटत असेल नाही? "

" बया, बया, बया " रंगात आला म्हणजे बया बया करून मुरका मारण्याची नाथाची सवय होती. " त्रास कशाचा हो? मला तर भारी मजा वाटायची. सगळी सकाळ त्यात जायची. "

" तुला कसली रे मजा त्यात? वेडाच आहेस... खरंच नाथा, तुला आता पुन्हा असं काम आलं की मला तू पाठव. दिवसभर मी बायांना नुसत्या आंघोळी घालीत राहीन." दादाचा मित्र म्हणाला आणि ती सगळी पोट धरधरून हसली.

दादा सुटीला आला की त्याचे जुनेपाने कपडे नाथाला मिळत. नाथा

त्याच्यापेक्षा स्थूल होता. पण तरीही ते कपडे तो वापरी. दादाची उंची पँट अन् रेशमी कोट घातल्यावर तर त्याचे रूप फार मजेदार दिसे...दिसायला नाथा तसा सुरेखच होता. पण सौंदर्य असून नसल्यासारखे भासायचे. पँट घातली की मी त्याची खूप थट्टा करी. "तू अगदी दादासारखा दिसतो आहेस" असे म्हणे. "तू नेहमी पँटच घालीत जा", "दादासारखं तुझंही लग्न करायला हवं" असं म्हणून त्याला चिडवी. लग्नाची गोष्ट काढली की तो चक्क लाजे. त्याची ही कळ माहीत झाल्यानंतर येता जाता त्याच्या लग्नाविषयी थट्टा करायची आमच्या घरातल्या बायकांना सवयच जडली होती, काकू तर सरळच विचारी, "नाथ...!...तुमचं लग्न करायचं ना?...बायको कशी हवी?... गोरी का काळी? का माझ्यासारखी चालेल?"

यावर आई हसून म्हणे, "अग, त्याला हे विचार की बायको आणायची का नवरा आणायचा?"

बायकांत मग हशा पिके.

काकू पुढे विचारी, "नाथ, तुम्हाला नवरा कसा हवा?...गोरा...शिकलेला ...चष्मेवाला चालेल? आमच्या दादाच्यासारखा हवा का?"

दादा पास झाला आणि मुली बघण्याची धामधूम घरात सुरू झाली. खूप मुली सांगून आल्या होत्या. त्यांच्या रूपाची, कुलशीलाची, हुंड्यापांड्याची चिकित्सा सारखी घरात चाले.

दादाचे लग्न ठरले, आणि नवी नवरी सगळ्यांना दाखवायला आमच्या घरी आणली. त्या दिवशी पंढरीनाथ सारखा आत बायकांतच होता. बायकांना फराळाचं द्यायचं काम त्याच्याकडेच होतं. त्याच्याकडे कुणाचं लक्ष नव्हतं. पण त्याचं सगळीकडे होतं. वहिनींना मीही प्रथम त्याच वेळी पाहिलं...छान गोजिरवाण्या दिसत होत्या. रंग पूर्ण गोरा होता. चेहरा हसरा होता. डोळे मोठे होते आणि त्यांत थट्टेखोरपणाचे पाणी होते. आई, काकू आणि माझ्या बहिणी यांच्यात शोभतील अशाच त्या होत्या. त्या दिवशी हलक्या आवाजात त्यांनी एक गाणे म्हणून दाखविले. ते तर दुधाच्या साईसारखं मधुर होतं.

पाहण्याचा समारंभ संपला आणि मंडळी जिकडच्या तिकडे गेली. पंढरीनाथ आणि मी दोघंच बाहेर व्हरांड्यात होतो. कंदिलाच्या काचांना राख लावून साफ करण्याचा त्याचा उद्योग चालला होता. मी विचारले, "काय नाथ, कशा काय

वाटल्या वहिनी ? " तो काहीच बोलला नाही. दिव्यांच्या वाती कातरीने सारख्या करीत राहिला.

घरात दिवे लागले आणि मग स्वयंपाकघरात स्त्रीराज्य भरले. काकूंनी विचारले, " आवडली वहिनी...नाथ ? "

" बरी आहे की हो...गोरी गोरी आहे. नाकी डोळी चांगली आहे. "

" तुम्हाला पसंत आहे ना नाथ ? " काकू खोडकरपणाने म्हणाली. "नाही तर असं करू, तिची एक धाकटी वहीण आहे लग्नाची...ती तुम्हाला करून घेऊ...चालेल ? "

बायका हसल्या. पण आई हसली नाही. ती थट्टादेखील तिला आवडली नाही. किंचित कुरंठेपणाने ती काकूला म्हणाली, " हे ग काय ? दुसऱ्याच्या मुलीविषयी असं बोलणं चांगलं नाही. "

काकू वरमली. पण वहिनीबद्दल जास्त बोलत राहिली...तिचा आवाज चांगला आहे. ती आत आली तेव्हा चालत कशी आली...खाली मान कशी घातली होती...बोलताना हेल काढत होती...सगळ्याची नक्कल काकू करत होती. खरं म्हणजे कुठल्याही बाईची नक्कल करायला पंढरीनाथसारखा दुसरा योग्य माणूस आमच्या घरात नव्हता. पण तो त्या दिवशी अगदीच गप्प होता.

दादाचे लग्न फार थाटात झाले. चार दिवस नुसत्या जेवणावळी आणि हसणीखिदळणी चालली होती. वऱ्हाड खूप जमलं होतं. कामाखाली पंढरीनाथाचा पिट्टा पडत होता.

समारंभ संपल्यावर एकदोन दिवसांनीच बाबा फिरतीवर गेले. मग घरात दंगा उसळला. कुणालाच दाब राहिला नाही.

त्या दिवशी रात्री जेवणंखाणं झाल्यावर सगळ्या बायका बाहेरच्या अंगणात तुळशीवृन्दावनापाशी मजेनं बसल्या होत्या. दादा वर होता, मी आतल्या घरात होतो. पण मला सगळं ऐकू येत होतं. प्रत्येकीचा आवाज कानाला समजत होता. वहिनीचं अगदी हलक्या आवाजातलं मंद हसणं ओळखू येत होतं.

वहिनीचं एक गाणं झालं. मग नाव घेण्याचा बूट निघाला. खूपसे आढेवेढे घेऊन वहिनींनी एक छानदार नाव घेतलं. मग काकूला आग्रह व्हायला लागला. काकू हसत मोठ्याने म्हणाली, " मी नाव घेईन...पण एक अट आहे..."

बहीण ओरडली, " काय अट आहे ?...सांगा तरी. "

" पहिल्यानं नाथानं नाव घ्यावं. मग मी घेईन."

आई हसली, "अग नाथा नाव घेणार म्हणजे कुणाचं?"

बायका खूप हसल्या. आणि नाथा "मी...नाही मी नाही" करायला लागला. काकूनं फारच आग्रह धरला. तेव्हा त्यानं त्याच्या बोजड आवाजात उखाणा घेतला..."ओट्यावरल्या बादलीत ठेवलं गरम पाणी! दादांचे पाय धुते त्यांची आवडती राणी."

वहिनींनी लग्नात जे अनेक उखाणे घेतले होते त्यांतला हा एक होता. नाथानं त्या गर्दीत तो लक्षात ठेवला होता आणि वहिनींनी म्हणावं तशा ठसक्यात तो म्हणाला होता.

काकू नाथाला सोडायला तयार नव्हती. ती ओरडली, "नाथ...आता बायकोचं नाव घ्या."

नाथा पुन्हा 'नाही नाही' करायला लागला आणि बायकांचा आग्रह वाढत चालला. त्यानं नाव घेतलंही असतं. पण आईनं तो सर्व प्रकार एकदम थांबविला. तिला कदाचित भीती वाटली असावी की पुरुषाचं नाव घेताना नाथानं दादाचं नाव घेतलं, तसंच बायकोचं नाव घेताना त्यानं स्वतःला दादा समजून वहिनीचं नाव घेतलं असतं.

त्या दिवशीचा तो प्रसंग का कुणास ठाऊक माझ्या मनात मात्र कायमचा घर करून बसला. नाथाकडे मी निराळ्या दृष्टीनं पाहायला लागलो.

लग्नानंतर आमचं घर नेहमीप्रमाणं सुरू झालं. दादानं गावातच वकिली सुरू केली. दादा-वहिनींचा संसार फुलायला लागला. मी कॉलेज-शिक्षणासाठी पुण्याला गेलो. आता माझं गावचं आकर्षण थांबलं होतं...नाथाचीही आठवण येत नव्हती. माझं जग बदललं होतं. डोक्यात निराळे विषय सुरू झाले होते.

सुट्टीत कधीमधी मी गावाकडे जाई. आता बाबा गेले होते. दादाचं राज्य सुरू झालं होतं. जुने बरेचसे नोकर-चाकर काढून टाकले होते. पण पंढरीनाथ तसाच होता. वयानं तोही आता खूप वाढला होता. पाणी आणण्याचं काम त्याचं चालूच होतं...काका-काकू आता वेगळे झाले होते. त्यामुळे नाथाची थट्टा करायला काकू घरात नव्हती...स्त्री-राज्यही आता संपलं होतं. एकट्या वहिनी घरात असत.

सुट्टीत दुसरा काही उद्योग नव्हता. म्हणून मी नाथाला खुलवण्याचा प्रयत्न

करी. लहानपणी नाथाची आमच्या घरात जी थट्टा होई तिचं स्वरूप आता मला कळायला लागलं होतं...त्याच्या त्या तशा स्थितीबद्दल थोडी अनुकंपाही वाटत असे. मी जास्त बोले. पण तो बोलत नसे. आपल्या पायरीनं राहात असे. त्याच्या वृत्तीवर एक प्रकारचा चमत्कारिक म्लानपणा आलेला होता. लहानपणी तो बरा दिसे. पण आता जास्तच मद्दड दिसायला लागला होता. चेहरा फार रुंदावला होता. चेहऱ्यावरचा काळा मस आता वाढला होता, आणि त्यामुळे त्याच्या केविलवाणेपणात भर पडली होती. अशा माणसांना दाढी-मिश्या का येतात कुणास ठाऊक!... नाथाच्या चेहऱ्यावर ठायी ठायी दाढी उगवली होती. ते केस फारच विद्रूप दिसत. चारआठ दिवसांनी तो न्हाव्याकडून दाढी करून घेई. तेव्हाही तो फार वाईट दिसे.

घरात वहिनी नाथाशी बोलत नसत. आईच्या राज्यात नाथाचा वावर सारखा स्वयंपाकघरातच असे. आताही स्वयंपाकघरातली बरीच कामे तो करी; पण बाप्या गड्याला वागवावं त्याप्रमाणे वहिनी त्याला वागवत. मोरीमध्ये आंघोळीला पाणी नेऊन ठेवण्याची वगैरे कामे आता कमी झाली होती. आईच्या वेळी पुरणावरणाचा स्वयंपाक असला की नाथा पिवळं सोवळं नेसून उघड्या थुलथुलीत अंगाने पाट्यावर आईला पुरण वाटून देत असे. तेव्हा त्याची सारखी टकळी सुरू असे. आता असा मोठा स्वयंपाक असला तरी नाथाला मागच्या पडवीत पुरण वाटावे लागे. बोलणं तर अगदीच बंद असे.

आमच्या सर्व घरात नाथा आता अलग वाटत होता. दादा विशेष बोलत नसे. पण वहिनी तर चक्क हिडीसफिडीस करीत. तो घरात बसलेलाही त्यांना आवडत नसे. थोडं काही बोलला की त्याला ताडकन तोडून टाकीत.

दिवस असेच चालले होते. शिक्षण संपून मला पुण्याला नोकरी लागली होती. माझं लग्न झालं होतं. आता तर गावाकडे जाणं कमी झालं होतं. मी माझ्या कामात आणि दादा त्याच्या उद्योगात अशी स्थिती होती. आम्हा दोघांमध्ये पत्रव्यवहारही बेताचा राहिला होता.

असं आयुष्य चालू असताना एके दिवशी अचानक तार आली. कोर्टातून येताना मोठ्या लॉरीचा दादाला धक्का लागला होता. त्याची प्रकृती चिंताजनक आहे असं लिहिलं होतं. मी ताबडतोब तिकडे गेलो... जाऊन उपयोग नव्हताच...सगळा खेळ खलास झाला होता... दुःखाचा फार मोठा डोंगर

कोसळला होता.

मी मन घट्ट केले. घराची आवराआवर केली. तिथला सगळा इतमाम आणि सरंजाम एका खोलीत कुलूप-बंद करून टाकला. वहिनींना आता तिथे राहू देणं बरोबर नव्हतं. त्यांना मूलबाळ नव्हतंच. तिथं राहण्यात स्वारस्य काहीच नव्हतं. सगळे नोकर काढून टाकले. पण नाथाला रजा देणं शक्य नव्हतं. लहानपणापासून त्याचं आयुष्य आमच्या घरात गेलं होतं... तो आमचाच होता...तो दुसरीकडे कुठेही जाऊ शकत नव्हता. त्याला नि वहिनींना घेऊन मी पुण्याला आलो.

पुण्याला माझी जागा मोठी आहे. पण गावाकडच्या जागेची सर तिला नाही. चार खोल्यांत आम्ही पाच-सात माणसे राहतो. त्यातच आता नाथा आला. विहिरीचं पाणी पुण्यात काढावं लागत नव्हतं. स्वयंपाकाचाही तसा रगाडा नव्हता...निवांत बसायला तर कुठे जागाच नव्हती. माझ्या बाहेरच्या खोलीत नाथा कधी येत नसे. आतल्या दोन्ही-तिन्ही खोल्यांत बायकांचा वावर असे, तिथेच त्यालाही बसावं लागे. त्याला किंवा मला अर्थातच त्यात विपरीत काहीच वाटत नसे. आमच्या घरातल्या बायकांतच तो वाढला होता.

दिवस चाललेच होते. वहिनी घरात असत. त्यांचे शिक्षण फक्त मॅट्रिकपर्यंत झाले होते. आता पुढे काय करावं हा प्रश्नच होता. एकदोन वर्षं काहीच करू नये असं ठरलं होतं.

काही दिवस गेल्यावर माझ्या कानांवर कुसफूस यायला लागली. माझी बायको नोकरीसाठी दिवसभर बाहेरच असे. मुलं शाळेत असत. मीही घरात नसेच. त्या चार खोल्यांमध्ये असत फक्त वहिनी आणि पंढरीनाथ. घरात काम तसं फारसं नव्हतंच. शिवाय पंढरीनाथ कामाला खंबीर होता. पण वहिनींना त्याचं काहीच मानवत नव्हतं. त्या रागराग करीत.

एकदा तर त्या स्पष्टच म्हणाल्या, "दुपारी तुम्ही सर्व बाहेर असता... पंढरीनाथबरोबर दिवस काढायचा म्हणजे अगदी नको वाटतं." लग्नापासून वहिनींना पंढरीनाथ कधी आवडलाच नव्हता. त्यांनी त्याच्याबद्दल तसं बोलावं यात आश्चर्य नव्हतं. पण तरीही काही गोष्टी कानांवर आल्या आणि मन बेचैन झालं...पलीकडच्या खोलीत रात्री वहिनी झोपत. त्या खोलीत त्यानं मुळीच जाऊ नये अशी त्यांची सक्त ताकीद असे...पण एकदा त्यांचा स्वयंपाक चालू

असताना तो त्यांच्या खोलीत जाऊन कॉटवर चक्क आडवा झाला होता. काही तरी आणण्यासाठी म्हणून वहिनी तिकडे गेल्या आणि त्यांच्या तो दृष्टीस पडला. त्यांच्या अंगाचा तिळपापड झाला. कधी न रागावणाऱ्या– आवाज न चढविणाऱ्या वहिनी त्या दिवशी त्याला खूप ताडताड बोलल्या. खाली मान घालून तो मांजरासारखा कोपऱ्यात बसून राहिला.

माझ्या हे सर्व कानावर आलं होतं; पण मला त्याचं विशेष वाटत नव्हतं. पंढरीनाथबद्दलची ही गोष्ट गंभीरपणाने घेण्याजोगी नव्हती. पण घरात वातावरणाला कुठे कुठे तडे गेले होते.

असाच आणखी एक महिना गेला...त्या दिवशी रविवार होता. मी बाहेरच्या खोलीत निवांत बसलो होतो. बायकांची न्हाणी घरात चालली होती... इतक्यात आतून वहिनींचा रागाचा आवाज ऐकू आला. कापऱ्या आवाजात त्या काहीबाही बोलत होत्या. आवाजातील चमत्कारिकपणा मला जाणवला आणि मी आत गेलो.

बायको नुसतीच पलीकडच्या दरवाज्यात उभी होती. वहिनी बाथरूममधून बाहेर येऊन लुगडं नेसत होत्या. पंढरीनाथ बाथरूमच्या दाराशी उभा होता.

मी करड्या आवाजात विचारले, " काय झालं ? " प्रथम कोणीच काही बोललं नाही. मी पुन्हा विचारल्यावर त्या म्हणाल्या, " माझं कर्म झालं...आता डोकं आपटून घ्यायचीच वेळ आली आहे."

वैतागानं मी म्हटलं, " अहो, झालं काय ? "

" त्याला हज्जार वेळा सांगितलं, माझ्या धुण्याला हात लावू नकोस म्हणून. पण तिथे सारखा तडफडतो. "

मी पंढरीनाथाकडे पाहिले. त्याच्या हातात धुण्याची बादली होती. वहिनींचे पारोसे कपडे बादलीत होते.

मला काहीच वाटले नाही. आमच्या घरात लहानपणापासून बायकांचे कपडे पंढरीनाथच धूत असे...बाबांच्या मित्राकडे तर बायकांच्या पाठीसुद्धा त्याने चोळल्या होत्या...अगदी लहानपणची ती आठवण होऊन मी मनातल्या मनात हसलो. आणि खोलीत परत आलो.

पण तो विषय तितक्यावर संपणारा नव्हता. संध्याकाळी पंढरीनाथाला बायकोनं भाजी आणावयास पाठवला आणि वहिनींनी त्या विषयाला पुन्हा तोंड फोडलं.

त्या म्हणाल्या, " पंढरीनाथाला तुम्ही काढून टाका."

मी अजूनही गंभीर नव्हतो. मी म्हटले, " का बुवा?...तसा तो विश्वासू आहे...काही चोरी चहाडी केली नाही ना?"

बायको काही बोलणार होती; परंतु मध्येच वहिनी रागानं म्हणाल्या,

" अहो, चोरी केली असती तर परवडलं असतं."

मी गंभीर होऊन विचारले, " मग काय केलंय त्यानं?"

वहिनींचा चेहरा रागाने लालबुंद झाला होता. पण आता त्यात थोडी लज्जा मिसळली. मी त्यांचा लहान दीर नव्हतोच...जवळ जवळ मुलगाच होतो. तरीही त्यांना सांगायला संकोच वाटत असावा.

खाली पाहात त्या म्हणाल्या, " कसं सांगू?" बायकोनं सांगितलं, " त्यांचं म्हणणं आहे पंढरीनाथ वाईट दृष्टीनं त्यांच्याकडे पाहतो..."

हे ऐकावं लागेल अशी मला कल्पनाही नव्हती. मी एकदम मोठ्याने हसलो. " अहो, तुम्हाला माहीत आहे ना तो कसा आहे तो?...तो काय बघणार?..."

आता विषयाला तोंड फुटले होते. वहिनी बोलायला लागल्या, " तो कसा आहे हे मला माहीत आहे. पण त्याची दृष्टी वाईट आहे...लग्नापासून मी बघते आहे...यांच्या एवढाच वयानं आहे तो. यांचेच कपडे घालायचा. ते गेले आणि हा राहिला...पण पहिल्या दिवसापासून तो माझ्याकडे त्या नजरेनं बघतो...कसं सांगू?"

थोडा वेळ त्या तशाच थांबल्या, मग पुढे म्हणाल्या, " सगळंच वागणं त्याचं चमत्कारिक आहे. माझ्या खोलीत जाऊ नको म्हणून सांगितलं, तिथं जातो. दांडीवरचे धुतलेले कपडे हातात घेऊन नुसताच उभा राहतो. मी कपडे बदलत असले तरी हा तिथे असतोच. सगळं पातळ नेसून होईपर्यंत तिथून जात नाही."

मला फार चमत्कारिक वाटले. पंढरीनाथाकडे लहानपणापासून मी एका दृष्टीने बघत होतो. पण त्याची दुसरी बाजू आता कळली. हिरवळीवर साप दिसावा तसं झालं. तरीही मी म्हटलं, " मला वाटतं तो वेडपट आहे... उगाच बघत असेल."

वहिनी हसल्या, " भावजी, तुम्ही मला हे सांगता?...कोण कसं बघतंय

हे देखील मला कळत नाही ?" त्यांच्या हसण्यामुळे वातावरण किंचित सैल झाले. मी म्हणालो, "अहो समजा, अगदी त्यानं बघितलं...तरी त्याचं काय एवढं मोठंसं ?...तो कसा आहे हे तुम्हाला माहीत आहे. सगळ्यांना माहीत आहे."

वहिनींचा चेहरा पुन्हा खुरटल्यासारखा झाला. कपाळाला आठ्या घालून त्या म्हणाल्या, "तुम्हाला कसं पटवायचं हे मला कळत नाही...मी एवढंच सांगते की तो घरात नको !...तो असताना मला बरं वाटत नाही."

इतके बोलून त्या झपाट्याने आत निघून गेल्या. तो सबंध दिवस मी रागावलेलो होतो...पंढरीनाथ असं बघू शकेल का ?...त्याला अशा काही भावना असतील का ?... लहानपणापासून तो असा आहे याचा अर्थ काय···मला काहीच कळेना. कुणाच्या न कळत पंढरीनाथचं निरीक्षण करण्याचा मला चाळाच लागला...झोपलेल्या मद्दड बैलाप्रमाणे त्याचा देह होता. हालचाली कमालीच्या थंड होत्या...हा माणूस कसा असेल ?

एकदोन दिवस तसेच गेले. मी त्या बाबतीत काहीच केले नाही. वहिनी धुस्स्यातच होत्या. बायकोही बोलत नव्हती.

मग एका रात्री बायकोनं एखादी गोष्ट ठरवून विचारावी, त्याप्रमाणे म्हटले, "पंढरीनाथचं काय ठरवलंत ?"

"मला वहिनींचं म्हणणं पटत नाही !"

"काय पटत नाही ?"

"तो जरी अगदी असं बघत असला तरी काय बिघडलं ?...त्याबद्दल एवढा त्रागा का ?"

बायकोचा चेहरा एकदम गंभीर झाला. ती म्हणाली,

"खरं सांगू का ?"

"सांग ना."

"सांगायला बरं वाटत नाही; पण सांगते...अहो, तो हंडगा माणूस... त्यानं आपल्याकडे अशा तऱ्हेनं बघावं, असं कोणत्या स्त्रीला वाटेल ?"

मी ऐकत राहिलो.

"...पंढरीनाथ तसा आहे. पण त्याचं मन तसं नाही. ते पुरुषाचं आहे. मन तशी झेप घेतं···खरं सांगू ?...एखाद्या बलिष्ठ पुरुषानं वाकड्या नजरेनं बघणं

स्त्रीला एक वेळ चालेल, कधी कधी ते आवडतंही, पण अशा माणसानं बघणं म्हणजे...छी !...नुसती किळस येते...कपड्यावर विष्ठा पडावी तसं सारखं वाटत राहतं."

माझ्या डोक्यात प्रकाश पडला. कोडं सुटलं. वहिनींचं बरोबर होतं... पंढरीनाथचं तसं बघणं हा स्त्रीत्वाचा अपमान होता.

दुसऱ्या दिवशी दुपारी मी पंढरीनाथला समोर बोलावलं. माझं मन कावरं-बावरं झालं होतं. अपराध नसताना शिक्षा द्यावी लागत होती.

रागाचा आविर्भाव आणत मी म्हटले, "पंढरीनाथ, उद्यापासून दुसरी नोकरी बघ." तो रडायला लागला. काय चाललंय हेच त्याला कळेना.

मी मन घट्ट केले व सांगितले, "उद्यापासून तू इथे राहायचं नाहीस..."

त्यानं खूप गयावया केल्या, तोंडात मारून घेतल्या, पण मी बधलो नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी बोचकं घेऊन तो घराच्या बाहेर पडला. मी खिडकी-तून बघत होतो. माझे डोळे पाणावले. डोळे पुसत मी आत बघितले.

दरवाज्यात वहिनी आणि बायकोही रडत होत्या.

# १२

# स्वातंत्र्य, राजकारण, क्रांती....

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

' चळवळीचे दिवस ' या लेखमालेत लिहिण्याचे निमंत्रण मी स्वतःच लावून घेतले. या लेखमालेविषयी संपादकांच्या कार्यालयात चर्चा चाललेली असताना मी तिथे अभावितपणे होतो. मी एकदम संपादकांना म्हटले,

" मलाही या विषयावर लेख लिहायला आवडेल."

संपादकांनी व तिथे असलेल्या एकदोन लेखकांनी माझ्याकडे काहीशा आश्चर्याने आणि विस्मयाने पाहिले. माझा सगळा जन्म सरकारी नोकरीत कारकुनी करण्यात गेलेला...मी कोणत्याही प्रकारचा त्याग देशभक्तीखातर केलेला नाही. ( त्याग करण्याजोगे माझ्याजवळ काहीच नव्हते हेही खरे आहे ! ) मी कधी तुरुंगात गेलो नाही. लाठीमारात किंवा गोळीबारात जखमीही झालो नाही. एका दृष्टीने माझे आयुष्य इतर चार मध्यमवर्गीयांप्रमाणे असल्यामुळे या लेखमालेत मी लिहावयास उद्युक्त व्हावे याचे इतरांना आश्चर्य वाटणे साहजिक होते. संपादकांनीही केवळ मित्रभावनेने माझ्या लेख लिहिण्यास होकार दिला असावा.

मी जरी चळवळीमध्ये प्रत्यक्ष भाग घेतला नसला, तरी बत्तीस सालापासून आणीबाणीपर्यंत म्हणजे जवळ जवळ पस्तीस-चाळीस वर्षे राजकीय चळवळी जाणीवपूर्वक आणि खूपच जवळून पाहात आलो आहे. चळवळीची प्रत्यक्ष धग जरी लागली नसली किंवा लोखंडाचे चणे मी खाल्लेले नसले तरी राजकीय

चळवळीची धुंदी किंवा बेहोशी मी बऱ्याच वेळा अनुभवलेली आहे. ते सगळे वातावरण म्हणजे एक प्रकारचा सामाजिक आणि राजकीय इतिहासच आहे. तो घडत असताना मी तिथे असल्यामुळे त्याविषयी लिहिणे लेखक म्हणून माझे कर्तव्य आहे. शिवाय त्या त्या वेळी ती चळवळ जशी दिसत होती तशी मागून दिसत नाही. बेहोशीचा पूर ओसरल्यानंतर काठावरचे खडक जास्तच ओबड-धोबड आणि केविलवाणे दिसतात. ते सर्व शब्दबद्ध करावे याच हेतूने मी या अनोख्या विषयावर लेख लिहीत आहे.

एकोणीसशे बत्तीस साली मी पुण्यास नूतन मराठीत मॅट्रिकच्या वर्गात होतो. तोपर्यंत चळवळ म्हणजे काय हे मला मुळीच माहीत नव्हते. सावरकरांच्या अत्याचारी चळवळीत माझे एक नातेवाईक, जवळ पिस्तुल सापडल्यामुळे तुरुंगात गेले होते. त्यांना येरवड्याच्या तुरुंगात दोन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा भोगावी लागली होती. ते सुटून आल्यावर अविवाहित अवस्थेत असेच इकडेतिकडे राहात. आमच्याही घरी येत. त्यांच्या तोंडून टिळक, शिवरामपंत परांजपे, आणि अत्याचारी चळवळ याविषयीच्या कथा ऐकायला मिळत. त्या ऐकून वयाच्या दहाव्या-बाराव्या वर्षी मी भारावून गेल्याचे स्मरते.

मुळशी सत्याग्रहाच्या वेळी माझे एक चुलतबंधू चळवळीत भाग घेण्यासाठी घरातून पळून गेले होते. पण त्यांना बाबा-पुता करून घरी परत आणून पुढे शिकायला लावले होते. तेही त्याबद्दलच्या काही हकिगती सांगत. "आम्ही काय कुणाचे खातो रे। तो राम आम्हाला देतो रे।" ही कविता ते नेहमी म्हणत. सेनापती बापटांच्या कविताही त्यांना मुखोद्गत होत्या. "महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले" हे त्यांतले एक कडवे. मुळशी सत्याग्रहात प्रत्यक्ष भाग घेतलेले श्री. बाळूकाका कानिटकर हे आमचे दूरचे नातेवाईक. (चित्पावन समाज लहान असल्यामुळे बहुतेक सगळ्यांशी नाते निघेच!) माझ्या वडलांकडे ते नेहमी येत. खादीची अर्धी चड्डी, वर हाफ शर्ट, गोरा, लालबुंद आणि बराचसा देखणा चेहरा असे त्यांचे रूप होते. ते आले की सोप्यावरूनच माझ्या आजीला हाक मारीत. बऱ्याच वेळा भाकरीही खायला बसत. स्वतःच्या कविता मोठमोठ्याने म्हणून दाखवत. आवाज फारच मोठा असल्यामुळे वाड्यातल्या चारी पाची बिऱ्हाडांतली माणसे तिथे जमा होत. बाळूकाका स्वतःची कवने स्वतःच प्रसिद्ध करीत. त्या पुस्तकांची किंमत प्रत्येकी दोन-चार आणे असे. माझे वडील ती हमखास विकत घेत आणि

देशभक्ताला साह्य केल्याचे समाधान मिळवीत. बाळूकाका हे पुण्याच्या श्रीमंत खानदानी ब्राह्मण कुटुंबातले. त्यामुळेच त्यांच्या त्यागाला महत्त्व फार होते. त्यांची दोन्ही मुलेही हातगाडीवर खादी विकत. बाळूकाकांशिवाय श्री. वा. वि. साठे, हरिभाऊ फाटक, सोलापूरच्या मार्शल लॉमध्ये शिक्षा झालेले अनंतराव काळे वगैरे मंडळीही आमच्या कुटुंबाशी संबंधित होती. त्यामुळे कायदेभंगाच्या पूर्वीच्या चळवळींची माहिती माझ्या कानावरून बरीचशी गेलेली आहे.

तीस सालच्या कायदेभंगाची चळवळ थोडीफार आठवते. ज्या दिवशी सायमन कमिशन पुण्यात आले, तेव्हा टिळक पंचांगाप्रमाणे नरकचतुर्दशी होती. आम्हा सर्वांच्या घरात पणत्या लागल्या होत्या. बाहेर "सायमन, गो बॅक" चाललं होतं. वडील हसत म्हणाले,

"आपण ब्राह्मण लोकांनी समया आणि पणत्या लावलेल्या आहेत, त्या सायमनसाहेबाचे स्वागत करण्यासाठीच होत्या, असे उद्याचे इतिहासकार म्हणतील!"

त्याच सुमारास गोगटे यांनी हॉटसनवर गोळ्या झाडल्या. तेव्हा मी इंग्रजी पाचवीत होतो. संध्याकाळी शाळा सुटण्याच्या वेळी ती बातमी आली. सगळ्या मुलांनी पाट्यादप्तरे आपटून जयजयकार आणि ओरडा केल्याचे आठवते.

बत्तीस सालची चळवळ मात्र चांगली आठवते. दररोज कुणीतरी पकडले जाई आणि शाळेवर हरताळ पडे. मी आणि माझे मित्र दरवाज्यात आडवे पडून इतर मुलांना वर्गात जाऊ देत नसू. ते साधारण अकराबारा वाजेपर्यंत चाले. मग आम्ही जोगेश्वरीसमोर राजभवन नावाचे एक हॉटेल निघाले होते तिथे खूप चरत असू. संध्याकाळी मिरवणूक आणि शेवटी शनिवारवाड्यापुढची सभा! त्या वेळच्या घोषणा आणि गीतं अजूनही आठवतात "नहीं रखना। नहीं रखना—सरकार जालीम नहीं रखना।" हे गीत सगळ्यांनाच माहीत आहे. पण "हे असे कसे सरकार। आम्हा छळणार॥ सत्तेच्या जोरावरती...परि आम्ही नाही भिणार। कायदा मोडणार॥" हे गीत आता लुप्त झाल्यासारखे दिसते. मंडईतले श्री. गोटीराम काचा "टोपीवाले दादा! तुम्ही जाणार कधी गावा?" ही लावणी फार ठसक्यात म्हणत. ती आत्ताही आठवते.

बत्तीस सालच्या चळवळीची आणखी एक जवळची आठवण : सेनापती बापट यांचे चिरंजीव श्री. वामन बापट आणि (डॉ.) अनंत लागू हे आमच्या

वर्गात होते. आम्ही एका बाकावरच बसत असू. चळवळीच्या वेळी आपण बाहेर राहणे बरोबर नाही असे त्या दोघांनाही वाटले आणि आपण शिक्षण सोडत असल्याचे वामन बापटने सेनापतींना तुरुंगात कळविले. इतक्या लहान वयात तसे करणे बरोबर नाही असा सेनापतींनी तुरुंगातून निरोप धाडला. परंतु बापट आणि लागू यांनी तरीही सत्याग्रहात भाग घेतला व तुरुंगवास पत्करला. वामनने तेव्हा सेनापतींना लिहिलेले पत्र गुप्त पत्रकात चक्रमुद्रित झाल्याचे स्मरते. खुद्द आमच्या वर्गातलीच दोन मुले तुरुंगात गेल्यामुळे आमचाही भाव वधारला! त्याच वेळी शाळेवर पिकेटिंग करण्याबाबत मुख्याध्यापक दत्तो वामन पोतदार यांनी एक सभा घेतली होती. त्यांचे एक वाक्य चांगले आठवते. ते म्हणाले :

"आम्ही पांडवांसारखे राज्य राखू असं नुसतं म्हणून उपयोगी नाही. राज्य करण्याची अक्कल आली पाहिजे. ती शिक्षणानंच येईल—खुद्द महात्मा गांधींनीही जरी शाळा बंद करण्याबद्दल सांगितले तरी मी एकटा त्यांना विरोध करीन."

मॅट्रिक पास झाल्यावर मी परशुरामभाऊ कॉलेजमध्ये नाव घातले. ते युद्धपूर्व दिवस आर्थिक मंदीचे आणि बेकारीचे होते. वातावरण फारच गुदमरल्यासारखे होते. घरोघरी बेकार लोक नुसते बसून असत. सरकारी नोकरी मिळणे दुरापास्त असे. त्यामुळे तरुणांच्या मनात फारच निराशा असे. आपण कशाकरता शिकत आहोत हेच कळत नसे. नोकरी मिळत नाही म्हणून पोटाला अक्षरशः चिमटा घेऊन लोक मुलाला कॉलेजमध्ये पाठवीत. तिथेच चारसहा वर्षे एक प्रकारच्या निरुद्योगीपणात जात. बी ए. झाल्यानंतर पुढे काय करायचे याविषयीची दुःस्वप्ने त्याला कॉलेजच्या चार वर्षांत छळत. मीही तशाच वातावरणात वाढलो. एक प्रकारचा अस्वस्थपणा त्या दिवसांत माझ्या मनात दाटलेला असे.

पुण्यातल्या राजकीय वातावरणात त्या दिवसांत अनेक कंपू असत. शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ, मामा देवगिरीकर वगैरे मंडळी काँग्रेसची... न. चिं. केळकर, ल. ब. भोपटकर, मामा दाते, शि. ल. करंदीकर ही मंडळी हिंदुमहासभेची! हे दोन राजकीय गट तेव्हा प्रमुख होते. पण हिंदुमहासभेच्या पायाखालची जमीन त्या दिवसांतच हादरू लागली होती आणि त्यांची लोकप्रियता ओसरू लागली होती. काँग्रेसमध्येच त्या वेळी आणखी निरनिराळे गट असत. महत्त्वाचा गट म्हणजे समाजवाद्यांचा! एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, शिरुभाऊ लिमये वगैरे लोक त्यात अग्रेसर असत. बत्तीस सालच्या चळवळीत, एस. एम., गोरे

वगैरे तरुण लोक तुरुंगात गेले आणि तेथून समाजवादाची दीक्षा घेऊन बाहेर पडले असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. त्या वेळी लोकमानसात समाजवादाबद्दल भलतेच ग्लॅमर होते. प्रत्येक तरुण बहुधा समाजवादीच असे. श्री. पां. वा. गाडगीळ व कै. आचार्य जावडेकर हे समाजवाद्यांमधले विचारवंत होते. ते निरनिराळी स्टडी सर्कल्स चालवीत व तरुणांना विचारप्रवण करीत. ‘ समाजवादच का ? ’ या नावाचे पां. वा. गाडगिळांचे एक पुस्तक वादविवेचनमालेतर्फे तेव्हा प्रसिद्ध झाले होते. ते वाचल्यावर मी समाजवादी विचारांनी बेहोश झाल्याचे स्मरते. श्री. गाडगीळ तेव्हा दैनिक ‘ लोकशक्ती’मध्ये अत्यंत कमी पगारावर नोकरीला होते. त्याच्या अंगात खादीचा एकच एक निळसर कोट असे. मी त्या दिवसांत त्यांच्याकडे अनेक वेळा गेलो आहे. त्यांची कर्तव्यनिष्ठा फारच प्रखर होती. आमच्यासारख्या अगदीच नगण्य युवकांशी ते तावातावाने चर्चा करीत. अर्थात समाजवादी विचारसरणी महाराष्ट्रात रुजण्यास श्री. गाडगिळांची लेखणी आणि वाणी खूपच कारणीभूत झाली आहे.

बत्तीस ते बेचाळीस या कालखंडात एकच एक अशी चळवळ झालेली नाही, परंतु तो कालखंडच राजकीय विचारांनी आणि अस्वस्थतेने धुमसत होता. त्यात बहुधा प्रत्येक तरुण ओढला जाई. मीही अपवाद नव्हतो.

मी खरे तर समाजवादीच व्हायचा. खादीचे पांढरेशुभ्र कपडे घालणारे काही गोरेगोमटे ‘ समाजवादी ’ तेव्हा प्रख्यात होते. आश्चर्य वाटेल, पण सांगतो, पुण्यातील श्रीमंत आणि सधन ब्राह्मण कुटुंबातली मुलेमुली, तेव्हा समाजवादी म्हणून मिरवत. कवी आणि लेखक म्हणून गाजण्यासही समाजवादी असण्याचा उपयोग झाला असता. पण काही योगायोगामुळे कॉलेजमध्ये असताना कॉम्रेड भाऊ फाटक यांची व माझी ओळख झाली. कॉ. फाटक यांचे व्यक्तिमत्त्व त्या दिवसांत ज्वालाग्राही असे. कम्युनिस्ट चळवळीत भाग घेण्यासाठी त्यांनी इतक्या लहान वयात घर सोडले होते आणि एक प्रकारची फकिरी पत्करली होती. टिळक रोडवरच एका खोलीत ते दोनतीन स्नेह्यांसह राहात. असेच कुठेतरी जेवत. करायचा म्हणून अभ्यास करीत. पण बाकीचा वेळ चळवळीसाठीच देत.

मी लेखक आहे आणि कथा वगैरे लिहिण्याचा माझा मानस आहे असे समजल्यावर त्यांनी मला हाताशी धरले आणि कम्युनिस्ट चळवळीची थोडीफार

दीक्षा दिली. अर्थात त्या किंवा दुसऱ्या कोणत्याही चळवळीत पडण्यासाठी लायक असलेले गुण माझ्यात नव्हते. तरीही मी त्यांच्या बरोबर अनेक वर्षे काढली.

कॉ. डांगे आजारीपणामुळे तेव्हा गायकवाडवाड्यात विऱ्हाड करून राहात. तरुणांना आकर्षित करून कार्यप्रवण करण्याची त्यांच्याइतकी शक्ती फारच थोड्या पुढाऱ्यांत असेल ! पुण्यात वास्तव्य असण्याच्या काळात कॉ. डांगे यांनी स्वतः-भोवती कम्युनिस्ट तरुणांचा एक गट बनवला. श्री. एस. के. लिमये, कॉ. चावरे, कॉ. टिळेकर, कमल तुळपुळे ( भागवत ), वसंत तुळपुळे, के. एन. फडके वगैरे अनेक लोक त्या दिवसांत कम्युनिस्ट म्हणून ओळखले जात कॉ. दि. के. बेडेकर हेही त्याच सुमारास मुंबईहून पुण्यात आले असावेत. त्यामुळे कम्युनिस्ट चळवळीलाही फार मोठा वेग आला होता.

मला लेखन करायचे असल्यामुळे मी जग पाहायला पाहिजे, निरनिराळ्या वर्गांचे आर्थिक संबंध समजावून घ्यायला हवेत, राजकारण आणि अर्थकारण या विषयांवरची पुस्तके अभ्यासायला हवीत वगैरेबद्दलचा श्री. फाटक यांचा आग्रह असे. ललित लेखनाच्या द्वारे क्रांतीच्या ठिणग्या पडल्या पाहिजेत, असेही त्यांचे म्हणणे असे. त्यांना स्वतःलाही ललित लेखन करण्याची इच्छा असे. परंतु पार्टीच्या कामामुळे त्यांना ते शक्य नसे. त्यामुळेच मी तरी चांगला लेखक व्हावे असा त्यांचा हट्ट असे. लेखकाने आरामशीर बंगल्यामध्ये न राहता बाहेर हिंडायला पाहिजे, समाजात मिसळायला पाहिजे आणि अनेकविध लोकांशी व्यक्तिगत परिचय वाढवला पाहिजे, असे ते म्हणत. त्यामुळेच बहुधा त्यांनी मला चळवळीत सामील करून घेतले असावे.

कम्युनिस्टांबरोबर मी थोडेफार ' जग ' पाहिले हे मात्र नाकारता यायचे नाही. अप्पा बळवंत चौकात तेव्हा प्रेस कामगार युनियनचे ऑफिस होते. त्यावर लाल झेंडा लावलेला असे. तिथे बहुतेक संध्याकाळी जाऊन निरनिराळ्या चर्चा ऐकत असे. खरे सांगायचे तर तोपर्यंत मी मध्यमवर्गाशिवाय दुसऱ्या वर्गातली माणसे जवळून पाहिलेली नव्हती. त्यांचे दर्शन मला प्रेस कामगार युनियनच्या ऑफिस-मध्ये झाले. तेव्हा मी कसा भारावून गेलो होतो हे आजही आठवते.

युनियनच्या ऑफिसमध्येच मी श्री. डांगे, मिरजकर, कऱ्हाडकर, एस. के. लिमये, साने गुरुजी, वगैरेंची अनेक भाषणे ऐकली आणि माझा दृष्टिकोण बदलला. जग पाहण्यासाठी आम्ही एकदा सोलापूरला गेलो होतो आणि

कॉ. कऱ्हाडकरांच्या मध्यस्थीने कामगारांच्या चाळीत दोनचार दिवस राहिलो होतो.

फैजपूरला काँग्रेस झाली तेव्हा आम्ही तिथेही गेलो होतो. आज आठवत आहे त्यावरून शेतकऱ्यांचा एक मोर्चा घेऊन तीस-चाळीस मैल चालत आम्ही फैजपूरला गेलो आणि पंडित नेहरूंना निवेदन सादर केले. परतायच्या वेळी आगगाडीपुरते पैसे नव्हते आणि चालण्याची तर मुळीच हिंमत नव्हती. तेव्हा कॉ. डांगे यांनी पैशाची सोय करून आमची पुण्यास रवानगी केली. तो शेतकऱ्यांचा मोर्चा मी आजतागायत विसरलो नाही.

त्या वेळी कम्युनिस्ट चळवळीचे प्रत्यक्ष काम अनेक प्रकारचे असे. स्टेशनजवळ रेल्वे पुलाखाली तेव्हा एक फार मोठी झोपडपट्टी होती. तिथे जाऊन व्याख्याने दिल्याचे (आणि जग पाहिल्याचे) आठवते. पुरंदर तालुक्यात तेव्हा एक शेतकरी परिषद घ्यायची होती. मी, भाऊ फाटक, आणखी एक जण तेव्हा पुरंदरमधील कित्येक खेड्यांत हिंडलो आणि प्रचार केला. प्रचाराची भाषणे बहुधा भाऊ फाटक करीत. मी लेखकाच्या दृष्टीने जग पाही. त्याच वर्षी महाराष्ट्रात प्रांतिक काँग्रेसने खेड्यामध्ये साक्षरताप्रसाराची मोहीम काढली होती. दोनतीन तरुणांनी एखाद्या खेड्यात महिनाभर राहायचे, दररोज निरनिराळ्या घरी जेवायचे आणि साक्षरताप्रसार करायचा अशी योजना होती. मी व कॉ. विनायक कुलकर्णी महिनाभर अवसरी बुद्रुकला राहिलो होतो व स्पृश्य-अस्पृश्य सर्वांच्या घरी जेवण घेतले होते.

कम्युनिस्टांचे आठवड्यातून दोनतीन वेळा मोर्चे किंवा मिरवणुका निघत. शनिवारवाड्यापुढे भाषणे होत. त्या सर्वांत मी हिरीरीने भाग घेत असे. सभा सुरू होण्याआधी गाणी म्हणण्यात येत. त्यामध्ये अमर शेखही असे. त्यांतली काही गाणी अशी—" उठाव झेंडा बंडाचा। शेतकरी स्वातंत्र्याचा। कामकरी स्वातंत्र्याचा... शेकडो गरीब बेकार एक सरदार।... फाके विजयी रक्तोषाची जी एक रशियात। ती आमुची स्वातंत्र्याशा। मूर्त प्रकाशित... "

काँग्रेस मंत्रिमंडळ येण्याअगोदर छत्तीस साली कूपर-जम्नादासांचे मंत्रिमंडळ आले तेव्हा सात नोव्हेंबरला मुंबई गिरणी कामगारांचा एक विराट संप आयोजित करण्यात आला होता. तो पाहण्यासाठी आणि काही काम करण्यासाठी आम्ही दोघेतिघे कॉ. डांगे यांच्या घरी महिनाभर राहिलो होतो. तिथेच त्या वेळी साने गुरुजीही होते.

तो एक अपूर्व अनुभव होता. 'क्रांती' नावाचे कम्युनिस्टांचे साप्ताहिक तेव्हा प्रसिद्ध होत असे. त्याचे गठ्ठे काखेत मारून कामगार विभागात विकत फिरणे हा सकाळी बारा वाजेपर्यंतचा कार्यक्रम असे. "डांगे-निमकरांची क्रांती!... डांगे-निमकरांची क्रांती!" असे ओरडत आम्ही चाळीचाळींतून फिरत असू. कामगार उत्स्फूर्त स्वागत करीत, पण त्यात थोडा चावटपणाही असे. एक प्रसंग आठवतो. कॉ. पाटकर यांच्याबरोबर मी 'क्रांती' विकत चाललो असताना एका कामगाराने एकदम दोन अंक मागितले व बंदा रुपया दिला. माझे मन आदराने भरून आले. वाटले, काय हे कामगारांचे प्रेम! मी रुपया खिशात टाकला तेव्हा कॉ. पाटकरांना संशय आला. त्यांनी तो रुपया मजजवळून घेतला व त्याकडे नीट निरखून पाहिले. तो चक्क खोटा होता. खोटा रुपया खपवण्याचा त्या कामगाराचा डाव पाटकरांनी उधळून लावला. ते हसत मला म्हणाले, "जोशीबुवा! ही काही सदाशिव पेठ नव्हे. पैसे जरा पारखून घेत चला."

संध्याकाळी कामगार मैदानावर सभा होई तेव्हा कॉ. डांग्यांची लोकप्रियता दिसून येई. ते उभे राहिले म्हणजे हजारो लोकांच्या त्या सभेत दहा दहा मिनिटे स्लोगन्स आणि जयजयकार चालत. रात्री एखादी चर्चा असे. निमकर, रणदिवे, जोगळेकर, एस. व्ही. देशपांडे, अंबू जोगळेकर वगैरे पुढारी तेव्हा फार जवळून बघायला मिळाले.

संपानंतर आम्ही पुण्यास परतलो आणि नेहमीचे जीवन अळणी वाटायला लागले. आपण लेखक व्हावे असे, का कुणास ठाऊक, पण तेव्हापासूनच मला वाटत होते. फडके आणि खांडेकर हे तेव्हाचे अग्रगण्य लेखक. गोष्टीचा नायक कामगारपुढारी असण्याची तेव्हा फॅशन होती. तशा गोष्टी 'किर्लोस्कर'मध्ये हमखास स्वीकारल्या जात. खांडेकर गरिबीबद्दल सारखे लिहीत. त्यांची पात्रे समाजवादच बोलत. मीही त्या दिवसांत तशा काही गोष्टी लिहिण्याचे पाप केले आहे.

परंतु कम्युनिस्टांच्या सहवासामुळे आत्मटीकेची किंवा कठोर विश्लेषणाची जी सवय मला लागली, त्यामुळेच माझे पाय जमिनीवर राहिले, आणि मी नाटकीपणाने लिहिणे सोडून दिले. एखादी कथा घेऊन मी काही वेळा एस. के. लिमयांकडे वाचून दाखवण्यास जात असे. प्रत्येक गोष्टीकडे अत्यंत गंभीरपणे पाहण्याचा

त्यांचा स्वभाव होता. कथा वाचून झाल्यावर ते इतकी कठोर टीका करीत की मेल्यासारखे होऊन जाई. आता कळत आहे की, ललित वाङ्मयाबद्दलची समज आणि प्रेम दि. के. बेडेकर किंवा डांगे यांच्याव्यतिरिक्त फारच थोड्या कम्युनिस्ट पुढाऱ्यांना असे. एस. के. लिमयेही त्यातलेच. आम्ही लेखक चळवळ कळावी म्हणून तेथे जात असू. त्याबद्दलचे अगत्य कोणालाच नव्हते. श्री. दि. के. बेडेकर यांचेकडेही मी जात असे. कथा ऐकल्यावर त्यांच्या डोळ्यांत मिस्किल हास्य चमके. पण ते नाउमेद करीत नसत. सगळ्या चुका समजावून देत. संप बघण्याच्या मिषाने आम्ही कॉ. डांग्यांच्या घरी उतरलो तेव्हा मी लेखक असल्याचे त्यांना कुणीतरी सांगितले. डांगे खूप हसल्याचे आठवते. रात्री घरी आल्यावर ते मला " काय लेखक ! आमच्या कामगार चळवळीतलं काय काय पाहिलंत ?" असे विचारीत. माझे वय फारच लहान असल्यामुळे मला थट्टा कळत नसे. आणि मी जास्तच भडाभडा बोले. त्यामुळे खूपच हशा पिके. आमच्या ' जग पाहण्या'ची तेव्हा खूपच थट्टा होई. अगदी परवा परवा जुना विकलांग पुढारी भेटला होता, त्यानेही हसत विचारले, " काय जोशीबुवा, जग किती पाहून झालं ? शेरअच्छेर तरी जग दिसलं का ? "

चाळीस साली युद्ध सुरू झाले आणि मी सरकारी नोकरीत चिकटलो. तोपर्यंत चळवळीबद्दलचे प्रेम खूपच कमी झाले होते. बेचाळीसच्या चळवळीत काही गुप्त पत्रके काढण्यास किंवा वाटण्यास मदत केली असेल इतकेच! परंतु आपल्या हातून काही प्रत्यक्ष कार्य होणार नाही याची खात्री पटल्यामुळे मी पूर्वीचे संबंध जवळ जवळ सोडले. एकदा केव्हा तरी चार-पाच महिन्यांकरिता तुरुंगवास घडावा आणि अनुभूतीचे क्षेत्र विशाल व्हावे अशी इच्छा होती. पण ते घडले नाही. बहुतेक मध्यमवर्गीयांप्रमाणेच मीही भित्रा आहे. चळवळीत भाग घेतल्यास नोकरी सुटेल आणि उपासमार होईल अशी भीती वाटल्यामुळे मी माझा मार्ग बदलला आणि ' चालू ' लेखक झालो. " राजकीय क्रांतीपेक्षा लैंगिक विकृतीवर लिहिणे हे आर्थिक लाभाच्या व प्रसिद्धीच्या दृष्टीने फायदेशीर असते आणि त्यात खटले वगैरे होत असल्यामुळे थोडेफार हौतात्म्यही लाभते, तेव्हा तोच मार्ग लेखकाने अनुसरावा ! " असे एक कार्यकर्ता मला थट्टेने म्हणाला.

आज जवळ जवळ सर्वच चळवळींची धार बोथट झाली आहे. स्वातंत्र्यामुळे मध्यमवर्गीय तरुणांना अनेक संधींची दालने खुली आहेत. त्यामुळे

राजकीय चळवळीत फारसे कुणी पडताना दिसत नाही. शिवाय ' समाजवाद ', ' निधर्मीपणा ', ' जातीय ऐक्य ', ' आर्थिक समता ' वगैरे विषयांचा बोलून बोलून आता अगदी चिखल झालेला आहे. त्यामध्ये काहीही नावीन्य उरलेले नाही.

मी पाहिलेल्या चळवळींचा हा माझ्या दृष्टिकोणातून इतिहास ! यात ' चळ-वळ ' मुख्य आहे, ' मी ' कोणीही नाही हे ओघानेच आले. पण मी ती पाहिलेली आहे.

लेखन करायचे असेल तर स्वतःचा कोष सोडून बाहेरच्या जगाशी समरस व्हायला पाहिजे आणि चळवळीत भाग घ्यायला पाहिजे हे सूत्र त्या वेळच्या ज्या कार्यकर्त्यांकडून मी शिकलो त्यांना धन्यवाद !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०६०
दा. क्र. २३६६३
निबंध धम्मप्रेरणे
ग्रंथ शाखा

# १३

## धारा बहती है....

गाडी अलाहाबाद स्टेशनवर थांबली तेव्हा घड्याळात पहाटेचे पाच वाजले होते; आणि बाहेर जिकडे तिकडे काळोख पसरलेला होता. ऑक्टोबर महिना संपून नोव्हेंबरचाही मध्य आला होता, आणि त्यामुळे हवेत थंडीचा मनस्वी कडाका होता. माझे शरीर उत्तर हिंदुस्थानच्या त्या थंडीने काकडले होते, डोळ्यांतून पाणी पाझरत होते; आणि कानशिलांतून गरम वाफा निघत होत्या. शरीर थंडीने बधिर झाले असतानाच मी सामान गाडीतून बाहेर काढले व हमालाच्या साहाय्याने त्या मंद आणि उदास वाटणाऱ्या स्टेशनमधून बाहेर पडलो. मला दारागंजला जायचे असल्यामुळे एक्का ठरवला, त्याच्या एका कोपऱ्यावर बसून अंग आखडून घेतले, अंगात ऊब येण्यासाठी खिशातली सिगरेट पेटवली व एक्क्याचे धक्के खाता खाता मी मार्गस्थ झालो.

आता किंचित सकाळ झाली होती आणि रस्त्यावरून तुरळक ये-जा सुरू झाली होती. कुठे तरी–रस्त्यांच्या कोपऱ्यांतील नळांवरून बायका मोठे हंडे डोक्यावर घेऊन पाणी वाहात होत्या व बाभळीच्या काटक्यांनी दात घाशीत पुरुषवर्ग स्वतःला गरम शालीत लपेटून कुठे कुठे घराच्या कट्ट्यावर उभा होता. मी अलाहाबादला नवीनच आलो होतो. किंबहुना महाराष्ट्राच्या बाहेरही प्रथम पाऊल ठेवले होते. एक्क्याच्या कोपऱ्यावर बसून मी अलाहाबादचे लोकजीवन किलकिल्या डोळ्यांनी न्याहाळण्याचा प्रयत्न करीत होतो. खरे सांगायचे म्हणजे

पुण्या-मुंबईला जन्म घालवलेल्या माझ्यासारख्या माणसाला बघण्याजोगे—आकृष्ट होण्याजोगे असे फारसे नव्हतेच. गाव जुनाट होता आणि अरुंद रस्त्याच्या कडेची घरे पुण्यातील कसबा पेठेतील घरांप्रमाणे पडकी आणि म्हातारी दिसत होती. रस्त्यावरच्या नळावर पाणी भरणाऱ्या बायका उंच्यापुऱ्या होत्या, पण त्यांच्यात सफाई बिलकुल नव्हती आणि पुरुष लोक अस्वच्छ व बेंगरूळ तर होतेच, पण त्यांच्यात उत्तर हिंदुस्थानी थाटाचा हेंगाडेपणाही भरपूर होता. एक्का चाललाच होता, आणि त्या घाणेरड्या शहराच्या प्रथमदर्शनानेच मी अस्वस्थ झालो होतो. त्या शहरात माझी बदली झाली होती आणि तिथेच मला एकदोन वर्षे काढणे भाग होते. ‘ येथे माझं कसं होणार ? माझे दिवस कसे संपणार ? ’ हाच विचार त्या वेळी माझ्या मनाला कुरतडीत होता. तुरुंगाच्या भिंतीकडे बघून कैद्याचे मन हबकावे तसे माझ्या मनाचे झाले होते, आणि त्यावर काळजीची व भीतीची छाया पसरली होती.

अखेर एकदाचे ते धक्के संपले आणि एका अरुंद घाणेरड्या रस्त्यावरील सिंधी धर्मशाळेसमोर एक्का उभा राहिला. मी सामान खाली काढले व रस्त्यावरूनच आमच्या पुण्याच्या पद्धतीप्रमाणे जोरजोराने मित्राच्या नावाने हाका मारल्या. चार-पाच हाका तशाच वाया गेल्या. पण नंतर एकदाची दुसऱ्या मजल्यावरची डाव्या बाजूकडील खिडकी उघडली व डोळे चोळीत आणि जांभया देत उभ्या असलेल्या मित्राची मूर्ती मला दिसली. इतक्या भयंकर थंडीत सकाळीच मी आल्याबद्दल त्याने मला नक्कीच मनातल्या मनात शंभर शिव्या मोजल्या असतील, पण तसे त्याने बाहेर काही दाखवले नाही. तो लगेच खाली आला, हसून माझे स्वागत केले, व सामान घेऊन आम्ही धर्मशाळेत शिरलो.

त्या धर्मशाळेचे नाव ‘ सिंधी धर्मशाळा ’ असे होते. अगोदरच सिंधी लोक घाणेरडेपणाबद्दल प्रसिद्ध आहेत, आणि त्यातूनही ती ‘ धर्मशाळा ’ होती. त्यामुळे तिची अवस्था कशी असेल याचे वर्णन करणे अशक्य आहे. आम्ही आत गेलो तेव्हा चौकातल्या नळावर घाणेरड्या, काळ्या मिचकट विजारी घातलेल्या आणि दोन्ही नाकपुड्यांच्या मधून एकच मोठा लाल मणी असलेले सुंकले घातलेल्या सिंधी बायका पाणी भरीत होत्या; आणि अलाहाबादचा खास असा लाल चौकटीचा पंचा परिधान केलेले एक भैय्याजी उघड्याबंब शरीरास मालिश करीत होते. साऱ्या धर्मशाळेत माश्यांचा सुकाळ होता, व जिन्यातून वर जाताना नाक

दाबूनच जावे लागत होते.

आम्ही वर मित्राच्या बिऱ्हाडात गेलो आणि तेथल्या चारपाईवर मी उगाच सुन्न अवस्थेत बसून राहिलो. चहापाणी झाले, पुण्याच्या गप्पा झाल्या, पण कशातच मन रमेना ! कशामुळेच माझी रसवंती फुलेना ! एक प्रकारचा जड, मद्दडपणा माझ्या वृत्तीत भरला होता, आणि सुन्नपणानेच मी सारे व्यवहार करीत होतो.

आणखी काही वेळ असाच गेला आणि मग काही तरी चाळा म्हणून मित्राने बाहेरच्या खिडकीचे दार उघडले व आम्ही व्हरांड्यात येऊन उभे राहिलो. बाहेर मनस्वी गारठा होता आणि नदीकाठाने यावा तसा गार वारा वाहात होता. घराच्या डाव्या अंगाला रेल्वेचा पूल होता आणि त्यावरून काशीकडे जाणाऱ्या गाडीचे छोटे रूळ गेलेले दिसत होते. समोरच्या बाजूला बैराग्यांचा एक प्रसिद्ध ' आखाडा ' होता आणि नुकतेच सुस्नात झालेले काही बैरागी तेथे धुतलेल्या कषायरंगी छाट्या वाळत घालताना दिसत होते. त्या देखाव्याकडे काही वेळ बघितल्यानंतर मित्राने माझा हात धरला व म्हणाला, " चल वर गच्चीवर जाऊ ! तिथून सारे शहर दिसेल ! "

मी काहीच बोललो नाही. त्याच्या मागोमाग जिना चढून गच्चीवर गेलो व कठड्याला टेकून आसपासचे शहर बघायला लागलो. बोट दाखवून त्याने सांगितले, " तो किल्ला. अशोकाच्या वेळेपासून तेथे उभा आहे."

त्या प्रचंड किल्ल्याकडे बघत असतानाच मी भूतकाळात झेप घेतली.

मित्र पुढे सांगतच होता. " त्या किल्ल्यात एक वटवृक्ष आहे, त्याला अक्षय वट म्हणतात. त्याची मुळे थेट काशी व गया येथपर्यंत गेलेली आहेत. तो वृक्ष अमर आहे असे म्हणतात. आणि किल्ला बांधायच्या अगोदर हजारो वर्षे तो तिथे असावा असा समज आहे. "

मी भारावत चाललो होतो. त्याने माझा हात धरला व गच्चीच्या टोकाशी मला नेत म्हटले, " किल्ल्याच्या पायथ्याशीच त्रिवेणी आहे. "

त्याच्या बोलण्याकडे माझे आता मुळीच लक्ष नव्हते. अक्षय-वटावर स्थिरावलेले मन प्रचंड वेगाने भूतकाळाचा भेद करून मागे चाललेच होते. भूतकाळाचे पापुद्रे उलगडत होते आणि मनाला काळाची गणना करणे अशक्य झाले होते.

इतक्या वेळात गच्चीच्या दुसऱ्या टोकाला येऊन आम्ही उभे राहिलो होतो. आणि तेथून खाली थोड्याशा अंतरावरून वाहणारी नदी दिसत होती. तिकडे बोट करून मी म्हणालो, "हीच गंगा वाटतं ?" तो 'होय' म्हणाला व त्याने पुढे सांगितले, "इकडून डाव्या बाजूने गंगा येते, आणि समोरून यमुना येते, किल्ल्यासमोर त्यांचा संगम होतो— त्रिवेणी संगम !"

'त्रिवेणी संगम' हे शब्द कुणी तरी काही विशिष्ट अर्थाने हवेतल्या हवेत पुटपुटल्यासारखे मला वाटले. शिवमंदिराच्या गाभाऱ्यातील घंटेच्या आवाजाप्रमाणे मनात 'त्रिवेणी संगम' हे शब्द घुमतच राहिले. ते तसे का घुमावेत याचा मी विचार करीत आहे, इतक्यात तोच पुढे म्हणाला, "गंगा पांढरीशुभ्र आहे. यमुना काळी आहे आणि सरस्वती तर गुप्तच आहे. काळ्या-पांढऱ्या पाण्याचा संगम मजेदार दिसतो."

मी काहीच बोललो नाही. पण त्याचा हात धरून खाली उतरलो व म्हटले, "आपण गंगेवर स्नानाला जाऊ !"

त्या तशा थंडीत गंगेवर स्नानाला जाण्याची त्याची इच्छा नव्हती. बायकोने घरी स्टोव्हवर तापवलेल्या तपेल्यातून आंघोळ करणे त्याला बरे वाटत असावे. त्याने मग एकदा मनसोक्त आळोखेपिळोखे दिले व म्हटले, "गंगेवर जायचं ? नको बुवा ! त्यापेक्षा घरीच आंघोळ करू नि ऑफिसला जाऊ. गंगेवर उद्या-परवा जाता येईल."

त्याच्या इच्छेबाहेर जाणे मला अर्थातच शक्य नव्हते. मग मोरीवर चार तांब्ये अंगावर घेऊन आंघोळ उरकली. आजपर्यंत मी तसाच चार तांब्यांतच अंग भिजवीत आलो आहे. कधी फारच झाले तर नळाच्या धारेखाली डोके धरले आहे. पुण्यातील टिळक तलावात एक आणा तास या दराने पोहणे हीच माझ्या बाबतीत आजपर्यंत जलक्रीडेची मजल ठरली आहे. पण काय असेल ते असो, घरच्या मोरीत कशीबशी केलेली ती आंघोळ मला त्या दिवशी तरी पारोशीच वाटली.

दुपारी जेवण करून कचेरीत गेलो तरी मनास एक निराळीच हुरहूर लागून राहिली होती. सकाळी अलाहाबाद स्टेशनवर उतरल्यानंतर वाटलेली उद्विग्नता कोठल्या कोठे पळाली होती. मन अस्वस्थ होते. पण ती अस्वस्थता सकाळसारखी नव्हती. या अस्वस्थतेत एक निराळीच गोडी होती—निराळीच

माधुरी होती.

हे असे का वाटावे हे मला कळत नव्हते. मन सुखातिशयाच्या लाटेत भिजून इतके ओलेचिंब का व्हावे हेच मला समजत नव्हते. 'मी' तोच होतो. मनही तेच होते. आसपासचा देखावाही तसाच होता. पण तरीही मनाच्या साऱ्या अंगावर रोमांच फुलले होते. देवदेवक बसत असावे आणि सनईचे सूर कानांवर येत असावे त्याप्रमाणे साऱ्या दिवसभर वाटत होते. ज्ञानेश्वरी वाचताना उदबत्त्या लावाव्यात आणि त्यांच्या परिमलाने मनावर एक प्रकारची शुचिता विंबावी, तसे त्या दिवशी सारखे वाटत होते.

ऑफिसात मी कसेबसे काम करीत होतो, पण मन सैरावैरा भटकत होते. तशा अवस्थेत काम करणे शक्यच नव्हते, म्हणून मी टाक खाली ठेवला आणि डोळे मिटून आत्मनिरीक्षण करायला लागलो. कसल्या हुरहुरीने मनाला व्याकुळता आली हे पाहायला लागलो.

डोळे मिटल्यानंतर कारण माझ्या एकदम लक्षात आले. चर्मचक्षू बंद केले आणि मन:चक्षू पुढे सकाळच्या वेळी गच्चीवरून पाहिलेली; डाव्या हाताकडून अशोकाच्या किल्ल्याकडे वाहात येत असलेली स्फटिकशुभ्र गंगा मला दिसली ! गंगेच्या नुसत्या प्रथमदर्शनानेच मन इतके भरून यावे याचे मला आश्चर्य वाटले. मी गंगेला नुसते बघितले होते. नुसत्या दर्शनानेच मनाची ही अवस्था झाली होती. अजून तिला मी स्पर्शही केला नव्हता तरी इतकी जवळीक उत्पन्न झाली हे खरोखरच नवल होते.

त्या दिवशी कचेरीत कामाकडे लक्ष लागले नाही नि रात्री झोपही नीट आली नाही. अर्धवट झोपेत देखील ते मोठे पांढरेशुभ्र वाळवंट व त्यातून वाहणारी गंगा दिसत होती. माझे मनच वाळवंट बनले होते आणि त्यामधूनच गंगेचा शुभ्र प्रवाह फेसाळत चालला होता. मनाला त्या रात्री जी शांतता लाभली होती तिचे कारण मी अर्थातच जाणले होते. लहानपणी घरातल्या मोरीत घंगाळभर पाण्यात आंघोळ करताना माझी आजी 'हरगंगे...भागीरथी...' असे काहीसे आर्द्र उद्गार काढी. ते उद्गार इतके दिवस आसपासच्या वातावरणात कदाचित भूतरूपाने हिंडत असतील ! तिने गंगास्नानाची आसक्ती जन्मभर मनातल्या चोरकप्प्यात जतन करून ठेवली असावी. दारिद्र्यामुळे, संसारतापामुळे गंगा-स्नानाची तिची इच्छा अतृप्त राहिली असेल, ती माझ्यामुळे पूर्ण होण्याचा

योग आला होता म्हणूनच मन शांत झाले असेल. पण आजीचेच कशाला, माझ्यापूर्वीच्या साऱ्याच पिढ्यांची ती इच्छा नसेल का? त्यांच्यापैकी कदाचित कोणीच तीर्थराज प्रयागाचे दर्शनही घेतले नसेल! जिवंत असताना राहोच, पण मृत्यूनंतर तरी गंगेत हाडे पडावी, ही प्रत्येक हिंदुमात्राची इच्छाही बहुधा कोणाचीच पूर्ण झाली नसेल. बहुतेक साऱ्यांची बोळवण आळंदीला व नाशकालाच झाली असेल. इंद्रायणीत किंवा गोदावरीत मिळून-मिसळून गेलेल्या माझ्या पूर्वजांच्या अस्थींवर अजूनही कदाचित त्यांच्या इच्छा रेंगाळत राहिल्या असतील. त्यांना माझ्या गंगास्नानाने मुक्ती लाभणार असेल! मनात हे विचार चालू असतानाच मला भास झाला की माझ्या पूर्वीच्या कित्येक पिढ्या जमिनीपासून वरपर्यंत एकावर एक अशा उभ्या आहेत आणि सर्वांच्या वर उभा राहून मी गंगेकडे बघत आहे. गंगेकडे बघणारे डोळे अर्थातच 'माझे' आहेत. पण त्यांच्यात माझ्या पूर्वीच्या पाच-पन्नास पूर्वजांची दृष्टी मिसळलेली आहे. माझ्या स्वतःच्या मनानेच मी गंगेचे सौंदर्य बघत आहे, परंतु त्या सुंदरतेची समज माझ्या सर्व पूर्वजांना होत आहे.

ती रात्र तशीच गेली. शांत झोप अशी लागलीच नाही. तरीही पहाटेच मला जाग आली. खिडकी उघडून बाहेर पाहिले, तर वातावरण शांतच होते. आणि थंडीचा कडाका भासत होता. सारी रात्र झोप आलेली नव्हती, तरीही मनाला खूपच हुशारी वाटत होती. आजारातून बरे व्हावे आणि सर्वांगात नवीन शक्ती भरायला सुरुवात व्हावी तसे वाटत होते. इतके दिवस जणू माझ्या साऱ्या पंचेंद्रियांची चव नष्ट झाली होती. ती कोणाच्या तरी कृपाप्रसादामुळे एकदम जागृत झाली होती. मी कालचाच होतो. शरीरही कालचेच होते, पण तेच आज मला पिसासारखे हलके वाटत होते. जखमेवरच्या खपल्या गळून पडाव्यात तशा मनावरच्या साऱ्या विवंचना, साऱ्या काळज्या गळल्या होत्या आणि ते कापसासारखे मुलायम नि शुभ्र झाले होते. ते मन घेऊन जगात वावरताना काही तरी नवीनच वाटत होते.

मी हलक्या पावलाने उठलो. दार उघडून बाहेर आलो. हातात साबणाची वडी घेतली आणि दोरीवर वाळत टाकलेला पंचा घेऊन आवाज न करता जिना उतरून खाली आलो. मित्र आतल्या खोलीत सुखनिद्रा घेत पडला होता. त्याला त्या वेळी उठवणे वेडेपणाचे होते. मी एकटाच बाहेर पडलो व रस्त्याच्या

पलीकडून वाळवंटात उतरलो आणि नदीच्या रोखाने चालू लागलो.

वेळ पहाटेची होती. दिशा किंचित फाकल्या होत्या आणि थंडीचा जबरदस्त कडाका होता. वाळवंट जवळजवळ निर्मनुष्यच होते व वातावरणात कमालीची शांतता होती. मी चाललोच होतो. आणि समोर – अगदी समोर गंगा नदी वाहताना दिसत होती. चालताना पायाखाली सहज बघितले व माझ्या लक्षात आले की लांबून दिसणारे वाळवंट महाराष्ट्रातील नद्यांच्या वाळवंटांप्रमाणे मुळीच नव्हते. तेथे कठीण, पायाला रुतणारी वाळू नसून पांढरीशुभ्र मुलायम अशी गाळीव वाळू जिकडे तिकडे पसरलेली होती. मला काय वाटले कुणास ठाऊक, पण मी एकदम पादत्राणे हातात घेतली आणि नुसत्या पायांनीच त्या वाळूवरून चालायला लागलो. गंगेच्या काठच्या त्या वाळूचा स्पर्श खरोखरच मृदू आणि मऊमऊ होता. एखाद्या प्रेमळ वयस्कर स्त्रीने अंगावरून हात फिरवावा तसे तेथून चालताना वाटत होते, आणि त्याच अनुषंगाने चंद्रभागेवर किंवा इंद्रायणीवर कार्तिकस्नान करून परत येत असताना वाळवंटातून टोचलेल्या गोट्यांची आठवण होत होती.

मी चाललोच होतो आणि गंगेतील व माझ्यातील अंतर कमी कमी होत होते. मी तीरापर्यंत आलो व उजव्या अंगाला झुलता पूल बांधला होता, त्यावर उभा राहिलो. खालून गंगेचे शुभ्र जल फार मोठ्या वेगाने वाहात होते. उजव्या बाजूला दूर क्षितिजावर सूर्यबिंब नुकतेच उगवत होते; त्याची प्रभा त्या पांढऱ्याशुभ्र पवित्र जलात मिसळली होती आणि लज्जारक्षणापुरतेच वस्त्र अंगावर असलेले तुरळक लोक त्या प्रवाहात यथेच्छ डुंबत होते. त्या वेळी तिथे दुसरा तिसरा कसलाही आवाज नव्हता. आसपासच्या काठावर पवित्र नद्यांच्या भोवती असणारे घाट नव्हते, त्या घाटावर सोनेरी कळस असलेली देवालयेही नव्हती, व घंटानादाचे गंभीर निनादही कानांवर येत नव्हते. पंढरपूरला वा आळंदीला नदी हे साधन असते व तुळशीमाळांनी अलंकृत झालेली, कटीवर दोन्ही कर ठेवलेली पांडुरंगाची मूर्ती हे साध्य असते. पण येथे गंगास्नान हेच साध्य आहे आणि साधनही आहे; त्यामुळे आसपास मंदिरे नसणे स्वाभाविकच आहे.

बराच वेळ मी तसाच बघत उभा राहिलो व नंतर परत तीरावर आलो. कपडे कुठे काढून ठेवावे याचा विचार करीत उभा असतानाच काठावरच एका लाकडी चौकीवर बसलेल्या पंड्याकडे माझे लक्ष गेले. तो पंड्या सडसडीत,

बांधेसूद अंगाचा होता व त्याचे नाक विशेष टोकदार होते. त्याने गळ्यात रुद्राक्षाच्या माळा घातल्या होत्या आणि पांढऱ्याशुभ्र झब्ब्यावर काश्मिरी शाल पांघरली होती. भालप्रदेशावर अर्थातच चंदनाचा टिळा होता आणि आसनाच्या पुढच्या बाजूला मातीच्या तबकड्यांत गंध आणि कुंकू होते.

माझ्याकडे त्याचे लक्ष जाताच तो ओरडला, "आइये बाबूजी! इधर आइये – नहाइये!"

त्याच्या स्वरातील आनंदाने आकर्षित होऊन मी त्याच्याजवळ गेलो तेव्हा त्याने पुन्हा सांगितले, "बाबूजी, नहाइये – धारा बहती है!"

वास्तविक 'धारा बहती है' हे एक त्रिकालाबाधित सत्य आहे. ते इतके ओरडून सांगण्याची जरुरी नाही. 'भागीरथीला खळ लेश नाही – अखंड रामायण गीत गाई' हे कविवचन प्रसिद्ध आहे.

गंगेच्या प्रवाहाला अंत नाही हे कुणी मुद्दाम सांगावे असे नव्हते. महाभारतातल्या नि रामायणातल्या कथा सहस्र मुखांनी साऱ्या भारतवर्षात पिढ्यान्‌पिढ्या वाहात राहणार त्याचप्रमाणे गंगेचे आहे हे मला माहीत होते – साऱ्यांनाच माहीत होते. ते महान सत्य होते आणि पंड्याने उच्च स्वरात ते उद्घोषित करण्याची खरोखरच जरुरी नव्हती. तरी देखील तो एखाद्या बालकाच्या निरागसतेने ओरडत होता, "बाबूजी आइये ... नहाइये ... धारा बहती है!" वाहणाऱ्या – सतत अनादिकालापासून वाहणाऱ्या त्या जलधारेकडे मी काही वेळ नुसते बघितले, कपडे काढून त्या लाकडी चौकीवर ठेवले व हातात साबणाची वडी घेऊन मी पाण्याकडे निघालो.

हातातल्या वडीकडे बघून पंड्या तुच्छतेने हसला व म्हणाला, "बाबूजी, इसकी तो कुछ जरूरत नहीं. गंगाजीमें नहाते समय साबुनकी कुछ जरूरत नहीं होती."

मी त्याच्याकडे आश्चर्याने बघितले तेव्हा तोच पुढे म्हणाला, "साबुन इधरही छोड दो बाबूजी. गंगाजी की मिट्टी से ही सारा शरीर साफ हो जायेगा. आप अनुभव कीजिये."

मी साबण खाली ठेवला आणि तसाच नुसता लंगोट नेसून पाण्याकडे धावलो. पाणीही जोराने धावत होते. त्याला नमन केले आणि माझे शरीर त्या जलधारांच्या स्वाधीन केले.

पाणी मनस्वी थंड होते. त्यामुळे पहिल्या बुडीत अंग काकडले व हुडहुडी भरल्यासारखी झाली. बुडी मारून वर आलो आणि एकदम जादूच्या कांडीने जावी तशी थंडी कुठल्या कुठे पळाली व शरीरात निराळेच चैतन्य खेळायला लागले. गंगेचा प्रवाह जोरदार होता, पण खोली मात्र जिकडे तिकडे कमरेइतकीच होती. पाण्यात उभे राहून आसपासच्या पात्राकडे बघण्यात मोठी मौज होती. सूर्य आता चांगलाच वर आला होता, आणि कोवळे लुसलुशीत ऊन अंगावर पडत होते. आसपासची माणसे स्नानाचा आनंद लुटण्यात मग्न होती. कुणीच कुणाशी बोलत नव्हते. सारीच जणे त्या प्रचंड, वेगवान जलधारांशी क्रीडा करीत होती. डोळे उघडून डावीकडे बघितले तेव्हा माझ्या पलीकडेच दोन पंजाबी तरुण स्त्रिया जवळजवळ विवस्त्र अवस्थेत स्नान करीत असताना दिसल्या. त्यांची नि माझी दृष्टी एकमेकांशी भिडली, पण त्यांना काहीच वाटले नाही. गंगेच्या तळातील पांढऱ्या मातीने त्या स्वतःची पांढरीशुभ्र शरीरे घाशीत होत्या. परंतु मलाही काही वाटले नाही; माझ्याही मनाच्या तारा कुठेही छेडल्या गेल्या नाहीत.

साधारणपणे तरुण स्त्रीच्या दर्शनाची मला हौस आहे. त्यातून त्या तर उंच्यापुऱ्या बांधेसूद शरीराच्या पंजाबी स्त्रिया होत्या आणि शामॉयच्या कापडाने हस्तिदंती नक्षीदार भांडे साफ करावे तशा थाटात त्या गंगेच्या मातीने स्वतःची डौलदार वक्षःस्थळे स्वच्छ करीत होत्या. तरीही मला काही वाटले नाही हे आश्चर्य होते. स्त्री-शरीराच्या – अनावृत स्त्री-शरीराच्या दर्शनाने देखील मुळीच विचलित न होण्याच्या आयुष्यात काही वेळा असतात त्यातलीच ती वेळ असावी. चोरट्या नजरेने मी आसपास बघितले. तेथे स्त्रिया होत्या, पुरुषही होते. सर्वांची शरीरे अनावृत होती. पण कोणीच कोणाकडे बघत नव्हते. सारेच जणू निर्गुण निराकार झाले होते. जाड सतरंजीतून मळ झटकावा तशा साऱ्यांच्याच मनातून वासना झटकून टाकल्या गेल्या होत्या. स्त्रीत्व वा पौरुष या दोन्ही भावनांचे मनावरील ओझे साऱ्यांचेच संपले होते आणि ती निराळ्याच मानसिक जगात वावरत होती.

यथेच्छ डुंबल्यानंतर मी बाहेर आलो. कपडे परिधान करून कपाळाला तिलक लावला व पंड्याला दक्षिणा देऊन गावाकडे निघालो. वाळवंट संपल्यावर दारागंजातील बाजार सुरू झाला आणि भाजी किंवा संसारोपयोगी जिनसा खरेदी

करणारे स्त्री-पुरुष दिसायला लागले. त्या लोकांकडे मी बघितले आणि जणू जीवनाच्या बाजारात परत आलो. बाजारातून हिंडणाऱ्या त्या स्त्रिया पूर्णपणे वस्त्रावगुंठित होत्या, व त्यांच्या तोंडावर उत्तर हिंदुस्थानी पद्धतीप्रमाणे पदर होते, तरीही त्यांच्याकडे मला बघावेसे वाटत होते. मघाशी गंगेच्या पात्रात उभा असताना जी निर्गुण व निराकार दृष्टी झाली होती ती पुनश्च मायामोहाच्या पसाऱ्यात सापडली होती हाच त्या सर्व गोष्टींचा अर्थ होता.

बाजारात हिंडून मी घरी आलो तेव्हा माझ्या खांद्यावर ओल्या पंचाचा पिळा होता आणि भालप्रदेशावर चंदनाचा कुंकुममिश्रित तिलक होता. मित्राच्या घरी जिना चढून वर गेलो तेव्हा अजूनही तो लोळत पडलेला होता आणि त्याची बायको नुकतीच उठून टूथपेस्टने दात साफ करीत होती. तिला माझे ते रूप अर्थातच नवीन होते. माझा तो बालमित्र असल्याने तिने मला अनेक वेशांत, अनेक परिस्थितीत बघितले होते, परंतु कपाळावर चंदनतिलक लावलेले माझे ध्यान पाहून तिला हसू लोटल्याशिवाय राहिले नाही. पेस्टने पांढरे बुळबुळीत झालेले दात बाहेर काढून ती फिदीफिदी हसली व म्हणाली, "काय विचार काय आहे?"

हातातला पिळा मी दोरीवर वाळत टाकत होतो म्हणून काहीच उत्तर दिले नाही. इतक्यात डोळे चोळीत व जांभया देत माझा मित्र बाहेर आला, तेव्हा ती त्याला हसून म्हणाली, "यांना मात्र सांभाळायला पाहिजे हो. पहिल्याच दिवशी इतकी मजल! असेच राहिले तर संन्याशी व्हायचे आणि आता माघ-मेळा भरणार आहे तो संपला की वैराग्याच्या तांड्याबरोबर हिमालयात निघून जायचे!"

माझा मित्र हसला आणि माझ्याशी पारोशा तोंडानेच काही बोलला. मीही काही बोललो. पण त्यात समरस झालो नाही. माझ्या सर्व गात्रांत एक प्रकारची शुचिता व पावित्र्य भरून राहिले होते. नुकतीच अंथरुणातून उठलेली व जांभया देणारी माणसे माझ्यापासून खूप लांब– हजारो योजने लांब असल्या-सारखे वाटत होते. त्यांच्यात सामावून जाणे त्या वेळी मला शक्यच नव्हते.

असेच पाचसात दिवस गेले. आणि माघ महिना जवळ येत चालला. मी गंगास्नान करीत होतो आणि माझ्यात बदल होत चालला होता. हास्यविनोद, थट्टामस्करी, खाणेपिणे, कपडे, यांपैकी कशातच माझी वासना उरलेली

नव्हती. या जीवनाबद्दल माझी रुचीच बदलली होती व मी निराळाच माणूस झालो होतो.

माघमेळ्याची गर्दी अलाहाबादेत भरत चालली आणि त्या तशा भयंकर थंडीत गंगा-यमुनांचे वाळवंट राहुट्यांनी फुलून गेले. माघ महिन्यात दररोज प्रातःकाली सूर्योदयापूर्वी त्रिवेणीचे स्नान करणारास मोक्षप्राप्ती होते असे पुराणात सांगितले आहे. त्या मोक्षाच्या प्राप्तीसाठी प्रांतोप्रांतीचे यात्रेकरू जमा झाले आणि ती अपूर्व पर्वणी साधण्यासाठी उत्सुक झाले. त्यांच्याबरोबर माझीही उत्सुकता शिगेला पोहोचली. मी ऑफिसचे काम करीत होतो, मित्राबरोबर जेवतखात होतो, पण ते सारे बाह्यात्कारी होते. त्या फक्त शारीरिक क्रिया होत्या. तो सर्व वरवरचा देखावा होता, पण अंतर्यामात मीही संन्यासी बनून राहिलो होतो, आणि माघस्नानाच्या प्राप्तीसाठी हपापलो होतो.

हळूहळू मग तो दिवस उगवला, आणि मी पहाटे साडेतीन-चारच्या सुमारास जागा झालो. थंडी कडाक्याची होती व आकाशात लखलखणाऱ्या चांदण्यांची दाटी होती. उठून मी चूल भरली आणि खिडकीत उभा राहून त्या नक्षत्रांकडे अनिमिष नेत्रांनी बघत राहिलो. नंतर बाहेरचा गारठा अंगात भरल्यावर आत आलो आणि हातात वस्त्र घेऊन त्रिवेणीकडे निघालो. रस्त्यावर काळोख होता व थंडीने हातपाय थडथडत होते. असल्या थंडीत अर्धा-पाऊण मैल लांब असलेल्या त्रिवेणीकडे स्नानासाठी निघणे हाच खरोखर वेडेपणा होता. पण मी कशाने तरी भारला गेलो होतो व शरीरातला कणन्‌कण मला गंगेकडे खेचीत होता. माझ्या मनात माझे सारे पूर्वज बसले होते व ते माझ्या इच्छेचे संचलन करीत होते. तिकडे न जाणे मला केवळ अशक्य होते.

दहा-पंधरा पावले चालून गेलो व डाव्या बाजूला लांब दूरवर त्रिवेणीचे वाळवंट दिसायला लागले. माघस्नानासाठी ते वाळवंट विद्युत्‌दीपांनी नटवले होते व यमुनेच्या पात्रात सोडलेल्या होडग्यांतील दिवे इतक्या लांबूनही लुकलुकताना दिसत होते. त्रिवेणीवर कुठे तरी दूरध्वनिक्षेपण यंत्र बसविले होते आणि त्यातून ' श्रीकृष्णगोविंद हरे मुरारे हे नाथ नारायण वासुदेव ' हा मंत्र सुरू होता.

तो मंत्र ऐकत यात्रेकरूंच्या आणि बैराग्यांच्या तांड्यांतून मी चालली होतो. चालता चालता भारलेल्या माणसासारखा मी तीरावर पोचलो आणि तशा त्या

कडक थंडीत चौकीवर कपडे काढून ठेवून आसपास बघितले. आसपास हजारो नव्हे, लाखो माणसे होती व ती त्या भयंकर थंडीत केवळ त्रिवेणीस्नान करण्यासाठी आली होती. त्यांत बैरागी होते, नग्न साधू होते, लहान होते, मोठे होते, सर्व काही होते. तेथे तीरावर देऊळ नव्हते, देव नव्हते. पूजाअर्चा नव्हती, जपजाप्य नव्हते, काही नव्हते! फक्त तेथे गंगा नि यमुना होत्या. डाव्या बाजूने वाहात आलेली, खळखळाट असणारी परंतु खोली नसणारी अशी ती परमपवित्र गंगा आणि दुसरीकडून संथपणे येणारी, खोल असणारी कृष्णवर्णाची यमुना! भगीरथाने पितरांना मुक्ती मिळावी म्हणून पृथ्वीवर आणलेली, नेहमी पवित्र असणारी, आणि प्रत्यक्ष भगवान शंकराच्या मस्तकावर चढून बसणारी गंगा! व कृष्णाने आपल्या असंख्य क्रीडांनी पुनीत केलेली यमुना तेथे एकत्र आल्या होत्या. जणू पावित्र्य आणि रंगेलपणा किंवा अवखळ बाल्य आणि खोल तारुण्यच तेथे एकत्र झाले होते. लोक त्या थंडीतही देहभान विसरत होते आणि त्या संगमात बुड्या मारून वर येत होते. 'हरगंगे...भागीरथी' असा घोष करीत होते. त्या लोकात मीही मग एकदम मिसळलो व बघता बघता पाण्याशी एकरूप होऊन गेलो.

पाण्यात बुड्या मारून दमलो आणि गंगेच्या पात्रात काही वेळ उभा राहिलो तेव्हा पूर्वेच्या बाजूने सोनेरी रंगाचे सूर्यबिंब वर आले व त्या देखाव्याला आणखीच रमणीयता प्राप्त झाली. सूर्य डोंगरावर उगवतो हे पुण्यास राहिल्यामुळे खरे वाटत होते. परंतु येथे डोंगरच नव्हता, आणि उजव्या बाजूला एखाद्या हातावर सूर्यबिंब वर येताना दिसत होते. पिकलेला आंबा, थोडा हात लांब करून झाडावरून तोडून घेता यावा, तसेच त्रिवेणी संगमात उभा राहून, हात लांब करून लालभडक सूर्यबिंब मी तोडून घेऊ शकेन, असे वाटले. गंगेच्या प्रवाहात उभा राहून मी त्या सूर्यबिंबाकडे बघत होतो आणि मला जगाचे ज्ञान प्राप्त होत होते. गंगाप्रवाह अनादिकालापासून तसाच सारखा वाहतच होता. आणि त्याच्यात नाना तऱ्हेची माणसे पावन होत होती. हरिश्चंद्रापासून नव्हे, प्रत्यक्ष प्रभू रामचंद्रांपासून किंवा महर्षी व्यासांपासूनची माणसे त्याच गंगेने पावन केली होती. मानवी पिढ्यांच्या रक्षा आणि अस्थी त्याच गंगेने हजारो-लाखो वर्षे स्वतःच्या पोटात सामावून टाकल्या होत्या. तो प्रवाह जसा काही कालप्रवाहच होता. एका दृष्टीने तो प्रवाह हजारो वर्षांपूर्वीचा म्हणजेच जराजर्जर

होता, परंतु त्याच्यात जरेचे – वार्धक्याचे मुळीदेखील चिन्ह नव्हते. तो तरुणच होता. यौवनसंपन्न होता आणि खळाळून वाहातच होता. त्या प्रवाहात उभा राहिलेला माझा देह त्या वेळी जेमतेम तीस-बत्तीस वर्षांचाच होता. त्या वेळी तो तरुण होता, परंतु कालांतराने त्याला वार्धक्य येणार होते. त्याच्यावरची टवटवी नाहीशी होऊन त्यावर सुरकुत्यांचे जाळे पसरणार होते आणि त्यानंतर तो देहही झाडापासून पिकलेले फळ गळून पडावे तसा गळून पडणार होता. मी गंगेत उभा होतो! गंगा म्हातारी होती. अनंत कालापासून तिच्या हृदयाचे स्पंदन सुरू होते. खरे म्हणजे मी तरुण होतो, परंतु तिच्याजवळच यौवनाचा आणि सामर्थ्याचा साठा होता. माझा आज ना उद्या नाश ठरलेला होता! परंतु ती मात्र अविनाशी नि चिरतरुण होती!

आंघोळ उरकली नि घराकडे निघालो व मनात एक निराळीच क्रांती सुरू झाल्याचे आढळले. वैराग्याचा नि विरक्तीचा झटका यावा, तसे मग घरदार, संसार, नोकरी सारेच खोटे वाटायला लागले. आज 'मी' आहे, संसार करीत आहे, पण 'मी' कोण आहे? कशासाठी संसाराचा इतका अट्टाहास चालला आहे? राग, लोभ, मत्सर इत्यादी भावनांच्या आवर्तात कशासाठी स्वतःला बंदिस्त करून घेत आहे? असे जगात अनेक लाखो कोट्यवधी 'मी' आहेत! मातीतून येतात नि पुन्हा मातीत जातात! आज आहेत नि उद्या नाहीत! परंतु गंगामाता चिरकालीन टिकणारी, चिरतरुण राहणारी आहे! ती सर्वसाक्षी आहे. क्षणभंगुर असलेल्या मानवी जीवनाकडे ती हजारो वर्षांपासून गमतीने पाहात आहे.

मनात अशा तऱ्हेचे विचार का यावे हे कळत नव्हते. परंतु त्या दिवसांत ते विचार फार येत होते. आपले जीवन क:पदार्थ वाटावे–आपली सुखदु:खे, आपले संसार नि आपल्या आशाआकांक्षा सारेच व्यर्थ वाटावे असे काही तरी सामर्थ्य त्या काळ्यापांढऱ्या पाण्यातच असावे असे वाटते. स्नानाचा तो अपूर्व सोहळा महिनाभर चालला होता. मी भल्या पहाटे उठत होतो, व त्रिवेणीवर जाऊन हजारो लोकांसमवेत उगवत्या सूर्यबिंबाला साक्षी ठेवून स्नानाचा आनंद लुटीतच होतो. त्या दिवसांत मला दुसरे काही सुचत नव्हते. वाटत होते की हे सारे सोडून द्यावे व बैरागी व्हावे; भगवी वस्त्रे परिधान करावी आणि हातात कमंडलू घेऊन सारा भारत पालथा घालावा. गंगेपासून गोदावरीपर्यंत आणि

कावेरीपासून तुंगभद्रेपर्यंत साऱ्या नद्यांच्या पाण्याने शरीर पुनीत करून घ्यावे. संसार करू नये. राग-लोभादी विकारांचा मनाला स्पर्श होऊ देऊ नये. सारा जन्म तसाच निर्विकार-निराकार अवस्थेत काढावा. स्वतःला नाव असू नये, गाव असू नये, परिवार असू नये ! नुसतेच सारे आयुष्यभर भटकावे नि एक दिवस अगदी सहजतेने पंचत्वात विलीन व्हावे !

माघस्नान संपले आणि एकदोन महिन्यांतच अचानकपणे माझी बदली पुण्यास झाली, व मी तेथून निघालो. पुण्यास येताना वाटेत मुंबईस काही दिवस थांबलो आणि एकदोन दिवसांतच मी पुन्हा पूर्वीचा झालो. मी हसा-खेळायला लागलो, थट्टामस्करीत रस घ्यायला लागलो, संध्याकाळच्या वेळी रस्त्याने उगाचच हिंडण्यात मला गंमत वाटायला लागली व पुन्हा राग-लोभादी विकारांची जळमटे मनावर साचायला लागली. थोड्याच दिवसांत माझी विरक्ती संपली व संसारात मला मजा वाटायला लागली.

त्या गोष्टीला आज अनेक वर्षे होऊन गेली आहेत. मला तेव्हापासून तशा प्रकारची विरक्ती कधीच आली नाही. मी आज संसारात रमून गेलो आहे. पण अजूनही प्रतिवर्षी माघ महिना येतो आणि पुण्या-मुंबईलाही थंडीचा कडाका पडतो. तशा त्या थंडीत एखादे दिवशी सकाळी बाथरूममध्ये सुवासिक साबण लावून गरम पाण्याने आंघोळ करीत असताना मला एकदम गंगा-यमुनांचा संगम दिसतो. त्यात हजारो-लाखो माणसे स्नान करीत असतात, आणि कुणी तरी बालिश उत्साहाने माझ्या कानात सांगत असते, 'बाबूजी,–आइये–नहाइये–धारा बहती है !'

# १४

## माझ्या आईवडलांचा संसार

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

माझ्या आईचं नाव होतं रमा. तिचे वडील तिच्या लग्नापूर्वीच आफ्रिकेत वारले. त्यांना मी बघणं शक्यच नव्हतं. मी दहा-पंधरा वर्षांचा होईपर्यंत तिची आई आमच्याच घरी येऊन जाऊन असे. तिची बुधवारात एकच एक खोली होती. तिथे ती शिवणकाम करी. पैसे काय मिळवी कुणास ठाऊक!... मला तिच्या दोन आठवणी आहेत. ती आमच्या घरी येई तेव्हा वर्तमानपत्राच्या तुकड्यात बांधून तांबड्या-पिवळ्या पेपरमिंटच्या गोळ्या आणी...दुसरी आठवण जास्त चमत्कारिक आहे. तिच्या हातापायाची बोटे अशी मुडपलेली होती. ती विचित्र दिसत. एकदा मी 'मा' ला त्याबद्दल विचारले होते. तिने सांगितले होते, "शिवताना मशीनमध्ये तिची बोटं सापडली. त्यामुळे ती तशी झाली आहेत." लहानपणी या सांगण्यावर विश्वास बसला होता. पण मोठेपणी ते कायम गूढच राहिले होते.

माझ्या आईचं नाव होतं रमा. मला लहानपणी 'र' म्हणता यायचा नाही. मी बराचसा बोबडा होतो. त्यामुळे तिला मी नुसतंच 'मा' म्हणायचा. त्या काळी हिंदी भाषेचा मुळीच प्रचार नव्हता. पुण्याच्या ब्राह्मणी वातावरणात तर हिंदी माहीतही नव्हती. त्यामुळे माझं 'मा' लोकांना चमत्कारिक वाटे.

आईबद्दल लिहायचे म्हणजे आफ्रिकेच्या आठवणी आल्याच. मी स्वतः आफ्रिकेला कधी गेलेला नाही. आईही फार लहानपणी इकडे आली. पण तिच्या

बालमनावर थोडीफार आफ्रिका कोरलेली होतीच. ती तिथल्या राक्षसांसारख्या काळ्याकुट्ट कुरूप लोकांबद्दल बऱ्याच वेळा सांगे आणि भय निर्माण करी. लहानपणच्या माझ्या बऱ्याचशा स्वप्नांत आफ्रिकेतले काळे लोक असत. त्यांच्या भीतीने मी माझ्या पांघरुणात गुदमरून गेल्याचे स्मरते. पुढे आफ्रिकेत जाऊन आलेले लोक मला भेटले. मी भीती घेतली होती तसे काळे हबशी लोक तिथे फारसे नाहीत असे त्यांच्या बोलण्यात आले. बहुधा रावणाच्या लंकेची जी वर्णने मी माझ्या पुस्तकांत वाचली होती तीच मी माझ्या मनातल्या आफ्रिकेला लाव-लेली असावीत.

माझ्या आईचे वडील सुमारे शंभर वर्षांपूर्वी आफ्रिकेत धंदा करण्यासाठी गेले होते. उपासमारीने ते वैतागले आणि मुंबईहून कसे कुणास ठाऊक पण केनि-याला जाऊन पोचले. तिकडे त्यांनी काही दुकान वगैरे काढलं होतं. व्यापार-उदीम केला होता. पैसे बरे मिळवले असावेत. पण त्याचा उपयोग माझ्या आईला किंवा आजीला झाला नाही.

केनियामध्ये आठदहा वर्षे धंदा केल्यानंतर माझे आजोबा साधारणपणे वयाच्या तीसबत्तिसाव्या वर्षी मुंबईस आले. तिथून लग्न करण्यासाठी कोकणात वरसईला गेले. माझी आजी तेव्हा अकरा-बारा वर्षांची उपवर मुलगी होती. तिच्या घरातल्या माणसांना आजोबांच्या रूपानं नागवं कोल्हंच भेटलं. तीस वर्षांच्या आजोबांशी बारा वर्षांच्या आजीचं कसंबसं लग्न लागलं. आणि एकदोन दिवसांतच ते नवविवाहित जोडपं आफ्रिकेला जाण्यासाठी बोटीत चढलं... वरसईपासून मुंबईचा पल्ला लांबचा. तिकीटही भारी. त्यामुळे तिच्या घरचं तिला पोचवण्यासाठी धक्क्यावर कोणीही आलं नव्हतं. त्या एकाकी अवस्थेतल्या बारा वर्षांच्या मुलीच्या मनाची तेव्हा किती ओढाताण झाली असेल याचं चित्र मी बऱ्याच वेळ मनाशी रंगवत बसतो...माझे डोळे अजूनही पाणावतात.

माझी आजी तिकडे गेली ती जवळजवळ दहा वर्षं होती. पुढे आजोबांनी तिला आणि तीन मुलांना बोटीत बसवून मुंबईस पाठवून दिले. त्यानंतर आजो-बांची आणि तिची भेट नाही. त्यांनी तिकडेच एक आफ्रिकन बाई ठेवली होती असं म्हणतात. तिला मुलंही झाली होती. पुढं आजोबा तिकडेच वारले. त्यांचा आजीशी आणि मुलांशी संबंधच उरला नाही. त्यांनी कधी कसली जबाबदारीही घेतली नाही. आफ्रिकेचा अध्याय तसा संपला. मजजवळ आयुष्यात फारसे पैसे

कधी जमले नाहीत; मला कधी सवडही मिळाली नाही. पण सारखं वाटतं की आपण केनियातल्या त्या गावी जावे...तिथे माझ्या आजोबांची मुलं असतील... एखादं घरही असेल. तो संसार एकदा नुसता बघावा !...अर्थात माझी ती इच्छा कधीही फलद्रूप झालेली नाही.

माझ्या आजीला दोन मुली आणि एक मुलगा. तिला एकटीलाच आजोबांनी बोटीत बसवून दिलं. तिच्याजवळ एक पत्त्याचं पत्र दिलं. तिनं मुलांसकट पुण्यास जावं आणि आजोबांच्या एका खानदानी श्रीमंत नातेवाइकाला भेटावं असं ठरलं होतं. प्रवासात मुलाची प्रकृती बिघडली आणि पाचसात दिवसांत तो बोटीवरच गतप्राण झाला. बोटीवर अन्त्यविधीची व्यवस्था नसते. खलाश्यांनी मुलाचा मृतदेह उचलला आणि उसळत्या समुद्रात आजीच्या देखत टाकून दिला. पोटभर रडण्याइतकाही आजीला अवसर नव्हता. दोन मुली होत्या. आसपास ओळखीचं कोणी नव्हतं. त्यांच्या गावातून एक मराठी सुतार त्याच बोटीने मुंबईस येत होता. त्याच्याच आधारावर दोन मुली घेऊन आजी पुण्याला आली आणि त्या श्रीमंत नातेवाइकांकडे येऊन धडकली. त्या घरात तिचे स्वागत कसे झाले असेल याविषयी मी काहीच कल्पना कधी लढवत नाही.

आईचं माहेरचं आडनाव मुद्दामच सांगत नाही. ते श्रीमंत गृहस्थ जुन्या सरदार घराण्यातले होते. स्वतः फर्स्ट क्लास जज्ज होते. त्या काळातच त्यांना पाचसहाशे रुपये पगार होता. त्यांचा वाडा किल्ल्यासारखा होता. मोठा काळाकभिन्न दरवाजा दोन लोखंडी कड्यांचा. पुढच्या बाजूला देवडी मग ओसरी नि माजघर !... मागच्या परसदारात मोठी चौकोनी विहीर...तिथे पारिजातकाची नि सोनचाफ्याची झाडं... पैपाहुणा, नातेवाईक, आश्रित, सगळे मिळून घरात पंचवीस माणसे असत. तेवढ्या इतमामाला माझी आजी नि तिच्या दोन मुली मुळीच भारी नव्हत्या. पुरुषांच्या नुसत्या चित्रावती खाऊन देखील त्यांची पोटं भरली असती असं म्हणत.

माझी आई आफ्रिकेतून आली तेव्हा आठ वर्षाची होती. तिच्या खाली आणखी एक बहीण होती. त्या मोठ्या खानदानी घरात कामाधामाला सारखं माणूस लागेच. दर वर्षी एकदोन बाळंतपणं होत. एखादं लग्न निघे. घरात राबण्यासाठी माझ्या आजीचा उपयोग झाला असता.

त्या मोठ्या घराचा, तिथल्या श्रीमंतीचा आणि डामडौलाचा माझ्या आईच्या

मनावर खोल असा परिणाम झाला असावा. त्या घराविषयी नि स्वतःच्या बालपणाविषयी बोलायला तिला आवडे... तिची निरीक्षणशक्ती जबर होती. एखादी गोष्ट रंगवून सांगण्याची शक्तीही तिच्यात होती. त्यामुळे जुन्या गोष्टी निघाल्या की त्या घराचे चित्र ती हुबेहूब उभे करी. तिथली अनेकविध माणसे कशी बोलत, त्यांचे एकमेकांशी संबंध कसे असत याचे मार्मिक वर्णन ती करी. मोठेपणी मी एकदोनदाच त्या घरी गेलेलो आहे. त्यांपैकी काही माणसे पाहिलेली आहेत. लहानपणी आईने काढलेली चित्रे बरीचशी खरी असल्याचा साक्षात्कार मला झालेला आहे.

त्या घरात प्रमुखपण वहिनीबाईंकडे होतं. त्या बोलण्यात जहांबाज, बऱ्याचशा तुटक पण कर्तृत्ववान होत्या. एवढ्या मोठ्या घराची सर्व सूत्रं त्यांच्या हातात असत. लग्नकार्य ठरविणे, ती पार पाडणे, हुंडयापांडयाची व्यवस्था करणे, सगळा इतमाम संभाळणे हे त्यांचे काम असे. त्या उंच, शेलाट्या अंगयष्टीच्या आणि गौरवर्णाच्या होत्या. डोक्यावरून टोपपदरी लुगडयाचा पदर घेत. अंगाखांद्यावर ठसठशीत दागिने असत. लग्नाकार्यात तर त्या गौरीसारख्या सजत.

घरात आश्रित बरेच होते. त्यांच्या मुलाबाळांच्या लग्नांची जबाबदारीही वहिनीबाईवरच असे. त्यांनी एकदा ठरवले की कोणाचीही मोडता घालण्याची प्राज्ञा नसे.

एकदा संध्याकाळी त्या बग्गीतून उतरल्या नि घरात आल्या. माझी आजी माजघरात भाजी चिरत बसली होती. माझी आई आत काही काम करत असावी.

त्या आल्या आणि बैठकीवर टेकत म्हणाल्या, "रमाचं लग्न ठरवून आले... मुलगा सरकारी नोकरीत आहे...आज बुधवार... परवा शनिवारी लग्न...गोरज मुहूर्तावर."

माझी आजी त्यांच्याकडे बघतच राहिली. त्यांना काही विचारण्याची टापच नव्हती. माझी आई रंगाने काळी, दिसायला ओबडधोबड होती. तिच्या लग्नात वहिनीबाईंनी लक्ष घालावं हेच विशेष होतं. माझ्या आईला काय वाटलं, हे सांगता यायचं नाही. मी तिला त्याबद्दल खूप वेळा विचारलं होतं. कोणत्याही विषयावर खुलून बोलण्याचा तिचा स्वभाव होता. पण स्वतःच्या लग्नाबद्दल मात्र ती पुढे कधीही बोलली नाही.

दोन दिवसांत लग्न! तयारी फारशी करायचीच नव्हती. त्या मोठ्या घरात

नेहमीच सणसमारंभ साजरे होत. एका गरीब आश्रिताच्या मुलीच्या लग्नाची फारशी मातब्बरी नव्हती.

लग्नाच्या दिवशी माझे वडील घोड्यावरून न येता पालखीतून आले. भोयांनी पालखी जमिनीवर ठेवली. मग ते हातात काठी घेऊन लंगडत लंगडत विवाह मंडपाकडे गेले. कित्येकांच्या मनात पाल चुकचुकली. माझ्या आजीने डोळ्याला पदर लावला, काय चालले आहे हे रमाला कळलंच नाही. ती गौरीहरासमोर बसली होती... अंतर्पाट बाजूला झाला तेव्हा माझे वडील पायाने अधू असल्याचे तिला कळून चुकले. त्या गोष्टीची वाच्यता तोपर्यंत कोणीही केली नव्हती. तिला किंवा तिच्या आईला विचारलं नव्हतं.

माझे वडील आणि त्यांची आई वहिनीबाईंच्या दूरच्या नात्यातली होती. आपल्या मुलाचं लग्न कसं होईल अशी त्यांच्या आईला नेहमी काळजी वाटे. त्या विवंचनेतून वहिनीबाईंनी त्यांना सोडवलं होतं. आपल्या घरची आश्रित मुलगी त्यांनी बिनबोभाट उजवली होती.

माझ्या आईचा संसार असा लंगडा होता. तो पुढे जवळ जवळ पंचवीस वर्षे झाला. पंगू नवऱ्याबद्दल तिला काय वाटत असेल ?... सांगता यायचं नाही. कारण तसं ती कधी कोणाजवळ बोललेली नाही. अनेक दुःखे आपण नेहमी मनाच्या अंतर्भागात लपवून ठेवतो. मनाच्या काळोखात असे अनेक विचार असतात की, ते आपण दुसऱ्याला कधी दिसू देत नाही... तसंच तिचं ते दुःख असावं.

पण खरं बोलायचं म्हणजे ते दुःख तरी होतं का ? कित्येक वेळा एखाद्या माणसाच्या आयुष्याकडे दुसरा माणूस त्रयस्थ नजरेने बघतो तेव्हा त्याला त्यांतली अनेक दुःखं दिसतात. ती व्यक्ती फार कष्टी असावी असे वाटते. पण खुद्द तसं आयुष्य जगत असलेल्या व्यक्तीला त्या दुःखाची कल्पनाही नसते. कुरूप नवऱ्याची सुंदर बायको मनात जळत असेल असं आपण समजतो, पण माझ्या नात्यातल्या अशा दोनतीन स्त्रिया आहेत, त्यांना त्या दुःखाची जाणीवही नाही. त्या अगदी सुखात असलेल्या दिसतात. माझ्या आईचेही कदाचित तसेच असावे. आपण अनाथ आहोत, रूपानं सामान्य आहोत... आपल्या लग्नासाठी आईजवळ पैसे नाहीत अशा अवस्थेत माझ्या वडलांसारखा नवरा मिळाला हेही भाग्यच आहे असेच ती समजत असावी... माणसाच्या मनाचं काही सांगता येत नाही.

स्वत:च्या लग्नाबद्दल पुढे कधी कधी ती आठवणी सांगे. त्यांतल्या एकदोन महत्त्वाच्या आहेत...वहिनीबाईंनी माझ्या वडलांची वरात पालखीतून थाटामाटात मिरवत नेली. त्या वेळी माझ्या आईच्या अंगावर बिंदीपट्ट्यासह सर्व दागिने होते. ती त्या अलंकारांनी अगदी लवली होती. पाहुणे आलेल्या सगळ्या वऱ्हाडी बायकांना त्या दागिन्यांचं फार कौतुक वाटत होतं. मुलगा पायानं अधू असला तरी याच्याजवळ सोनंनाणं भरपूर आहे असंच सर्वजण म्हणत होते. पण माझ्या बारा वर्षाच्या आईला मात्र खरी परिस्थिती माहीत होती. ते सर्व दागिने वहिनीबाईंचे आहेत आणि मांडवशोभेनंतर लगेच ते आपल्याला काढून द्यावे लागणार आहेत याचं ज्ञान तिला होतं. ती सांगायची, "वरात घरात आली... लोक आपआपल्या घरी गेले...वहिनीबाई निघाल्या...त्या किंचित मोठ्याने म्हणाल्या, 'तेवढे सगळे दागिने काढून दे बरं...जिथला माल तिथे गेलेला बरा' ...त्यांचे शब्द माझं हृदय कापीत गेले...अजूनही ते वाक्य आठवलं की मी कावरीबावरी होते."

दुसरा प्रसंगही तसाच !...आईचा कुणी लांबचा मामा होता. तो बऱ्यापैकी श्रीमंत होता. या लग्नामुळे त्याचं माथं फिरलं आणि वरातीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी तो आमच्या बिऱ्हाडी आला, तेव्हा माझे वडील नि त्याची आई, बाहेरच्या खोलीत चहा पीत बसले होते. तो आला आणि त्याने लगेच मोठमोठ्याने भांडण्यास सुरुवात केली...तो म्हणाला, "तुम्ही सगळ्यांनी फसवून हे लग्न केलेले आहे. धट्ट्याकट्ट्या मुलीच्या गळ्यात लंगडापांगळा मुलगा बांधला... आता नुसताच लंगडा असला तरी पुरवलं, नाहीतर तो 'पुरुषही नसायचा.' "

त्या भरल्या वाड्यात तो माणूस बिनदिक्कतपणे वाटेल तसं बोलत होता. सगळ्यांच्या कानावर त्याचं बोलणं जात होतं. माझे वडील खरोखरीचेच स्थितप्रज्ञ होते. आईने जसा हा प्रसंग आणि ते विशिष्ट वाक्य एकदोनदा सांगितले होते, तसेच वडिलांनीही हसत हसत, बाह्यत: गमतीने ते सर्व कथन केलं आहे. ते म्हणत, 'मुलगा पुरुष आहे किंवा नाही अशी शंका त्या लेकाच्यानी घेतली. पण त्याचा परिणाम नेमका उलटा झाला... तुमच्या आईला वयाच्या तेराव्या वर्षीच पहिलं मूल झालं... तिची एकंदर दहा बाळंतपणं तर नक्की झाली असावी. दर वर्षी मी आसपासच्या बिऱ्हाडात साखर वाटायची... मला त्याची

लाजही वाटायची नाही."

काय असेल ते असो पण त्या माणसाचे ते उद्‌गार माझ्याही मनात घर करून राहिले आहेत. 'लहानपणी नीट अर्थ कळायचा नाही, पण पुढे चमत्कारिक वाटायचं.' काय वाटायचं ते सांगणं अवघड आहे. पण सांगतो, एक पाय अधू असल्यामुळे विवाहानंतर ' ते ' शरीरसुख वडलांनी सर्वार्थानं कसं दिलं–घेतलं असेल... त्या सुखाचा फुलोरा आणि रोमांचकारिता त्यांना किंवा आईला अनुभवता आली असेल का ?– हे अनुभव कोणी लिहीत नाही– सांगत नाही, पण त्यांना तो फुलोरा बहुधा अनुभवायला मिळाला नसावा... शरीरक्रिया होत होतीच... मुलंही झाली पण सुखात कमतरता असावी... कदाचित वयात खूप अंतर असलेल्या जोडप्यांना वाटत असेल तशीच उणीव त्यांना भासत असावी... खुद्द आईवडलांबद्दल मी माझ्या म्हातारपणी लिहीत आहे. माझे संस्कारी मन आताही हबकले आहे. जास्त लिहिणे शक्य नाही.

वडलांना आम्ही सर्वजण बाबूराव म्हणत असू. ते पायाने अधू असले तरी दिसायला फार रुबाबदार होते. वर्ण अगदी हस्तिदंती गोरा होता. नाक सरळ, डोळे काळेभोर आणि बारीक होते. भुवया रेखीव–कोरल्यासारख्या दिसत. सकाळी आंघोळ वगैरे झाली की पितांबर नेसून ते पूजेला बसले म्हणजे स्वतःच कापराच्या गणपतीप्रमाणे दिसत. ते नेहमी ऑफिसात टांग्याने जात. कुसुंबी रंगाचा फेटा आणि पिवळसर, पारशी फॅशनचा लांब कोट असा त्यांचा पोशाख असे. त्यातही ते फार रुबाबदार दिसत.

बाबूराव कलेक्टर ऑफिसमध्ये नोकरीला होते. लंगडे असले तरी लोकांवर त्यांचा वचक असे. त्यांचं इंग्रजी चांगलं होतं. पाचसात पानी ड्राफ्ट ते लीलया लिहीत. कारकुनी प्रकरणात रंग कसा भरावा याचं त्यांना ज्ञान असे. त्यांच्या रुबाबदारपणाची एकच गोष्ट सांगतो. ज्यांचा खून करण्याचा श्री. गोगटे यांनी प्रयत्न केला ते हॉटसन त्या वेळी कलेक्टर होते. ते ऑफिस तपासण्यासाठी दर आठवड्याला येत. ते बाबूरावांना म्हणत, " तुम्ही माझ्यापुढे उभे राहात जाऊ नका. तुम्ही बसलेलेच मला जास्त आवडते..." हॉटसनसाहेबाच्या ते नेहमी गमती सांगत.

बाबूरावांचे वडील पूर्वी कमिशनर ऑफिसमध्ये होते. ते जर लवकर वारले नसते तर सरकारात फार मोठ्या पदावर नक्की चढले असते, परंतु दुर्दैवाने

पुण्यातील पहिल्या प्लेगमध्ये त्यांचं देहावसान झाले आणि घरावर दारिद्र्याची संक्रांत आली. आजीला तेव्हा महिना दहा रुपये पेन्शन मिळे. एक पंगू मुलगा नि लग्नाची मुलगी अशा जबाबदाऱ्या होत्या. कसं भागत असेल कुणास ठाऊक !

आजोबांच्या मोठ्या नोकरीमुळे कुटुंबाच्या ओळखीपाळखी पुण्यातील श्रीमंत खानदानी कुटुंबात आणि सरकारी अधिकाऱ्यांत होत्या. राहणीही वडेजावीची आणि खर्चिक होती. पुढे दारिद्र्य आलं तरी बाबूरावांनी आणि त्यांच्या आईने जुनी पद्धत सोडली नाही. त्यामुळे काप गेले आणि भोकं राहिली अशी अवस्था झाली. '.मिजास राजाची आणि नांदणूक कैकाड्याची ' असे स्वतःच्या कुटुंबाचे वर्णन पुढे पुढे बाबूरावच करीत.

अशा घरात आईने संसार सुरू केला. नारायण पेटेमध्ये एका मोठ्या वाड्यात आमच्याकडे तीन खोल्या होत्या. फर्निचर, कपडालत्ता फारसा नव्हता तरीही बाहेरची खोली रुबाबशीर दिसे. दागदागिने तर मुळीच नव्हते. वडलांना त्या काळी पस्तीस चाळीस रुपये पगार होता. नीट राहिले असते तर कमी पडण्याचं कारण नव्हतं. खर्चाची तोंडमिळवणी करताना त्रेधातिरपीट तर मुळीच व्हायला नको होती.

पण व्यवस्थेशीर राहणं बाबूरावांच्या स्वभावातच नव्हतं. त्यांच्या आणि आजीच्या डोक्यात जुन्या मोठेपणाच्या कल्पना असत. घरात दररोज जेवायला वारकरी असे. बाहेरच्या सोप्यावर मधुकऱ्यांसाठी ताटे तयार असत. पाव्हणा नाही असा दिवस नसे. सणावारी सहज दहापंधरा पान होई. उत्तम तऱ्हेतऱ्हेचे जेवायला त्यांना आवडे. नेहमी घरात जेवायला देखील सकाळसंध्याकाळ दोन भाज्या आणि कोशिंबीर असल्याशिवाय चालत नसे. दुपारचं अन्न संध्याकाळी मोलकरणीला दिले जाई. रात्रीच्या अन्नाचे वाटपही तसेच होई.

पस्तीस-चाळीस रुपये पगार असणाऱ्या त्या घरात कपडे धुवायला, भांडी घासायला आणि अंथरुणे घालायलाही मोलकरीण असे. पिठाच्या गिरणीत डबाभर धान्य मोलकरीण घेऊन जाई. त्यातून खरोखर किती नेले होते आणि दळून किती आले याचा हिशेब नसे.

याशिवाय ' परोपकाराची ' आणि गरिबांविषयीच्या कनवाळूपणाची आजीला आणि वडलांना हौस असे. निरनिराळ्या संस्थांना त्यांच्याकडून मदती जात.

भिक्षा मागायला आलेली बाईदेखील जेवून सूपभर तांदूळ व सज्जनगडासाठी रुपाया घेऊन जायची ! ...अशा किती गोष्टी सांगायच्या ?... हे फक्त काही नमुने. दिसायला हे सर्व ( अवगुण ) क्षुल्लक वाटते, पण त्यामुळे गरीब कुटुंबाचा बोजवारा उडतो. आमचंही तसंच झालं.

या सर्व गोष्टी आणि बेवंद कारभार माझ्या आईला आवडत नसावे. ती म्हणे मी गरिबी पाहिली आहे... लोकांच्या घरी आश्रित म्हणून जगले आहे... मोठेपणाही खूप अनुभवला आहे. पण या साऱ्याला काहीही अर्थ नसतो... शेवटी तुमच्याजवळ पैसा किती शिल्लक आहे यावर सगळं ठरतं. खरा मान लोकात पैशाला असतो. ...लहानपणापासूनच्या गरिबीमुळे तिला सुस्थितीबद्दल किंवा पैशाबद्दल एक प्रकारचा हपाप निर्माण झाला होता. पैसे साठवावेत, भांडीकुंडी, कपडेलत्ते जमवावेत, मुलांना शिकवावे, घर बांधावे वगैरे वगैरे तिच्या कल्पना होत्या. त्याबद्दल तिचा अट्टाहास चाले.

वडलांच्या दृष्टीने असल्या तऱ्हेचं म्हणणं नुसता वेडेपणा होता. ते त्याची कल्पनाही करू शकत नव्हते. ते बुद्धीने तीव्र होते. दिसायला रुबाबदार होते पण शरीराने पंगू होते. लहानपणी त्यांची कदाचित टिंगल टवाळी झाली असेल. त्यांच्या मनानं हाय घेतली असेल. आपलं कधीही कोणतंही काम नीट होणार नाही अशी समजूत त्यांनी करून घेतली होती... काय असेल ते असो पण त्यांनी कधी पैसे साठवण्याचा किंवा निदान आर्थिक दृष्टीने चौकटीत राहण्यासाठी प्रयत्न केला नाही. सगळा संसार वाऱ्यावर झोकला. घरात नातेवाइकांची मुले शिकायला राहात. त्यामुळे आपल्या बायकोला किती त्रास पडत आहे, किंवा आपल्या स्वतःच्या मुलांची कशी आबाळ होत आहे याची फिकीर ते करत नसत.

माझ्या आईवडलांच्या संसाराविषयी सांगताना मी काही तरी नाट्यमय किंवा थरारक अनुभव सांगेन अशी एखाद्याची कल्पना होईल, मला कल्पनाशक्ती आहे. मनात आणलं तर तसं काहीतरी जुळवून सांगू शकेन, पण मुद्दामच तसं करत नाही. कारण खरा संसार तसा नसतो. त्यातल्या खाचाखोचा दिसायला अगदी सामान्य असतात, पण त्यातच दुःखाची बीजं असतात. माझे वडील तसे इतर चार माणसांसारखे होते. पण चमत्कारिक स्वभावामुळे आणि निराशेने ग्रासल्यामुळे त्यांचा संसार दुःखमय झाला.

माझ्या आठवणीपासून ते नेहमी कर्जात बुडालेले असत. वाण्याकडे तीन तीन महिन्यांची उधारी तुंबलेली असे. ते नेहमी थट्टेने म्हणत, "मी नेहमी घराच्या दोन बाजूकडचे दोन वाणी बघतो ...एका बाजूच्या वाण्याची उधारी तुंबली म्हणजे दुसरी बाजू जा-ये करायला मोकळी राहते."... वाण्याप्रमाणे शिंपी उधार असे. भाजीवालीचे पैसे द्यायचे असत. डॉक्टर आणि दूधवाले यांना तर पैसे कधी दिले जातच नसत.

वडलांजवळ सोनेनाणे पूर्वी काय असेल कोण जाणे पण मध्यंतरीच्या काळात त्यांनी ते विकले. भांडीही कायम जुनीपानीच राहिली. नव्या घाटाची भांडी आणून घर सजवावे आणि आईला खुश करावे असे त्यांना कधी वाटलेच नाही. आईची लुगडीही सामान्य असत. नातेवाइकांच्या लग्नाकार्यात आई आणि आम्ही मुले ओकीबोकी दिसत असू. फक्त वडीलच त्यांच्या विनोदी बोलण्या-मुळे आणि रुबाबदार व्यक्तिमत्त्वामुळे उठून दिसत. त्यांच्यापुढे घरातली सगळी माणसे मालवलेली भासत.

या सगळ्या वातावरणाचा परिणाम आईच्या मनावर होणे साहजिक होते. तिने प्रथम प्रथम वडलांना आवरण्याचा खूप प्रयत्न केला. संसाराला शिस्त लागावी, कर्ज होऊ नये, फालतू लोकांनी येऊन उगीच पुलखे झोडू नयेत, झुळझुळीत आटोपशीर राहणी असावी असे पाहिले. पण तिला यश आले नाही. वडील मोठमोठ्याने बोलत. स्वतःच्या कर्जाबद्दलही ते चारचौघांत विनोदाने बोलत. त्यांच्या विनोदाला लोक हसत, पण मागून आमची थट्टा होई. ते रुबाबात राहण्याचा प्रयत्न करीत पण आम्हा सर्वांचा विशेषतः —आईचा नातेवाइकांत पाणउतारा होई. तिला मान असा मुळी नव्हता.

ती स्वतः आश्रिताचे जीवन जगली होती. तिच्या स्वभावात पीळ किंवा कणखरपणा असा नव्हताच. तिने प्रथम त्रागा केला. मग विरोध किंवा असह-कारही करून पाहिला पण वडील त्याचीही थट्टा करीत. आसपासच्या लोकांत वडील 'उदारमनस्क' किंवा कनवाळू! आणि आई कंजूष आणि माणूसघाणी असं चित्र तयार झालं.

मला एक प्रसंग आठवत आहे... एकदा एक लब्धप्रतिष्ठित श्रीमंत गृहस्थ गरीब विद्यार्थ्याला घेऊन आले. वेळ सकाळची होती. जेवणाची पानं मांडली जात होती. ते गृहस्थ माझ्या वडिलांशी काहीच न बोलता त्या मुलाला म्हणाले,

“ अरे गोपीनाथ, नुसता बघत काय उभा राहिला आहेस... ? सोवळ्याची लंगोटी नेस आणि पानावर बस. आता इथेच तू आठवड्यातून दोन-तीन दिवस येत जा. ”

मग ते वडलांकडे वळून म्हणाले, “बाबूराव, तुमचा स्वभाव चांगला...परोपकारी !...तुमच्यासारखी माणसं थोडी. इथे मी या मुलाला हक्कानं आणला. ”

माझी आई कधी बोलायची नाही. पण तिने विचारले,

“ अहो, पण मग तुमच्या घरातच का नाही ठेवून घेतलात ? ” ते लब्धप्रतिष्ठित चमकून म्हणाले, “ माझ्या बायकोला तसं काही चालत नाही ... एखादा वार द्यायचा म्हणजे ती आकाशपाताळ एक करील. ”

ते गृहस्थ निघून गेल्यावर ‘ मा ’चे आणि बाबूरावांचे न भूतो न भविष्यति भांडण झाले. ती फुणफुणली, “ त्यांच्या बायकोला आवडत नाही पण माझी कुणालाच पर्वा नाही...मी पोळ्या लाटते आहे नि उष्टी काढीत आहे... मी या मुलाला मुळीच ठेवून घेणार नाही. ”

पण अर्थातच तिचं काही चाललं नाही. वडलांनी सर्व थट्टेवारी नेलं. ( त्या मुलाचे वार सुरू झालेच. ) माझ्या आईची व आजीचीही बोलाचाली झाली. आजीही मुलाचा कित्ता होती. ती म्हणाली, “ ज्या घरात गरीब विद्यार्थ्याला दोन घास मिळत नाहीत... ते घर कसलं ! अशा घरात मी पाणी प्यायलाही राहणार नाही. ”

वडील ऑफिसमध्ये गेल्यावर आजी दुपारी घरातून रागावून निघून गेली ती दोनचार दिवस आलीच नाही. सगळ्यांच्या तोंडचे पाणी पळाले. शेवटी ती गाणगापूरला असल्याचे कळले. सगळ्या नातेवाइकांनी माझ्या आईला खूप बोलून घेतले. शेवटी मी आणि आई गाणगापूरला गेलो आणि बाबापुता करून नाकदुऱ्या काढून आजीला घेऊन आलो. या सगळ्या वादावादीत आईच्या बाजूला कोणीही नव्हते.

मला वाटते असल्या प्रसंगामुळे आईनं हाय खाल्ली असावी. ती एक प्रकारच्या कैचीत सापडली असावी. तिला उत्तम संसार करायचा होता. अपंग नवरा तिच्या नशिबी आला होता. पण त्याची क्षिती न बाळगता तिला टुकीनं राहायचं होतं. आमच्या घरातल्या वातावरणामुळं ते जमलं नाही.

तिला एकंदर आठ-दहा मुले झाली. त्यांतली पाच जगली. सगळ्या मुलांची

आबाळ असे. खरे म्हणजे आम्हीही कसल्यातरी व्याधीने ग्रस्त असायचे, पण तसं झालं नाही ही ईश्वराची कृपा!

बाबूराव सकाळी नऊला ऑफिसला जात. रात्री आठला परत येत. बायकोशी गप्पा मारीत बसले आहेत किंवा हास्यविनोद चालला आहे असं दृश्य कधीही नसे. ते आजीला हरिभाऊंच्या कादंबऱ्या किंवा गुर्जरांच्या गोष्टी मोठ्याने वाचून दाखवत. आसपासच्या बिऱ्हाडांतले लोक जमवून केसरीचेही वाचन होई. पण त्या सर्वांत आई कुठेच नसे. ती मालवलेली असे. नाटक-सिनेमा, सभासम्मेलन याचा आमच्या अंतर्गृहात वासदेखील नसे. मला माझी आई जी आठवते ती स्वयंपाक करताना किंवा आजारी-किरकिरणाऱ्या मुलाला गप्प करताना, दुसरे तिचे रूप मला स्मरत नाही.

त्या काळातले आमच्या आसपासचे ब्राह्मणी संसार मी आज आठवत आहे. माझं मन खिन्नतेने भरून गेलं आहे. बहुतेक सगळे संसार आमच्या घरासारखेच होते. सगळ्या संसारी स्त्रिया थोड्याफार प्रमाणात तशाच पिचलेल्या असत. पण तरीही त्यात कुठेकुठे विनोदाची हिरवळ असे. शृंगारही असे. नीटनेटकेपणाही असे... आमच्या घरात तेही नव्हते.

बाळंतपणामुळे अनास्थेमुळे 'मा' दिवसानुदिवस खचत गेली. शरीरापेक्षा तिच्या मनाचे हाल आणि तडफड जास्त होती... आयुष्यात तिला काहीच मिळालं नाही. नुसताच संसार झाला.

अशीच ऑगस्ट महिन्यातली रात्र होती. तिचा देह बरेच दिवस थकत चालला होता. शेवटी तो मृत्यूच्या आधीन झाला. त्या रात्री मुसळधार पाऊस होता. आमच्या कौलारू घरात खूप गळत होतं. आतल्या खोलीत तिच्या अंत्य-शय्येजवळ बाबूराव मोठ्याने दासबोध वाचत होते.

'मा' च्या स्वभावाविषयी एक सांगायला हवं... कोणत्याही हिंदू पतिव्रतेचं नवऱ्यावरचं असतं तसं तिचं बाबूरावांवर प्रेम होतं. तिला त्यांची फार काळजी वाटत असावी.

मृत्यूपूर्वी एकदोन दिवस अगोदर खोलीत कोणीच नसताना संध्याकाळी तिनं मला जवळ बोलावलं होतं आणि करुण आवाजात सांगितलं होतं, "त्यांची काळजी घे... त्यांचा कधीही अपमान करू नकोस."

मला रडू आवरले नाही तेव्हा ती म्हणाली, "ते लंगडेपांगळे आहेत. त्यांच्या

मनावर ते कायमचं दडपण आहे. ''

मी तिच्याकडे थक्क होऊन पाहिले. एक अशिक्षित स्त्री इतकी सखोल असेल अशी माझी कल्पना नव्हती.

माझ्या आईवडिलांचा संसार हा असा होता. त्या काळाप्रमाणेच तो होता, पण तरीही त्यात एक दुराव्याचा पदर होताच.

हे सर्व सांगावं किंवा नाही याचा मी विचार करीत होतो... पण शेवटी सांगितलंच!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# १५

## वृंदावनाच्या मामी

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

नगरला निदान पंधरा दिवस तरी माझा मुक्काम पडणार होता. डाक बंगलाही चांगला होता. गेले दोन महिने सारखी फिरतीच झाली होती. एकटेपणाचा कंटाळा आला होता म्हणून पुण्याहून निघून येण्याविषयी बायकोला पत्र लिहिलं. डाक बंगल्यात का होईना, पण पंधरा दिवस निवांत संसार करावा, असा बेत होता.

बायको लगेच दुसऱ्या दिवशी आली. एकत्र राहण्यामुळे खूप मजा येईल असं वाटलं होतं. पण तसं झालं नाही. पहिले एकदोन दिवस बरे गेले. मग मात्र कंटाळा आला. आसपासच्या शाळा तपासण्यासाठी मला खेडोपाडी हिंडणं भाग पडे. रात्री मी डाक बंगल्यात येई. पण तो सुद्धा दमलाभागलेला असे. बायकोची सारा दिवसभर नुसती झोपच झालेली असे. आळसामुळे तिचे डोळे जडावलले असत. काहीतरी चुरचुरीत बोलावं, थट्टामस्करी करावी, कुठेतरी हिंडावं अशी तिची इच्छा असे. पण ते जमत नसे. ती मग फार चिडल्याचिडल्यासारखं करी.

पहिले पाचसात दिवस तसेच गेले. नगर जिल्ह्यातली खेडी रखरखीत, धुरकटलेली आणि मलिन आहेत. कोकणातल्या खेड्यांसारखी ती रम्य नाहीत. पडक्या घरांच्या पुंजक्याशिवाय, तिथं बघण्याजोगं काही नाही. बायकोला घेऊन जाण्याजोगं एकही गाव नव्हतं. तिथं ती जास्तच चिडली असती. एकट्यानेच

हिंडण्याशिवाय मला तरी दुसरा मार्ग नव्हता.

पुढच्या आठवड्यासाठी म्हणून मी डायरी चाळत होतो. कोणकोणत्या खेड्यांना भेटी द्यावयाच्या आहेत, हे पाहात होतो. बायको तिथंच कॉटवर अस्ताव्यस्त पडली होती.

गावांची नावं वाचता वाचता एका नावावर माझी दृष्टी टेकली आणि हसलो.

ती काहीच बोलली नाही. नुसतेच आळसटल्यासारखं तिनं माझ्याकडे बघितलं.

" या यादीत वृंदावन आहे." मी म्हटलं.

" मग त्याचं काय ? अशी छप्पन गावं असतात."

" गेल्या वर्षी मी नगर जिल्ह्यात फिरलोच नव्हतो. वृंदावन गावात तपासणीला जायचं आहे, हे मला माहीतच नव्हतं."

" वृंदावनचं काय विशेष ?"

मी काहीच बोललो नाही. डायरीतल्या पानावर 'वृंदावन' ही चार अक्षरे किरट्या लपेटीत लिहिली होती. डोंगरापलीकडचे आकाश दिसावे त्याप्रमाणे त्या अक्षरांमागच्या कितीतरी आठवणी मला दिसत होत्या. लांबून बघितल्या कारणाने त्या अंधुक वाटत होत्या. दाट धुक्यात सापडलेल्या बकुळीच्या झाडाप्रमाणे त्या होत्या...

मिनिट-दोन मिनिटांनी मी जागा झालो व म्हणालो, " वृंदावनला आमच्या मामी होत्या."

" तुमच्या मामी ?..." तिनं आश्चर्यानं विचारलं.

" आमच्या म्हणजे आईच्या मामी !...नेहमी आमच्याकडे यायच्या ! बाल-विधवा होत्या...विकेशा होत्या...पण तांबडं आलवण नेसायच्या नाहीत ! पांढरं शुभ्र पातळ अंगावर असायचं."

बायको किंचित उठून बसली आणि हसली.

मी विचारलं, " हसायला काय झालं ?"

" हसू नको तर काय करू ?...तुमच्या वंशवृक्षाचं आख्यान पुन्हा सुरू झालं. आईच्या मामी...वडिलांचे काका...त्या काकांचे आणखी कुणी मामा सारखं तुमचं चाललेलं असतं."

मी हसलो. पण थोडासाच ! जुन्या काळातील भरभक्कम भिंतीला किंचित

फट पडली. पलीकडचं छान दिसत होतं.

मी म्हटलं, " मामी अजून आहेत की नाही कुणास ठाऊक. "

ती काहीच बोलली नाही. मीच पुढे म्हटलं, " आई गेल्यावर तिकडच्या नातेवाइकांची वर्दळ कमीच झाली. घराला एका बाजूने मोठी भिंत घालावी त्या बाजूचं काही दिसू नये, तसं झालं... अलीकडे बऱ्याच वर्षांत त्यांचं काही कळलंच नाही. "

" मग त्या अजून असतील... माणूस मेल्याचं कळतं... वर्षानुवर्षं जिवंत असतं, पण कुणाच्या लक्षात येत नाही. "

" आपण असं करू... वेळ बराच आहे. वृंदावनलाच जाऊ... आज मी पत्र टाकून चौकशी करतो. "

वृंदावनला जाण्याची कल्पना तिला आवडलीही नाही, नावडलीही नाही. माझ्याबरोबर खेड्यात येणे तिला आवडत नसे. पण नगरही तिला आवडले नव्हते.

मी मग कार्ड लिहिले आणि बराच वेळ मामींबद्दल बोलत बसलो.

" अगदी लहानपणी मामी आल्या की दोनतीन महिने राहायच्या. तेव्हा गंमत वाटायची. "

" का ? "

" का काय ? तेव्हाच त्या पस्तिशी उलटलेल्या असतील. पण बाई अशा त्या वाटायच्या नाहीत. पुरुषासारखं वाटायच्या... खरे म्हणजे, त्या आईच्या नातेवाईक; पण स्वयंपाकघरात कमी असायच्या... बाहेर ओटीवर वडिलांची बैठक असायची तिथे याही असायच्या. देण्याघेण्याच्या व्यवहारात अगदी पुरुषासारखं बोलायच्या. वडिलांपेक्षाही त्यांचा आवाज जास्त खणखणीत यायचा."

" असतात काही काही बायका अशा ! "

" असतील बुवा...पण यांचं वेगळंच होतं. आंघोळ झाली की ओल्या लुगड्याला पाठ पुसत पुसत दांडपणानं स्वयंपाकघरात यायच्या. पुरुषाने ओलं डोकं पुसावं त्याप्रमाणे पंच्याला खसाखसा डोकं पुसायच्या...देवासमोर पाट मांडलेला असे; त्यावर बसून सरळ संध्या करायच्या ! अंगावर पांढरं पातळ नेसलेलं. चोळीबिळी नाहीच. कपाळाला चार बोटी भस्म...अशा अवस्थेत पाटावर बसून आचमन करताना मला त्या अजून दिसतात."

"बाई संध्या करायची? ...कमालच आहे.... हडळीसारख्या किंवा चेटकिणीसारख्याच त्या दिसत असतील."

"लग्न झालं, तेव्हा त्या सातआठ वर्षांच्या होत्या. पुढे वर्षा-दोन वर्षांनी नवरा मेला. वयात येण्याअगोदर जी बाई विधवा झालेली असते, ती पुरुषच असते असं त्या म्हणायच्या...तिला संध्या करण्याचा अधिकार असतो म्हणे!"

थोडा वेळ तसाच गेला. खरं म्हणजे डोळ्यांवर पेंग आली होती; पण मामींच्या चित्राच्या मनातल्या रेषा जास्त जास्त गडद होत चालल्या होत्या.

नवरा मेल्याची हकीगत त्याच कधी कधी सांगायच्या. त्या तेव्हा सासरी गेल्याच नव्हत्या. माहेरीच होत्या. सकाळची वेळ होती. अंगणात विटीदांडूचा डाव पडला होता. सारी मुलेच होती. विटी जोरात मारण्याच्या त्या नादात होत्या. इतक्यात घरातून रडण्याचा मोठा आवाज आला. वडील रडत होते. आई कपाळ बडवून घेत होती. पण त्यांचे खेळणे चालूच होते. शेवटी आईने घरात बोलावले; आणि त्यांना कवटाळून धरून ती ओक्साबोक्शी रडली!...नवरा मेल्याचे तिने त्यांना सांगितले, पण यांना कळलेच नाही. मरण म्हणजे काय याचे ज्ञान त्यांना थोडेसेच होते...नवराही त्यांना आठवत नव्हता. दोनतीनदा बघितला होता. पण नीट नाही...उजव्या कानात भिकबाळी होती. कपाळाला उभे तांबडे गंध होते...एवढेच आठवत होते.

त्या वयात आल्या तेव्हाचा प्रसंग माझ्या आईने ऐकला होता. ती नेहमी सांगायची···मामींना नहाण आले, तेव्हा कुणीतरी मरावे, असा त्यांच्या आईने शोक केला होता. नवरा मेल्यानंतर दोनतीन महिन्यांनी मूल व्हावे, आणि ते मेलेले असावे म्हणजे कसं होईल? तसं त्यांच्या आईला झालं. रडण्याची पंचाईत. मोठ्यानं बोलण्याची पंचाईत. 'तेरी चूप, मेरी चूप' असा कारभार... पण तेव्हाही यांना काही वाटले नव्हते...अशा वेळेला घरात चांगलेचुंगले खायला करतात, ओल्या नारळाच्या करंज्या मुद्दाम करतात, हे त्यांनी शेजारी-पाजारी बघितले होते...आपल्या वेळेला करंज्या का केल्या नाहीत, रंगीबेरंगी कागदाचे मखर का घातले नाही, शेजारणींनी वाढणे का आणले नाही, म्हणूनच त्या हट्ट धरून बसल्या होत्या.

बायको एव्हाना झोपली होती. मी दिवा मालवला आणि अंथरुणावर पडलो. पण मला शांत झोप आलीच नाही. सारख्या लहानपणच्या काही काही गोष्टी

आठवत होत्या. माझ्या मनात मी प्रयत्नाने त्या कधीच साठवल्या नव्हत्या. अंधेऱ्या खोलीत उन्हाचा कवडसा पडावा, आणि सांदीकोपऱ्यातल्या जुन्यापान्या वस्तू चमकायला लागाव्यात तसे माझे झाले.

वृंदावनला मी फार पूर्वी गेलो होतो—अगदी लहान आठदहा वर्षांचा असताना. कुणाचे तरी लग्न होते. आईबरोबर मुद्दाम गेलो होतो...स्टेशनवर उतरून बैलगाडीने पुढे दोनचार कोस गेल्याचे मला आठवत होते...वृंदावन जहागिरीचे गाव होते. मामींचा मोठा भाऊ इनामदार होता. इनामदारीतील सारे वैभव तिथे त्या वेळी होते. बाहेर गुरांच्या गोठ्यात बैलच कितीतरी होते. गोठ्यापलीकडे फुलांचे मांडव होते. गाईम्हशींच्या घुंगरांच्या आवाजाने सारे आसमंत निनादत होते. चौक ओलांडल्यावर मोठा दिवाणखाना होता. तिथे लोडतक्क्यांची बैठक होती. त्यावर परीटघडीचे पांढरे शुभ्र अभ्रे नि चादरी होत्या. फुलाफुलांचे गालिचे खाली घातले होते. छताला हंड्याझुंबरे होती. त्यातून सूर्याची प्रकाशकिरणे लकलकत होती.

आम्ही गेलो तेव्हा दादासाहेब इनामदार शेतावर गेले होते. मामी देवघरात होत्या. देव लखलखीत घासलेले होते. तबकात फुलेच फुले होती. मांडी घालून मामी देवाची पूजा करत होत्या. आईने नमस्कार केला. तेव्हा देवघरातून ओरडूनच आमची व्यवस्था करायला त्यांनी सांगितले. पुरुष माणसाला करावा तसा गड्याने समोर येऊन त्यांना मुजरा केला. तेव्हा मला फार आश्चर्य वाटले.

साऱ्या लग्नात देखील त्यांचाच आवाज सारखा खणखणत होता. गडीमाणसांवर करड्या आवाजात त्या ओरडत होत्या. त्यांच्या आयामाया उद्धारत होत्या...शिव्या देत होत्या...काम करून घेत होत्या. साऱ्या बायका स्वयंपाकघरात असावयाच्या. पण या मात्र बैठकीच्या खोलीतच असायच्या.

मामी इनामदारांच्या वैभवाच्या गोष्टी नेहमी सांगत. त्यांतल्या एकदोन गोष्टी मला आठवल्या.

गावाच्या टोकाला चावडी होती. शेजारी महादेवाचे देऊळ होते. देवळात दर्शनाला जायचे तर चावडीवरून जावे लागे. चावडीत म्हारंपोरं असत. गडीमाणसं असत. त्या जायला लागल्या की ती सारी माणसं उभी राहात आणि जमिनीपर्यंत लवून त्रिवार मुजरा करीत. एकदा कुणीतरी मुजरा केला नव्हता तेव्हा दादासाहेब इनामदारांनी त्या माणसाला हंटरखाली फोडले होते. स्वतःला

मिळणारे सर्व मान बहिणीलाही मिळावेत असे त्यांचे पाहणे होते.

लहानपणी त्या साऱ्या गोष्टी ऐकायला मजा वाटे. माझा जन्म पुण्याला गेलेला. मी श्रीमंती पाहिलेली नाही. मला आजपर्यंत कुणी मुजरा केलेला नाही. मीही कुणाला केला नाही; पण ती चावडी...ते लवून केलेले मुजरे...छोट्या घोडीवरची रपेट...मोठा शोभिवंत दिवाणखाना...जुन्या पद्धतीचे गालिचे... शिसवीचे पलंग वगैरे साऱ्या गोष्टी परीकथा वाचावी तशा वाटत.

मोठेपणी मामी वर्षा दोन वर्षांनी येत. इनामदारी अगदीच संपली होती. सारे शेतमळे गहाण पडले होते. शेतात विहिरी खोदल्या पण त्यांना पाणीच लागलं नाही. सारे पैसे वाया गेले. सारा जन्म ऐषआरामात आणि मानमरातबात दादासाहेबांनी काढला. दिवस पालटल्यावर व्यापार करण्याची त्यांना हुक्की आली. नगरच्या बाजारपेठेत मोठे दुकान घातले; पण ते अंगावर आले... जहागीरदाराचा दुकानदार नीट होऊ शकला नाही. सारे कर्जात गेले.

मामी आमच्याकडे अधूनमधून येतच राहिल्या. आल्या की जुन्या गोष्टी सांगत. त्या सांगण्यात देखील बायकी हळहळ नसे. दादासाहेबांबद्दल म्हणत, "त्याच्या हातात फक्त बांगड्याच कमी आहेत. पुरुष म्हणायचा नुसता नावाला...मुलं झाली म्हणून पुरुष म्हणायचा...नुसत्या याच्या शेर शेर वजनाच्या मिश्या बघून घ्या!..."

दिवस फिरले आणि मग मामींचे वृंदावन सुटले. दादासाहेब दारिद्र्याच्या धसक्याने मेले. मुले शिकण्यासाठी नगरला किंवा मुंबईला राहिली. त्यांच्या-बरोबर मामींना गावगन्ना फिरावे लागले. एकेकाळी चावडीवरून जाताना जोहार घेणाऱ्या मामी पडक्या वाड्यात आणि घाणेरड्या चाळीत राहिल्या. पुरुष माण-साने वाढवावी तशी त्यांनी भावाची मुले वाढविली.

त्या दिवसांत त्यांचा नि आमचा संबंध अगदीच सुटला होता. माझी आई मेली होती, त्यामुळे नात्याचे सूत्र तुटले होते...आम्ही मोठे झालो होतो. वडील विरागी बनले होते. त्या धामधुमीत मामींचे संबंध कुठल्या कुठे पाला-पाचोळ्यासारखे उडून गेले होते.

मला आठवले, दादासाहेब गेले तेव्हा केसरीत गृह्यसंस्कार आला होता. तो पाहून वडिलांनी मला सांत्वनाचे औपचारिक पत्र त्यांना लिहायला सांगितले होते...मध्यंतरी दादासाहेबांच्या एका मुलीसाठी पुण्यातले स्थळ कळले होते.

म्हणून मामींनी पत्र पाठविले होते. तेव्हा वडील निवर्तले होते...वर्षा दोन वर्षांनी कधीतरी त्यांच्याकडच्या तरी लग्नाच्या पत्रिका आल्या होत्या. लहर असली तर मी अभिनंदनाची पत्रे पाठवीत होतो. पुण्यात लग्न असले तर आहेरही करत होतो...पण एकंदर संबंध अगदीच जुजबी झाले होते.

अलीकडे कित्येक वर्षांत मी त्यांच्याविषयी काहीच ऐकले नव्हते. त्या मेल्या असतील का?...कदाचित असतीलही...मरणाचे त्यांचे वयच झाले होते... पान पिवळे होऊन गळून पडले असले तर आश्चर्य करायला नको होते; पण कदाचित त्या जिवंतही असतील. पान पिवळे पडले असले तरी ते झाडावरून खाली पडतेच असे नाही. सोसाट्याच्या वाऱ्यात देखील ते फांदीचा कासोटा सोडीत नाही. त्या दिवशी असले काहीबाही विचार करता करताच मला झोप लागली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी वृंदावनहून पत्र आले. पत्र कुणाकडून तरी लिहून घेतले असावे; कारण मामींना लिहिता येत नव्हते. मामी अजून हयात होत्या. प्रकृतीने चांगल्या होत्या. भावाची मुले आता पुण्या-मुंबईकडे नोकऱ्यांत होती. मामी वृंदावनला त्या जुन्या वाड्यात एकट्याच होत्या. त्यांनी आम्हा उभयतांना अगत्याने बोलावले होते.

पत्र वाचून मी बायकोकडे बघितले. ती त्रासलेली होती.

मी विचारले, " काय करायचं? मला वाटतं जावं. "

कपाळाला आठ्या घालीत ती म्हणाली,

" मला वाटतं मुळीच जाऊ नये."

" का? काय हरकत आहे? तेवढाच चेंज होईल."

" अहो हरकत कसली? त्यांनी बोलावलं पण आपण विचार नको का करायला? एक म्हातारी विधवा बाई ती! आपण जोडप्यानं तिथं जायचं आणि तिथं राहायचं. तिथे घरात काय असेल? म्हातारीला काय खायला लागणार? आपली व्यवस्था ती कशी ठेवणार?"

" घर मोठं आहे. लहानपणी मी तिथं गेलो आहे."

" त्या मोठ्या घरात आता काही असेल का? धड जेवायला मिळणार नाही की झोपायची देखील सोय होणार नाही...चावडींत घोंगडीवर झोपावं लागेल."

"तसं होणार नाही, काहीतरी व्यवस्था त्या करतीलच. मला वाटतं, जावं."

" तुम्हाला वाटतं, म्हणजे मग पुढे अपीलच नाही; पण जाऊ नये असं माझं मत आहे...त्या वनवासात जाऊन पडण्याची माझी इच्छा नाही."

पण माझ्या मनाने जाण्याचेच ठरविले होते. त्या जागेचे मला कसले तरी आकर्षण वाटत होते. अनेक प्रकारांनी बोलून आणि समजावून सांगून मी तिला तयार केली. तिच्याकडून कसाबसा होकार मिळवला आणि मामींना पत्र टाकले.

दुसऱ्या दिवशी सकाळच्या गाडीने नगरहून निघालो आणि नऊ साडेनऊपर्यंत वृंदावन रोड स्टेशनवर उतरलो. हवा बरी होती. कोवळे ऊन पडले होते आणि स्टेशनच्या समोरची शेते छान हिरवी दिसत होती. मी अस्वस्थच होतो.

रूळ ओलांडून आही दोघे पलीकडे गेलो. पत्र्याच्या शेडच्या स्टेशनमध्ये उभे गंध लावलेले काळगेले स्टेशनमास्तर होते. स्टेशनवर दोनचारच माणसे उतरली होती.

आम्हाला बघताच स्टेशनमास्तर पुढे आले व म्हणाले, " पुण्याचे पाहुणे काय ? "

मी होकारार्थी मान हालवली. तेव्हा बाहेर तोंड करून त्यांनी ' रामजी, रामजी ' अशी हाक मारली.

फाटकी पैरण घातलेला, म्हातारा पण बळकट अंगाचा रामजी धावत आला. आमच्याकडे बोट दाखवून मास्तर म्हणाले,

" पुण्याचे पाहुणे, नीट संभाळून ने. "

रामजीबरोबर आम्ही बाहेर आलो. वडाच्या झाडाखाली बैलगाडी उभी होती. बैलगाडीकडे मी सहज बघितले. बैल चांगले पुष्ट होते. त्यांच्या गळ्यात पिवळ्या मण्यांच्या माळा होत्या. शिंगे लाल रंगाने छान रंगवली होती. गाडीत मागच्या बाजूला खाली कडबा होता. वर छान पुष्ट शरीराची गादी होती. बाजूला टेकायला झालर लावलेली लालसर रंगाची शेवरीच्या कापसाची उशी होती.

गाडी चालू झाली, रस्ता खडकाळ होता. पण मजा वाटत होती.

मी रामजीला विचारले, " गाडी गावातली कुणाची आहे काय रे ? "

" नाही बा ! आपलीच नव्हं का ?"

" आपलीच म्हणजे ? "

" अवो मामींचीच नव्हं का ? ...मी त्येच्याकडंच असतो. मला वळाखलं न्हाई ? "

मी ओळखणे शक्यच नव्हते. वृंदावनला मी अगदी लहान असताना आलो होतो. पण त्याने मला ओळखले होते.

दादासाहेब इनामदारांकडे तो पिढीजात नोकर होता. त्याला सर्व आठवत होते. मी लहानपणी लग्नाला वृंदावनला आलो होतो तेव्हा कसा दिसत होतो हे तो सांगत होता... त्या वेळी मला ऊस करवे केल्याशिवाय तोंडाने सोलून कसा खायचा हे माहीत नव्हते. बाजूने साल सोलून खाण्याऐवजी मी एकदम दाताने उसाचा मध्य कुरतडण्याचा प्रयत्न केला होता, याची त्याला आठवण होती. भूतकालात दडलेल्या कित्येक गोष्टी तो पुन्हा पुन्हा रसाळपणाने सांगत होता.

मी ऐकत होतो. मला नवल वाटत होते. खेड्यात एकदा ओळख झाली की ती निरगाठीसारखी गच्च बसते. आसपासचा प्रदेश मी न्याहाळून बघत होतो. मला कशाचीच ओळख पटत नव्हती.

खाचखळग्यातून गाडी चालताचालता गाव लागले. बाहेर मोडकीतोडकी, मलिन, काळसर विटा असलेली वेस होती. आत उजव्या अंगाला मारुतीचे देऊळ होते. डावीकडे चावडी होती. पलीकडे महादेवाच्या देवळात पारवे घुमत होते. गाडी चाललीच होती.

आडव्यातिडव्या, अस्ताव्यस्त पसरलेल्या, पडझड झालेल्या मातीच्या घरांना मागे टाकून गाडी खडखडत पुढे चालली होती. दोन गल्ल्या गेल्यावर कोपऱ्यावर एका चिरेबंदी वाड्यासमोर गाडी उभी राहिली. आम्ही खाली उतरलो.

मी घराकडे बघितले. मला ते ओळखले नाही. म्हाताऱ्या माणसासारखा त्याचा चेहरा होता. सुरकुतलेले अंग होते. बायको प्रवासाला निघाल्यापासून अस्वस्थ होती. त्या म्हाताऱ्या घरात एका म्हातारीला भेटायला आम्ही आलो होतो. आम्ही दोघेच फक्त तिथे तरुण होतो. बाकी सारेच विकलांग होते. तसेच मागे परतावे असे वाटले; पण ते आता शक्य नव्हते.

रामजीने सामान आत नेऊन ठेवले. आम्ही आत शिरलो. बाहेरच्या बाजूला ओसरी होती. बळकट अंगाची खालच्या वर्गातील एक स्त्री चुलीवर स्वयंपाक करीत होती. खूप जाळ झाला होता. सारी ओसरी धुराने भरून गेली होती. काळ्या रंगाचे एक शेंबडे मूल जमिनीवर वळवळत होते. सारखे केकाटत होते.

मला वाटले, मामी त्याच जागी राहात असतील. मी रामजीकडे बघितले.

माझे मन त्याने कदाचित ओळखले असावे. तो म्हणाला, " व्हा म्होरं...हिथं मी ऱ्हातो."

पुढे गेलो आणि वाड्याच्या चौकात आलो. पायऱ्या चढून वर गेलो. मग मात्र जुन्या स्मृती एकदम चाळवल्या... मी दिवाणखान्यात उभा होतो. नक्षीचा गालिचा अंथरला होता. जुन्या पद्धतीचा मोठा आरसा मध्यभागी टांगला होता. रविवर्म्याची चित्रे ठिकठिकाणी होती. वरच्या बाजूला काचेच्या लखलखणाऱ्या हंड्या आणि झुंबरे होती.

आतून कुणीतरी करड्या खणखणीत आवाजात बोलल्याचे ऐकू आले. मी चमकून आत बघितले. लागलीच ओळखले. आतून मामी येत होत्या. लहानपणी दिसायच्या तशाच शुभ्र पांढरे पातळ नेसलेल्या. श्मश्रू केलेले डोके पदरातून डोकावत असलेल्या... गळ्यात रुद्राक्षाची माळ असलेल्या.

मी झटकन पुढे झालो आणि नमस्कार केला, बायकोलाही नमस्कार करण्याची खूण केली.

तिच्या तोंडाकडे नीट न्याहाळीत त्या म्हणाल्या, " ही बायको वाटतं !... छान आहे " असे म्हणून त्या हसल्या-राकट पुरुषी आवाजात हसल्या व म्हणाल्या, " पण रंग तुमच्या घरातल्यासारखा शुभ्र गोरा नाही...हुंडी सोलापुरी दिसते. "

बायको बावचळल्यासारखी बघायला लागली. तेव्हा त्याच पुढे म्हणाल्या, " सोलापुरी आहे; पण नुसताच दांडगोबा नाही... नाकीडोळी तरतरीत आहे. "

बोलत बोलत आम्ही आत गेलो. देवघरात पूर्वीसारखे देव होते. तबकात फुलांच्या राशी होत्या. उदबत्तीचा सुवास घमघमत होता. स्वयंपाकघरात चुलीपाशी कोपऱ्यात दुसरी एक चाळिशी उलटलेली बाई भाजी चिरत होती.

आम्ही उभेच होतो. रुद्राक्षाच्या माळेतला एकेक मणी पुढे सरकत होता. कमरेत वाकून त्या आमच्याजवळ उभ्या होत्या.

त्या एकदम मोठ्याने कडाडल्या, " अग सगुणा, यांना पाट दे... किती वेळ पाहुण्यांनी उभं राहायचं ?"

सगुणेने भाजी चिरता चिरता, भयभीत संकोचल्या नजरेने आमच्याकडे पाहिले. मग ती अपराधी चेहऱ्याने उठली आणि तिने झपाट्याने दोन पाट

शेजारी शेजारी आणून ठेवले.

मामी कडाडतच होत्या, " हिला केव्हा कळणार कुणास ठाऊक...किती शिकवलं, किती सांगितलं तरी डोक्यात प्रकाश पडत नाही. जन्म सारा सांगकामेपणातच गेला."

मी मामींकडे टक लावून पाहिले. खाली जमिनीवर पोत्याचे एक बस्कर घेऊन पुरुष माणसांनी बसावे तशा त्या बसल्या होत्या. इतके वय झाले तरी आवाज खणखणीत होता. गारगोटीसारख्या दिसणाऱ्या दोन्ही डोळ्यांत मनस्वी धार होती. नुकतीच पूजा आटोपली होती. दोन्ही भुवयांमध्ये बुक्क्याचा भला मोठा टिळा लावलेला होता.

सगुणेनं भाजी चिरणे थांबवले होते. चुलीत जाळ भगभगत होता. त्या मोठ्या जाळावर चहाचे पातेले चढले होते.

मामी हसल्या... प्रेमभराने मृदुपणाने हसावे तशा हसल्या...तिच्याकडे बघून म्हणाल्या, " इतकं सुचलं हे खूप झालं. पाहुण्यांना चहा ठेवायचं डोक्यात आलं म्हणायचं !"

सगुणाही हसली...एखादी मर्यादशील स्त्री संकोचाने हसावी तशी हसली.

इतक्यात मामी किंचित जोराने ओरडल्या, " लाकडं पुढं ओढ...जाळ तरी किती झालाय !"

आम्ही दोघं तशीच बसलो होतो. चहा झाल्यावर बाहेर आलो. मामीही बाहेर येऊन बसल्या.

मी हसलो व म्हणालो, " तुम्ही भेटलात एवढं बरं झालं...भीत भीत पत्र टाकलं...आहात की नाही याचीच भीती वाटत होती."

मामीही हसल्या. पांढऱ्या पातळाचा पदर श्मश्रू केलेल्या डोक्यावरून त्यांनी नीट घेतला व त्या म्हणाल्या, " नसायला काय झालं ? ...आमच्यासारखी माणसं खूप जगतील."

काहीतरी विचारायचं म्हणून मी विचारलं, " ही सगुणा कोण ?"

" आहे अशीच !" त्या मान वेळावून म्हणाल्या. " माझ्या चुलतभावाची बायको...भाऊ मेला. हिला मूलबाळ नाही. मी ठेवून घेतली आहे."

इतके होत आहे तो सगुणा दारात उभी राहिली. हलक्या नम्र आवाजात म्हणाली, " आंघोळीला पाणी काढायचं का ?"

मी म्हणालो, " काढा "– आणि उठलो. बायकोने तोपर्यंत प्रवासी बॅग उघडली होती आणि टॉवेल काढून हातात दिला होता.

मी न्हाणीघरात गेलो. न्हाणीघर जुन्या पद्धतीचे ऐसपैस होते. सगुणेने गरम पाणी काढले होते. विसणाला गार पाण्याची मोठी बादली जवळ ठेवली होती.

दार लावून मी आत पाहिले. कट्टयावर शिकेकाईची तपेली होती. शेजारी आजच काढलेला वाटोळ्या अंगाचा सुवासिक साबण होता. आंघोळ करताना मला त्या साबणाचेच आश्चर्य वाटत होते.

बायकोची आंघोळ झाली आणि लुगडे लावून घेऊन ती बाहेर आली. ओणव्यानेच प्रवासी बॅग उघडून काहीतरी शोधायला लागली.

माझे लक्ष नव्हते, पण मामींचे होते. त्यांनी विचारले, " काय शोधते आहेस ? "

बायको नुसती उचकापाचकच करत राहिली.

मामींनीच पुढे विचारले, " अग तुला कंगवा पाहिजे का ? "

तिने होकारार्थी मान हालवली व म्हटले, " गडबडीत विसरून राहिला. पण त्याचं काही नाही. मी यांचा घेईन...पण..."

"पण काय ?"

" ...पण...पण कुंकवाची बाटलीच विसरली आहे. "

मामी खो खो हसल्या व म्हणाल्या, " कुंकू विसरलीस ?... हात त्याच्या ...ये इकडे. "

बायको तिकडे गेली. बसल्या बसल्या मामींनी सांगितले, " देवघरापाशी तो कोनाडा आहे ना ? तिथे बाटली आहे. आरसा तिथेच आहे. "

त्या दोघी विधवांकडे बघत बायको कोनाडयापाशी गेली. तिथे खरंच कुंकवाची बाटली होती. मोठा आरसा होता. कंगवा होता. सौभाग्यवतीच्या साजशृंगाराची सारी तयारी होती.

कुंकू लावून बायको जवळ आली व म्हणाली, " अहो, इथे सारी तयारी आहे. साऱ्या गोष्टी आहेत... पुरुषाला लागणाऱ्याही साऱ्या वस्तू आहेत... पोमेड आहे, कंगवा आहे... दाढीची ब्लेड विसरली असती तरीही तुमच्या मामींनी घरातून नवी कोरी काढून दिली असती. म्हातारी विधवा इथे राहते; पण पुरुषाला आणि बाईला दोघांनाही लागणाऱ्या गोष्टी इथे आहेत. "

माझ्या मनात एक कल्पना आली. बहुतेक घरे पुरुषांची आणि बायकांची समाईक असतात. फक्त पुरुषाचे किंवा स्त्रीचे ' घर ' कधीच नसते. त्या ' खोल्या ' असतात. पण मामींच्या घरात स्त्रीपुरुषांचे दोन्ही भाग होते. एकाच रंगाचा धागा असायचा, तिथे दोन धागे होते ते एकमेकांत मिसळले होते.

मी बाहेर उगाच फेऱ्या घालत होतो. इतक्यात मधल्या दरवाज्यातून मामी बाहेर आल्या.

त्यांच्याकडे मी लक्षपूर्वक पाहिले. चेहरा म्हातारा होता; पण अजून त्यात कडकपणा होता... जबडा मोठा आणि रुंद होता... उगीचच वाटले की स्त्रीचा जबडा असा मोठा कधी नसतो.

काहीतरी बोलायला हे हवेच होते. मी म्हटले, " मला कल्पना नव्हती... तुम्ही घर इतके चांगले ठेवले असेल अशी... दिवाणखाना अगदी जसाच्या तसा ठेवला आहे... कुठे काही कमी नाहीच ! "

" मुद्दामच ठेवला आहे. पूर्वी दादा होता. इनामदारांचं आमचं घर...सारखी वर्दळ असायची...घरात माणूस नाही, गोंगाट नाही असं कधी व्हायचं नाही."

त्या बोलत होत्या. माझ्या डोळ्यांपुढे जुन्या वैभवशाली काळातील त्या घराचे चित्र तरळत होते.

" ...या दिवाणखान्यात मी वाढलेय म्हण... दादा समोर बैठकीवर असायचा... मी जरा बाजूला पण इथेच असायची... इथेच वाटेकरी यायचे... गावातले खटले खोकले इथेच निघायचे... पुढे सारेच बदलले. दादा गेला. घरात कोणीच येईनासे झाले... स्मशानात असावी तशी शांतता घरात पसरली. मुलांना इथे राहणे आवडेनासे झाले. सुनांना तर इथे एक दिवस देखील करमण्याची मारामार झाली. बरेच दिवस हे घर बंदच होतं. "

मी काहीच बोलत नव्हतो... त्या मात्र सांगण्याच्या भरात आल्या होत्या.

" बऱ्याच दिवसांनी मी इथे आले, तेव्हा घराची कुलपं सुद्धा गंजली होती. जिकडेतिकडे धुराळाच धुराळा साचला होता. काही दिवस मी दिवाणखाना साफ केलाच नाही, नुसतं स्वयंपाकघरच उघडलं; पण ते कसंतरीच वाटायला लागलं. मग एक दिवस रामजीला घेऊन दिवाणखाना साफ केला. मोठे आरसे पुसले, फोटोच्या फ्रेमी नीट केल्या, त्या दिवशी बरं वाटलं. पण अगदी चांगलं वाटलं नाही... आणखी चार दोन दिवस गेले. मग बैठकीच्या गाद्या झाडून झटकून

काढल्या... लोडतक्क्यांना अभ्रे घातले. पलंगावर नव्या चादरी पसरल्या... पण मग मात्र एकदम छान वाटलं. घरात मी एकटी आहे हेच विसरले... सारखा भास होई की, घरातला पुरुष बाहेर शेतावर किंवा चावडीवर गेला आहे तो घरी यायचा आहे. बाहेरचा दिवाणखाना त्याचीच वाट पाहतो आहे. तो माणूस थोड्याच वेळात घरात तक्क्यास टेकून बसणार आहे. मी आत आहे... थोडा वेळ विसावा झाल्यानंतर तो चौरंगावर उभा राहून पाय धुणार आहे... गडी विहिरीचं पाणी काढून देणार आहे. आंघोळ उरकल्यावर स्तोत्र म्हणत तो आत येणार आहे. त्या वेळी मी त्याची पूजेची तयारी करीत आहे..."

मामी इतके सारे बोलल्या नाहीत, पण त्यांच्या बोलण्यातून ते भावचित्र निर्माण झाले हे मात्र नक्की... आता चांगली दुपार झाली होती. उन्हे अंगणात उतरली होती. नगर जिल्ह्यातल्या कोरड्या हवेने अंगाची लाही लाही होत होती.

मी उठून उभा राहिलो आणि दिवाणखान्यात उगीचच फेऱ्या मारल्या. खिडकीतून घराची मागची बाग दिसत होती. तीत हारीने लावलेली कागदी लिंबाची झाडे होती. दुध्या-भोपळ्याचे वेल होते. मधून मधून उभ्या असलेल्या पेरूच्या ठेंगण्या झाडांवर पिवळे हिरवे पेरू होते. कोपऱ्यात प्रदोषवेल फुलला होता.

मी खिडकीत उभा असतानाच बायको आली. मामी अजून तिथेच होत्या. मघाशी काढलेल्या भावचित्रातच त्या रंगून गेल्या असाव्यात.

काहीतरी बोलायचे म्हणून मी मामींना म्हटले, "बागेत हिंडून येतो." त्यांनी रामजीला हाक मारली.

अंगणातल्या पायऱ्या उतरून आम्ही उभयता बागेत आलो. रामजी बाग दाखवत होता. आम्ही त्याच्या मागोमाग हिंडत होतो... बाग खरोखरच छान होती. लिंबाच्या झाडाचा आंबट वास सुटला होता. त्यामुळे वृत्ती फुलल्या होत्या.

झाडावर टप्पोरी हिरवी पिवळी लिंबे खालीवर होत होती. तिथे उभा राहून मी झाडाचे पान तोडले व रामजीला म्हटले, "लहानपणी मी आलो होतो, तेव्हा बाग नव्हती. नुसतीच पडिक जागा होती... रानटी झुडपं इथे

माजली होती... "

"अवो कशाची बाग आलीय!... हे सारं उजाडच व्हतं... आमच्या दादासाहेबांना हौस कशाची नवतीच."

आम्ही तिघेही त्या बागेकडे नुसतेच बघत राहिलो.

रामजी सांगत होता, "इथं पोरंसोरं खेळायची, गावातली गुरं चरायची. बाकी या बाजूला काही नसायचंच. पण बाईंनी स्वत: कष्ट करून बाग लावली, कलमं आणली, निगा राखली, पाणी घातलं, सारं त्यांनीच केलं."

मी म्हटले, "मामींच्या हातून इतके कष्ट होतात याचंच आश्चर्य वाटतं."

पेरूच्या झाडाखाली उभा राहून पिकलेला पेरू फांदीवर दिसतो किंवा काय याचे तो निरीक्षण करीत होता. तेथूनच तो म्हणाला, "कष्टाचं काय विचारता? एक दिवस बाई स्वस्थ नव्हती. आयुष्यात तिनं कधी संसार केला नाही. पण तिच्या मागचा संसार कधी चुकला नाही."

काही एका विशिष्ट जाणिवेने मी बायकोकडे पाहिले. आमच्या उभयतांच्या डोळ्यांनी परस्परांना काहीतरी सांगितले.

रामजी सांगतच होता..."बाईला आता पैशाची जरूर आहे का? मुलं पैसा पाठवतात. पण झाडाचं एक लिंबू ती कुणाला घेऊ देत नाही...आसपास कुणी मागायला आलं तर दोन पैशाला एक विकते. एवढी घरची गाडी आहे पण गावातून स्टेशनवर जायला मागितली तर तशी कधी द्यायची नाही."

बागेच्या कोपऱ्यात फुलांची झाडे होती. पिवळे, तांबडे गुलाब वाऱ्यावर डुलत होते. मी विचारले, "फुलांचं काय करतात?"

"फुलं अशीच देवाला वाहतात...कधी विकतात...लाल गुलाबांची फुलं सगुणाबाईला आवडतात, पण बाईंना आवडत नाहीत. बायकांनी लाल गुलाब डोक्यात घातलेला त्यांना खपत नाही त्यामुळे तो लाल गुलाब हट्टाने देवाला वाहतात...पिवळ्या गुलाबाची किंवा पांढरी कसली तरी फुलं सगुणाबाईनं डोक्यात घालावी असं त्यांना वाटतं."

मी पुन्हा बायकोकडे बघितले आणि घराकडे चालू लागलो.

स्वयंपाकघरात पाने मांडली होती. सगुणा स्वयंपाक करत होती. तिच्या डोक्यात पांढरी फुले होती. खाली मान घालून काहीच न बोलता ती काम करीत होती. एखाद्या नवोढेप्रमाणे संकोचली होती.

जेवताना तीन पाने शेजारी शेजारी मांडली होती. कुटुंबातल्या मुख्य पुरुषाने बसावे तशा त्या पहिल्या पानावर बसल्या होत्या. त्यांच्या खाली आम्ही दोघे होतो. सगुणा वाढत होती. पण तिच्या वाढण्याकडे त्यांचे जातीने लक्ष होते. त्यांच्या डोळ्यांच्या धाकात सगुणेचे वाढणे सुरू होते.

अंबाडीची भाजी केली होती. ज्वारीची सुंदर भाकरी होती. मला लहानपणीची आठवण झाली. भाजीत मी मधल्या बोटाने खळे केले, आणि तेल मागितले.

मामी ओरडल्या, " सगुणा, कपाटातलं ताजं तेल वाढ."

सगुणेने भिंतीतले कपाट उघडले. त्यात दादरे बांधलेल्या मोठमोठ्या बरण्या होत्या. लोणची आणि मुरांबे त्यात भरून ठेवले होते. मागच्या बाजूला तेलाची कासंडी होती.

मामी सांगत होत्या, " इथं कुणी खायला नाही पण तरीही मी लोणची, मुरंबे करते. तेवढंच घर भरल्यासारखं वाटतं, घरात कुणाचा तरी संसार नांदत आहे असं भासतं."

तेलाच्या कासंडीला सगुणेने हात घातला होता. इतक्यात तिने अस्पष्ट अशी किंकाळी फोडली. थरथरत, कापत ती बाजूला उभी राहिली.

मामींचे लक्ष होतेच. लोणची, मुरांब्याच्या गोष्टी थांबवून त्यांनी विचारले, " काय झालं ग ? "

ती काहीच बोलली नाही. नुसतीच त त प प करायला लागली.

त्याच पुन्हा ओरडल्या, " अग बोल की नीट...काहीतरी एखादं पेर दीड पेर जनावर असेल आणि ही लागली घाबरायला ! "

इतके बोलून त्या उठल्या आणि कपाटाजवळ गेल्या. आत काहीतरी इंगळीसारखे लवलवत होते. कोपऱ्यातली काठी घेऊन त्यांनी त्या इंगळीला चेचून काढले. आणि त्या खोखो हसल्या. म्हणाल्या, " हात् त्याच्या ! एवढीशी इंगळी ती काय ! अन् घाबरतेस ती काय....गंमतच आहे. "

मामींनी हसत हसत हात धुतले आणि पुन्हा पानावर येऊन बसल्या. बोलण्याला मग कलाटणी मिळाली.

" मला कधी असली भीती वाटलीच नाही. विंचवाची नाही न् सापाची नाही." मग त्या घटाघटा पाणी प्यायल्या, त्यांचे डोळे लकाकले. त्या सांगू लागल्या,

" आमचा दादा एवढा पुरुषासारखा पुरुष, पण तो सापाला भ्यायचा! एकदा रात्रीची वेळ होती. मुलं अशीच जेवायला बसली होती. मी तिकडे कोपऱ्यात होते. बाहेर दिवाणखान्यात दादा होता....कसं कुणास ठाऊक, माझं लक्ष मुलांच्या पानाच्यावर तुळई होती, तिकडे गेलं. काळ्या तुळई आणि कडीपाटाच्या मध्ये मला पिवळं पिवळं काही तरी हालताना दिसलं. मी एकदम दिव्याची वात मोठी केली. वर पिवळ्या जर्द नागाचं जोडपं होतं. दादाला हाक मारली; पण तो घाबरून बाहेरच बसला. घरात गडी कुणीच नव्हते. मग मीच मुलांना बाहेर काढलं आणि त्या जोडीकडे बघत बसले. ती खाली उतरल्या-शिवाय त्यांना मारणं शक्य नव्हतं. "

आम्ही दोघंही ऐकत होतो. सगुणा थरथरत होती. माझी बायकोही अस्वस्थ झाली होती. पण मामी सांगतच होत्या.

" हळूहळू ते जोडपं तुळईवरून भिंतीवर आलं आणि भिंतीवरून पलीकडच्या ओसाडीत गेलं. मी काठी घेऊन मागे होतेच. वहिनीनं खूप सांगितलं, 'तुम्ही जाऊ नका! नागाचं जोडपं आहे. त्याला कशाला मारायचं?...' मी ऐकलंच नाही. जोडप्यामागोमाग हलक्या पावलाने मीही ओसाडीकडे गेले. दादा पायऱ्यां-वर उभा होता. वहिनीची बोबडी वळली होती...बाहेर छान चांदणं पडलं होतं. ओसाडी पांढरी फेक झाली होती. नागाच्या जोडप्याला भानच नव्हतं. चांदण्यात त्यांची पिवळी अंगं चमकत होती. लाटा याव्यात तशी ती वर खाली होत होती. त्यांची क्रीडा चालली होती.

मी तशीच बघत उभी राहिले. त्यांचं खेळणं संपू दिलं. ती दोघंही निश्चेष्ट होऊन खाली पडली .. दमली असतील बिचारी... मग मी पुढे झाले आणि एकेका घावातच दोघांनाही ठार केलं. "

मामींच्या सांगण्यामुळे आमचे जेवणातले हात खोळंबून बसले होते. जेवण सुचणं शक्यच नव्हतं. थोडा वेळ जेवणाचं नाटक करून आम्ही उठलो.

जेवणानंतर दुपारचा वेळ आळसात संपला. मधून मधून मला गुंगी येत होती तरीही मी मामींशी बोलतच होतो. त्या अजून जुन्या जहागिरीच्या काळातच वावरत होत्या. पन्नास वर्षांपूर्वी लागलेल्या लग्नाच्या आणि जेवणा-वळीच्या आठवणी त्या अजूनही काढीत होत्या. मध्यंतरीचे त्यांचे दिवस दारिद्र्यात गेले होते. परंतु अलीकडे पैशाची स्थिती चांगली होती... भावाची

मुले... त्यांच्या चरितार्थासाठी पैसे पाठवीत होती. आता दारिद्र्य संपले होते. पण मुलांच्या नोकरीच्या पैशात त्यांना गोडी वाटत नव्हती. अजून त्यांना पूर्वीचे खानदानी गाडीघोड्याचे... गडीमाणसे... जमिनीपर्यंत त्रिवार हात लावून जोहार करून घेण्याचे वैभव आठवत होते. त्याबद्दलच त्या सारख्या बोलत होत्या.

उन्हे ओसरली आणि संध्याछाया पसरल्या. जहागिरदारांचा तो मोठा वाडा अगदीच भयाण वाटायला लागला. दिवसभर बोलून बोलून आमचे सारे विषय संपले होते. आम्ही नुसतेच बसलो होतो. काही वेळाने मी नि बायको गाव बघायला गेलो. गावात फक्त एकच रस्ता होता. त्यात ठिकठिकाणी पडक्या घरांचे पुंजके होते. घरांना लागूनच शेते होती. एका शेताच्या कोपऱ्यात शंकराचे देऊळ होते. तिथे पाकोळ्या फडफडत होत्या. तिन्हीसांजच झाली होती पण त्या कुग्रामात धूसर काळोख पसरला होता.

पाय मोकळे करून घरी आलो. स्वयंपाकघरात छोटा कंदील लागला होता. मामी कुणावर तरी करड्या आवाजात ओरडत होत्या. आम्ही तसेच आत गेलो आणि बघितले. सगुणा दरवाज्यात पाणी प्यायचे भांडे घेऊन खालच्या मानेने उभी होती आणि मामींच्या डोळ्यांत निखारे फुलले होते.

मी विचारले, " काय झाले ? "

त्यांनी तावातावाने सांगितले, " व्हायचंय काय ? नेहमीची कर्मकटकट ! हजार वेळा सांगितलं आहे... संध्याकाळी देवाला जायला हरकत नाही; पण दिवेलागणीला घरी यायला हवं. "

सगुणा एखाद्या कुलवधूसारखी खाली मान घालून उभी होती आणि मामींचे तडातडा बोलणे बराच वेळ चालले होते.

काही वेळाने रात्र गडद झाली. त्या मोठ्या वाड्यात अपुऱ्या प्रकाशामुळे सावल्या भिंतीवरून इकडे तिकडे जायला लागल्या... मागच्या बाजूच्या बागेतून झाडांची सळसळ ऐकू यायला लागली. लिंबाच्या झाडांचा आंबट वास अंगात भरला. अशा तऱ्हेची गूढरम्य रात्र पुण्या-मुंबईला अनुभवायला मिळत नाही.

रात्रीची जेवणे झाली. सगुणा वाढत होती. आमची दोघांचीच पाने होती. मामींना निराहाराचे खायचे होते. रात्रीची शांतता आमच्या सर्वांच्याच अंगात

मिनत चालली होती.

जेवण होऊन बाहेर आलो आणि उगाच बसलो. झोपायचे कुठे, हे माहीत नव्हते. बहुधा मला एकट्याला बाहेरच्या ओसरीवर झोपावे लागणार होते... आत तिघी बायका झोपल्या असत्या... अंथरुणाची सोय होईपर्यंत मी तसाच बसलो.

थोड्या वेळात दिवाणखान्यात जुन्या पद्धतीचा मोठा वाटोळा स्टँड लागला. रामजी तिथे अंथरूण घालीत असल्याचा आवाज ऐकू येत होता. माझ्या डोळ्यांवर झोप तरंगत होती... बायको आत होती... मामी बाहेर येऊन बसल्या होत्या.

पाच-सात मिनिटे तशीच गेली. मामी भाजके दाणे चावत बसल्या होत्या. मी चाळवाचाळव करीत होतो. त्यांना जुन्या आठवणी काढण्याची लहर आली होती. भावाच्या मुलांचे आणि मुलींचे संसार कसे चालले आहेत हे त्या सांगत होत्या.

दादासाहेबांना पाच मुलगे आणि तीन मुली होत्या. प्रत्येकाची माहिती त्या देत होत्या. एकदोन वाक्यांत, मी न पाहिलेल्या मंडळींची व्यक्तिचित्रे उभी करत होत्या.

"आमची मोठी सून नुसतं जहाज आहे बघ... दोनशे पौंड वजन असेल... मधला नुसता बायल्या आहे... सारखा बायकोच्या कासोट्यात असतो... धाकटी नुसती कोंबडी आहे. तिला दुसरं तिसरं काही जमत नाही. दर दीड-दोन वर्षांनी आपला पाळणा हालतोय... काही जमत नाही, पण हे जमतंय!" वगैरे सांगत होत्या.

"मोठी मुलगी बारामतीला वकिलांकडे दिली आहे. तिला मूलच नाही... आणि धाकट्या मथूचा तर घोटाळाच झाला..."

मी मथूला कधीच बघितले नव्हते तरीही विचारले,

"घोटाळा व्हायला काय झालं?"

"अरे तिचा नवरोजी अगदीच बिनडोक आहे... फार त्रागा दिलान् बघ त्यानं... सारखं मारायचा, उपाशी ठेवायचा. पोरगी मरायला लागली."

"असं का वागायचा?" मी विचारले.

"नवरा तोऽ! त्याचं काय विचारायचं? पोरगी निम्मी झाली तेव्हा मी गेले

आणि घेऊन आले. मला तिचाच फार राग आला... अगदी भेंड्याची भाजी पचपचीत... तिला नवऱ्याकडे पाठवलंच नाही."

"नवरा गप्प बसला?"

"करतो काय? इथे मी आहे हे माहीत होतं. आला नाही हेच बरं झालं. नाहीतर खेटरानंच बडवलं असतं. त्यानं खूप पत्रं लिहिली. पण मी दाद दिली नाही... मथीला म्हटलं, तू दुसरा नवरा कर. मी पाट लावून देते."

"आपल्याला हे बरं नाही दिसत."

"बरं काय आणि वाईट काय?... का लावू नये पाट?... नुसतं रडत बसण्यापेक्षा ते खूप बरं. मथी आता सोलापूरला मास्तरीण आहे. मी तिला सांगते तशीच नुसती राहू नकोस. तुझ्याजोगता माणूस शोधून काढ."

मी काहीच बोललो नाही... रामजीने अंथरूण घातल्याचे सांगितले. मामी खोकत खोकत हसल्या व म्हणाल्या, "कृष्णराव, दिवाणखान्यात एकटे झोपाल ना?... का भीतीबीती वाटेल?"

मी दिवाणखान्यात आलो. स्टुलावर स्टॅण्ड होता... जुन्या पद्धतीच्या इनामदारी वैभव बघितलेल्या मोठ्या पलंगावर गादी घातली होती. स्वच्छ पलंग-पोस होता. दोन ऐसपैस उश्या होत्या.

दिवा बारीक केला आणि अंथरुणावर पडलो. झोप येईनाच... जुन्या पद्धतीने सजवलेला तो दिवाणखाना सारखा समोर दिसत होता... कसेसेच वाटत होते. अर्जुन-सुभद्रेची आणि दुष्यंत-शकुंतलेची चित्रे माझ्याकडे डोळे मिचकावीत होती.

बाहेर सारे शांत होते. काही वेळाने दार किलकिले झाले. बायको आत आली. तिच्या हातात तांब्याभांडे होते.

माझ्याकडे बघून ती हसली. मी गंभीर होऊन म्हटले, "तू का आलीस? मला इथं एकट्यानंच झोपायला सांगितलं होतं."

ती नुसतीच हसली. म्हणाली, "अहो, तुमच्या मामीचा तो विनोद आहे. मलाही सारखं तसेच म्हणत होत्या... मग आता एकदम त्यांनी इकडे यायला सांगितलं."

"हे वाईट दिसतं."

"मी नकोच म्हणत होते. संकोच वाटत होता. पण त्यांचाच सारखा

आग्रह पडला... म्हणाल्या..."

इतके बोलून ती थांबली... बोलावे किंवा नाही अशा विचारात ती पडली.

मीच पुढे विचारले, "काय म्हणाल्या?"

"म्हणाल्या, गेल्या पंधरावीस वर्षांत जोडपं असं दिवाणखान्यात झोपलंच नाही... आज तुम्ही झोपा."

मी काहीच बोललो नाही. झोपण्याची तयारी केली. बायको सांगतच होती, "सगळ्या गोष्टींची तुमच्या मामींना हौसच आहे... संध्याकाळपासून गड्याला सांगून त्यांनी दिवाणखाना सजवला आहे... मुद्दाम परटाचे पलंगपोस आणि अभ्रे काढले आहेत."

मी अंथरुणावर पडलो... बागेतून उमललेल्या प्रदोषपुष्पांचा मंद वास येत होता... बाहेर टिपूर चांदणे पडले होते. जुन्या काळातील इनामदाराच्या थाटात मी मंचकावर पडलो होतो.

तिने दिवा अगदी कमी केला आणि जवळ येऊन झोपली... परक्या वातावरणामुळे मला ती नवीन वाटत होती.

मी तिच्याकडे वळलो.

ती हसतच होती.

घोगऱ्या आवाजात मी विचारले, "हसायला काय झालं?"

"मला मामींचं हसू येतं." ती म्हणाली, "त्यांना सगळया गोष्टींचा सोस आहे. नवरा-बायकोची थट्टा करण्याचीही हौस आहे.... तुम्हाला एकटं झोपायला सांगून तुमची गम्मत केली!"

मी तिच्या अंगावर हात टाकला.

ती बोलतच होती, "बाई म्हणून त्यांना स्वयंपाकातली माहिती आहे, याचं काही नाही...पण पुरुषाच्या गोष्टीही माहीत आहेत... खरं म्हणजे बालविधवा त्या. आयुष्यात कसला म्हणून अनुभव नाही... पण आपण एका खोलीत झोपावं, अशी त्यांना हौस... अशा वेळी कशानं रंग चढतो हे त्यांना कसं कळत कुणास ठाऊक."

इतक्यात बाहेरून दार खडखडले. मामींचा करडा आवाज ऐकू आला.

मी बाजूला झालो आणि दिवा मोठा केला. बायकोने दार उघडले. काही वेळाने बायको बाहेरून आली... हसत आली. मी काही विचारायच्या आतच

तिने टपोऱ्या पांढऱ्या शुभ्र मोगरीच्या फुलांचे दोन गजरे पुढे केले व म्हटले, " हे विसरले होते. संध्याकाळी त्यांनी करून ठेवले होते. पण इकडे यायच्या वेळी द्यायचे विसरल्या. "

तिने दिवा मालवला व पांघरुणात शिरत खुदूखुदू हसत मला म्हणाली, " मामींची कमाल आहे बाई."

ती मला बिलगली. दिवाणखान्यात अंधार होता. खिडकीतून मात्र बाहेरचे शुभ्र चांदणे चमचमताना दिसत होते.

मी उठून बसलो. तिला म्हटले, " खिडकीतून बाहेर बघ तरी...निख्खळ चांदणं बघायला मिळतंय."

तीही उठून बसली. बाहेर बघत उद्गारली, " खरंच की ! फारच मजा आहे. असं चांदणं पुण्यात दिसत नाही...कुठे तरी त्यात ट्यूबचा किंवा इलेक्ट्रिकच्या खांबाचा प्रकाश अडमडतोच."

तिचा हात धरला आणि आम्ही खिडकीपाशी आलो. बाहेर चांदण्याचा समुद्र फेसाळत होता.

थोडा वेळ तसाच गेला. फेसाळत्या चांदण्यात मला एकदम तकतकीत पिवळ्या लाटा दिसल्या.

मी तिला विचारले, " चांदण्यात काय दिसतंय ? "

" काही नाही ..नुसतं चांदणच दिसतंय."

" नीट बघ..."

" बघितलं...झाडांचे तुरे चांदण्यात हालताहेत..."

" झाडांच्या पलीकडे ओसाडीत काय आहे ? "

" ओसाडी आहेच कुठे ? सगळी तर बागच आहे."

" नीट बघ. ओसाडीच आहे. पांढऱ्या शुभ्र चांदण्यात ते नागाचं जोडपं बघ...जमिनीवर सरळ ताठ ती दोघं उभी आहेत...त्यांची पिवळी शरीरं चकाकताहेत... लाल लाल जिभा लवलवताहेत... डोळे नीलमण्यासारखे दिसताहेत... ती दोघं फुलांच्या वासानं धुंद झाली आहेत... एकमेकाला बिलगताहेत... पुन्हा लांब होताहेत... "

मला नागाचे जोडपे दिसत होते. बायकोलाही ते आता दिसले. म्हणाली, " खरंच हो खरंच; ते जोडपं डोळयांसमोरून जातच नाही. मामींनी एका

घात्रात ते कसं मारलं असेल ?"

मी काहीच बोललो नाही. बराच वेळ आम्ही चांदण्याकडे बघत बसलो. मला चमत्कारिक वाटले. फार वर्षांपूर्वी मामींनी नागाच्या जोडप्याला असंच खेळू दिलं होतं. चांदण्यात धुंद होऊन ते जोडपं क्रीडा करीत होतं. मामींनी क्रीडा होऊ दिली होती...

माझी सारी चेतनाच नष्ट झाली. बायकोचा मूडही एकदम बदलला. आम्ही दोघेही दुसरी गादी नव्हती म्हणून एका पलंगावर झोपलो. पण एकमेकांना स्पर्श करण्याची मुळीच इच्छा नव्हती.

रात्रभर मला पांढरे स्वच्छ चांदणे आणि रंगात आलेले पिवळे जर्द नागाचे जोडपे दिसत होते... बाहेर निजलेल्या मामींनाही कदाचित ते तसेच दिसत असेल.

दुसऱ्या दिवशी फार वेळ तेथे थांबलो नाही... मामी आग्रह करीत होत्या. पण मी ऐकले नाही. शक्य तितक्या लौकर तयारी केली आणि इनामदारांच्या त्या अवजड वाड्यातून आम्ही बाहेर पडलो.

१६

# पेपर-स्टॉल — माझा वीक पॉइंट!

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □ □

रविवारी नेहमीप्रमाणे, सकाळी जिमखान्यावर बसने उतरलो. काम असं काहीच नव्हतं. उगीचच गावात भटकत होतो... पुण्यात निर्हेतुक भटकणे हा एक माझा आवडीचा छंद आहे.

जुन्या पुण्यावर मी निरनिराळ्या प्रकारचे प्रेम करतो. एखाद्या प्रेयसीप्रमाणे पुणे शहर मला आवडते. कधी कधी मला ते शहर एखाद्या वृद्ध आजीबाई-सारखं किलकिल्या पण स्निग्ध दृष्टीने माझ्याकडे पाहात असल्यासारखं वाटतं. पत्नीच्या ठायी कालिदासाने प्रेयसी, माता किंवा अन्नपूर्णा अशी अनेक रूपे बघितल्याचा दाखला आहे. माझंही या नगरीवरचं प्रेम तसंच आहे.

अलीकडे उपनगरात राहायला लागल्यापासून मला या शहराची ओढ विलक्षण वाटते. जीव कसनुसा होतो. अनेक प्रकारचे त्रास सोसून मी दिवसातून एकदा तरी पुण्यात येतोच. पूर्वी गिरगाव सोडून दादरला किंवा पार्ल्याला स्थायिक झालेली माणसं गिरगावच्या प्रेमाने अशीच तिकडे जात असावीत.

नेहमीप्रमाणे जिमखान्याच्या बस-स्टॉपवर मी जरासा रेंगाळलो. शहराच्या कोणत्या भागाकडे पदयात्रा काढावी याचा विचार करीत उभा राहिलो. मग रमतगमत संभाजी पार्कच्या बाजूला चालायला लागलो. कुठेतरी लांब फेर-फटका मारण्यासाठी माझं शरीर आसुसलं होतं.

मी चालायला लागलो. पण पूनम रेस्टॉरंटच्या समोर फूटपाथवर निरनिराळी

दैनिकं आणि मासिकं लावून ठेवलेली आढळली. थोडा वेळ त्यांच्याकडे बघावं म्हणून मी तिथे थांबलो... आश्चर्याची गोष्ट आहे पण एक-दोन क्षणांतच माझा ' मी ' राहिलो नाही. माझे जवळ जवळ भान हरपले. आपल्याला कुठे तरी लांब हिंडायला जायचं आहे हेही मी विसरलो. नुसताच त्या वर्तमान-पत्रांच्या चवडीकडे पाहात राहिलो... समोरच्या फूटपाथवर एक नर्सरी आहे. तिथे ताजी टवटवीत रंगीबेरंगी फुले सारखी हसत असतात. त्यांचं सौंदर्य नजरेनं टिपण्याचा मला नाद आहे, पण त्या ताज्या फुलांपेक्षाही फूटपाथच्या कडेला लावून ठेवलेली वृत्तपत्रे बघण्याचा मला शौक आहे ही माझी आवड आजचीच आहे असं नाही. फार पूर्वी— अगदी लहानपणी, फरासखान्याच्या हौदासमोर निरनिराळ्या वर्तमानपत्रांचा आजच्याप्रमाणेच बाजार भरे. त्याकडेही मी तासतास बघत राही. पहाटेच्या वेळी वर्तमानपत्रं विकणारी मुलं " सकाळ... त्रिकाळ ...प्रभात... केसरी " अशा आरोळ्या ठोकत घरावरून जात तो आवाजही मला कर्णमधुर वाटे. वर्तमानपत्रांचं आणि माझं काही निराळंच नातं आहे.

खरं सांगायचं तर मी माझ्या घरात दोन-तीन दैनिकं विकत घेतोच. ऐपत नसूनही मी तेवढा खर्च करतो. दाराच्या फटीतून दैनिक सरकवल्याचा आवाज ऐकल्याशिवाय माझी झोप संपत नाही. दिवस सुरू झाल्यासारखं मला वाटतच नाही. घराबाहेर पडताना ती सर्व दैनिकं मी वाचलेली असतात. बातम्यांचं किंवा माझ्या आवडीच्या सदरांचं रवंथ करीत एक प्रकारच्या धुंदीतच मी घरा-बाहेर पडलेला असतो. पण तरीही वर्तमानपत्रांच्या स्टॉलचं माझं आकर्षण तिळमात्र कमी होत नाही.

फूटपाथवरचा तो स्टॉल पाहिल्यावर मला भानच उरलं नाही. .एखादा जुना मित्र भेटावा तसं झालं. तिथे उभा राहून मी त्या वृत्तपत्रांकडे नुसताच बघत राहिलो. मला माझंच हसू आलं. मी आसपास पाहिलं. माझ्या अवतीभोवती माझ्यासारखेच आठ-दहा व्यसनी लोक वर्तमानपत्रांच्या त्या चळतींकडे बघत होते. विक्रेत्याची नजर चुकवून एखादा आशाळभूतपणे पेपर हातात घेऊन चाळत होता. विक्रेता दटावत होता पण त्याचंही त्याला भान नव्हतं.

एकदम विचार आला की आपण आयुष्यात प्रथम वर्तमानपत्र केव्हा पाहिलं ! ...माझा मीच चक्रावलो... तो वेडेपणाचाच विचार होता... जीवनात प्रथम आई केव्हा पाहिली ?... राहतो ते घर केव्हा पाहिलं ?... आठवण शक्य

आहे का ?... आपण या जगात येण्यापूर्वीपासूनच आई असते आणि घरही असतंच !... माझ्या बाबतीत मात्र आईप्रमाणेच वर्तमानपत्रं घरात होतंच. ते नव्याने पाहण्याचा प्रश्नच नव्हता.

मी प्रथम मोटार केव्हा पाहिली... सांगता यायचं नाही. पण माझ्या वडलांनी मोटार पुण्याच्या रस्त्यावरून हिंडताना प्रथम पाहिली तो प्रसंग एकदा वर्णन करून सांगितला होता... सदाशिव पेठेच्या हौदापाशी आलेली ती मोटार बघायला ऐंशी नव्वद वर्षांपूर्वी तुडुंब गर्दी जमली होती. त्या लोंढ्यात चकित नजरेने माझे वडील मोटार पाहात उभे होते. तळपत्या उन्हात ती मोटार कशी दिसली, तिचा रंग कसा चमकदार होता, तिचा खाकी पोशाखातला सारथी कसा रुबाबदार होता याचे चित्र त्यांनी डोळ्यांपुढे हुबेहूब निर्माण केल्याचे स्मरते. वडलांचा मला तेव्हा हेवा वाटला. त्यांनी जाणत्या कुतूहलाने नवी गोष्ट पाहिली होती. त्या कुतूहलाचे सौख्य मला काही बाबतीत मिळाले. माझ्या नातवंडांना तर मुळीच मिळत नाही. घराला भिंती आणि खिडक्या असतात त्याचप्रमाणे तिथे फ्रीज, टी. व्ही. आणि फोनही असतोच असा त्यांचा समज आहे. त्यांना कशाचेच नावीन्य नाही... दुर्दैवी बिचारे !

मी स्वत: वर्तमानपत्र कधी पाहिले हे मला आठवत नाही. पण आमच्या एकत्र कुटुंबात एक म्हाताऱ्या आजीबाई केसरीचा पहिला अंक बघितल्याचे सांगत. त्या वेळी त्यांचे वय फक्त बारा-तेरा वर्षांचे होते. नवरा सरकारी नोकरीत होता. त्याच्या स्वत:च्या नावावर केसरी घेण्याचं धैर्य दाखविता येत नसल्यामुळे बायकोच्या नावावर तो अंक घेई. लग्न झालं तेव्हा तिला अक्षरओळखही नव्हती. नवऱ्यानंच "श्रीगणेशा" शिकवला आणि पुढे कित्येक वर्षांनी त्यांनी तो केसरी प्रत्यक्ष वाचला. त्या वेळचा तो आनंद त्या नेहमी वर्णन करीत. हल्लीच्या सुशिक्षित स्त्रियांना वाचनाचा तो पहिला आनंद कधी लाभणार नाही. ..तो 'आनंद' आहे हे कळण्यापूर्वीच त्यांनी अक्षरे वाचलेली असतात.

'केसरी' आमच्या घरी पहिल्यापासूनच येत असे. माझे वडील आसपासच्या बिऱ्हाडांतल्या लोकांना तो वाचून दाखवत असल्याचे आठवते. त्यांचा आवाज खडा होता आणि वाचन शुद्धलेखन सांगितल्याप्रमाणे असे. सर्व वाड्यात—जवळ जवळ आठ-दहा बिऱ्हाडांत तेव्हा एकच केसरी येई. प्रत्येकाचा 'पेपर'

निराळा असण्याची कल्पना तेव्हा नव्हती. पुढेही कित्येक वर्षे पेपरबद्दल पझेसिव्हनेसची भावना पुण्यात नसल्याचे आठवते. कुणीही कुणाचाही पेपर सरसकट वाचण्याची पद्धत होती. आमचा पेपर तर सर्व वाडाभर हिंडे. रात्री आमच्या घरी तो परत येई, तेव्हा छिन्नविच्छिन्न अवस्थेत असे. मीही दुसऱ्याच्या पेपरमध्ये वाटेल तेव्हा तोंड खुपसत असे... एकदा मुंबईस गेलो असताना लोकलमध्ये शेजारचा माणूस पेपर वाचताना दिसला. मला एकदम उबळ आली. मी त्याने वाचलेले पान आगाऊपणाने हातात घेतले आणि आधाशीपणाने वाचून संपवले. तो माणूस माझ्याकडे चकित नजरेने पाहात होता. मी पान परत दिल्यावर त्याने हसत विचारले, " काहो !... तुम्ही पुण्याचे का ? "... मी होकार दिला व प्रतिप्रश्न केला " कसं ओळखलंत ? " ...तो जास्तच हसला आणि म्हणाला, " इथे असं दुसऱ्याचं वर्तमानपत्र घेऊन कोणीही वाचत नाही. " ...मला थोबाडीत मारल्यासारखे झाले आणि तेव्हापासून माझी ती सवय सुटली.

पण तेव्हा संध्याकाळी कामं-धामं संपली की सगळ्यांनी कुणाच्या तरी माडीत जमून केसरीचे सामुदायिक वाचन करण्याची रीत होती हे मात्र खरे ! त्या वाचनात स्त्रियांचा सहभाग असण्याची कल्पनाही नव्हती... हरिभाऊंच्या ' करमणूक 'मुळे माजघरात मासिक-पुस्तक गेलं असा त्यांचा दावा होता. पण दिवाणखान्यातून स्वयंपाकघरापर्यंत वर्तमानपत्राचा प्रवास व्हायला मात्र जवळ जवळ एकोणीसशे बत्तीस साल उजाडावं लागलं.

केसरीतील केळकरांच्या भाषाशैलीची चटक मला अगदी लहानपणी लागली. ती गोडी शेवटपर्यंत कमी झालीच नाही. केसरीतले अग्रलेख वडील मोठमोठ्याने वाचून दाखवत. केळकरांच्या भाषेला एक विशिष्ट लय किंवा नाद असायचा. एखाद्या नर्तकीच्या पैंजणाच्या आवाजाप्रमाणे केळकरांची डौलदार वाक्ये साऱ्या घरात घुमत राहात. शिवरामपंत परांजप्यांना कैलासवासी होऊन आता पन्नासच्या वर वर्षे होऊन गेली, पण वडलांनी वाचून दाखविलेला त्यांच्याविषयीचा मृत्युलेख मला अजूनही जसाच्या तसा आठवतो. शिवरामपंतांचे ' काळ ' वर्तमानपत्र दर शुक्रवारी निघे. त्यांचा मृत्यूही शुक्रवारीच झाला. केळकरांनी लिहिले, "जो काळ त्यांच्या घरातून दर शुक्रवारी मोठ्या थाटाने वाजतगाजत निघे त्याच 'काळा'ने शुक्रवारी एखाद्या चोराप्रमाणे येऊन त्यांचे प्राण हरण केले." ... केळकरांच्या

अग्रलेखाबद्दल खूप लिहिता येईल. एकच गोष्ट सांगतो. त्यांनी संपादकपदा-वरून निवृत्त झाल्यानंतर बऱ्याच वर्षांनी एकदा केसरीत अग्रलेख लिहिला ... किती तरी वाचकांनी लगेच तो केळकरांचा अग्रलेख आहे असे ओळखले आणि तसे पत्राने कळवले.

केळकरांनंतर ज. स. करंदीकर, दा. वि. गोखले, ग. वि. केतकर वगैरेंचे अग्रलेख सवयीमुळे वाचले. केतकरांच्या रोखठोक आणि बुद्धीला आवाहन करणाऱ्या शैलीव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाच्या अग्रलेखांची मोहिनी पडल्याचे आठवत नाही.

नुसता केसरी वाचून वडलांचे समाधान होत नसे. आमच्या कोपऱ्यावर एक सेवानिवृत्त जज्ज राहात. ते ' रावसाहेब ' पदवीनेही विभूषित होते. त्यांच्याकडे ' ज्ञानप्रकाश ' आणि इंग्रजी टाईम्स येत. दुपारी तिकडे जाऊन मी वडलांकरिता ' ज्ञानप्रकाश ' घेऊन येई. टाईम्सला हात लावण्याची माझ्या वडलांचीही प्राज्ञा नसे. माझ्या वडलांनी जर टाईम्स मागितला असता तर रावसाहेबांनी बहुधा त्या औद्धत्याबद्दल मला घरातून हाकलूनच दिले असते. ज्या घरी ' टाईम्स ' आणि ' ज्ञानप्रकाश ' येतो ती श्रीमंतांची किंवा बड्या सरकारी नोकरांची घरं असतात असं समीकरण माझ्या मनात तेव्हापासून ठाम बसलेलं आहे. आजच्या वर्तमान-पत्रांकडे बघितलं तर कुणीही कोणतंही वर्तमानपत्र वाचतो असं दिसतं. सुख-वस्तू आणि घरंदाज कुटुंबांचं ज्ञानप्रकाश हे जसं वर्तमानपत्र होतं तसं आज त्या वर्गाचं खास वर्तमानपत्र नाही. कदाचित असंही असावं की त्या तऱ्हेचा सुखवस्तुपणाच आज नाही.

ज्ञानप्रकाश साधारणपणे एक्कावन सालपर्यंत होता. त्याचे वृद्धावस्थेमुळेच निधन झाले असे म्हणण्यास हरकत नाही. मला ज्ञानप्रकाश आठवतो तो काका-साहेब लिमयांचा ! वर्तमानपत्र हे ' जनतापत्र ' होण्यास काकासाहेबांपासून सुरुवात झाली. पुण्याच्या पूर्व भागात पूर्वी ' केसरी ' तरी जात असे किंवा नाही याची शंकाच आहे. पण ज्ञानप्रकाशने अगदी थेट नाना, भवानी पेठां-पर्यंत शिरकाव करून घेतला. महाराष्ट्रातल्या खेडोपाडीच्या बातम्यांनाही ज्ञान-प्रकाशमध्ये जास्त स्थान मिळायला लागले. नवे नवे उपक्रम सुरू करण्याची दृष्टीही काकासाहेबांमध्ये होती. पुस्तकांवर प्रदीर्घ अभिप्राय त्यात येतच, शिवाय साहित्यविषयक चर्चाही असत. दैनिकाची साहित्यविषयक पुरवणी ( लिटररी

सप्लिमेंट ) असण्याची कल्पना प्रथम ज्ञानप्रकाशचीच ! माडखोलकर किंवा कवी यशवंत यांच्यासारखे बुजुर्ग संपादक असत. त्या वेळच्या रविकिरण मंडळाला ज्ञानप्रकाशनेच प्रसिद्धी दिली. कवी यशवंत आणि माटे मास्तर यांचा हमरी-तुमरीचा वाद ज्ञानप्रकाशच्या कॉलममधून खेळला गेला. ठळक टाईपमध्ये छापलेल्या दिवाकरांच्या नाट्यछटा माझ्या डोळ्यांना अजूनही दिसत आहेत.

पण ज्ञानप्रकाश म्हणजे खरं तर ' हशा आणि टाळ्या '...गाजलेल्या सभांचे सविस्तर वृत्तान्त द्यावेत ज्ञानप्रकाशनेच !...आता तशा सभाही नाहीत आणि वृत्तान्तही नाहीत. बातमीदार दामूअण्णा कोकजे यांना वक्त्यांचे शब्द लघुलिपी येत नसतानाही इतके कसे आठवत, कुणास ठाऊक ! कोकज्यांनी आचार्य अत्र्यांना लोकप्रियता मिळवून दिली. मी स्वतः सदतीस सालच्या इलेक्शनच्या धामधुमीत जेधे मॅन्शनमध्ये झालेल्या शंकरराव मोरे आणि काकासाहेब गाडगीळ यांच्या सभेला हजर होतो. श्री. कोकजे हेही एखाद्या साळसुदाप्रमाणे श्रोत्यांमध्ये बसले होते. काकासाहेबांचे लक्ष त्यांच्याकडे गेल्यावर ते मनात चांगलेच चरकले. सभा संपल्यानंतर त्यांनी कोकज्यांना जवळ बोलावून घेऊन सभेचा वृत्तान्त ज्ञानप्रकाश-मध्ये न देण्याची विनंती केली. कोकज्यांनीही 'हो' ला 'हो' केले. मी दुसऱ्या दिवशी ज्ञानप्रकाश पाहिला. त्यात जाड मथळ्यामध्ये हशा टाळ्यांसह कोकज्यांनी दिलेला वृत्तान्त वाचला आणि थक्क झालो. मी स्वतः ती सभा ऐकली होती. पण मला ती इतकी कळली नव्हती. अत्रे-माटे वाद जोरात होता तेव्हाही सभांचे वृत्तान्त जसे ज्ञानप्रकाशमध्ये येत तसे दुसऱ्या कोठेही येत नसत. मला वाटतं साहित्यिकांना ज्ञानप्रकाशइतकी प्रसिद्धी दुसऱ्या कोणीही दिलेली नसेल. आजच्या दैनिकांच्या रविवार आवृत्त्यांची सुरुवात ज्ञानप्रकाशपासूनच झाली.

काकासाहेब लिमये निवृत्त झाले आणि ज्ञानप्रकाशचे चैतन्य संपले. पुढेही काकासाहेब ज्ञानप्रकाश कचेरीमध्ये येऊन बसलेले मी पाहिले आहेत. त्या वेळी ते अगदीच मालवलेले दिसत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामधील सर्व तेजच त्यानंतर संपले. ज्ञानप्रकाशची पोकळी त्याआधीच 'सकाळ'ने भरून काढण्यास सुरुवात केली होती. 'सकाळ'चं सगळंच नवीन आणि पुणेकरांच्या भाषेत म्हणायचं तर अमेरिकन होतं. इतर वर्तमानपत्रांच्या कचेऱ्यात चावड्या असत. तिथे गप्पाष्टकांचे अड्डे जमत. वर्तमानपत्र म्हणजे ते सगळं आलंच. पण सकाळ कचेरीत तसं कधी दिसलं नाही. कोणीही गप्पा मारीत नसे. सगळं अमेरिकन शिस्तीत असे त्या

काळातील पुण्यात तशी शिस्त कुठेच नव्हती. त्यामुळेच सकाळ ऑफिसचा दबदबा सर्वत्र असे.

‘सकाळ’मध्ये ग्रंथ-परीक्षण असे. पण परीक्षण करणाऱ्याचं नाव दिलेलं नसे. सगळा गुप्त कारभार असे. इतर वर्तमानपत्रांत लेखक मंडळी स्वतःच्या पुस्तकावर दुसऱ्या कोणाकडून तरी स्तुतिपर मजकूर लिहून घेऊन तो सहज छापून आणू शकत असत. तिथल्या उपसंपादकाच्या दृष्टीने ते चांगलंच असे. कारण पुस्तकवाचनाची डोकेदुखी न अनुभवता कॉलम भरता येत असत. एकोणीसशे चाळीस साली ‘रविवार सकाळ’ सुरू झाला, आणि मग पेपरमध्ये पूर्वी कधीही न आलेले विषय सकाळच्या कॉलममध्ये साक्षात दिसायला लागले. उषा वहिनींचा सल्ला...भाजीपाला लागवड...प्रौढ साक्षरांच्या गोष्टी...अजब अनुभव....कुस्त्यांची वर्णने...एक ना दोन ! किती सांगायचं ? आम्ही सदाशिव पेठेतील वाड्यांत राहणारे लोक त्या भाजीपाल्याची टिंगल करत असू. पण पुढे शहराबाहेर राहायला लागल्यानंतर त्या भाजीपाल्याची उपयुक्तता कळायला लागली आणि अलीकडे तर माझ्या कुटुंबातील बायका त्या समितीत जायलाही लागल्या.

सकाळची भाषा हा एक स्वतंत्र विषय आहे. केसरीच्या संस्कृतप्रचुर भाषेला सकाळने प्रथम हादरा दिला. सामान्य माणसाला सहज कळेल अशी मराठी भाषा सुरू केली. त्यात आवेश किंवा नाटकीपणा नसे. केळकरांच्या भाषेसारखी ती सुंदर किंवा नीटनेटकीही नसे. शिवरामपंतांच्या भाषेची तर तिच्यावर छायादेखील नसे. ते काही निराळेच रसायन होते.

सकाळच्या बरोबरीची आणखी कितीतरी वर्तमानपत्रे आठवतात. मामा दात्यांच्या ‘दैनिक काळ’ला लोक केसरीचं भावंडच समजत. केसरी दर मंगळवारी निघे. काळ त्या दिवशी बंद राही. ‘त्रिकाळ’कार शि. ल. करंदीकर यांच्या शैलीचा वारसा काळने पुढे चालवला. काँग्रेस पक्षाची टिंगलटवाळी करण्यासाठी नवीन शब्दही काळने घडवले...‘अमुक तमुक काँग्रेसवासी झाले...’ ‘गांधाळ’... सुताळ किंवा मंडई विद्यापीठ असे काही शब्द सहज आठवतात. बातमीदार श्री. माडीवाले किंवा उपसंपादक श्री. शंकरराव पाटणकर यांच्यासारख्यांच्या प्रतिभेतून ते शब्द स्फुरले असावेत असा माझा तर्क आहे.

याच संदर्भात ‘लोकशक्ती’, ‘त्रिकाळ’, ‘भारत’ किंवा नथुराम गोडसेचा

'अग्रणी' यांचा उल्लेख करायला हवा. लोकशक्तीला लोक थट्टेने कर्जशक्ती म्हणत. आचार्य जावडेकर तिचे संपादक होते. पण काँग्रेस पक्षाच्या इतर दैनिकांप्रमाणेच त्या पत्रानेही मूळ धरले नाही. संपादकाचे नाव मोठे पण खप कमी अशी अवस्था झाली.

'दैनिक प्रभात' तेव्हाही आपला विशिष्ट वाचकवर्ग टिकवून होता. वालचंद कोठारी यांच्या ढंगबाज लेखणीतून निघालेले छोटे अग्रलेख अजूनही आठवतात. त्या पत्रात वकिलांच्या नोटिसा पानभर तरी असत. मला वाटते दररोज 'लेखकाचे सदर' देण्याची कल्पना प्रभातने खूप वर्षे चालवली. प्रा. माटे यांचे 'मला काय वाटते' हे सदर लोक दररोज आवडीने वाचत. 'कृष्णद्वैपायन' (वि. श्री. मोडक) यांची 'प्रभातची किरणे' वाचण्यासाठीही लोक प्रभात विकत घेत.

कोणत्या घरात कोणता पेपर असायचा याचे त्या काळी एक कोष्टक असे. पूर्व भागात आणि व्यापाऱ्यांच्या दुकानात 'सकाळ' असे. सदाशिव-नारायण पेठेत— माजघर ओटी वगैरे असलेल्या पेशवाई वाड्यात 'केसरी' किंवा 'काळ' असत आणि अमृततुल्य हॉटेलमध्ये व सद्गुनमध्ये 'प्रभात' असे. ही वाटणी अगदी ठरलेली असे. कोठारी यांचे अग्रलेख मोफत वाचण्यासाठी मी स्वत: सदाशिव पेठेच्या हौदासमोरच्या चहाच्या दुकानात गेल्याचे आठवते.

पासष्ट साली केसरी दैनिक झाला. त्या आधी तो द्वि–त्रि साप्ताहिक होताच. केळकर हे टिळकांनंतरच्या केसरीचे प्रणेते होते, पण माझ्या जाणत्या वयात केसरीवर केळकरांपेक्षाही ज. स. करंदीकरांचा ठसा जास्त होता. त्यात ग्रहण, श्रावण्या, गीताजयंती वगैरेवर संस्कृतप्रचुर भाषेत लेख येत. पावसाचा वार्षिक अंदाजही करंदीकर पंचांगाच्या आधारे करीत. पुढे त्यांनी ते सर्व सोडून दिले, "हल्ली परिस्थिती इतकी पालटली आहे की ऋतुमानाबदलही अंदाज करणे शक्य नाही" असे करंदीकरांनी लिहिल्याचे आठवते. त्या वेळच्या केसरीवर एक प्रकारचा ब्राह्मणी सोवळेपणा होता. केळकरांच्या केसरीवर साहित्यिक रसिकपणाची छाप होती. आज सर्वच बदललं आहे.

पंचवीस वर्षांपूर्वी 'तरुण भारत' निघाला. नागपूरहून एखाद्या पत्राने पुण्यामध्ये पाय रोवण्याचा प्रयत्न करण्याची ती पहिलीच वेळ होती. तेव्हा झालेल्या चर्चा आठवतात. नागपूरहून आले असले तरी त्या पेपरवर वऱ्हाडी छाप नव्हतीच. केसरीच्या भाषाशैलीच्या छायेतच ते होते. बातम्यांची पद्धतही तशीच असे.

केतकरांनी विदेशी स्त्रीशी प्रेमलग्न केल्यामुळे जेवढी खळबळ पुण्यात उडाली होती तेवढीच त्यांनी 'तरुण भारत'चे संपादकत्व पत्करल्यानंतर झाली. तरुण भारतला एक ' नाव ' असलेला संपादक मिळाला पण संपादकाला नाव असलंच पाहिजे हा आग्रह केतकरांनंतर संपादक झालेल्या भिषीकरांनी खोटा ठरवला. त्यांना पुण्यात तरी त्या वेळी लेखक म्हणून नाव नव्हते. केळकर, करंदीकर, कोठारी, लिमये यांच्या मानाने तर अजिबातच नव्हते. तरीही त्यांनी दैनिक यशस्वी रीतीने चालवले. त्यात अनेक प्रवाहांचा समावेश केला.

आजच्या जीवनावर वर्तमानपत्रांचा किती प्रभाव आहे हे सांगणं कठीण आहे. सकाळी उठल्यावर दात न घासणारा माणूस जसा क्वचितच असेल त्याप्रमाणे पेपर न वाचणारा माणूस नसेल– अगदी झोपडपट्टीतला माणूसही कामावर निघण्यापूर्वी न्याहारी करील— न करील पण पेपर वाचेल. एकदा मी कचरा डेपोकडे जाणाऱ्या गाडीत घमेल्याने कचरा भरणाऱ्या माणसालाही सकाळी पेपर वाचताना बघितले आहे.

पूर्वी मी वर्तमानपत्रात काय वाचत असे ?... निवडणुकांचे वेळी सभांचे वृत्तान्त वाची. कुणाच्या सभेला किती हजार लोक जमले होते हे पाही. त्यावर चर्चा करी. बहुतेक सगळे अग्रलेख मन लावून वाचे. त्यात सरस नीरस ठरवी. आज तसे होत नाही... अग्रलेखांची लज्जत आज बरीच कमी झाली आहे. सभांचे वृत्तान्तही विश्वास गमावून बसले आहेत. साहित्यिकांच्या उखाळ्या-पाखाळ्यांना तर आता मुळीच भाव नाही.

दोन वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकांत मी सगळी वर्तमानपत्रे वाचून अंदाज बांधत होतो. पुण्यात ना. ग. गोरे निवडून येणार असे मी वर्तमानपत्रांवरून ठरवले होते. पण झाले उलटेच !... त्याच वेळी मनात विचार आला की लोक वर्तमानपत्रं वाचतात पण तसं वागतातच असं नाही.

ते काहीही असलं तरी अजूनही माझं वर्तमानपत्रांचं वेड कायम आहेच. कुठेही हिंडत असलो आणि पेपरचा स्टॉल दिसला की मी तिथे घोटाळतो... सकाळ... तरुण भारत... केसरी... प्रभात ही वर्तमानपत्रं नुसती डोळ्यांनी बघितली तरी मला समाधान वाटतं.

## १७

## ‘ इतिश्री ! ’

संध्याकाळी बराच वेळ बंगल्यात एकटा होतो. मुलं बाहेर गेली होती. ती नेहमी जातातच. पण बायकोही लग्नाला दुपारपासूनच गेली होती. सगळा बंगला मला खायला उठला होता.

दुपारी चहा झाल्यावर मी बाहेर येऊन उभा राहिलो. अवतीभवतीच्या बागेकडे पाहिले. फुलं फुलली होती. पण आसमंत अगदी शांत होता. आसपासचे बंगलेही बंदच होते. पलीकडच्या बगल्यातले वयस्कर गृहस्थ बाहेरच्या झाडांना पाईपने पाणी घालत होते. मी त्यांच्याकडे पाहिले आणि त्यांनी माझ्याकडे पाहिले. मला बोलावंसं वाटलं पण बोललो नाही. मी तसा वृत्तीने ‘ नारायण पेठी ’ आहे. आसपासच्या लोकांशी बोलावं, त्यांच्या संसाराबद्दल चौकशा कराव्यात, गप्पांचे फड रंगवावेत असं मला नेहमी वाटतं. माझ्या मनाला तशी भूक आहे. पण शेजारच्या बंगल्यातल्या माणसाला तशी भूक आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. बहुधा नसावी. गेली आठ-दहा वर्षे आमचे बंगले शेजारी शेजारी आहेत. पण एकमेकांशी औपचारिकतेशिवाय आम्ही जास्त बोललेलो नाही. ते पूर्वी काय करीत होते, त्यांना मुलं किती...मुली कुठे दिलेल्या आहेत, त्यांचं नवऱ्याशी पटतं किंवा नाही...सांपत्तिक परिस्थिती कशी आहे मला काही माहिती नाही. त्यांनाही माझ्याबद्दल नाही.

बाहेर उभं राहून कंटाळा आला. मी स्वतःशीच हसलो आणि आत आलो.

माझं लहानपण आणि तरुणपण ज्या बिऱ्हाडाच्या वाड्यात गेलं तिथली आठवण झाली. तिथे मी एकटा कधी नसेच. साधं सकाळचं वर्तमानपत्र वाचताना किंवा चहा घेताना आसपासच्या बिऱ्हाडांतली माणसं असत. दैनिक वर्तमानपत्र एकट्यानं कधी वाचायचंच नसतं. मागून पुढून त्यात इतरांनी तोंडं घातली पाहिजेत असा तिथे शिरस्ता होता...माझ्या बहिणीला पाहायला आले होते आणि बाहेरच्या खोलीत वधूपरीक्षा चालली होती. त्यावेळीही आसपासच्या बिऱ्हाडांतील दारं-खिडक्या माणसांनी भरून गेली होती. प्रातर्विधीपासून रात्रीच्या झोपेपर्यंत आम्ही कधी एकटे नसायचोच !...मला स्वतःला तो सर्व सीन आठवला आणि खुदूखुदू हसू आले.

मुलाने बंगला बांधला तेव्हा पहिले काही दिवस मी शेजारच्या बंगल्यातल्या माणसाशी संबंध वाढवण्याचा किंवा गप्पाष्टके जमवण्याचा प्रयत्न केला होता. मुलाच्या ते लक्षात आले तेव्हा तो म्हणाला, "तुम्ही भलते उपद्व्याप करू नका. इथे असं एकमेकांशी उगीचच बोलत बसायची पद्धत नसते...प्रत्येक बंगल्याचं युनिट सेपरेट असतं... तुमच्या डोक्यातली ती नारायण-सदाशिव विसरा...हा बंगला आहे."

त्यानं मला झापलं आणि मीही बंड करायचा प्रयत्न केला नाही. मुलाचं म्हणणं खरंच होतं...हा बंगला आहे...ती निराळी संस्कृती आहे...मी तिकडचा असलो तरी मला इथेच रमायला पाहिजे...इथेच सामावून जायला पाहिजे.

घड्याळाचे काटे पुढे सरकत होते. अजून घरातल्या लोकांना यायला अर्धा तास तरी अवकाश होता. मी एकटाच सुन्नपणे आत बाहेर करत होतो. शेजारच्या दोन्ही बाजूंच्या बंगल्यांतली वयस्कर माणसेही तसंच करीत असावीत. आम्ही सगळे अ वर्गाचे कैदी होतो. सगळ्या सुखसोई होत्या पण गप्पा मारण्याचा आनंद नव्हता...प्रत्येकजण ' सेपरेट 'मध्ये बंद होता.

मी आत आलो आणि उगाच बसलो. इतक्यात बाहेरची घंटा वाजली. मला खूप आनंद झाला. निर्जन बेटावर दुसरा मनुष्यप्राणी आला होता. मी उठलो आणि दार उघडले.

बायको आत आली. तिची आता साठी उलटली आहे. पण तिने जॉर्जेटचे पाचवारी पातळ नेसले आहे. ब्लाऊजची रंग-संगती जमवली आहे. अंगाखांद्यावरही फारसे दागिने नाहीत...मला उगीचच लहानपणी पाहिलेल्या नऊवारी

इरकली लुगड्यातल्या नाकात नथ आणि गळ्यात चपलाहार असलेल्या बायका आठवल्या. खरं तर माझी बायकोही पूर्वी तशीच होती, पण आता ती देखील 'मॉडर्न' झालेली आहे.

तिने कपाटात पर्स ठेवली आणि बाहेर येऊन म्हटले, "आज आपल्या जुन्या आळीत लग्नाला गेले होते...तिथे केवढं टोलेजंग कार्यालय झालंय."

माझ्या काहीच लक्षात आले नाही. मी नुसताच बघत राहिलो. ती बोलण्याच्या भरात होती. समोरच्या कोचात बसत म्हणाली, "आपलं लग्न झालं तेव्हा त्या वाड्यातच पहिली आठ-दहा वर्षं संसार झाला. मागच्या चौकातली जागा होती. बघावीशी वाटली..."

"खूप मजा वाटली असेल...जुन्या ओळखीच्या व्यक्तीला भेटावं तसा आनंद वाटला असेल...कोण कोण जुन्या बायका दिसल्या?"

ती खूप हसली. मग क्षणभराने गंभीर होत म्हणाली, "तेच सांगते आहे–कोणीही जुनं भेटलं नाही...तो वाडाही नाही!"

"म्हणजे? तूच आत्ता म्हणालीस ना मी मुद्दाम तिथे गेले होते..."

"अहो, तो वाडा तिथे नाहीच आहे. तो पाडून आता ओनरशीप ब्लॉक केले आहेत. दुसऱ्या मजल्यावर मुंबईच्या ओळखीच्या एका बाई दिसल्या. त्यांनी आता तिथे ब्लॉक घेतला आहे. दीड लाखाला! त्यांच्याकडे गेले आणि बाहेरच्या गॅलरीतून रस्त्याकडे पाहिले. सगळी सृष्टीच बदलली आहे. जुनं काहीही नाही. जुन्या खाणाखुणा पार पुसून गेल्या आहेत. एवढी दहा-बारा वर्षं आपण तिथे राहिलो. पण ती गल्लीदेखील आता मी ओळखणार नाही."

मी काही वेळ गप्प बसलो. मन आत कुठेतरी हाललं. तीच पुढे म्हणाली, "गंमत अशी की नुसती घरंच बदलली आहेत असं नाही तर माणसंही बदलली आहेत. मी दहा-पंधरा मिनिटं मुद्दाम पाहिलं... धोतर नेसलेला पुरुष आणि नऊवारीतली बाई एकही दिसली नाही... लग्न होऊन मी वाड्यात आले तेव्हा बहुतेक लोक सकाळी गंजीफ्रॉक न घालता उघड्यानं वावरत असत. आता तिथे बिनगंजीफ्रॉकचा किंवा दाढी न केलेला एकही माणूस दिसला नाही."

मला तिच्या निरीक्षणाचे हसू आले. खरोखरच तेव्हा आम्ही उघड्या अंगाने वावरत होतो. आम्हाला त्यात काही विपरीत वाटायचं नाही. ती मुंबईची!... गोरेगावकर चाळीत तिचे वडील राहायचे...दादरला लतीफ बिल्डिंगमध्ये चुलते!

त्यामुळे ती जास्त मॉडर्न किंवा पुरोगामी ! तिच्या ते बरोबर लक्षात येणारच.

मला आठवलं. लग्न झालं आणि आमचा संसार सुरू झाला. ती नेहमी 'वाडा सिस्टिम' बद्दल धुसपूस करी... तिथे प्रायव्हसी नाही... कुणीही कुणाच्या घरात घुसतो... दाराखिडक्यांना पडदे नाहीत... एकाच्याही घरात चांगले फर्निचर नाही. तिच्या अशा तक्रारी असत.

एकदा ती म्हणाली होती, " वाड्याचं वातावरण सरंजामशाही पद्धतीचं आहे. मालक स्वतःला समजतात कोण !... असतील श्रीमंत ! पण तुम्ही त्यांना एवढी किंमत का देता ?... त्यांच्या घरी भाडं का नेऊन देता ?... दुपारच्या वेळी त्यांची झोपमोड होऊ नये म्हणून इतर बिऱ्हाडांत दळायचं नाही, कुटायचं नाही हा कुठला नियम ! "

मी विचारले होते, " मुंबईच्या चाळीत नसतं वाटतं असं ? "

" अहो, तिथे कोण कुणाला विचारतो... आणि अशी कुणाची ठाकुरकी तिथे चालू देणारच नाहीत... तिथे मालक दिसतोय कशाला... 'गोरेगावकर चाळ' म्हणायचं इतकंच, पण एकही 'गोरेगावकर' त्या चाळीत आलेला देखील नसेल. तो कशाला गर्व दाखवतोय... इथे उथळ पाण्यालाच खळखळाट फार... "

मला तेव्हाही हसू आलं होतं. चाळ आणि वाडा यामधला फरक तिनं बरोबर दाखवून दिला होता... दोन्हीही बिऱ्हाडाचीच घरं. पण चाळ ती चाळ आणि वाडा तो वाडा !... सहज लक्षात आलं की चाळ ही जास्त कॉस्मॉपालिटन असते. ब्राह्मण, मराठे, शेणवी, प्रभू नि सारस्वत यांच्या स्वतंत्र चाळी पूर्वी असत, पण तो जमाना केव्हाच संपला होता. चाळीत निरनिराळ्या उपजातींचे लोक, मनात एकमेकांना तुच्छ लेखत, हलक्या आवाजात परजातीच्या लोकांची टिंगल करीत पण बाह्यतः एकत्र राहात.

पुण्यातला सदाशिवपेठी वाडा हामात्र निर्भेळ ब्राह्मणी असे. त्यातही 'चित्पावनी' आणि 'देशस्थी' असेही प्रकार होतेच ! नाना पेठेत किंवा भवानी पेठेत फार मोठं सोशल लाईफ होतं असं नव्हे. तिथेही मराठ्यांचे, सोनारांचे आणि माळ्यांचे निराळे वाडे असत. पण 'ब्राह्मणी–चित्पावनी' वाड्यांची तटबंदी जास्त भक्कम होती हे मात्र खरे.

मला अनेक शनिवारपेठी आणि सदाशिवपेठी वाडे आठवले आणि गंमत

वाटली. मी बायकोला म्हटले, "तुम्हा लोकांची चाळीबद्दल काय भावना असते ?... उद्या जर तुमची चाळ पडली किंवा पाडली, तिथे एखादं आठ दहा मजली हॉटेल झालं तर तुला कसं वाटेल... तुमच्या भावना हलतील का ?"

बायकोने तसा कधी विचारच केलेला नसावा... चाळ ही चिरंतन टिकणारी वस्तू आहे असा तिचा समज असावा. चाळीला वाड्याप्रमाणे विनाश काल नसतो असं तिला वाटत असावं.

माझ्या प्रश्नावर ती किंचित निरुत्तर झाली. काही विचार करीत ती म्हणाली, "गोरेगावकरांची चाळ जर उद्या नाहीशी झाली तर मला काय वाटेल !... वाईट नक्कीच वाटेल. पण वाड्याचं नाहीसं होणं... एखाद्या बंगल्याचं नाहीसं होणं आणि एखाद्या चाळीचं नाहीसं होणं यात फरक आहे. तुम्ही जेवढे अस्वस्थ होता तेवढी मुंबईच्या चाळीबद्दल मी होणार नाही..."

ती काही वेळ नुसतीच बसून राहिली. मग एकदम गंभीर होत म्हणाली, "खरंच !...मोठी गंमत आहे नाही ?...आमच्या मजल्यावरही सगळी ब्राह्मणाचीच बिऱ्हाडं होती. सगळ्यांना तसा अभिमानही होता. पण वाड्यातली बिऱ्हाडं नि चाळीतली बिऱ्हाडं यांत फरक आहे...काय तो सांगता यायचा नाही..."

संभाषणाला जरासं गंभीर वळण लागतंय हे तिच्याही लक्षात आले. ती हसत म्हणाली, "मी मुंबईची आहे...पण निम्मी पुण्याचीही आहे. वाड्याशीही माझे लागेबांधे आहेत...इथल्या अनेक गल्ल्यांशी माझं नातं जडलं आहे. चाळ पडली तर काय होईल हा निराळा प्रश्न ! पण तो वाडा नाहीसा झाल्याचं मी स्वतः पाहिलं आणि मला एकदम तुमची आठवण झाली. एखादा म्हातारा नातेवाईक वारला म्हणजे माणसाला जसा शॉक बसतो...तो मरणार आहे हे माहीत असूनही शॉक बसतो तसं तुमचं होणार याची कल्पना मला होती. घरी येत असताना मी तुमचाच विचार करीत होते..."

ती काय बोलत होती हे मला ऐकूच येत नव्हतं...माझी बेचैनी फार वाढली. वर्ष दोन वर्षांपूर्वी एका कातर संध्याकाळी मी अशीच आमच्या जुन्या गल्लीची आणि परिसराची सफर किंवा यात्रा केली होती...वाड्याच्या मागचा पार पडला होता. मुंजा हलण्याच्या तयारीत होता. ठिकठिकाणी चुन्यामातीचे ढीग पडले होते. बाहेरच्या चौकातली सगळी बिऱ्हाडं कुलूपबंद होती. फक्त विसुभाऊचा एक वंशज तिथे जीव धरून होता.

मृत्यूने आपले पाश त्या वाड्यावर टाकले होते तरीही त्या वाड्यात धुगधुगी होती. आता ते सगळंच संपलं होतं. प्लेगच्या साथीत उंदीर मरावेत त्याप्रमाणे आळीतले सगळे जुने पेशवाई वाडे धारातीर्थी पडले होते... शेवटी आमच्या वाड्याचीही ' इतिश्री ' झाली होती.

...बाहेरच्या प्रांगणात स्कूटरचा आवाज ऐकू आला. मुलगा आणि सून दोघंही कामावरून परत आले. स्वयंपाकघरात गॅस पेटला. खमंग पदार्थांचे वास बंगलाभर दरवळले...माझी बायको खोलीतून उठून केव्हाच दिवाणखान्यात जाऊन बसली. त्या तिघांचे हास्यविनोद चालू झाले. गमतीची बोलणी सुरू होती...

मी काही क्षण त्या बोलण्याकडे कान दिले... एवढा मोठा!... जवळ जवळ शंभर वर्षांपूर्वीचा आमचा वाडा मृत्युमुखी पडला. त्याचं त्या तिघांनाही दु:ख नव्हतं. त्याची जाणीवही नव्हती. त्या कैलासवासी झालेल्या वाड्याबद्दल एखादा शब्द बोलावा असंही त्यांना वाटत नव्हतं.

मुलगा आणि सून मनाने आणि संस्कृतीने वेगळी आहेत. त्यांच्या घरात आंघोळीचं पाणी गीझरवर तापतं... स्वयंपाक गॅसवर होतो. हिंडणं फिरणं स्कूटरवर होतं... त्यांची संस्कृती परीटघडीची आहे. गंजीफ्रॉकशिवाय माणूस त्यांनी अजून पाहिलेला नाही. त्याची ते कल्पना करू शकत नाहीत... पण बायकोची गोष्ट वेगळी !... तिला ते जग माहीत आहे. तरीही तिला त्याबद्दल आपलेपणा नाही. तिचं मन हलत नाही.

बाहेरच्या हॉलमध्ये टी. व्ही. वर कसला तरी धांगडधिंगा सुरू झाला, मी खाली मान घालून वरच्या मजल्यावरच्या बेडरूममध्ये गेलो. थोडी संध्याकाळ झाली होती. पण दिवा लावला नाही. अंधारात तसाच बसून राहिलो.

माझ्या मनासमोर अनेक वाडे दिसत होते... आडव्या अंगाचे...मोडकळीस [illegible]... कौलारू ! तिथे अनेक ब्राह्मण कुटुंबे नांदत होती... सरकारी [illegible]ांत कारकुन्या करणारे किंवा शाळेत शिक्षक असणारे, भिडे, पटवर्धन, [illegible]. अपुऱ्या पगारावर स्वतःच्या खांद्यावर संस्कृतीचं ओझं वागवत जगत [illegible]त... त्यांच्या बायका !... उमाबाई... रमाबाई... कृष्णाबाई !... बघण्यासारखं त्यांच्यात काही नाही. पण एक चमत्कारिक पीळ आहे. अहंता आहे... त्यांची मुलं आणि मुली !... त्रिविक्रम, श्रीकृष्ण, पांडुरंग... लीला आणि

विमला... त्यांपैकी प्रत्येकाला देशभक्त व्हायचं असतं... सावरकरांचा आणि टिळकांचा आदर्श त्यांच्यापुढे असतो. जाडेभरडे, घरी धुतलेले कपडे ते घालतात... प्रेम वगैरे त्यांना करावंसं वाटतं पण ते करत नाहीत. हॉटेलात जात नाहीत... हरिभाऊ आपटे... ना. ह. आपटे, साने गुरुजी हे त्यांचे लेखक !...हडप किंवा फडके वाचावेसे वाटतात पण ते चोरून. एखादे वेळी. नेहमी आपली श्यामची आई किंवा सुखाचा मूलमंत्र !...

मला काय वाटले कुणास ठाऊक !... टेबलावरचे कागद पुढे ओढले आणि मी लिहीत गेलो.

माझ्या डोळ्यांसमोरून अनेक वाडे येत होते. नाना वाडा ... मोरोबादादाचा वाडा... शनिवारवाडा ... गाय आळीचा राम ... ओंकारेश्वराचं देऊळ ... शनिवारातला गाडगिळांचा वाडा ... वाडेच वाडे ! त्यांच्या तुळयांवर खडूने 'शीलम् परम् भूषणम् ! '...' सत्यसंकल्पाचा दाता भगवान । '...' मरावे परी कीर्तिरूपे उरावे '...' साधी राहणी उच्च विचारसरणी '...' लौकर निजे लवकर उठे तया ज्ञान आरोग्य संपत्ती भेटे । ' वगैरे बोधवाक्ये लिहिली होती.... गणपतीच्या मिरवणुकीत एक एक गणपती समोरून मिरवत जावा त्याप्रमाणे ते वाडे समोरून जात होते आणि काळसमुद्रात कोसळत होते.

समोरच्या कागदावर मी काय लिहीत होतो हे माझं मलाच कळत नव्हतं पण मी लिहीत चाललो होतो. जी वाडासंस्कृती मृत झाली, तिच्याबद्दल मला दुःख वाटत होतं का ? नक्की सांगता यायचं नाही..... बंगल्यात मी दुःखी होतो का ? तेही सांगणं अवघड ! माणसाच्या जीवनात बदल हा हवाच. तो प्रगतीचा निदर्शक आहे....

पण ... तरीही ! ... तरीही !...

मी कागद समोर ठेवून अंधारात किती वेळ बसलो होतो कुणास ठाऊक. बायको वर आली आणि तिने आश्चर्याने विचारले, " अहो, अंधारात कसली लिहिताय ? "

मी भानावर आलो. बायकोकडे पाहात म्हटले..."ही एक श्रद्धांजली वाडासंस्कृतीस ! "

बायकोने तो कागद वाचला. थोडं हसत ती म्हणाली, " शेवटचं वाक्य राहिलं... ईश्वर मृतात्म्यास शांती देवो ! "



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९६०
वा. क्र. २३६५३
निबंधसंग्रह

REFBK-0023683